19/02/2015

श्री महाराजांचे
अप्रकाशित
अनुभव

**नामा म्हणे आम्हा थोर लाभ झाला।**
**सोईरा भेटला अंतरीचा।।**

## मल्लिकार्जुनाला अभिषेक

साधकाच्या अंत:करणातील भक्तीभाव सदगुरुंना त्यांच्याकडे खेचून आणीत असतो आणि सद्गुरुंची साधकावर असलेली कृपादृष्टी त्याला उपासनेच्या पथावर मार्गक्रमण करीत असता बळ देत असते.

'श्रीं'चा नारायण नावाचा हा भक्त. श्रीक्षेत्र नृसिंहवाडीला 'श्री'च्या सान्निध्यात असता त्यांनी ''काय उपासना करावी, ७ दिवस आहेत'' तेव्हा श्रीशिवलीलामृत ग्रंथाची (पोथीची) ७ दिवसात अकरा पारायणे करण्यास श्रींनी सांगितले. कधीतरी थोडेसे वाचन केलेला नारायण अतिशय घाबरला. म्हणजे रोज किमान ९-१० तासाची बैठक होणार ! श्रींनी त्याची काळजी जाणली. ते म्हणाले ''अहो, ज्यांचे ते करुन घेतात, आपण काळजी कशाला करायची ? सुरवात करा.'' त्याप्रमाणे नारायणाची अनुष्ठानाला सुरवात होऊन ते पूर्णही झाले. त्यावर श्री उद्‌गारले, ''येथे झालेल्या अनुष्ठानाचे कोटी गुण फळ आहे.''

श्रीशंकर हे नारायणाचे उपास्य दैवत. त्याचीआराधना करण्याचं मार्गदर्शन त्याला आधीच घडले होते. त्यानुसार आराधना चालू होती. तथापि, श्री मल्लिकार्जुन लिंगाची अभिषेकपूर्वक पूजा स्वत:कडून एकट्याने गाभाऱ्यात व्हावी अशी तीव्र इच्छा मनात होती. त्यावेळी 'श्री' श्री शैल्य मल्लिकार्जून यात्रेसाठी भक्तासह हैद्राबादला आले होते. प्रवासाला निघण्याच्या आदल्या दिवशी श्रींनी नारायणास आज्ञा केली की ''आत्ताच्या आत्ता श्री शैल्यकडे एकट्याने पुढे प्रस्थान करावे.''

अपरिचित प्रांत, न कळणारी भाषा, न वाचता येणारे फलक. मोडक्या संभाषणाने वाहन सापडले. आंत गेल्यावर एक जागा मिळाली. श्रीगुरुंचे वचनांचे पुस्तक काढून वाचन व चिंता करीत करीत नारायण निघाला. चिंतेचे मुख्य कारण असे होते की पूर्वी कधीही जेथे गेला नाही त्या क्षेत्राचे ठिकाणी ''पुढे जाऊन श्रीगुरुंची व्यवस्था '' करायला आज्ञा झाली होती. हे कठिण कार्य श्रीगुरू आज्ञेने अंगिकारले होते व ते कसे संपन्न होईल याचीच चिंता होती.

प्रवासात यांच्या शेजारी बसलेला प्रवासी यांच्या हातातील मराठी पुस्तकाकडे वारंवार पहात होता. पण नारायणाला ''आपण आंध्र प्रांतातील वाहनात आहोत व आपण कोणाशीही त्यांच्या भाषेत संवाद साधण्यास पूर्णपणे असमर्थ आहोत याची मनोमन कल्पना होती. अशातच अचानक शेजारचा प्रवासी चक्क मराठीत नारायणाची चौकशी करू लागला. थोड्या संभाषणानंतर नारायणाला सुखद धक्का देणारे ''श्रीं चे कृपा दर्शक'' सत्य कळले. शेजारचा प्रवासी माधव हा श्रीगुरुंना ओळखणाराच नव्हे तर त्यांचा भक्त व शिष्यच आहे. तोही श्रीशैल्यालाच जातो आहे व कळस म्हणजे तो वैदिक ब्राह्मण श्री मल्लिकार्जुनाचा वेद पाठ करण्यासाठी नेमलेला सेवक आहे तसेच श्रीशैल्याला राहाणारा आहे.

त्याने आस्थेने सर्व परिस्थिती विचारली व समजल्यावर आश्वासन देऊन सर्व व्यवस्थेची काळजी सोडून देण्याचे सांगितले.

नारायण व माधव श्रीशैल्याला पोचले. धूळ भेट झाली. माधवाने अचानक विचारले, ''तुझा सोमवार (उपवास) आहे ना ? माझ्याकडे चल. तेथे सोमवार सोड. तेथेच विश्रांती घे.'' विशेष म्हणजे नारायणानी आत्तापर्यंत न उल्लेखलेली त्याची ''सोमवार कसा सोडावा '' ही समस्या अशी सुटली.

अति आश्चर्याचा भाग अजून पुढेच आहे. माधवाने आपण होऊन विचारले''तुला मल्लिकार्जुनाला अभिषेक करायचा आहे का? मग पहाटे पाचला तयार रहा.''

आणि काय घडले हे सांगण्याची गरजच नाही. नारायणाला प्रत्यक्ष पूजेसाठी अर्धातास गाभाऱ्यात शिवलिंगाचे सान्निध्य पूर्ण एकांतात जसे व्हावे असे तीव्रतेने वाटत होते तसेच सर्व घडले. अतिशय आनंद व समाधान वाटले.

आता पुढची मुख्य समस्याही माधवने चुटकीसरशी सोडवली. एक संपूर्ण बंगला श्रीगुरु व सर्व भक्तांच्या निवासाला सज्ज करून दिला. पहाटे ६ वाजता या बंगल्याच्या दारासमोर नारायण व माधव श्री गुरुंच्या आगमनाची प्रतिक्षा करीत उभे होते. इतक्यात वाहनातून 'श्री' आले. उतरल्या बरोबर नारायणाला पहिला प्रश्न,'' काय सर्व मनासारखे झाले ना? '' परतीच्या प्रवासात नारायण श्रीगुरुंबरोबर आला.

## पुण्य आले फळाला !!

श्री महाराजांचे निर्मळ प्रेम लाभलेल्या लक्ष्मी नावाच्या साधिका ! लहानपणापासूनच दत्तमहाराजांचा सगुण सहवास यांना लाभला. श्रींच्या कृपेचे अलौकिक अनुभव त्यांना येतात. स्वप्नदृष्टांताच्या रुपाने श्री सतत त्यांच्याजवळ आहेत. अतिशय नम्रतेने त्या आपले अनुभव नोंदवितात...

श्रीवासुदेव निवास आश्रमात 'श्रीं' चे सायंकाळी येणे होत असे. त्यांची वेळ ठराविक असे. आश्रमात जाऊन 'श्रीं'चे दर्शन घेणारे, त्यांची येण्याची वेळ नियमित साधणारे अनेक भक्त होते त्यात ह्या 'लक्ष्मी' होत्या. एकदा ह्या रोजच्या प्रमाणे ४ वाजता आश्रमात आल्या. महाराजांचे गर्दीमुळे लांबून दर्शन घेतले व वर गुरुमहाराजांच्या खोलीत साधनेला बसल्या. त्या दिवशी नेमकी साधना लांबली. बैठक संपवून जेव्हा खाली आल्या तेव्हा महाराज घरी निघून गेले होते.

तथापि, यथाशक्य सेवेस नित्या प्रमाणे सुरवात केली. कोठे झाडलोट, कोठे दुसरे दिवशीच्या पूजेची तयारी इ. सुरू होते त्यासाठी पहिल्या मजल्यावरील हॉल मधे त्या असताना अचानक खाली ऑफिसकडे 'श्रीं'च्या आवाजाचा भास झाला. आताच घरी गेलेले श्रीगुरु लगेच परत आले असे कधीच झाले नाही. आज असे कसे? हा विचार करीत जिना उतरुन आल्या तर 'श्री' त्यांच्या नेहमीच्या खुर्चीत ऑफिसमधे बसलेले दिसले. 'श्रीं'च्या जवळ सौ. सविता वहिनी होत्या. भास्करराव होते. बाकी सर्वत्र शांतता होती. पुढे जाऊन त्यांनी आनंदाने 'श्रीं' ना नमस्कार केला. 'श्रीं' नी खडीसाखरेची पुडी हातात दिली व ''**काम झाले ! चला!** असे म्हणून आश्रमा बाहेर पडले. दारातच आणखी एका दांपत्याला उभ्या उभ्या दर्शन झाले. न्यायला आलेल्या वाहनात बसून 'श्री' सौ. सविता वहिनीं सह निघून गेले.

येथपर्यंत सर्व प्रत्यक्ष जागेपणी उघड्या डोळ्यांसमोर घडले. त्या नंतर ''आज 'श्री' दुसऱ्यांदा कसे काय आले याची चर्चा करताना लक्षात आले की 'श्री' दुसऱ्यांदा आलेच नाहीत. सौ. सविता वहिनींनीही सांगितले की त्या आश्रमात आल्याच नाहीत.''

म्हणजे केवळ त्या साधिकेचे दर्शन चुकल्यामुळे अंतरातील झालेली तळमळ 'श्रीं' पर्यंत पोचून दुसऱ्या रुपाने ते येऊन दर्शन देऊन गेले. खडी साखरेची पुडी तेव्हढी सत्यतेला साक्षी म्हणून हातात होती. या प्रसंगातून 'श्रीं' ची भक्तवत्सल भक्ताभिमानी भूमिका तसेच श्रींच्या अंतरंगातील असलेली साधिकेची जागा या दोन्हींचे प्राकट्य झाले आहे.

## स्मर्तृगामी स्वभक्तानां

एका देवस्थानात एका यागासाठी 'श्रीं' चे येऊन राहाणे झाले तेव्हा या साधिका तेथे होत्या. 'श्री' तेथून पुढच्या कार्यक्रमासाठी निघून गेले. त्यांना सारखी आठवण येत होती. पुन्हा केंव्हा भेटतील अशी तळमळ लागली होती. हाताला कांहीतरी उद्योग म्हणून खोलीत 'श्रीं' साठी असलेली बैठकीवरील गादी नीट करून चादर पुन्हा ताठ करून ठेवली. इतक्यात त्यांना झोप येऊ लागल्याने त्या आसना नजीक चटई आंथरून निजल्या. थोड्या वेळाने जाग आली तो त्यांना चटई शेजारी उशीजवळ खडीसाखरेची 'श्री' नेहमी देत तशी पुडी असलेली दिसली. आसनाकडे जाऊन बघितले तर वर बसून-उठून गेल्यावर जशी चादर मधे खोलगट व सुरकुत्या पडलेली होईल तशी दिसली. आठवले की निजण्या आधी ही चादर नीट केलेली होती. 'श्री' यांची आठवण व हुरहुर जाणून तेथे दुसऱ्या रुपाने येऊन गेल्याचे ह्या खुणा व खडी साखरेची पुडी ग्वाही देत होत्या. प्रत्यक्ष दिसले नाहीत याचे दुःख परंतु आपली ओढ यांनी जाणली व येऊन प्रसाद देउन गेले याचा आनंदही झाला.

## । तस्मात् गुरुं प्रपद्येत ।

इहलोक साधायाकारणे । जाणत्याची संगती धरणे।
परलोक साधाया कारणे। सद्गुरु पाहिजे ।।

हा लौकिक व्यवहार व परमार्थातील लाभाचा एक संकेत श्री समर्थांनी सांगितला. आपले परम कल्याण व्हावे असे वाटत असेल तर सद्गुरुंना शरण जावे असे स्पष्ट मार्गदर्शन केले. आत्मानुभवी, आत्मसाक्षात्कारी संत सद्गुरुंचे अनुभव हे नेहमीच साधकाला कृतार्थ करणारे, बोध देणारे असतात.

अशा सद्‌गुरुंचे विशेष सामर्थ्य आणखी असे असते की ते ज्या जीवावर कृपा, अनुग्रह करतात, त्या जीवाच्या ठिकाणी विलक्षण आकर्षण भाव जागृत होतो, तळमळ लागते. एवढेच नव्हे तर त्या जीवाला आपल्यापर्यंत आणण्यासाठी त्याच्या जीवनात अनपेक्षित योगायोगही घडवितात व त्या ध्येयापर्यंत आणून पोचवितात. हे सद्‌गुरुंचे भक्तवात्सल्यच असते !

एका परिवारातील एका तरुणाला त्यांच्या घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्यासह 'श्रीं'चा अनुग्रह मिळण्याची अनुकूलता प्राप्त झाली होती. पण बालबुध्दी प्रमाणे असे वाटले की प्रपंचातील वाढत्या जबाबदाऱ्या व व्यवसाय सांभाळून **'गुरुदत्त मंत्राचा'** जप नियमितपणे होणे शक्य नाही. या शंकाकुशंकांच्या जालात सापडून तो दीक्षा प्राप्तीचा योग स्वतःच ''नको'' म्हणून घालविला.

कालांतराने मनात अचानक असा भाव जागृत झाला की ''आपण गुरुमंत्र घेतला पाहिजे. त्याच सुमारास एकदा स्वप्न पडले. यांच्या राहत्या घराच्या दारात मंगलमय सडा-रांगोळी केलेली दिसली. घरात पवित्र व आनंदाचे उत्साहाचे वातावरण, हॉलमध्ये पूजेची तयारी-फुले,पेढें, हे दिसले व तेथील खुर्चीत लाल शाल पांघरलेली व्यक्ती दिसली. जुळलेली पाउले दिसली पण ओळख पटेल असे दर्शन झाले नाही.

या स्वप्न दृष्टांताचा अर्थ काय असावा असे चिंतन करताना १४ वर्षापूर्वी गुरुमंत्र घेण्याची संधी आपण घालविली, पण आता मात्र प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजाकडून गुरुमंत्र मिळावा अशी तीव्र इच्छा मनात जागी झाली.

'श्रीं' चे पुण्यात वास्तव्य, हा परिवार दूर परगावी राहणारा. व्यवसायातील अति प्रतिकूल परिस्थिती, मानसिक व प्रापंचिक ताण तणाव खूप जाचक झालेले. त्यामुळे पुण्याला जाणे अशक्य होते व ह्याची खंत वाटून गुरुमंत्र मिळण्यासाठी तळमळ अधिकच तीव्र झाली होती. आर्तता वाढली होती.

अशातच एकदा सायंकाळी फिरायला म्हणून बाहेर गेलेले तो वाटेत एक परिचित गृहस्थ अचानक भेटले. त्यांचे कडून कळले की प.पू. श्री दत्तमहाराजांचे त्या गावात आगमन झाले असून अमुक ठिकाणी 'श्रीं' चा मुक्काम आहे. हे

कळल्यावर आनंदाने भरून आले व ‘श्री’ किती दयाळू आहेत;’ आम्ही त्यांच्यापर्यंत पुण्याला जाऊ शकलो नाही तर कांही निमित्त म्हणून तेच येथे आलेत, ह्या विचाराने, त्यांचे केंव्हा एकदा दर्शन होईल अशी घाई झाली. सर्व परिवार ‘श्रीं’च्या निवासाच्या घरी पोचला तेंव्हा आधीच थोडा उशीर झालेला होता. तेथे पोचल्यावर दर्शनासाठी प्रतीक्षा करीत थांबले.

बऱ्याच वेळानंतर तेथील व्यवस्थापक आले व ‘श्रीं’ ची फराळ इ. होऊन आता विश्रांतीची वेळ झाली आहे. तरी आपण उद्या या असे सांगू लागले. खरोखरीच सुमारे रात्री १०.३०-११ वाजायची वेळ झालेली होती. खूप काकुळतीने सांगून पाहिले. उद्या बऱ्याच समस्या असल्याने कदाचित गावातल्या गावात सुध्दा येणे कठीण वाटत होते. शेवटी त्या व्यवस्थापकांना दया आली. ते सांगू लागले की ‘श्री’ ज्या खोलीत वाचत बसलेले आहेत तिचा दरवाजा थोडा किलकिला (अंशतः उघडा) आहे. त्या फटीतूनच दुरून दर्शन घ्यावे व निघावे. त्या प्रमाणे दाराच्या फटीशी वाकून वंदन करीत होते तितक्यात ‘श्रीं’ ची दृष्टी यांचेकडे गेली. खुणेने ‘आत या’ असे सुचवले.

अति आनंदाच्या भरात -भांबावलेल्या स्थितीत झटकन जाउन प्रत्यक्ष दर्शनाला वाकले व गडबडीने मुखातून शब्द निघाले ‘‘महाराज, आम्हाला गुरुमंत्र घ्यायचा आहे.’’ ‘श्रीं’ च्या मुखावर सूचक भाव (आता आलात तर?) व हास्य उमटले. शेजारी असणाऱ्या सेवेकरी व्यक्ती कडून दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम काय आहे ते जाणून घेतले. पहाटे ७-७॥ ला ‘श्रीं’ ना पुढील कार्याची व्यस्तता राहणार होती यांना ६॥ वाजता स्नान करुन सोवळे नेसून हजर राहा म्हणून सांगितले व प्रेमाने निरोप दिला. आनंदातिशयाने रात्रभर झोप आली नाही. लवकर उठून सर्व आटोपून ६॥ ला ‘श्रीं’ च्या द्वारात पोचले.

‘श्रीं’नी सर्व मंत्र देण्याचा विधी करवून घेऊन कृपा अनुग्रह दिला. त्या वेळी शरीर कापसासारखे हलके झाले, परमानंदाची अनुभूती आली. शक्ति जागृती झाल्याची जाणीव देणारे बरेच स्थूल सूक्ष्म अनुभव आले.

**''आनंदाचे डोही, आनंद तरंग, आनंदचि अंग, आनंदाचे''** अशी अवस्था क्षणभरात झाली. तात्काळ अनुभूती मिळाली. त्या वेळी 'श्रीं' च्या कडे पाहताना तेजस्वी सूर्याची पण शीतल प्रखरता त्या रुपाचे ठिकाणी दिसली.

**मार्तंड जे तापहीन ।।** ही श्री ज्ञानेश्वर माउलींच्या पसायदानातील उपमाच तेथे योग्य होती.

भाव असावा आपुले मनी । पूजा करावी श्रीगुरुचरणी ।।

हे त्या नंतर नित्य सुरु झाले. सर्व बदलच बदल होऊ लागले. प्रतिकूल परिस्थितीचा त्रास वाटेनासा झाला. सर्व वातावरण उपासनेला सहजपणे अनुकूल होउ लागले. आपल्या कडून नियमित गुरुमंत्राचा जप -प्रापंचिक व्यग्रतेने होईल की नाही ही १४ वर्षापूर्वी आलेली शंका केंव्हाच मावळली.

## आम्ही दत्तच

२) दुसऱ्या प्रसंगाची पूर्व पीठिका अशी की 'श्रीं' ची पाद्य पूजा करावी असे एका दांपत्याला वाटले. तशी परवानगी विचारली. तेंव्हा पूजा आश्रमात करा म्हणजे सगळ्यांना प्रसाद मिळेल असे सुचविले. कांही संयोग वशात् ही पूजा झाली नाही. मात्र त्या साठी जमवलेले रुपये बाजूला बँकेत बाजूला ठेवून दिलेले होते.

वर वर्णन केलेला कृष्णा माईचा साडी अर्पणाचा प्रसंग आला. या दांपत्याला त्या सोहळ्यासाठी जाण्याची संधी मिळाली म्हणून आनंद झाला. त्याच बरोबर वाडीला महापूजा करायची इच्छा झाली. बँकेत गेले तर रक्कम सुमारे दोनपट(व्याजासह) झालेली होती. पण बरेच दिवस मधे गेल्याने नमुना सहीची विस्मृती झाली. 'श्रीं' ची प्रार्थना करून सही केली. मॅनेजरला सही चुकलेली लक्षात येऊनही 'श्री'कृपेने संपूर्ण रक्कम मिळाली. वाडी मुक्कामात मुख्य सोहळा आटोपल्यावर श्री मनोहर पादुकांची महापूजा केली तेव्हा संपूर्ण पूजा व अन्नदानाचा खर्च जवळच्या रकमेतून बरोबर भागला. 'श्रीं' नी जाणीव करुन दिली की आमची पाद्यपूजा व श्री मनोहर पादुकांची महापूजा एकच आहे कारण **आम्ही दत्तच.**

## ।। श्री गुरुपरमात्मा परेशू ।।

श्रींचे मार्गदर्शन हे सर्वव्यापी, संतग्रंथ आणि अध्यात्म शास्त्राला धरुनच असे. 'श्रीं' च्या रुपाने गुरुतत्त्वच कार्य करीत होते, यात शंकाच नाही. ते स्वरुप, तो देह कालवशात अदृश्य रुपात गेला तरी दुसऱ्या स्वरुपाने तेच तत्त्व जीवाला पुढे नेण्यासाठी आपणाकडे आकर्षून घेते. म्हणून गुरुंच्या उभय रुपात भेद, द्वैतबुद्धी मानणे योग्य नाही. तसा भेद मानणारा साधक स्वत:ची अपरिमित हानी करवून घेतो.

या संदर्भात श्री गुरुमहाराजांची (सद्‌गुरु श्री गुळवणी महाराज) एक आठवण पुष्टीदायक आहे. श्री गुरु महाराजांना एका भक्ताने विचारले, ''महाराज ! आम्हाला या जन्मी आपण लाभलात-दीक्षा मिळाली. तरीपण जर या जन्मी मुक्ती नाही मिळाली तर पुढच्या जन्मी आपली भेट कशी होईल ? दीक्षा कशी मिळेल ?'' श्री गुरु महाराज हसून म्हणाले, ''तुम्ही जेथे असाल, तेथे आम्ही तुम्हाला हुडकून घेऊ. तुम्ही काळजी करु नका.''

''सद्‌गुरु'' हे यथार्थ ज्यांचे अभिधान आहे अशा प.पू.श्री.कलावती आई म्हणून थोर महिमा प्रकट करणाऱ्या एक विभूती, कर्नाटक-महाराष्ट्र या प्रांतात ईशेच्छेने संचार करीत होत्या. त्यांचे कृपाछत्र लाभलेला हा परिवार आहे. ८ फेब्रुवारी १९७८ (तिथी माघ शु. प्रतिपदा) या दिनी जेंव्हा प.पू. श्री. कलावती आईनी देह ठेवला तेंव्हा आम्हा उभयतांना अतिशय दु:ख झाले. आम्हाला एकच प्रश्न सतावीत होता की आत्ता इथून पुढे आम्हाला मार्गदर्शन कोण करणार? या विचारात कधी कधी रात्री झोप येत नसे. अशातच एका रात्री स्वप्नामध्ये दृश्य दिसले. ''आम्ही उभयता अश्रु ढाळीत आहोत आणि तेवढ्यात एक वृध्द गृहस्थ, धोतर व उपरणे अशा पोशाखात आमच्याकडे घरी आले व पलंगावर बसले. आम्ही त्यांच्याजवळ उभे होतो. त्यांनी आमच्या पाठीवरून हात फिरवला व म्हणाले ''बाळानो, रडू नका. तुमच्या आई जरी देहाने तुमच्या जवळ नसल्या तरी पण सतत त्या तुमच्या पाठीशी आहेत. शिवाय मी आहे ना तुम्हाला मार्गदर्शन करायला! तुम्ही काळजी करू नका. सर्व ठीक होईल.'' जागे झाल्यावर ''हे कोण होते?'' याचा काही बोध होईना. कालांतराने याची विस्मृतीही झाली.

या नंतर शेजारी एकाने त्यांचे 'गुरुमहाराज' येत असून मी दर्शनाला येण्याची इच्छा असेल तर त्या वेळी यावे- असे सुचवले. आपल्या सद्गुरुपदी अंत:करणात नित्य आरुढ असलेल्या पू. आईंची स्मृती चाळवली गेली व त्यांचे व्यतिरिक्त कोठे जाण्याची इच्छा होईना. आणि अचानक पू. आईंचे शब्द आठवले-**''सत्पुरुषांचे दर्शन चुकवू नये. केंव्हाही काहीही घडू शकते.''**

अर्थातच दर्शनाला योग्यवेळी शेजारी गेलो. ठरलेल्या वेळी श्री महाराज आले. माझी ओळख करून दिली. माझ्याकडे त्यांचे लक्ष होते. मला पुसटशी जाणीव झाली की आपण यांना कुठेतरी पाहिले. पण कदाचित तो भास असेलसे वाटले. मला थोड्या थोड्या अंतराने त्यांनी एकच प्रश्न केला ''तुम्ही इथेच राहता का?'' व मी हो म्हटले. अचानक पुढे मी म्हणालो ''महाराज! आमच्याक डे याल का? आणि हो. चला! म्हणून जागचे उठलेच. घरी आणले. त्यांनी प.पू. आईंच्या फोटोकडे पाहून सांगितले '' त्यांच फार मोठ कार्य आहे. भजन व नामस्मरणातूनच चालते. त्यांनाही त्यातूनच गुरुकृपा मिळाली आहे. ''चांगल आहे.'' त्यांनी दिलेली साधना चालू ठेवावी. सर्व चांगलं होईल. (अति महत्वाचा भाग -) अधून मधून शक्य झाल्यास पुण्याला आमच्याकडे आलात तरी चालेल. आपल्या शंकांचे निरसन करता येईल. शनिवार पेठ-वर्तक वाडा- पत्ता सांगितला. सवडी प्रमाणे, पण आधी पत्र पाठवून यावे. आम्ही बरेचदा दौऱ्यावर असतो. इ. सांगून निघाले. आश्चर्य म्हणजे ते गेले व मला एकदम स्मरले की आपल्या स्वप्नात आलेले ते ''हेच''. शेजाऱ्याला त्यांचे नांव विचारले तेंव्हा कळले की हे ''श्री दत्तमहाराज कवीश्वर'' आहेत. माझी व श्री महाराजांची ही पहिली भेट. (आम्ही तुम्हाला हुडकून काढू याचा प्रत्यय!) त्यांनी घरी येण्याचे सुचविले होते.

आणखी एका परिचिताने आग्रह केला. जाताना हार पेढे न्या. ते हार घालू देत नाहीत. ''फोटोला घाला'' म्हणतात. तुमच्या भाग्याने स्वीकारला तर उत्तमच. प्रसाद मिळाला तर अत्युत्तम.

मी सोमवार चा उपवास करुन- सायंकाळी उपास सोडतो. मी पुण्याला एका सोमवारी गेलो. गाडी लेट झाली, घर शोधण्यातही उशीर झाला व १२- १२।। ला घर सापडले. श्रीमहाराज समोरच्या खोलीत पत्र लिहीत होते. हातपाय धुवून दर्शन घेतले. म्हटले ''महाराज हा हार आणला आहे.''

''फोटोला घाला म्हणाले.'' थोडा धीर करुन म्हटले ''आपल्यासाठी आणला आहे. कृपया स्वीकारावा''. किंचित हसून''घाला म्हणाले. पेढे स्वीकारले व प्रसाद म्हणून मला दिले. आपले भोजन झाले का? असा आकस्मिक प्रश्न विचारला. सोमवार आहे, सायंकाळी सोडणार हे सांगितल्यावर सांगणे झाले. ''माध्यान्हा नंतर उपवास सोडला तरी चालेल. व लगेच सूनबाई (सौ. सविता वहिनींना) यांना बोलावून पान वाढायला सांगितले. संकोचून पण नाइलाजाने 'प्रसाद' घेतला.श्रीगुरुंच्या अंतर्यामित्वाची प्रत्यक्ष प्रचीती आली. मनातील प्रार्थना ऐकली- हार स्वीकारला व प्रसाद ही दिला.

अजून एक वर्ष प.पू. आईंनी दिलेली उपासना-साधना चालू ठेवा. अधून मधून येत जा. असे प्रेमळ पणाने सांगून बोळवण केली. त्यानंतर ५-६ भेटी ''दर्शन'' व ''परतणे'' अशाच झाल्या. मात्र या वर्षभरात प.पू. आईंचे अनेक स्वप्न दृष्टांत होऊन साधना मार्गाला अनुकूल असे ''आहार'', ''विहार'', ''जप'', ''पूजा'' इ. संबधी बरेच मार्गदर्शन मिळत गेले. जणू श्रीगुरुमहाराजांच्या कडून पुढे मिळणाऱ्या लाभासाठी पूर्वतयारी करुन घेत होत्या.

डिसेंबर -श्रीदत्त जयंती जवळच असताना पुन्हा दर्शन झाले. 'श्री' घरीच होते.

(दीक्षा आदेश-अनुग्रह प्राप्ती-)

''परवा पौर्णिमा आहे. श्रीदत्तजयंती आहे तेव्हा आपण उभयता पती-पत्नी त्या दिवशी पहाटे ५ला स्नानादि करून देवासमोर बसा. श्रीमहाराज व पू. आई आपल्यावर कृपा करतील. त्यांच्या फोटो समोर बसावे. बसण्या आधी घरातील वडील मंडळींचे आशीर्वाद घ्यावेत.'' असा सर्व खुलासेवार आदेश दिला. व त्या प्रमाणे दत्त जयंतीला अनुग्रह-दीक्षा-मिळाली. उत्तम अनुभूती आली. आनंदच आनंद! या पेक्षा वेगळे शब्द त्या अनुभूतीला प्रकट करण्यास सापडत नाहीत.

''स्वार्थी कळकळे माता ।
ती नोहे पुत्रा करिता ।
शिष्याच्या हिता करितां ।
गुरु देवता कळकळे।। (श्री दत्त माहात्म्य.)

अनुभूती जरी आनंद दायी होती तरी मनात एक शंका यायची. मी आईंचा शिष्य, की श्री दत्त महाराजांचा? दोघा बद्दल भेद बुध्दि डोकावून मन अस्वस्थ व्हायचे. एकदा श्री महाराजांनाच शंका विचारली त्यावर श्री महाराज म्हणाले- **''गुरुतत्व एक आहे. गुरु वेगळे असले तरी तत्व एकच आहे. श्रीगुरु देहाने नसले तरी त्यांचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी दुसऱ्या कोणाची नियुक्ती होतेच. त्या मुळे ही शंका काढून टाका.''**

त्यांच्या शब्दातील ''ईश्वरी'' सामर्थ्याच्या प्रभावानेच माझी ही शंका तत्क्षणी नाहीशी झाली.

''सांभाळुनि मार्गावरता । आणिता न दुजा त्राता ॥''

******

## ॥ ये त्वां शरणमापन्नः कृतार्था अभवन्हिते ॥

(श्री दत्तभाव सुधारस)

श्री नारायण 'श्रीं'चा अनन्य भक्त आहे. 'श्रीं'ची प्रत्येक आज्ञा शिरसा वंद्य मानून अमलात आणणे ही मनाला जडलेली नित्याची सवय आहे. एकदा (फेब्रुवारी १९८८) 'श्रीं'च्या (श्री दत्तमहाराज कवीश्वरांच्या) दर्शनाला गेले होते. 'श्रीं'नी स्वतः विचारले ''आपला मुलगा ८ वर्षांचा झाला असेल ना!'' यांनी सांगितले की होय ८ वे सुरू आहे.

'श्री' आज्ञा अशी झाली की नरसोबाच्या वाडीला मौंज करावी.

''चैत्री अमावस्येला होणाऱ्या श्री नारायण स्वामी महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवाला आम्ही नरसोबा वाडीला दर वर्षी जातो. उत्सवानंतर लगेच पुढे अक्षय्य तृतीया आहे. तो दिवस चांगला आहे. तेंव्हा त्या दिवशीचा मुहूर्त धरून आपण चिरंजिवांची मौंज वाडीला करावी असे आम्हाला वाटते. वाडीला प्रत्यक्ष देवा समोर मौंज होणे म्हणजे फार भाग्य आहे. आम्हीही पुढे दोन दिवस राहू व मौंजीला हजर राहून बटूला आशीर्वाद देऊ. एक मात्र आहे की ''आपल्या नातेवाईकांना कदाचित पटणार नाही. जे येतील ते येतील, म्हणाले. आपल्या बरोबर देव आहेत नां! मग कशाला काळजी? पत्रिका वगैरे छापायच्या

नाहीत.'' नारायणाने 'श्रीं' ना लगेच सांगितले की आपल्या आज्ञेप्रमाणे करतो. त्यामुळे नरसोबावाडीला अक्षय तृतीयेला मौंज करायची हे तेथेच ठरले.

आता श्री महाराजांना रीती प्रमाणे घरी जाऊन मौंजीचे आमंत्रण द्यावे म्हणून श्री महाशिवरात्रीचे दिवशी एक नारळ, हार-पेढे इ. व अक्षदा घेऊन नारायण एकटाच 'श्रीं'च्या घरी पोचला.

'श्रीं' ना प्रार्थना पूर्वक-नारळ-अक्षदा-देऊन आमंत्रण केले.

त्यांनी विचारले.-म्हणाले ''नारळ आणखी आहे का?'' एकच नेला होता. आणखी आणू का म्हणून विचारले, नको म्हणाले. घरात आहेत.

पुढे तेच म्हणाले ''जालन्याच्या प.पू. सौ. ताई महाराज आलेल्या आहेत. त्या साक्षात् भगवती आहेत. त्यांची पण उपस्थिती मौंजीसाठी **आवश्यक** आहे. आपण त्यांनाही आमंत्रण करा.'' 'श्रीं'नी सौ. आईसाहेबांना बोलावून घरातले नारळ मागून घेतले.

नंतर 'श्री' महाराज उठून प.पू. सौ.ताईमहाराजांच्या खोलीत यांना घेउन गेले. यांची ओळख करून दिली.

नारायणाने पुढे होऊन वंदन केले. म्हटले '' ताईमहाराज आपण माझ्या मुलाच्या मौंजीला येउन बटूला आशीर्वाद दिलेत तर आम्हाला फार आनंद होईल.'' प.पू. सौ. आई साहेबांनी भगवतींना हळद कुंकू लावले व त्यांची ओटी भरली आणि नारायणानी अक्षदा दिल्या.

त्यानंतर ''मंगल कार्य'' निर्विघ्न पार पडावे म्हणून काही जप करण्यास श्री नारायणास आज्ञा दिली. चि. बटू कडून काही स्तोत्रे पाठ म्हणून घेण्यास सांगितले. त्यात प्रामुख्याने **''प्रज्ञावर्धन स्तोत्र''** म्हणून घ्या ''याने बुध्दी तीक्ष्ण होते व अभ्यास चांगला होतो -म्हणाले.'' (आजही हे स्तोत्र यांचे चिरंजीव न चुकता म्हणत असतात.)

'श्रीं'चे आरंभाला सांगणे झाले होते--

'' आपल्या घरी कोणतेही मंगल कार्य असेल तेव्हा आपल्या सद्गुरुंना प्रार्थना करावी. होईल तितका जास्तीत जास्त जप करावा.म्हणजे सद्गुरु ती जबाबदारी घेतात. कोणताही अडथळा न येता कार्य पार पडते.''

पुढील घटना क्रम पाहता, 'श्रीं'नी याची प्रचीती लगेच दिली.

मौंजीच्या दोन दिवस आधी कोल्हापूरला प्रथम श्री अंबाबाईचे दर्शन इ. करून व तेथील आप्तांना सूचित करून नृसिंह वाडीला जाण्यासाठी कोल्हापूरच्या बसस्टँडवर सायंकाळी हे कुटुंब आले. सामान ही बरेच होते. दोन अडीच तास प्रतीक्षेत गेले पण वाडीची बस आलीच नाही. अंधार पडू लागला. रात्री ८-९ पर्यंत वाडीला पोचायलाच हवे होते. शेवटी 'श्रीं' चा धावा सुरू केला. म्हटले ''महाराज, उद्या महापूजा, आपण स्वतः पुजेला, प्रसादाला येणार असे आश्वासन दिले आहे. आता सांभाळा.''

अचानक एक रिक्षावाला यांच्या जवळ येऊन विचारू लागला. म्हणाला ''मी नृसिंह वाडीहून भाडे घेऊन आलो आहे- परत जात आहे. तुम्हाला वाडीला जायचे असेल तर चला. बस इतकेच भाडे दिले तरी पुरे.'' 'श्रीं'ना मनोमन नमस्कार करून वाडीला निघालो.

असे कळले की साधारण त्याच सुमारास 'श्री' महाराज वाडीला उपस्थित भक्तांकडे नारायणाची चौकशी करीत होते. अजून कसे आले नाहीत? उद्या महापूजा आहे नां? सर्व कुटुंब वाडीला वेळेवर पोहोचले. महापूजा-प्रसाद इ. कार्यक्रम व्यवस्थित झाले. मौंजीचे सर्व शास्त्राप्रमाणे यथास्थित करवून घेतले. भोजनोत्तर- बटुला मांडीवर बसवून घेऊन पाठीवरून हात फिरवून डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिले. नारायणाला 'श्रीं' चे आश्वासन आठवून प्रेमाश्रुनी नेत्र भरून आले. 'श्री' म्हणाले होते,''तुमचे सद्गुरु आता देहात नसले म्हणून काय झाले? आम्ही आहोत ना! सर्व ठीक होईल. काळजी करू नये.''

पुढे प्रसंगाने प.पू. श्री ताई महाराजांकडे ही आठवण निघाली. त्या म्हणाल्या, ''अहो! आम्ही 'श्रीं'ना म्हटले आमचा त्यांचा परिचय नसताना मौंजीला कसे यायचे?'' त्यावर 'श्री' महाराज म्हणाले होते'' बटूला आशीर्वाद देणे हे पुण्य कर्म आहे त्यासाठी परिचय नसला तरी हरकत नाही. व आपले (म्हणजे पू. श्री. ताई महाराजांचे) आशीर्वाद **''महत्वाचे''**आहेत. '' इत्यादि.

भक्ताने कृतज्ञ भावाने काय मागावे?

त्वमसि हितकारक त्वमसि भय वारक।
स्त्वमसि भवतारकः साधुदेव ॥
त्वमसि मम दैवतं त्वमसि मम जीवितं ।
त्वमसि मम सकल हितजात मेतत् ॥
यत्वमिच्छसि विभो तत्कुरुश्व प्रभो ।
वासुदेवार्थित श्रीश देव ॥

******

## ॥ दत्तात्रेयो भावगम्योऽस्यमेयः ॥

- प्रार्थनातारावली

श्री दत्तमहाराजांचे वागणे अतिशय नेमस्त असे. नेटकेपणा, विना विलंब कामे, दुसऱ्याच्या वेळेचा अपव्यय त्यांनी कधीही केला नाही. पण भक्ताचा भाव तळमळीचा असेल, तर तसे घडावे म्हणून केव्हा केव्हा 'नाट्य' घडवित असते.

एकदा असे घडले की, मनात पूर्ण भक्तीभाव असलेल्या एका साधकाला श्रींची पाद्यपूजा घडावी असे वाटत होते. पण त्याबरोबर असणाऱ्या सेवकाला असे वाटे की, श्रींना जास्त त्रास होऊ नये म्हणून तो निर्भिडपणे नकार देत असे.

पण ''देव भावाचा भुकेला'' या न्यायाने श्रींनी ती योजना पुर्णत्वास नेली. झाले असे की, श्री प्रवासाला निघाले होते तेव्हा महद् भाग्याने या भक्ताच्या घरी येणे झाले. आपल्या मनातले श्रींना त्यांनी आधीच कळवले होते. त्याप्रमाणे पूजेची सर्व तयारीही केली होती. ब्राह्मणही बोलावले होते. पण आपल्यावर आल्यावर कळले की श्रींच्या सोबत ज्या पुजेच्या पादूका असत, त्या यावेळी बरोबर नव्हत्या. त्यामुळे त्या प्रथम सेवकाने पूजेस नकार दिला.

पण 'श्री' भक्ताचा भाव जाणून होते. त्यांनी नाट्य घडविले. 'श्री' महाराज या भक्ताकडे आल्या आल्या विश्रांती साठी पहुडले व चक्क २-३ तास उठलेच नाहीत. त्यांतच ''स्थगन आदेश'' ही झाला होता. पूजा सांगायला बोलावलेल्या ब्राह्मणांना शेवटी प्राप्त परिस्थितीस शरण जाऊन परत पाठवले.

त्यानंतर जवळ जवळ भोजन समय झाला असेल इतक्यात 'श्री' उठले. भक्ताला राहवले नाही. पहिला '**सेवक**' आसपास नाही असे पाहून 'श्रीं'ना प्रार्थना केली ''महाराज'' पाद्यपूजा करावी अशी इच्छा आहे. साहित्य तयार आहे. 'श्रीं' नी विचारले ''भोजनास किती अवकाश आहे? '' साधारण अर्धा पाउण तास अवकाश होता. ''करा'' म्हणाले. अति आनंद झाला. पण अरे! पूजा सांगायला आता कोण? पण भावगम्य भगवान प्रसन्न असल्यावर-तेथे काय उणे! 'श्री' म्हणाले ''आम्हीच सांगू पूजा.''

भराभर तयारी केली. संकल्प-गणपती कलश शंख घंटा आदि पासून स्वतःच्या 'श्री' पाउलांवरच सर्व उपचार स्वतःच मंत्र म्हणून घालून घेतले व उत्तम पूजा झाली. खूप आनंद व समाधान वाटले. आज सिंहावलोकन केल्यावर 'श्रीं'च्या २-३ तास निजण्या मागील ''नाट्य'' लक्षात येते.

******

## प्राप्य पुण्यकृतां

श्री भगवान गोपालकृष्ण योगाचे माहात्म्य कथन करीत असतांना अर्जुनाच्या शंकेचे समाधान त्यांनी केले आहे. शंका अशी होती-'' अभ्यास करणाऱ्या साधकाला पूर्णत्व प्राप्ती होण्या आधीच जर त्याचे आयुष्य संपले तर ह्या जन्मात केलेला अभ्यास वाया जातो कां? पुढील जन्मी पुन्हा आरंभापासून सर्व मिळवावे लागते कां?

आणि श्री भगवान याचे उत्तर स्पष्टपणे ''नाही '' असे देतात. ते सांगतात की साधकाचा अपूर्ण राहिलेला अभ्यास पुढे चालू व्हावा या साठी अनुकूल असा पुढचा जन्म त्याला मिळतो. पवित्र कुलात ''ईश्वर भक्तीचे वैभव जेथे आहे ''अशा कुलात जन्म मिळतो. ईश भक्तीचे फलस्वरुप जे अध्यात्मिक वैभव, तीच खरी श्रीमंती आहे. अशी श्रीमंती असणाऱ्यांच्या (श्रीमतां गेहे) घरी तो जन्म घेतो. ही भगवंताने दिलेली ग्वाही आहे.

या जन्मात उत्तम साधना होऊन ज्ञान-प्राप्ती-झाली, पण कांही प्रारब्ध भोगून संपवायचे राहिले अशी स्थिती काही वेळा येते. प्रारब्ध भोग पूर्ण व्हायच्या आधीच तो जन्म संपतो. मग उरलेले भोग संपविण्यासाठी, कुणी कांही दिवस,

कांही महिने अथवा कांही वर्षे, त्या शेवटच्या जन्मात जगतो व प्रारब्ध भोग संपताच श्रीगुरुतत्वात विलीन होऊन मुक्त होतो. अशा ज्ञानी महात्म्याच्या संबंधात आलेली प्रचीती, पहायला मिळाली. पूर्व जन्मात मिळालेल्या उत्तम ज्ञानामुळे त्या जीवाला स्वतःच्या गुरुंचे पूर्ण स्मरण ह्या अंतिम जन्मात असते- हे ही पहायला मिळाले.

प.पू.श्री दत्त महाराजांचे शिष्य असलेल्या व ''शुचिता'' आणि ''आध्यात्मिक श्रीमंती'' असलेल्या एका दांपत्याला असा योगभ्रष्ट महात्मा- पुत्ररुपाने मिळाला. तो पुत्र ५-५॥ वर्षेच जेम तेम देहात राहिला. त्या अल्प काळातील निम्म्याहून अधिक काळ तो बालक एका दुर्धर व्याधीने ग्रस्त होता. ही व्याधी म्हणजे त्याचे उर्वरित प्रारब्धभोग निःशेष संपण्यासाठी कर्मविपाकाचा आविष्कार होता. प.पू. श्री दत्त महाराजांना व प.पू. सौ. आई साहेबांना या बालकाचा विलक्षण लळा होता व तो ही त्यांच्या भेटीसाठी अति उत्सुक असे. दूरच्या अंतरामुळे वरचेवर 'श्रीं'च्या प्रत्यक्ष दर्शनाला येणे जमत नसे. म्हणून 'श्रीं'चा एक मोठा फोटो त्याला सतत समोर लागायचा. हे त्याचे ''फोटोतले आजोबा''! सगळे निवेदन त्यांना तो करीत असे.

'श्री' महाराजांनी या बालकाकरितां विविध उपासनांचे नियोजन करुन दिले होते. त्यात अनेक साधक गुरु बंधूंनाही सामील होण्यास आज्ञापिले होते :-

१. अखंड दिगंबराचा जप

२. श्रीगुरु चरित्राची सप्ताह पारायणे

३. बीज मंत्रासह जपाचे अनुष्ठान

४. वेळो वेळी सामुहिक उपासना -धून- साधना

यांच्याकडे भेटीला येणाऱ्या व उपासनेला येणाऱ्यांना सवयच जडली होती की आल्यावर हातपाय धुवून प्रथम एक माळ जप करायला बसायचे. जप झाल्यावरच इतर बोलणे होई. 'श्री' महाराजांनी तुळजापूर, गाणगापूर, हरिहरेश्वर आादि यात्रा करविल्या. नरसोबावाडीची प्रतिवार्षिक वारी चैत्रात, श्रीनारायण- स्वामींच्या उत्सवात करायला सांगितले होते. कारण 'श्री' स्वतः या उत्सवाला वाडीला जात असत. 'श्रीं'नी यांना बरोबर नेऊन 'काशीयात्रा' करुन आणले.

या बालकाला धून सांगायला आवडायचे. तो साधनेला बसत असे व उत्तम ध्यान होत असे.

योगी पुरुषाचा देह चैतन्य तत्वाने ओतप्रोत असतो. म्हणून त्यांच्या पांचभौतिक देहाची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. या बालकाचा आहार अगदी मर्यादित व पवित्र होता. 'श्रीं' ना निवेदन केलेले नैवेद्याचे ताटातील अत्यल्प पदार्थ एक वेळ ग्रहण केले जात.

तीव्र परिणामाची रासायनिक-ॲलोपॅथिक-इ. औषधे, 'श्री' महाराज या बालकाला अजिबात देऊ देत नसत. व्याधीची तीव्रता कमी करायला फक्त आयुर्वेदिक औषधे व तीही एका सत्पुरुषाच्या मार्गदर्शनाप्रमाणे, विशिष्ट अनुपानाच्या योजनेसह देण्यावर कटाक्ष होता. ही औषधे दिवसातून ७-८ वेळा द्यावी लागत. प्रत्येक वेळी 'श्रीं'ना निवेदन करून व गुरुनामाच्या घोषाबरोबर औषध पोटात जाई.

अति सात्विक, प्रेमळ स्वभाव. अतिसूक्ष्म निरीक्षण, अगदी व्यावहारिक बाबतीतही एकाद्या पोक्त, वडीलधाऱ्या माणसाप्रमाणे अचूक सूचना केंव्हा केंव्हा हा बालक देत असे. सहनशीलता, तितीक्षा विलक्षण होती. बालकाची स्वत:ची नित्य उपासना अगदी साधी पण नियमित होत असे. मारुती स्तोत्र, गणपती स्तोत्र, शुभंकरोती.,घोरात कष्टात् स्तोत्र नियमित म्हणत असे. स्नान झाल्यावर सर्व प्रथम 'श्रीं'ना (फोटोतील आजोबांना) वंदन करण्याचा नियम न सांगताच चालवला होता.

एकदा एका गुरुबंधूंनी विचारले ''पुढच्यावेळी येताना तुझ्यासाठी काय आणू?'' तेंव्हा ''श्रीरामांचा फोटो आणा '' म्हणून सांगितले.

'श्री' महाराजांनी या माता-पित्याला बालकासह प्रतिमासिक जालना वारी व प.पू. श्री.ताई महाराजांचे दर्शन करायला सांगितले होते. ते ही नियमित होत असे.एवढी योजनाबध्द दक्षता श्री महाराजांनी या बालकासाठी आखून दिली होती की सगळ्याचेच आश्चर्य वाटावे.

या वर्णनातून एक स्पष्ट संकेत मिळतो- '' 'श्री' महाराजांचे व या योगभ्रष्ट बाल योग्याचे ऋणानुबंध विलक्षण होते. 'श्री' त्या बाळाचे पूर्व जन्मातही गुरु होते व उभयता गुरु-शिष्यांना हा अनुबंध माहीत होता. बालवयानुसार आचरण

ठेवून त्या बाल महात्म्याने स्वतःला झाकून घेऊन ही माहिती इतरांना होऊ नये याची काळजी घेतली. 'श्रीं' चेच शिष्य ते! स्वतःची खरी ओळख कशी होऊ देतील?

अंतकाळी त्या बालकाने 'श्रीं'चे स्मरण करीतच हा पांचभौतिक देह सोडला. यात काही आश्चर्य नव्हे. या बालयोगी चरित्रातून 'श्रीं' चे अवतारित्व आणखी एकदा उज्वलपणे पुढे आले आहे.एका जीवन्मुक्त अधिकारी महात्म्याचे ते गुरु आहेत. या बरोबरच ''न मे भक्तः प्रणश्यती।'' हे भक्त वात्सल्यही अवर्णनीय असे प्रकट झाले आहे.

******

**एका सामान्य परिस्थितील कुटुंबवत्सल ब्राह्मण भक्ताची ही कथा आहे.**

१) सद्‌गुरु श्री दत्त महाराजांचे आगमन आपल्या गावातच झाले असे कळल्याने आनंदाने सर्व कुटुंबासह 'श्रीं'च्या दर्शनाला गेले. परिचय करून दिला. अनेक वेळा ईशेच्छेने, गुरुकृपेने दर्शन घडत गेले. 'श्रीं'च्या सह येणाऱ्या भक्तांकडून तसेच प्रसंगी पुण्याला आश्रमात जाणे झाल्यावर तेथे ऐकून व पाहून 'श्रीं'च्या चरित्राचे अनेक ''विशेष'' अनुभवाला येऊ लागले. सौ. आई साहेबांचीही दर्शन भेट झाली. या उभयतांच्या ठिकाणी लक्ष्मीनारायणांची भक्तवशता, भक्तवात्सल्य,करुणा, अमानित्व, सर्वाभूती समभाव अशा अनेक गुणांची अनुभूती प्राप्त झाली.

एकदा ह्या ब्राह्मणाच्या पुत्राला साधनेमधे 'श्रीं'चे दर्शन व संभाषणाचा लाभ झाला व 'श्रीं' नी आश्वासन दिले की ''आम्ही उद्या तुमच्याकडे माध्यान्ही भोजनाला येऊ!'' साधना संपल्यावर घरातील सगळ्यांना हे शुभ वृत्त सांगितले. सगळेजण अतिशय आनंदित झाले. सर्व बारीक सारीक तयारीची चर्चा झाली व त्या प्रमाणे सगळे कुटुंब कामाला लागले. दुसऱ्या दिवशी माध्यांन्हा पूर्वीच उत्तम पक्वान्नांचा स्वयंपाक सिध्द झाला. पूजेची सर्व तयारी झाली. दारात पायावर दूधपाणी घालून औक्षण करण्याची तयारी, अंगणात रांगोळ्या, ज्याला जे सुचेल ते काम आटोपत, पायघड्या आसन, बिछाईत सर्व जय्यत तयारी झाली.

घरात यांची बोबडे बोलणारी १॥-२ वर्षे वयाची नात होती ती देखील सर्व उत्साहात सामिल झाली होती व आजोबांची वाट पहात होती. पण! बराच विलंब झाला! 'श्रीं' चे आगमनाची प्रतिक्षा करता करता एक आश्चर्य घडले. सगळे कुटुंबीय जागो-जागी निद्राधीन झाले. ती नात तेवढी जागी होती. किती वेळ असा गेला न कळे! अचानक एकेकजण जागा होउन आश्चर्याने दुसऱ्याकडे बघू लागला! सर्व जण सावध झाल्यावर घड्याळाकडे लक्ष गेले तर माध्यान्ह काळ टळून १-१॥ तास वर झाला होता. 'श्री' महाराज आले कसे नाहीत? आणि सगळ्यांना बसल्याजागी निद्रा कशी आली? कांहीच कळत नव्हते. छोट्या नातीने सर्व प्रकाराचा जो उलगडा बाळ बुध्दीने केला त्यावरून लक्षात आले की सगळे निद्राधीन झाल्यावर 'श्री' महाराज येऊन सर्व घरात फिरून मंगल करून निघून गेलेले तिने एकटीने बघितले. व ती मोठ्याने काका! काका! असे हाका मारु लागली त्यामुळे जाग आली.

''या देवी सर्व भूतेषु । निद्रा रुपेण संस्थिता। नमःतस्मै नमो नमः॥ ''

वास्तविक पाहाता 'श्रीं' चे त्यांच्याकडे प्रत्यक्षात येणे बरेचदा घडले होते. त्यावेळी अशीच तयारी अन्नदान, सर्वांना प्रसाद, श्रींची प्रेमपूर्वक सेवा, आचारधर्माचे पालन हे सर्व पूर्वसुकृताने घडले होतेच. या कुटुंबावर श्रींची पूर्ण कृपा होती. श्रींनी त्यांना विविध प्रकारे आपल्या सेवेत सामावून घेतले होतेच. त्रिभुवनामध्ये दुर्लभ असणारे श्रीगुरुभक्तीचे दान दिले होते, जे स्वप्रयत्नांनी अशक्य हाते. त्यामुळे वरील घटनेने थोडा विषाद वाटला. पण त्यांची अर्तक्य लीला अनुभवून आनंदही झाला.

सहकुटुंब सह परिवार, दास आम्ही हे घर दार।
तव पदी अर्पू असार, संसाराहित हा भार॥

२) या ब्राह्मणाची एक कन्या उपवर झाली होती. वर संशोधन सुरु होते. तशातच संत दर्शनाचा योग आला.उत्तम स्थळ मिळावे व लवकर कार्य संपन्न व्हावे ही इच्छा मनात होतीच पण तेथे प्रकट केली नाही. तथापि ''अंतर्यामी''गुरुमहाराजांनी कन्येला एक व्रत करण्यास आज्ञापिले. ज्या व्रतामुळे **''सौभाग्य संपन्नता ''** प्राप्त होते असे हे एक '' मंगळवार'' व्रत करण्यास

आज्ञापिले. ज्या व्रताच्या आचरणाने उपवर कन्येच्या ग्रहमानातील विशेष त्रासदायक असणाऱ्या स्थितीचे निवारण होऊन योग्य वर प्राप्ती होते. **''सौभाग्य संपन्नता''** म्हणजे सर्वच प्रकारच्या भाग्यांची संपन्नता होईल हे 'श्रीं'चे आशीर्वचन आहे.

'श्री' आज्ञे प्रमाणे त्या कन्येने एक वर्षापर्यंत चालणारे हे व्रत निष्ठेने केले. 'श्री' महाराज व्रत समाप्तीच्या प्रसंगी स्वतः उपस्थित झाले. स्वतः आचार्य झाले व व्रतसांगता करवून घेऊन इष्टप्राप्तीचा आशीर्वादही दिला.

लवकरच योग्य वर मिळून या कन्येचा विवाह संपन्न झाला. नंतर जे विविध प्रसंग या कन्येच्या आयुष्यात आले त्या सर्व प्रसंगी 'श्री' नी आपला वरद हस्त नित्य शिरी आहेच अशी या कन्येला अनुभूती दिली.

प्रत्येक जीवाचे प्रारब्ध त्याचे त्याला भोगून संपवावेच लागते, हा कर्म विपाकाचा सिध्दांत आहे. त्यामुळे नेहमीच अनुकूल व सुखदायक जीवन कोणाच्याही वाट्याला येत नाही. हे एक सत्य आहे.

तसेच दुसरे एक सत्य या कन्येच्या निमित्ताने श्री चरित्राचे बाबतीतील ही पहायला मिळाले. शब्दात वर्णन करायला कांहीतरी उपमेचा आधार घ्यावा लागतो. जसे '' गढूळ पाणी स्वच्छ करण्याकरता निवळीच्या बियांचा कल्क त्यांत टाकतात. तो कल्क पाण्यातील सर्व अशुध्द स्वतः भोवती आकर्षित करुन घेतो व भांड्याच्या तळाशी बसतो. नंतर वरचे शुध्द पाणी अन्य पात्रात ओतून घेतले की ते आरोग्यदायी पेय होते. तो कल्क या प्रमाणे स्वतः नष्ट होऊन आम्हाला शुध्द जल देतो.''

एक अशा स्वरुपाची लीला 'श्री' महाराजांनी या कन्येच्या बाबतीत केली. झाले असे की सासर कडची मंडळी स्वभावाने जरी प्रेमळ होती तरी मिश्र संस्कारामुळे, आचार धर्माच्या अभावामुळे, सासर माहेरच्या वातावरणात खूपच फरक होता. सासरे स्वतः शिर्डीच्या श्री साई बाबांचे एकनिष्ठ भक्त होते. परंतु त्यांची गृहस्वामिनी त्यांच्या भक्तिमार्गात अंतःकरणाने सहभागी नव्हती. एक प्राप्त कर्तव्य म्हणून ''ह्यांच्या'' इच्छेप्रमाणे देव धर्म होइल तसा करताना त्यांत श्रध्दा भक्तीचा अभाव असे. त्यामुळे तसेच विचारप्रवाह घरादारातून प्रवाहित

होत होते. **''स्वभावो दुरतिक्रमः''** म्हणून सासरे या सर्वांकडे कानाडोळा करुन आपल्या पुरते होईल तसे आचरण ठेवून होते. कन्या दीर्घ काळापासून 'श्रीं'ची अनुग्रहीत, सर्व माहेरच 'श्री' सेवेत समर्पित व 'श्रीं' ची या कुटुंबावर असलेली कृपा या संस्कारांमुळे नव्या, **''विरुध्द वातावरणात ''** रममाण होऊन विफलता जाणवू लागली, तरीही पूर्वी इतिहासात घडलेली महान सती स्त्रिया जसे मदालसा इ. यांची चरित्रे आठवून ती कन्या पतिदेवांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत असे. पण त्यात फारसे यश येत नसे.

भक्तवत्सल भक्ताभिमानी अंतर्यामी 'श्री' महाराज ह्या सर्व प्रकाराला जाणून एकदा यांच्या गावी आपण होऊन न बोलावताच गेले. २-३ दिवस यांचे कडे वास्तव्य करून आपल्या कृपा प्रभावाने खूप काही परिवर्तन घडवून आणले. कन्येला स्वतंत्रपणे आपल्या समोर बसवून कांही उपदेश के ला व तो तिच्या ठिकाणी स्वशक्तीने संक्रमित करुन तिच्या अंतःकरणात स्थिर केला. त्या नंतर अनेक सुंदर घटना प्रसंग घडून आले. पतिदेवांना 'श्रीं' ची कृपा प्राप्त करुन घेण्याची तीव्र इच्छा झाली. त्यांनाही दीक्षा देऊन 'श्रीं' नी कृतार्थ केले. या उभयतांना आपली साधना उपासना चालवताना घरातील विरुध्द विचार प्रवाहांचा अडथळा होउ नये अशी सर्व अनुकूलता जीवनात हळू हळू प्राप्त झाली. स्वतःची वास्तू झाली त्याला ''श्री वासुदेवनिवास'' हेच नांव दिले. व हे 'श्री' महाराजांचे घर आहे व आपण त्यांच्या घरात राहून त्यांची सेवा करून कृपाछत्रात राहतो आहोत हा भाव पक्का झाला.

हे सगळे अशा तऱ्हेने घडत असताना एक विचित्र प्रक्रिया घडून आली. लग्नाच्या आंदणा सोबत माहेरून 'श्री' महाराजांचा एक मोठा फोटो मिळाला होता. तो नित्य दर्शन होईल असा घरात लावलेला होता. पण नवल असे घडले की त्या फोटोतील 'श्रीं' ची प्रतिमा हळू हळू फिक्की होत होत एक दिवस पूर्ण दिसेनाशी झाली. वातावरणाचा व अन्य कशाचाही प्रभाव या घटने मागे नव्हता तर या कन्येच्या प्रपंचातील प्रतिबंधात्मक विरोध 'श्रीं' नी स्वतःवर ओढवून घेतला व फोटोतून अदृष्य झाले. वर लिहिलेल्या जलशुध्दीसाठी निवळीच्या बियेचा कल्क नष्ट होऊन शुध्द जल इतरांना देण्याचे कृतीची तुलना उपमा म्हणूनच या घटनेशी करावीशी वाटते.

अर्थात जरी त्या प्रतिमेतून 'श्री' अदृष्य झाले तरी यांच्या अंत:करणातून कुठे जाऊच शकत नाहीत. 'श्रीं'नी यांना पादुका प्रसाद दिला व ''ह्या थोरल्या महाराजांच्या (श्री. टेंबेस्वामी महाराजांच्या) आहेत, त्या पूजेत ठेवा'' अशी आज्ञा केली. वाडी, पुणे येथे यांचे कडून पूजा, अन्नदानादि करवून घेतले. आता हे सर्वच कुटुंब या कन्येच्या **''माहेरच्यांच्या प्रमाणे''** 'श्री' सेवेत अर्पित जीवन घालवीत आहे. प.पू. श्री ताई महाराजांची ही पूर्ण कृपादृष्टी यांच्यावर अखंड आहे.

या कन्येला जो विशेष प्रसाद 'श्रीं' नी स्व सान्निध्य अर्पण करुन आयुष्य भरासाठी दिला तो तर अति दुर्मिळ ठेवा आहे व एक प्रकारे ऐहिक व पारमार्थिक संपूर्ण कल्याणाचीच ग्वाही आहे.

जा को राखे साईयां। मार सके ना कोय ।
बाल न बाँका करसके । जो जग बैरी होय॥

३) एका सत्‌शील ब्राह्मणाच्या व ब्राह्मण पत्नीच्या (कन्येचे माता-पिता) ठिकाणी 'श्रीं' ची भक्ती होती. त्याचे फल त्या उभयतांना उत्तरायुष्यात व अंतकाळी प्राप्त झाले ते थोडेसे वर्णन करून हा अध्याय पूर्ण करीत आहोत.

कन्येच्या मातेला घरातील देवघराचे समोर फरशीवर सुंदर निळा प्रकाश प्रत्यक्ष डोळ्यांना दिसत असे व या मंद निळ्या प्रभेमध्ये भगवंताची गोपींबरोबर होणारी रासलीला दिसत असे. एकदा तर दिवसाचे वेळीअंगणातील पारिजात वृक्षावरील अंतराळात अशीच रास नृत्याची लीला प्रत्यक्ष सुरु असलेली दिसली. वृंदावनातील **''रासलीला स्थानी''** सेवा करणारे भाग्यवान सेवक-भक्त,प्रभूकृपेने क्वचित हा अनुभव घेतात असे ऐकले आहे. ही रास लीला पाहणारा जीव प्रेमलक्षणा भक्तीचा अधिकारी होतो असे श्रीमद्भागवतातही वर्णन आहे. ही दुर्लभ अनुभूती घेणारी ही माता अंतकाळी श्री विष्णु सहस्त्रनामाचा पाठ श्रवण करीत करीतच 'श्रीं'च्या निजधामाला गेली.

या ब्राह्मणाला शेवटचे काही दिवस कांही शारिरीक व्याधींचा उपद्रव सुरु झाला. पण शारिरीक त्रास सुसह्य होण्यासाठी सतत श्रीगुरुनामाचे मोठ्याने उच्चारण सुरु असे. रोज श्री हनुमान चालीसा, संकटमोचन हनुमान स्तोत्र, विष्णु

सहस्त्रनाम हे इतरांना मोठ्याने म्हणायला लावून त्यांच्या बरोबर स्वतः म्हणत असे. जाण्याच्या कांही दिवस आधीचा प्रसंग. ही कन्या वडीलांच्या आजाराचे वर्तमान कळल्याने भेटीला आलेली होती. तिला पित्याने सांगायला सुरवात केली- ते म्हणाले-''बघ, मला समोर एक महात्मा-महापुरुष दिसतात आहेत. ते माझ्याकडे पाहून मला अभय देऊन सांगत आहेत की काळजी करू नको. मी तुला न्यायला स्वतः येईन.'' कुतुहल वशात् कन्येने पित्याला त्या महात्म्याच्या स्वरुपाचे वस्त्रादि जे वर्णन करायला लावले ते त्यांनी केले. त्या वरून ते महात्मा-पुरुष म्हणजे श्री श्रीधरस्वामी महाराज होते(सज्जनगड निवासी श्रीधरस्वामी महाराज) . हे लक्षात आले. जेंव्हा शेवटची वेळ आली तेंव्हा ''मी आता यांचे सोबत जाणार'' असे सांगून श्रीगुरुनामाचा उच्चार करीत करीत श्री चरणी लीन झाले.

यांच्या पुत्रापैकी एक पुत्र और्ध्वदेहिक संस्कारानंतर अस्थिसंकलन केलेले पात्र घेउन नर्मदा किनारी ओंकारेश्वरी रेल्वेने जाण्यासाठी गाडीत बसला. गाडी कांही स्टेशने पुढे गेली व बराच वेळ थांबून पुन्हा उलट मार्गाने मूळच्या रेल्वे स्थानकावर आली. काय समस्या होतीते रेल्वे कर्मचाऱ्यांनाच माहिती! नाइलाजाने अस्थि घेउन पुन्हा घरी परत यावे लागले. नंतर **''पहिल्या उपलब्ध रेल्वे गाडीने''** ते अस्थिपात्र श्री क्षेत्र वाडीला नेले. या वेळी मात्र संपूर्ण प्रवास सहजपणे पार झाला. कृष्णामाईत अस्थि विसर्जन करुन लगेच परत येता आले.

नर्मदा व कृष्णा दोघीही मोक्ष दात्या आहेत. पण येथे श्री गुरुंना कृष्णामाईच अधिक प्रिय आहे असे अनुभवाला आले. अन्यथा ह्या घटनेचे समर्पक कारण सांगणे केवळ अशक्य आहे. ''माझ्या भक्ताचे पार्थिव अंश कृष्णामाईतच विसर्जित व्हावे'' हा बहुधा त्यांचा संकल्प होता. (अनेक भक्तांना हे विदित आहे की श्रीदत्तमहाराजांच्या अस्थीही अशाच अचानक निर्णय होऊन वाडीला संगमाचे स्थानी विसर्जित केल्या गेल्या व 'श्रीं' ची ती इच्छा त्यांनीच पूर्ण करुन घेतली.)

आलेल्या सांत्वनपर पत्रात 'श्रीं' नी लिहिले आहे--''आपले पिताजींचा उध्दार करण्यास 'श्री' महाराज समर्थ आहेत. तथा ''ते स्वनाम धन्य होते.''

## भक्तवश 'श्री'

१) एका भक्ताला मोठ्या शहरातील मोठ्या कारखान्यात 'श्री'कृपेने नोकरी मिळाली व प्रापंचिक बाजू बरीच सावरली गेली. ७-८ वर्षे प्रामाणिक पणे व चिकाटीने नोकरीच्या ठिकाणचे काम करीत होते. तथापि कांही मंडळी त्या कारखान्यात आपला स्वतंत्र कंपू करुन राजकारण खेळणारे जे होते त्यांचे कडून या भक्ताला निष्कारण उपद्रव होत असे. सुभाषितकारांनी म्हटल्याप्रमाणे मृग, मीन (मासा) व सज्जन यांचा विनाकारणच दुर्जन छळ करतात. नेमके हेच या भक्ताच्या बाबतीत घडत होते.

या भक्ताचे कारखान्यातील काम म्हणजे **''नवीन उत्पादनांसाठी करावयाचे संशोधन''** या स्वरुपाचे होते. अशा कामात यश १०-१५ टक्के प्रयोगांनाच मिळते. व त्यातूनही एखादीच वस्तू तयार करण्याची क्षमता उपलब्ध असल्याने हे संशोधनाचे काम अल्पफलदायीच असते. यात या भक्ताच्या कडून कामचुकारपणा होणे चुका होणे-असा कांहीही भाग नव्हता. पण या पिषुन मंडळींनी मालकाचे कान भरून या भक्ताला त्याच्या **यशाचा** निर्भेळ आनंद कधीच मिळू दिला नाही.

वास्तविक सत्य हे होते की या भक्ताने केलेली जी संशोधने प्रत्यक्ष यशस्वीरित्या उत्पादने तयार करण्याकडे उपयोगी आली त्यातून तो मालक अक्षरशः अब्जाधीश बनला होता, व लक्ष्मीचा ओघ थांबतच नव्हता. हे सगळे उघड्या डोळ्यांना दिसता असल्याने एकंदरीत या प्रकाराचा वीट येऊन नोकरी नकोशी वाटू लागली यात आश्चर्य नव्हते. यांनी स्वतःच आपल्या संशोधक बुध्दीचा वापर करुन त्या क्षेत्रात स्वतःचा कारखाना काढणे अशक्य कोटीतील नव्हते. कदाचित हा विचार कोणातरी सहाय्यक नोकराच्या समोर यांच्या तोंडून प्रकट झाला असेल. त्या सहाय्यकाने लगेच मालकाला **खबर** दिली. यांच्याकडे विचारणा झाली.

एका भेटीत अचानक मालकाने सरळ प्रश्न केला. काय तुम्ही स्वतःचे उत्पादन सुरू करणार कां? यांनी 'श्रीं' च्या कृपा प्रभावाने जे तत्क्षणी उत्तर दिले त्या मुळे मालक खूपच प्रभावित झाला व ह्या विरुध्द वातावरणाला हळू हळू

कलाटणी मिळाली. ती इतकी की त्याच कारखानदारांने पुढाकार घेऊन सर्व प्रयत्न करुन या भक्ताला स्वतःचा कारखाना सुरू करण्यास मदत केली. इतकेच नव्हे तर त्याच्या काखान्यात तयार होणारे भरपूर नफा देणारे उत्पादनच या भक्ताला त्याच्या नव्या कारखान्यात तयार करण्यास स्वतःच सांगितले.

नवीन कारखाना उभारताना असंख्य शासकीय-प्रशासकीय कामांच्या कचाट्यातून फाईल पुढे जाते व कधी कांही वर्षे ही अशी चालली जातात. पण 'श्री' महाराजांचा संकल्पच तसा होता त्यामुळे २-३ महिन्यातच सर्व अनुकूल स्थिती झाली व स्वतःचे उत्पादन करता येऊ लागले.

एखाद्या जीवाला **''आपला''** मानल्यावर श्रीगुरु त्याच्यासाठी काय काय करतात याचे प्रत्यक्ष उदाहरण अनेक प्रसंगातून या भक्ताने पाहिले. शासकीय कामांबरोबरच बँकेची कामे, इतर संस्थांमधील कामे आश्चर्यकारकरीत्या नेमके सहाय्य मिळत गेल्याने जलद गतीने पूर्ण होत गेली. प्रतिकूल अनुकूल झाले, शत्रू-मित्र झाले, विरोधक-सहाय्यक झाले! किती वर्णन करावे. ज्या अधिकाऱ्याच्या मनात यांच्या बद्दल सहानुभूती होती तोंच नेमका पुढल्या टप्याच्या कामात तेथीलही कार्यालयीन प्रमुख म्हणून नेमला गेला व तेथील यांचे काम होताच ८ दिवसांत त्या अधिकाऱ्याची अन्यत्र बदली झाली. 'श्रीं' ची सत्ता कार्य करु लागली म्हणजे काय काय करामती घडतात त्याची कल्पनाही करणे शक्य नाही. असाच एक प्रसंग पुढे घडला--

--------oooooo--------

२) रासायनिक पदार्थ तयार करताना हातात घालायला विशिष्ट प्रकारचे हातमोजे या भक्ताला आवश्यक होते. ते नेमके मिळत नव्हते. प्रयत्नांना यशच येत नव्हते-अशात कांही काळ प्रयत्न व काळजी करण्यात गेला. एक दिवस हा भक्त प.पू.श्री ताई महाराजांचे जालन्यातील स्थानात येउन दर्शन घेऊन परत जात होता. जरी प्रकट कोणाला सांगितले-मागितले नाही तरी मनात ती चिंता होतीच. झाले असे की परतीच्या प्रवासात बस मध्ये बसल्यावर एका सह प्रवाशाने सहज बोलावे तसे यांना **''काय करतां? कुठे असता? ''** असे सामान्य प्रश्न विचारले व स्वतःची ही जुजबी माहिती सांगितली. चर्चेच्या ओघात त्या सह प्रवाशाला इतके कळले की या भक्ताचा रासायनिक पदार्थ तयार

करण्याच्या प्रक्रियेशी संबध आहे. त्याने लगेच विचारले '' कां हो! तुम्हाला विशिष्ट प्रकारचे हात मोजे लागत असतील नां?'' '' अहो मी एके ठिकाणी नोकरी करुन माझा छोटा व्यवसाय ही करतो. मी हातमोजे तयार करतो! तुम्हाला मुंबई पेक्षा स्वस्त दरात योग्य दर्जाचे हातमोजे मी पुरवू शकतो,'' आणि त्या माणसाने खरोखरच एका आठवड्याच्या आत या भक्ताची हात-मोज्यांची पूर्ण गरज भागवली व पुढेही पुरवठा करीत राहिला.

अहो, ही 'श्रीं' नी केलेले या भक्ताच्या समस्येचे समाधान म्हणजे त्यांची योजनाबध्द कृती होती. आम्हाला 'श्री' महाराज बहुधा स्वस्थ-शांत बसलेले दिसायचे पण त्या बसण्यातून त्यांचे अनंत कोटी ब्रह्मांडांचे संचालन चालू असते त्या मानाने त्यांच्या नियामक शक्तीला ही समस्या म्हणजे **''दरिया मे खसखस''** , इतकीच होती.

--------००००००--------

३) त्या भक्ताला एका खरेदीदाराकडून मोठी रक्कम येणे होती. ती रक्कम देण्याचे तो टाळत होता. बँकेतून पैसे मिळण्यासाठी चेक दिला पण खात्यावर पैसे साठूच देत नव्हता. जमा झालेले चेक चे पैसे लगेच हातोहात काढून घेई. बँक मॅनेजरच्या ही गोष्ट लक्षात आली. आणि 'श्रीं' च्या **''चक्राच्या''** '' **चक्रात** '' तो मॅनेजर जे कृत्य करुन सहाय्याला आला त्याची सामान्य व्यवहारात कल्पनाच करता येत नाही. एकदा एक मोठ्या रकमेचा चेक त्या खात्यावर जमा होतो आहे असे त्या मॅनेजरने पाहिले व लगेच या भक्ताच्या नावाने चलन तयार करून ती रक्कम या भक्ताच्या खात्यात वळती होण्याची व्यवस्था केली.''न भूतो न भविष्यती'' असेच हे सर्व घडले. तो संबंधित मॅनेजर स्वत:च स्वत:च्या कृतीचे नवल करू लागला. मग इतरांनी काय म्हणावे?

श्री गुरुंच्या प्रभावाचे हे फल आहे यात शंकाच नाही. इतकी भक्तवशता 'श्रीं' ची आहे. 'श्री' म्हणतात -

ये दारागारपुत्राप्तान् प्राणान् वित्तमिमं परम् ।

हित्वा मां शरणं याताः कथं तांस्त्यक्तुमुत्सहे ॥ (श्रीमद् भागवत)

जे भक्त आपली स्त्री, पुत्र, गृह, संपत्ती, प्राण तसेच इहलोक व परलोक त्या कशाचीही इच्छा न ठेवता मला शरण आलेले आहे अशा भक्ताला सोडून

देण्याचा मी विचारतरी कसा करु शकतो? ही महत्ता 'श्री'चरणी अर्पणभाव ठेवणाऱ्या भक्ताची भगवान स्वतःच वर्णन करतात आहेत.

ह्या भक्ताला जे पदोपदी अनुभव येतात त्याच्या पाठीमागे ही कारण परंपरा आहे. आणि म्हणूनच या अनुभवांबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

--------oooooo--------

४) या भक्ताच्या कारखान्यात अति महत्वाचे एक यंत्र आहे. सर्व प्रकारच्या प्रक्रियेचा आरंभ या यंत्रापासूनच होतो. त्यामुळे हे यंत्र बिघडले की संपूर्ण कामच बंद पडते. असे हे महत्वाचे असलेले यंत्र नवीन आणून बसविल्यानंतरच्या कांही दिवसातील हा घटनाक्रम आहे. कधी तरी अचानक यातील एक भाग जळून गेला. त्याला दुरुस्त करुन पुन्हा सर्व सुरळित व्हायला ३-४ दिवस गेले. त्यानंतर तिसऱ्या चवथ्यादिवशी पुन्हा यंत्र बंद. आता पाहिले तर पुढचा एक भाग मोडला होता. पुन्हा २-३ दिवस काम ठप्प झाले. ह्या दुरुस्तीला ४-५ दिवस झाले तो त्याच्या पुढचा एक भाग अवास्तव झीज होऊन खराब झाला. पुन्हा २-३ दिवस बंद. असे या यंत्राचे रडगाणे अनेक दिवस याच पध्दतीने सुरु होते. जीव मेटाकुटीला आला होता.

त्या आधी या भक्ताच्या पत्नीने यांच्या ''धर्माचरण व अनुष्ठान गुरुभक्ती आदि सर्व गोष्टींचा काय उपयोग'' अशा शब्दात प्रतिक्रिया व्यक्त केली होती. अति उद्विग्नते मुळे यांनाही क्षणभर वाटले की खरच 'श्रीं' चे आपल्याकडे लक्षच नाही. सारख्या विपदा छळत आहेत. या स्थितीत कांही काळ गेला व प. पू.श्री ताई महाराजांकडे येणे झाले. प.पू.श्रीगुरुमहाराज (श्री. गुळवणी महाराज) प.पू.श्री दत्त महाराज तथा प.पू.श्री. ताई महाराज ह्या बाह्यतः भिन्न वाटणाऱ्या स्वरुपाने एकच एक गुरुशक्ती आहे अशी अभेद बुध्दी ठेवून आपली समस्या सांगण्याचे धाडस केले. त्या म्हणाल्या ''अहो! त्या यंत्रापुढे नारळ फोडा!''

आणि काय सांगावे? नारळ फोडल्यापासून कितीतरी वर्षे उलटली पण त्या यंत्राने कधीही त्रास दिला नाही. अणुरेणु तृण काष्ठात सुध्दा वसणाऱ्या चैतन्याने ते यंत्र व्याप्त होतेच की? त्याच्या ठिकाणी असलेल्या ह्या चैतन्याचे पूजन झाले व ते संतुष्ट होऊन कायमचे अनुकूल झाले. किती महत्वाचा संदेश आपल्याला या सहज घटनेतून 'श्रीं' नी दिला आहे.

## 'ते' ज्याला ''माझा'' म्हणतात-

पंकज हा भक्त नांवा प्रमाणेच आहे.

पंकज या भक्तामधे असे मूळचे काय होते? तर ''त्यांनी'' पंकजला ''माझा'' म्हटले होते. ह्या एका कारणामुळे जीवनधारा बदलून **उज्वलता** प्राप्त झाली. चिखलातून कमळ-विष्ठेतून अश्वत्थ वर यावा तसे अतिशय प्रतिकूल वातावरणातूनही पंकज श्रीगुरुभक्त बनून **''तरला''**.

पंकज च्या तारुण्यावस्थेतील वातावरण कसे होते ते पाहिल्यास आजचा पंकज हा तोंच का? अशी शंका वाटावी इतके परिवर्तन त्याच्यात आज झालेले दिसून येते.

यांचा मोठा परिवार आहे. आई व वडील या दोघांच्याकडील भावंडे, नव्या पिढीतील मुले मुली हे सर्व कार्य प्रसंगाने एकत्र येतात. सुख दुःखात धावून जातात. कार्य नसले तरी निमित्त शोधून मुद्दाम सहवासात येतात राहतात. असे सर्वजण पारिवारिक स्नेहाच्या धाग्याने बांधलेले आहेत. ह्या परिवारातील कांही थोडे सदस्य प.पू. श्री दत्त महाराजांचे भक्त आहेत. अनुग्रहीत शिष्य आहेत. सर्व चांगल्या वाईट प्रसंगात 'श्रीं' ना भेटून, सांगून, त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागावे म्हणजे आपले सर्वतोपरी कल्याण 'श्री' कृपेने होते अशी दृढ निष्ठा असलेले ही कांही सदस्य आहेत. तर कांही मंडळी विरुध्द काल प्रवाहात असणारे त्या प्रवाहाप्रमाणे वाहणारे ही आहेत. तथापि कुणालाही **माझेच खरे ! माझेच बरोबर आहे!** असा वृथा अभिमान नाही. ज्यांना जे चांगले वाटते त्यांनी ते स्वीकारावे असे मोकळ्या मनाचे विचार ठेवणारी माणसे आहेत. दुसऱ्याच्या अनुभवाला कांही चांगले आले व आपल्याला ते करणे पटले- भावले तर स्वीकारण्याचा दृष्टीकोन ठेवून असल्याने 'श्रीं' च्या कडे आकृष्ट होणाऱ्यांच्या संख्येत हळू हळू भरही पडते आहे.

पूर्व परंपरेमुळे घरात मांसाहार वर्ज्य नाही. पण जी मंडळी अनुग्रहीत आहेत त्यांनी तो कटाक्षाने त्याज्य मानला आहे. मांसाहाराचा मोठा त्रासदायक प्रभाव म्हणजे त्याच्या जोडीला मद्य, तंबाखू इ. पदार्थ ही हवेसे वाटू लागतात. त्यांच्या बद्दल ''त्याला काय हरकत आहे?'' अशी वैचारिक शिथिलता येते. हा दोषही कांही सदस्यांचा मित्र आहे. पंकज याला अपवाद नव्हता.

एका निकटच्या नातेवाईकाचे आग्रहामुळे पंकज 'श्रीं' च्या दर्शनाला आला. तेंव्हा तो शाळकरी विद्यार्थी होता. 'श्रीं' नी त्या वेळीच मंत्र अनुग्रह दिला. पण त्या अवस्थेचा व वर वर्णिलेल्या मनोवृत्तीचा परिणाम असा झाला की **श्रीगुरुकृपा** ह्या विषयी कुठलीच जाणीव चित्ताला झाली नाही. 'श्रीं' नी खाउसाठी पैसे दिले तर खरंच चॉकलेट आणून संपवायचे . हा प्रसाद जपून ठेवला पाहिजे असा कुठलाच भाव मनात नव्हता.

शिक्षणाच्या संथ वाहत्या गंगेला अचानक अडसर लागला व कांही अपरिहार्य अडचण येउन १२ वी ची परीक्षा हुकली. इथेच शिक्षणाचीही इतिश्री झाली. रिकामा वेळ व्यसनाधीनता व अस्थिर चंचल वृत्ती या मुळे नोकऱ्या-व्यवसाय करण्याचे सगळे प्रयत्न व्यर्थ होत होते. अशात पुण्याजवळच नोकरी असताना नात्यातील मंडळींच्या आग्रहाने पुन्हा 'श्रीं' कडे आला. सगळी परिस्थिती 'श्रीं 'ना कळली. त्यांनी याला दत्तमाहात्म्य वाचायला सांगितले. कितीही अपवित्र-प्रतिकूल वातावरणात असाल तरी थोडा वेळ एकांतात आपल्यापुरती शुध्दता करुन निदान एक अध्याय तरी रोज वाचत जा. अशी सूचना 'श्रीं' नी याला केली.

एकदा काकांनी याला ''गाडी चालक '' म्हणून मदतीला घेतला व पुण्याला आणले 'श्रीं' चे बरोबरच भगवती सौ. ताई महाराजांचेही दर्शन घडले. त्यांनीही समजावले व जप करायला सांगितले. लागोपाठ ३-४ वेळा जालन्यालाही जाणे झाले व प्रत्येक वेळी''जप चालू ठेवा'' असे सांगितले गेले. जालन्याला आल्यावर कांही कारणाने मुक्काम लांबून राहणेही घडत गेले. '' तुझा विवाह झाला म्हणजे सर्व सुरळीत होईल '' असे भगवती म्हणाल्या. त्या ''ड्रायव्हर'' च्या ड्यूटी मुळे बरेचदा रेणुका निवास मधे दर्शन, वासुदेव निवासला मुक्काम इ. होत असे. 'श्रीं' चे **''लक्ष सतत होते''** हे जाणवत असे.

पुढे जालना येथे व श्री क्षेत्री कांही सेवा कार्य देऊन 'श्रीं' नी व भगवतीने पंकजला ६-६ महिने एकास्थानी सत्संगतीत व देवाच्या सांन्निध्यात ठेवले. याचा सुपरिणाम असा झाला की विशेष प्रयत्न न करता सर्व दुर्व्यसने आपोआप सुटू लागली. सामिष आहार समोर आला तरी तो उचलून मुखात घालणे होतच नसे

इतका अंतर्गत बदल झाला. जे आपण कधीच सोडू शकणार नाही असे वाटायचे त्या विषयी मनातच तिटकारा निर्माण झाला. त्या मुळे दुरितांचा क्षय तर झालाच पण

पत्नीं मनोरमां देहि । मनोवृत्तानुसारिणीं ।
तारिणीं दुर्ग संसार । सागरस्य कुलोद्भवाम् ।।

ह्या प्रार्थने प्रमाणे अनुकूल अशा मुलीची भगवतीने योजना करून पंकजला विवाहबध्द केले. व त्याच बरोबर उभयतांना 'श्री' सेवेत ठेवूनच प्रपंचातही ठेवले.

अश्वत्थाच्या बीजाचा वृक्ष व्हावा व सर्वांना उपयोगी व्हावा तसे प्रपंचाचा विचार व सेवेचा अखंड ध्यास वाढत राहून **पंकज** सहपरिवार कमलाप्रमाणे प्रफुल्लित सुगंधित घडला आहे. हे 'श्री' कृपा अनुग्रहाचेच सामर्थ्य आहे ही त्यांची निश्चल भावना आहे.

******

## आम्ही भक्त रक्षणार्थ येथेच आहोत

१) श्री क्षेत्र नृसिंह वाडी येथे श्रीगुरुंनी १२ वर्षे तप केले व नंतर पुढे गाणगापूर कडे प्रयाण केले. त्या वेळी अन्नपूर्णा-योगिनींनी त्यांना अडविले-पुढे जाऊ नका. येथेच रहा-असा त्यांनी श्रीगुरुंना आग्रह केला. तेंव्हा श्रीगुरुंनी त्यांचे समाधान करुन आश्वासन दिले आहे की भक्तकाज पूर्ण करण्यासाठी आम्ही श्रीमनोहर पादुकांचे ठिकाणी येथेच आहोत. काळजी करु नये. हा इतिहास श्रीगुरु चरित्रात अध्याय एकोणीस मध्ये आहे.

प.पू.श्री गुळवणी महाराज तसेच प.पू.श्री दत्तमहाराज यांचे वाडी क्षेत्रावरील अलोट प्रेम पाहिले म्हणजे वरील आश्वासन पूर्ण करण्यासाठी श्री दत्तप्रभूचे प्रकट अवतार असणारे हे महापुरुष आवर्जून वारंवार वाडीला जात होते त्याचे कारण कळू शकते. यांच्या कृती वरुन बोध घेऊन अनेक भक्त त्या त्या वेळेला 'श्रीं' चे सोबत राहण्यासाठी वाडीला जात असत. विशेषत: श्रीगुरु द्वादशी पर्वणीला अनेक मंडळी जात असत. श्री गुरुमहाराजांनी त्यांना प्रोत्साहित करुन ही वारी न चुकता करावी असे आज्ञापिलेलेही आहे. अशा भक्त मेळ्या पैकी एका कुटुंबाचा हा

अनुभव आहे. श्री गुरुमहाराज व त्यांचे नंतर श्री दत्त महाराज ह्यांच्याबरोबर व त्यांच्यानंतर ही आज्ञा पालनार्थ हे कुटुंब दर गुरु द्वादशीला वाडीला जाते.

आर्थिक अडचणी तर नित्याच्याच असत तरीही जमेल तशी व्यवस्था करायची पण वारी चुकवायची नाही या निर्धाराने नेम चालू होता व अद्यापी चालू आहे असे ते सांगतात. श्री गुरुंना भक्तमाहात्म्य वाढवायची एकदा लहर आली. झाले असे की यांच्या गावातील सुमारे १५-२० मंडळींना 'श्रीं' नी सांगितले की हे भक्त प्रतिवर्षी वारी करतात. त्यांना सगळी माहिती आहे. त्यांच्या मार्गदर्शनाचा तुम्ही सर्वांनी लाभ घ्या व वाडीला गुरु द्वादशीला या. झाले ! ही मंडळी एक एक करून या भक्ताला भेटली व आम्हाला 'श्रीं' नी तुमच्याकडे पाठवले असे सांगू लागली. त्या परिस्थितीत सर्वांचा प्रवास सुलभपणे व एकत्रपणे व्हावा म्हणून यांनी दोन खाजगी वाहने 'जाणे-येणे' च्या भाड्यासह ठरवली. वास्तविक यांची स्वतःची स्थिती अत्यंत हलाखीची होती जवळ दीड दोन हजाराचीही रक्कम नव्हती. कारखान्यातील माल ज्या ग्राहकास दिला होता त्याने ४-५ महिने टोलवा टोलवी करून पैसे देणे लांबणीवर टाकले होते. बँकेत कांही शिल्लक असेल अशी आशा वाटत नव्हती तरी तशाही परिस्थितीत अखेरचा उपाय म्हणून बँकेत गेले (स्टेट बँक ऑफ इंडिया) कांही ८-१० हजार काढण्यासाठी चेक दिला. तो स्वीकृत झाला व रक्कम मिळाल्याने प्रवासाच्या प्राथमिक तयारीची (ॲडव्हान्स वगैरे) सोय झाली. सर्व मंडळी सह वाडीला गेले .'श्रीं' ना सर्वांनी कौतुकाने सांगितले की ह्यांनी आमची फार छान सोय केली. 'श्रीं'नीही कौतुकात भर घातली.

यात्रा आटोपून परत आले व ग्राहकाकडून येणे असलेल्या ८-१० हजाराचा चेक हाती पडला. तो घेऊन बँकेत गेले. चेक भरला. त्याच्या पोटी कांही रक्कम मिळावी म्हणून चलन भरले आणि आश्चर्य म्हणजे **यांच्या खाती रक्कम शिल्लक नाही** असे उत्तर मिळाले. हे म्हणाले अहो आता भरलेल्या चेकचे तर पैसे द्या. असे कसे शिल्लक नाहीत. तेंव्हा बँकेचे अधिकारी व हे भक्त एकत्र बसून यांचे पास बुक व बँकेचे लेजर खाते यांचे निरीक्षण करू लागले. तेंव्हा लक्षात आले की यांनी वाडीला जाण्यापूर्वी रक्कम काढण्यासाठी चेक दिला त्याच्या थोड्या आधी

यांच्या खाती ८-१० हजार रक्कम चुकून जमा झाली होती. त्यामुळे यांना लगेच पैसे मिळाले जे वास्तविक यांचे नव्हतेच. हा प्रकार कसा झाला याचे कोडे त्या अधिकाऱ्यांनाही उलगडत नव्हते. नेमकी यांची गरज भागण्या इतकी रक्कम ती ही त्याच दिवशी चुकीने यांच्या खात्यात कशी आली कांही कळे ना ! हे म्हणाले जाऊ द्या झाले ते झाले. मी बँकेचे पैसे ३ आठवडे वापरले त्याचे काही व्याज आकारायचे असेल तर मी ते देईन. ते अधिकारी म्हणाले अहो तुम्ही मूळ रक्कम परत देत आहात हाच तुमचा मोठे पणा आहे. अन्यथा ती रक्कम प्रथम आम्हाला भरावी लागली असती.

स्टेट बँक ऑफ इंडिया सारख्या बँकेत अशा प्रकारे भक्तानुकूल चूक कशी केली गेली व चुकीच्या मागची खरी सूत्र चालक शक्ती कोणाची ? हे भक्त कीर्ती वाढविण्याचे आश्चर्यकारक नाटक 'श्री'गुरुंनी कसे घडवून आणले? तेच जाणोत. जालन्याला आल्यावर हे वृत्त प.पू. श्री.ताई महाराजांना सांगितले. त्या वेळी तेथे उपस्थित असलेल्या भक्ताने नंतर शंका समाधानार्थ भगवतींना विचारले की बँकेमध्ये असे कसे होऊ शकते. **त्यावर भगवती म्हणाल्या ''वेळ आली तर सगळ्या जगाची बुध्दी तो परमात्मा फिरवू शकतो. त्याला भक्तकाजासाठी एवढे करणे काय विशेष?''**

--------००००००--------

२) प.पू.श्री गुळवणी महाराज, प.पू.श्री. दत्तमहाराज व प.पू.श्री.ताई महाराज म्हणजे एकच आहेत असा दृढभाव बाळगून असलेल्या ह्या भक्ताच्या अगदी साध्या अडचणीही भगवती सोडवतात. पहा. भगवतींनी या भक्ताला नियमितपणे जालन्याला येत जा म्हणून सांगितले. पण, आर्थिक ओढाताण फार होती. भाड्यापुरतेही पैसे केंव्हा केंव्हा शिल्लक नसायचे. तशात गुरु पौर्णिमेला प्रयत्नपूर्वक पैसे जुळवून जेंव्हा हे जालन्याला आले तेंव्हा भगवती यांना कृतक् कोपाने म्हणाल्या ''तुम्ही वरचे वर येथे येत कां नाही?'' तेंव्हा यांना प्रसंगाचे भान राहिले नाही. म्हणाले अहो माझ्याजवळ भाड्याला सुध्दा पैसे शिल्लक नसतात मग कसे यायचे?'' भगवतींनी यांना लगेच रु.१००/- दिले व सांगितले

आता हे संपेपर्यंत नियमित येत जा. ह्यांनी त्याप्रमाणे ते पैसे जपून ठेवून फक्त जालन्याला येण्यासाठीच वापरले. त्या जेंव्हा जालन्याला येत जा म्हणून सांगतात तेंव्हा भक्ताच्या सर्व समस्या सुटाव्यात या साठी उपाय म्हणूनच सांगत असतात याचा प्रत्यय या भक्ताने व इतर अनेकांनी घेतला व घेतात.

अनन्यभावे शरण असणाऱ्या या भक्ताच्या उपवर कन्येला उत्तम वर मिळवून देण्याची कृपा प.पू.श्री दत्तमहाराज व प.पू. श्री. ताई महाराजांनी केली. त्याचे अत्यंत कृतज्ञता पूर्वक स्मरण या भक्ताला नेहमी होत असते.हा विवाह निश्चिती सुरु असल्याच्या काळात 'श्री' स्वतः मुलीच्या बाजूने होते. तसे त्यांनीच स्पष्ट सांगितले होते. वर मुलगाही 'श्रीं' चा निःसीम भक्तच असल्याने मुलीला सासर माहेर जाणवतच नाही.

या संदर्भात आणखी एक प्रसंग ह्या भक्ताने निवेदन केला तो असा--

आमच्या कारखान्यात स्वतःच संशोधन केलेले एक उत्पादन यांना सुरु करण्यास 'श्रीं' नी सांगितले होते तो प्रसंग पूर्वी वर्णन केला आहे. त्या अनुषंगाने कच्चा माल मिळविण्यासाठी आमचा प्रयत्न सुरु होता. गोव्याच्या एका मोठ्या कंपनीत (वेस्ट मटेरियल) वाया जाणारा व फेकून द्यावा लागणारा रासायनिक पदार्थ यांच्या कारखान्याला कच्चा माल म्हणून फार उपयुक्त होता. तो मिळवण्यासाठी गोव्याच्या त्या महाकाय प्रकल्पाकडे आम्ही एस्.टी.ने प्रवास सुरु केला. एक पैसा गाठीला नसला की अनंत अडचणी प्रपंचात येतात. तशात मुलगी दाखवण्याचा कार्यक्रम करायचा म्हणजे पुढची कांहीतरी सोय असायला हवी नां? कारखाना सुरु झाला, कांही उत्पादन बाजारात विकले गेले तर ही बाजू सावरली जाणार होती.

गुरुकृपाछत्र आहे याची जाणीव असली तरी विवेक सतत जागा राहतोच असे नाही. त्यामुळे कठिण परिस्थितीत मन व्याकूळ होतेच. असंख्य प्रश्नाचे काहूर मनात घेउन गोव्याचा प्रवास सुरु असताना नेमकी ती बस बंद पडली. रस्त्याच्यां कडेला उपाशी तापाशी बसच्या खिडकीच्या बारला डोके टेकून विमनस्क स्थितीत हे बसलेले. इतक्यात थंड वाऱ्याची झुळूक यावी तसे भगवतीचे शब्द कानावर आले-**''चला! आज यांच्या मुळे कोकण पहायला**

**मिळाले''** क्षणात यांना जाणीव झाली की अरे! भगवतीतर आपल्या बरोबरच आहेत तरी आपण चिंता करायची हे योग्य नाही.

पुढे कारखान्याच्या ठिकाणी पोचले- त्या मोठ्या कंपनीला हवे असलेले वाया जाणारे रसायन नुसते गोळा करुन द्यायलाही सवड नव्हती. मला प्रथम त्यांनी धुडकावूनच लावले. पण दुसरे कांही करणे शक्यच नसल्याने पुन्हा पुन्हा प्रयत्न करीत राहावे या साठी ७-८ दिवस चणे, फुटाणे खाऊन तेथेच तळ ठोकून बसलो. शेवटी एका असिस्टंट मॅनेजरला 'श्रीं' नी बुध्दी दिल्यामुळे त्याने मला हवे असलेले वेस्ट मटेरियल पाईप लाईन बसवून गोळा करुन भरुन देण्याचे मान्य केले.

एक काम 'श्री'कृपेने मार्गी लागले या समाधानात जालन्याला आले. तेंव्हा भगवती एकदम रागावल्या. कारण यांनी या आर्थिक संकटाच्या समाधानासाठी जे दिवस घालवले त्या मुळे मुलीचे विवाह निश्चितीचे कामाला विलंब झाला होता. 'श्री' महाराजांकडून विचारणा झाली होती. सौ.सविता वहिनींचा फोन आला होता. हे भक्तराज कुठे आहेत?

भगवतीचा क्रोधाचा उपशम व्हावा म्हणून हळूच म्हणाले '' ताई महाराज आपण तर माझ्या बरोबरच होतात आणि तरी आपणच असे कसे म्हणता?

यावर एखाद्या नाटकातील पात्र मधेच ''स्वगत बोलते तशा भगवती म्हणाल्या ''अहो पण असं कोणी म्हणत असतात कां?

या स्वगता नंतर पुन्हा क्रोध नाटक सुरू झाले. थोड्या वेळाने यांना ताबडतोब पुण्याला जायला सांगून रवाना केले.

पुण्याला जाऊन वाङनिश्चयापर्यंत गाडे आले. नेमक्या त्या दिवशी प.पू.सौ.लक्ष्मी आई साहेब यांनी इहलोक यात्रा संपवली.

भगवती म्हणाल्या अहो याच साठी तुम्हाला विवाह लवकर आटोपण्याची घाई करत होतो. सर्व सोहळा श्री आईसाहेबांच्या समक्ष झाला असता!

संतांचे अंत:करण किती दयाळू असते !

******

## भक्ताच्या हृदयात राहे सद्गुरुनाथ

देऊळगावराजा परिसरात श्री दत्तमहाराजांवर प्रेम करणाऱ्या मंडळींची संख्या फार मोठी आहे. प.पू. श्री. धुंडीराज महाराजांच्या पासूनच ही मंडळी 'श्रीं'च्या कृपाछत्राखाली आहेत. पुणे येथे जसा 'श्रीं'चा सहस्त्रचंद्रदर्शन उत्सव झाला तसा या मंडळींनी तो शांतीउत्सव पुन्हा देउळगाव राजा येथेही उत्तम प्रकारे केला. प.पू. श्री. धुंडामहाराज देगळूरकर तसेच आणखीही बरीच संत मंडळी उपस्थित होती.

बुलढाण्याहून ७। ८ मंडळी एकत्रपणे ह्या कार्यक्रमाला गेली होती.

अनेक मान्यवरांनी प.पू. श्री. दत्तमहाराजांना मानपत्र देउन त्यांचा सत्कार केला. 'श्रीं' ची **रौप्यतुला** ही झाली.

दुसरे दिवशी सर्व भक्तांना प्रेमाचा निरोप देऊन गावी जाण्यासाठी निरोप व भेट दर्शन व्हावे म्हणून 'श्री' महाराज व सौ. आईसाहेब श्री. धनावत शेठजींच्या वाड्यात बसले होते. त्यांच्या भोवताली बऱ्याच वस्त्रादी भेट वस्तू होत्या. त्यातून जाणाऱ्या सगळ्यांना कांही काही प्रसाद देणे सुरु होते.

ही घटना कळविणारे उभयता रांगेत उभे होते. त्यांना प्रथम कांही प्रसाद मिळाला नाही. मनात थोडी निराशा वाटली. तसेच जायला निघाले. इतक्यात एकाने यांना 'श्रीं' नी बोलवले असल्याचे सांगितले. पुन्हा उभयता दर्शनाला गेले. उत्तम जरीकाठी धोतर व सौभाग्यवतींना नऊ वार साडी असे प्रसाद मिळाले. क्षणभरापूर्वीची निराशा झाल्याचे स्मरुन वाईट वाटले. आपणाकडेही 'श्रीं'चे पूर्ण लक्ष असल्याचे समाधान वाटून नेत्र भरून आले. त्यांना सगळेच भक्त सारखेच प्रिय आहेत हे लक्षात आले. 'श्री' सर्व भक्तांच्या हृदयातच आहेत. त्यांना आमच्या मनातील सर्वच भाव कळतात- मग ही निराशेची छटा कशी झाकली जाईल?

ह्या प्रसंगानंतर त्यांना स्मरण झाले की ते पुण्यालाही सहस्त्रचंद्र दर्शन शांती उत्सवात उपस्थित होते. सगळा कार्यक्रम उत्कृष्ट व अविस्मरणीय झाला. शेवटी सर्वजण गावी जायला निघाले तेंव्हा 'श्रीं' ना बरे नव्हते. तरी भक्तवत्सल 'श्रीं'नी सर्वांना दर्शन दिले. निरोप दिला. यांना म्हणाले ''बुलढाण्याला लवकरच येऊ!

या आश्वासना नुसार 'श्रीं'चे दोन महिन्यात बुलढाण्यात आगमन झाले. श्री. जोशींच्या कडे मुक्काम होता. दर्शनाला गेलो तेव्हा 'श्रीं' आत आन्हिकाला बसले होते. अचानक श्री. रघुनाथराव आले व 'श्रीं' नी बोलावल्याचे सांगितले. नमस्कार केल्यावर 'श्री' म्हणाले ''पुण्याला फार घाई झाली- नाही का?- हे घ्या ''म्हणाले - व एक चांदीचे दत्तमूर्ती मुद्रांकित नाणे प्रसाद म्हणून दिले. माझ्या सारख्या सामान्य भक्ताची आठवण ठेवून जवळ बोलावून प्रसाद दिला. हा प्रसंग हृदयात सुवर्णाक्षरांनी अंकित झाला आहे.

******

## पत्र लिहायचे आहे- पण नंतर लिहू

'श्री' महाराजांना पत्र पाठविल्यानंतर त्याचे पत्रोत्तर फार लवकर लिहीत असत. एकदा सेवकांपैकी एकाला 'श्री' महाराजांच्या चष्म्याच्या घरात एक नांव-पत्ता लिहिलेली चिठ्ठी 'श्री' ठेवत आहेत असे दिसले. सहज जिज्ञासा म्हणून याने 'श्रीं'ना विचारले- यांना पत्र लिहायचे आहे कां?''

''होय लिहायचे आहे--पण नंतर लिहू'' या 'श्रीं'च्या उत्तराचे नवल वाटले. पण एक लक्षात आले की **'श्री'** त्या चिठ्ठीवरील नांव पत्ता बहुधा रोज वाचायचे. -हं.वगैरे कांही स्वगत बोलायचे व चिठ्ठी पुन्हा चष्म्याच्या घरात!

कांही दिवसानंतर याच सेवकासमोर ''त्या'' चिठ्ठी वर ज्यांचे नांव होते ते गृहस्थ आनंदाने, हातात पेढ्यांचा पुडा घेऊन रेणुका निवासात आले. 'श्रीं'ना नमस्कार केला व 'श्रीं'ना निवेदन करु लागले- ''महाराज- ते भाडेकरु घर सोडून गेले'' पेढे ठेवून प्रसाद घेउन जाताना त्यांचे कडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला तेंव्हा कळले की त्यांच्या घरात कोणीतरी भाडेकरु फार दिवसापासून होता. फार त्रास देत असे. खूप प्रयत्न करुनही घर सोडून जातच नव्हता. 'श्री' महाराजांनांही कांही दिवसापूर्वीच सर्व सांगून प्रार्थना करुन गेलो होतो. आज ते गेले व घर ताब्यात आले म्हणून 'श्रीं'ना पुन्हा सांगायला आलो होतो.

'भक्ताने देवांचे स्मरण करावे'. पण येथे रोज चिठ्ठी वाचून देवच भक्ताचे स्मरण करीत होते. ही संकट निवारणाची अतर्क्य रीती त्यांची त्यांनाच ठाऊक.

******

## पूजा करुन घेतली

मी काही काळ वडाळ्याला राहात असे. त्या सुमारास 'श्रीं'चे दादर च्या भक्ताकडे आगमन झाल्याचे समजले. मनांत इच्छा होती की आपले घर जवळच आहे तर 'श्रीं'चे आपल्या घरी येणे व्हावे.आपल्या हातून पाद्यपूजा स्वीकारावी. तसा विचार यजमानांना बोलून दाखवला. त्यांनी परखडपणे सांगितले की 'श्रीं' चे नियम सांभाळणे सोपे नाही. तरी तुम्ही हा विचार सोडून द्या.

आपल्या नशीबात हा योग नाही असे वाटून मन निराश झाले. तथापि संधी पाहून मनाचा हिय्या करून 'श्रीं'नाच प्रार्थना केली की आम्ही येथून जवळच राहतो तर 'श्रीं' चे पाय आमच्या घराला लागतील कां? '' 'श्री' म्हणाले ''यजमानांना विचारले कां?'' त्यावर मी यजमानांचा नकार 'श्रीं' ना सांगितला. पण दयाळू गुरुमाऊलीने दुसऱ्या दिवशी सकाळी ९॥-१० पर्यंत तुमचेकडे येतो असे आश्वासन दिले.

'श्रीं' चे पाद्यपूजेची कशी तयारी करायची हे नीट माहीत नाही. तरी आम्ही उभयतांनी इतरत्र पाद्यपूजा होताना बघितली होती त्याचे स्मरण करून यथामती तयारी केली. मन आनंदाने फुलले होते.

'श्री' महाराज फक्त चांदीच्या पात्रातूनच पदार्थ सेवन करतात असे एकाने सांगितले. सौ.ने महत्प्रयासाने मैत्रिणीकडून तेही आणले.

एका गुरुबंधूनी 'श्रीं' ना व त्यांच्या बरोबरच्या मंडळीना वेळेवर माझ्या घरी आणले. पायावर दूध पाणी घालून आता पाय पुसायचे तोंच पाय पुसायचे वस्त्र घरातच राहिले आहे हे लक्षात आले. सौ. ला मोठ्याने ''ते फडके आण '' असे म्हणालो. झाले!

'श्रीं'च्या सह आलेल्यांना ''फडके हा शब्द खटकला. बरीच कांही कानउघाडणी त्यांच्याकडून झाली. आणखीनच बावरलेल्या अवस्थेत 'श्रीं' ना आंत आणले. त्यांची प्रतिक्रिया व माझी अवस्था 'श्रीं' नी बरोबर जाणली. ते स्वत:च पुढे झाले. चौरंग समोर घेतला व त्यावर 'श्रीं' च्या चांदीच्या पादुका ठेवून मला समोर बसावयाला लावले. सोबत आलेल्या श्री. पुजारी यांना संधीही न देता 'श्रीं' नी स्वत:च पूजा सांगायला सुरवात केली. तरी त्यांची सरबत्ती सुरूच होती. पण 'श्री' स्वतः पूजा सांगताहेत हे जाणून मी अति आनंदित झालो व शांतपणे,

छान पूजा पूर्ण झाली. हे ‘श्रीं’ चे विशेष भक्त वात्सल्य प्रकट झाले नसते तर आमची उभयतांची कांही धडगत नव्हती. पण ‘श्रीं’ नी सगळे गोड केले.

॥ सोनियाचा दिवस आजी अमृते पाहीला ।
नाम आठवीता रुपी प्रकट पै झाला॥

******

## महत्वाचे काम

एकदा पुण्याला आमच्या दृष्टीने अति महत्वाच्या कामासाठी उभयता गेलो होतो. गाडी उशीरा पोचली. तसेच श्रीवासुदेव निवासात गेलो. तेथे भोजनाची व्यवस्था त्यांनी लगेच व उत्तम केली. ‘श्री’ त्या वेळी रेणुका निवासला होते. ‘श्रीं’ ची विश्रांती झाल्यावर ३॥-४ ला आम्ही घरी (रेणुका निवासात) जावे असे त्यांनी सांगितले. आमच्या चि. संजीव च्या विवाहाची निमंत्रण पत्रिका देऊन ‘श्रीं’ ना आमंत्रण द्यायचे हेच ते महत्वाचे काम होते. जाताना बरोबर नारळ न्यायचा होता. घरून आणलेला नव्हता . ३-४ च्या वेळी दुकाने बंद. शेवटी तसेच गेलो. आमच्या ऐपती प्रमाणे साधारण बऱ्यापैकी वस्त्रे (साडी, धोतर,उपरणे इ.) अर्पण करण्यासाठी मुंबईहून आणली तर खरी. पण आपलाच आपल्याला संकोच वाटू लागला. इतकी साधारण वस्त्रे सौ.आई साहेबांना व ‘श्रीं’ ना कशी द्यावी? असे वाटले. सौ.ने त्यातल्यात्यात धीर दिला. ती म्हणाली ‘श्री’ महाराज व सौ.आईसाहेब यांची मने फार मोठी आहेत. ते आपल्याला सांभाळतील. शंका मुळीच घेऊ नये.

‘श्रीं’ ची विश्रांती नुकतीच आटोपली होती. सौ.आईसाहेब समोरच होत्या. त्यांचे मनमोकळे स्वागत व गप्पा या मुळे धीर आला. ‘श्रीं’ना विवाह निमंत्रण पत्रिका देतानाच सोबत आणलेले अहेराचे वस्त्र उभयतांना अर्पण केले. सौ. आईसाहेब म्हणाल्या ‘‘हे सगळ लग्नाच्या आधीच देत आहात.’’ मी म्हटले आम्हाला हे कांही कळत नाही. सर्व साधेच आहे. सांभाळून घ्या.’’दुधाचा प्रसाद मिळाला व आम्ही आनंदाने, महत्वाचे काम झाल्यामुळे समाधानाने परत आलो.

नंतर दादरला एका आप्ताच्या विवाह समारंभात ‘श्री’ महाराज व सौ.आईसाहेब आलेले होते. आम्हीही या समारंभाला गेलो. तेंव्हा उभयपक्षी सगळी घाई-गडबड सुरु होती. तेवढ्यात सौ. आईसाहेबांनी आम्हाला बघितले

व जवळ बोलावले. अंगावरच्या साडीचा पदर दाखवीत हसत म्हणाल्या ''अहो! ही तुम्ही दिलेली साडी आहे बर का? छान आहे.'' आमचे डोळे पाणावले.

अशी ही अथांग सागरा सारख्या मोठ्या मनाची मोठी माणस!

******

## मुलाचा हूडपणा

आमची मुले लहान होती. विशेषतः मुलगा फार चंचल, हूड स्वभावाचा होता. त्याची काळजी वाटायची.

त्याच काळात एकदा 'श्रीं' चे डोंबिवलीला आगमन झाल्याचे आम्हाला कळले. मुलांना घेऊन, उभयता 'श्रीं'चे दर्शनाला गेलो. दर्शन घेउन लगेच परतायचे असे ठरवले होते. 'श्रीं' ना कांही विचारावे असे मनातही नव्हते. पण 'श्रीं' ना नमस्कार करायला वाकलो त्या क्षणी असे वाटले की मुलाच्या व्रात्यपणाबद्दल 'श्रीं' ना सांगावे. त्या प्रमाणे थोडक्यात निवेदन केले. 'श्री 'लगेच म्हणाले 'अहो! तो लहान आहे. या वयात मस्ती, हूडपणा मुलांनीच करायचा असतो.'' त्या नंतर मला पुढे कांहीही बोलू न देता 'श्रीं' नी सद्गुरु टेंबेस्वामी महाराजांची 'प्रश्नावली मागविली. प्रश्नावली आणणाऱ्या महाभागांना पाहताच पहिल्या पाद्यपूजेचा प्रसंग आठवून घाबरलो. दुसरी भीती ही होती की न जाणो एखाद्या मोठ्या-कठीण ग्रंथाचे अनुष्ठान श्री थोरल्या महाराजांनी दिले तर?

पण तसे काही झाले नाही. ''दिगंबरा''चा एक लाख जप करावा असे सोपे सहज साधन माझ्या वाट्याला आले.

नंतर या प्रसंगाचा विचार केला तेंव्हा लक्षात आले की 'श्रीं'चे किती मोठे पूर्व नियोजन मज सामान्य जीवासाठी झाले होते.

एक तर माझ्या मनात नसताना ''मुलाच्या'' समस्येचे विचारण्याची प्रेरणा माझ्या बुध्दीला दिली. नंतर स्वतःच प्रश्नावली पहा म्हणून आज्ञा केली.

प्रश्नावलीतील इष्ट साधन मला झेपेल, पेलवेल असे साधे सोपे यावे अशाच अक्षरावर माझे बोट टेकवले. हे सर्व माझ्यासाठी घडवून आणले.

अशी ही माय माऊली!

पुन्हा नमस्कार करून, प्रश्नावली चा कागद घेऊन आम्ही परत निघालो.

## जेथे जातो तेथे तू माझा सांगाती

**अनेकांना** अनेकदा अनुभवाला येणारे 'श्री' च्या ''जेथे जातो तेथे तू माझा सांगाती'' याबाबतचे कांही अनुभव प्रातिनिधिक स्वरुपात नोंदले आहेत

१

मी एक लहान गावाहून मुंबईला येण्यास निघालो होतो. लहान गावाचे स्टेशन. सर्वत्र काळोख होता. गावातून स्टेशन पर्यंत आणून सोडणारी बस परत गेली होती. पैसेंजर गाडीची प्रतीक्षा करीत उभा होतो. भयानक शांतता, मिट्ट काळोख याचा मनावर परिणाम होत होता. अनामिक भीती जाणवत होती. गाडी केंव्हा येईल कांही अंदाज लागत नव्हता. मी अशा भीतीदायक परिस्थितीत सापडलेलो 'श्रीं' ना समजले असावे. कारण पुढची घटना कल्पनेने सुध्दा अशक्य वाटणारी अशी अकस्मात् घडली.

एक जलद गाडी स्टेशनवरुन पास होणार होती म्हणून हिरवा दिवा सिग्नल मधे सुरु होता. पोर्टर ही हिरवा झेंडा- दिवा दाखवित उभा होता. तथापि गाडी अचानक थांबली . पुढे ड्रायव्हर व मागे गार्ड उभयता खाली उतरुन परस्परांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागले. तेवढ्यात धीर करुन मी चटकन गाडीत बसलो. आणि जणू काहीच घडले नाही अशा सहजतेने गाडी पुन्हा मार्गस्थ झाली. बोरीवलीला वेळेच्या आधीच सुखरुप पोचलो तेंव्हा 'श्रीं' चे स्मरण झाले.

२

माझी मुलगी कठीण आजाराने एका दवाखान्यात होती. तिथून दुसऱ्या दवाखान्यात हलवायचे होते. नाइलाजाने तिला एकटीला पहिल्या दवाखान्यात सोडून आम्ही मोठ्या दवाखान्यात गेलो. परत आल्यावर मुलगी म्हणाली, तुम्ही गेल्यावर एक धोतर नेसून उपरणे पांघरलेले कुणीतरी आतापर्यंत माझ्या सोबतीला होते.

३

एकदा भर पावसात गोवा-मुंबई मार्गावरील आरवलीला सामानासह उतरलो. ५० आंब्यांची १ पेटी व सामानाची बॅग होती. या स्टॉपच्या बाजूनेच

नदीकाठाने- झाडी- जंगलातून एक खडबडीत रस्ता मुरडूवला जातो. अंतर ३-४ कि.मी. असेल. कुठूनतरी येणारी बस या सुमाराला त्या गावापर्यंत जाते. तिच्या आशेने बराच वेळ वाट पाहण्यात गेला. बहुधा गेली असावी. स्टॉपचा परिसर शांत व निर्मनुष्य होता. सह प्रवासी कोणी नव्हते. थंडी बोचरी होण्यापूर्वीच पायी चालत गावी जाणे अपरिहार्य झाले.

। मन चिंती ते वैरी न चिंती । अशी एक म्हण आहे. तिचा प्रत्यय येऊ लागला. अंधाऱ्या वाटेने डोक्यावर खोका व हातात बॅग सांभाळत चालू लागल्यावर झाडी-जंगल-नदीकाठ यातून विचित्र आवाज. त्यात भरीला श्वापदे-भूते यांची भीती मनात दाटून आली. कुठे किंचित आवाज आला. झालेली हालचाल ही भीती आणखी वाढवू लागली. अशा संकटग्रस्त स्थितीत चालणे सुरु असताना एवढ्या काळोखातून कुठून न कळे पण एक मोठी मधमाशी आली व नेमकी माझ्या डोक्याभोवती गुं-गुं करत सारखी फिरु लागली. माझ्या चालण्याच्या गती बरोबर ती ही पुढे सरकत मात्र डोक्या भोवती घिरट्या घालत सोबत करु लागली. असे वाटले की ही माशीअचानक चेहऱ्यावर बसली-चावली तर? तिचे निवारण करायला एक हातही मोकळा नव्हता. हे संकट आले व मन त्या माशी भोवती इतके गुंतले की ती माशी म्हणजे एक इष्टापत्तीच ठरली. जणू 'श्रीं' नीच तिला पाठविले.

झाले असे की माशीच्या चाव्याच्या भीतीने मन इतके व्यापून गेले की आरंभाला सभोवतालच्या परिस्थितीमुळे मनावर आलेले दडपण पूर्णपणे विसरले गेले. एकच ध्यास-शिल्लक राहिला व ह्या ध्यासासोबत पावलेही जलद पडू लागली. गांव केंव्हा आले कळलेच नाही. गावाची सीमा दिसू लागताच ती माशी अचानक कुठे गेली देव जाणे !

वाटले- कोण होती ही माशी?

## ४

आपल्या गुरुमहाराजांबद्दल **'अनन्य'** भाव असला म्हणजे साधना चांगली होते. केंव्हातरी ह्या अनन्यतेची परीक्षा श्रीगुरु घेतात. एकाला स्वप्नातील दृष्यात कांही परिचित व कांही अपरिचीत स्थान दिसले व त्या घरात एका महात्म्याचे

वास्तव्य आहे असे जाणवले. ते महाराज आजारी असावेत. सभोवताली त्यांचे भक्त सेवेत मग्न होते. अचानक ते दृष्य बदलले व एका एकांत स्थानात फक्त मी व ते महाराज असावेत असे जाणवले. त्यांच्याशी कांही संभाषण झाले. त्यांनी ''दुसऱ्या दिवशी सकाळी सहाला ये, दीक्षा देईन'' असे सुचविले मात्र. माझा नूर एकदम पालटला व स्पष्ट स्वरात नकार देऊन तेथून जाऊ लागलो. तेवढ्यात स्वप्न संपले.

या नंतर जेंव्हा प्रत्यक्ष साधनेला बसलो तेंव्हा काही अपूर्व अनुभव येऊन उत्तम साधन झाले. परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे ते जणू प्रमाणपत्रच होते !

*****

**श्री वासुदेव निवास आश्रमात नियमितपणे येऊन होईल ती सेवा करणाऱ्या अनेक भक्तांपैकी एका गुरु भगिनींच्या स्मरणातील हे प्रसंग आहेत.**

१. या भगिनींच्या वडीलांनी 'श्रीं' चा सहवास मिळेल तितका साधून सेवाही पुष्कळ केली होती. 'श्री' महाराज यांच्या घरी अनेकदा गेले होते. त्या मुळे या गुरुभगिनीला 'श्री' महाराज म्हणजे आपल्या घरातील एक जेष्ठ वडीलधारी व्यक्तीच वाटत. त्यांच्या शक्तिसंपन्न श्री गुरु स्वरुपाची ओळख झाली नव्हती.

अशाच एकदा माध्यान्ही भोजनाचे सुमारास या भगिनी आश्रमात आल्या. भोजनाची पाने ऑफिस शेजारच्या खोलीतच मांडलेली होती. ती सोवळ्यातली पंगत होती. 'श्री' महाराज समोरच बसले होते. या भगिनीने देव दर्शन घेताना मनात म्हटले ''आपल्याला कधी 'श्रीं' च्या सह पंगतीचा लाभ मिळणे शक्य तरी आहे कां? '' नंतर औदुंबराचे दर्शन केले व पुन्हा निघण्यापूर्वी देवा समोर आल्या. इतक्यात आतून एक सेवक आला. यांना म्हणाला ''पटकन् आंत चला.'श्री' महाराज तुमच्यासाठी जेवायचे थांबलेत!''

यांना फारच आश्चर्य वाटले. कांहीतरी चूक होत असेल असे वाटून खात्री करुन घ्यावी म्हणून त्या सेवकाला विचारले ''मलाच बोलावताहेत नां?'' तो

सेवक पुन्हा खात्रीपूर्वक म्हणाला ''चला! आता वेळ लावू नका-'श्री' महाराज थांबले आहेत.'' मग मात्र या भगिनी चटकन् आत गेल्या. पाहतात तो 'श्री' महाराजांचे शेजारीच यांचे पान वाढलेले होते. डोळ्यात आनंदाश्रू आले. हे म्हणजे श्रीदत्त बावनीतील "जाल पातली तने न चीड ...... याचे उदाहरण आहे.

--------oooooo--------

२. या भगिनी रेणुका निवास मधे ही बहुधा दर्शनाला जात असत. कधी कधी 'श्रीं'चे घरी कांही कुलधर्म-कुलाचार असायचा. मोजकीच भक्तमंडळी भोजन प्रसादाला असत. यांना वाटायचे '' 'श्रीं' च्या घरच्या कुलाचाराचा ''प्रसाद'' आपल्याला कधी मिळेल कां? ''

या नंतर एकदा 'श्रीं' च्या दर्शनाला गेल्या होत्या तेंव्हा 'श्रीं' नी त्यांना विचारले-''काय **(अमुक दिवशी )** तुम्हाला सुट्टी आहे कां?'' यांना सुट्टी नव्हती म्हणून तसे सांगितले. नंतर इतर कांही बोलणे होऊन या भगिनी परतल्या. हा संभाषणाचा प्रसंग ही विसरल्या.

पण एके दिवशी यांच्या घरी रेणुकानिवास मधून एक ४ खणांचा टिफिन डबा ताज्या प्रसादाच्या पदार्थांनी भरुन आला होता. आणणाऱ्या व्यक्तीने 'श्रीं' चा निरोप सांगितला. ''ताईंना म्हणावे आमच्या जेवणापूर्वी हा प्रसाद डब्यात भरुन पाठवला आहे. सायंकाळी आल्याबरोबर ग्रहण करावा.'' यांना नोकरीमुळे प्रसादाची वेळ साधत नव्हती म्हणून 'श्रीं' नी ही योजना केली.

******

यामुळेच पुढील 'अन्नपूर्णा' ध्याव घडले.

## अन्नपूर्ती

**श्री गुरुचरित्र ऐकताना त्यात अनेक सकाम भक्तांच्याही कथा आहेत. 'श्री' महाराज म्हणायचे ''असे ना का सकाम भक्ती पण इतर कुणाकडेतरी मनुष्याकडे मागणे मागायचे. जे पूर्ण होणार नाही-, त्या ऐवजी देवाकडेच मागावे. ते पूर्ण ही होईल अन् एक दिवस हीच भक्ती आपल्याला निष्काम भक्तीकडे नेईल.**

या सकाम भक्तांच्या मनोरथ पूर्तीकडे पाहता लक्षात येते की याहून ही अधिक भरभरुन 'श्री' महाराजांनी आपल्याला दिले. त्याला सीमाच नाही. ती भास्कर ब्राह्मणाची कथा-

त्रिपुंपर्याप्त पाकेन, भोजयामास यो नृणां ।
सिद्धः चतुःसहस्त्राणी श्री दत्तःशरणम् मम्।।

(श्री दत्तभावसुधारस स्तोत्र)

तीन माणसांना पुरेल एवढ्या अन्नात चार हजार माणसे जेवली.

'श्री' महाराजांनी बीडला संकल्पित केलेले यज्ञ आदि जेंव्हा जेंव्हा होतात व त्या निमित्ताने प्रसादाच्या पंगती होतात, निमंत्रित केलेले व न केलेले, असे असंख्य भक्त संतुष्ट-तृप्त होऊन जातात. 'श्री' महाराज कौतुकाने म्हणायचे ''मराठवाड्यात अन्नदान पुष्कळ होते.'' मात्र या अन्नदानाचे श्रेय 'श्री' नेहमी यजमानाला द्यायचे. अन्न कधीच कमी पडत नसे, खूप चवदार लागायचे अन् त्या सगळ्या सोहळ्यानिमित्त होणाऱ्या खर्चाला कुठून द्रव्य येते व कशी तोंड मिळवणी होते हे लक्षातही येत नसे. मात्र कोणाचेही देणे बाकी राहात नसे.

एका स्नेह्याने आश्चर्योद्गार काढलेले आठवतात. ते म्हणाले''लग्नासारखे एखादे कार्य उभे राहिले की कष्ट करणारी सर्व मंडळी एक दोन दिवसातच थकून जातात पण तुमच्याकडे 'श्री' महाराज आल्यावर आठ-आठ दिवस उत्सव होतो. रात्री बारा वाजेपर्यंत कामे करुन ही आचारी, कामगार, मोलकरणी इ. सर्व मंडळी भल्यापहाटे अतिशय उत्साहाने पुन्हा कामावर हजर होतात. हे कसे काय घडते?''

प्रत्यक्ष चैतन्याचा साक्षात्कार घरात असताना उत्साहाचा अभाव असणे शक्यच नाही.

सेवा समर्थांची !

## ~~डॉ. तळवलकर उवाच~~

श्रीदत्तमहाराजांचे औषधोपचाराच्या निमित्ताने 'श्रीं'च्या सहवासाचा लाभ मिळवणारे डॉ.तळवलकर यांचे हृद्‌गत्-

प.पू.ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे कृपाछत्र मला लाभले म्हणून मी मला धन्य समजतो. बरीच वर्षे ते डॉ.ह.वि.सरदेसाई यांच्या दवाखान्यात येत असत. मी त्यांना अनेकवेळा भेटलो, परंतु ती भेट केवळ प्रकृतीच्या निमित्ताने होत असे. एके दिवशी 'श्री' महाराजांनी एका पत्राद्वारे कळविले की, 'वाढत्या वयामुळे येणाऱ्या व्याधींसाठी आता औषधोपचारासाठी दवाखान्यात ये-जा बंद करावे.शक्यतो घरीच देवांच्या सांन्निध्यात रहावे असे वाटते.' डॉ.सरदेसाई यांनी 'श्रीं' च्या भावनेचे स्वागत केले, व केंव्हा कांही अडचण वाटल्यास जरूर कळवावे, आम्ही आहोतच, अशा आशयाचे पत्र लिहिले होते.

त्या नंतर कांही महिन्यांनी 'श्री' महाराजांची प्रकृती अचानक बिघडली. डॉ.मानवी यांच्या विनंतीनुसार मी महाराजांना, त्यांच्या घरी जाऊन नियमितपणे पाहू लागलो. घरी दर्शनाला येणाऱ्या सर्वांचे स्वागत चहा किंवा दूध देऊन होत असे. आजारपणातही दर्शनानंतर त्यांनी सूचना केली. ''डॉक्टरांना कॉफी देत जा हं ! ''मी घरी नेहमी चहाच घेतो. परंतु मला कॉफी मनापासून आवडत असे. माझी आवड त्यांना कशी कळाली याचा मला अचंबा वाटला.

तपासताना सहसा कोणत्याही तक्रारीची नोंद ते करीत नसत. श्री.फडके, श्री.पाटणकर, श्री रघुनाथराव, डॉ.देशमुख त्यांचा आढावा देत असत. त्यांना कांही विचारले तर त्याचे मुद्देसूद उत्तर देत. ते सर्वांना अहो! म्हणत, परंतु दृष्टीमधे कारूण्यभाव असल्यामुळे दुरावा वाटत नसे.

आसनावरचे दर्शन फारच लोभस असे, व ते पुन्हापुन्हा घडावे अशी आतूरता वाटत असे.

श्री.फडके श्री. पाटणकर आदींचा माझ्याशी स्नेहभाव असायचा. ते म्हणत ''डॉक्टर तुम्ही दीक्षा कां घेत नाही?'' साधनेसाठी पाळावयाचे

यम,नियम,नियमितपणा माझ्या व्यवसायात मी कसे पाळू शकणार? सकाळी लवकर उठल्यापासून रात्री उशीरापर्यंत रुग्ण आणि दूरध्वनी उसंत देत नाहीत. मग कोणत्या तोंडाने आपण विचारणार? ती. ताई महाराजांनी मला दिलासा दिला. त्या म्हणाल्या ''डॉक्टर तुमच्यावर कृपा आहेच.''

**एकदा धीर करुन मी 'श्री' महाराजांना विचारले ''अध्यात्मिक साधनेची आवड असून मी ती करु शकलो नाही. याची मला खंत वाटते.'' त्यांनी तात्काळ सांगितले-**

**''साधना दोन तऱ्हेची असते. व्यष्टीची व समष्टीची. आमची पध्दत एकांतात व्यक्तिगत असते. त्याची शेवटची परिणती ''सर्वांमध्ये परमात्मा दिसण्यातच होते.'' डॉक्टरांची पध्दती, सर्व रुग्णांची सेवा म्हणजे ''परमेश्वराची सेवाच आहे. या भावनेने करणे''.**

**दोन्ही पध्दतीमध्ये फलप्राप्ती एकच. फक्त एक सोपी व दुसरी कष्टप्रद आहे. आपण पुढे कधी एकांतात साधनेचा प्रयत्न कराल तर तिची सिध्दी लवकर होईल.''**

'श्री' महाराजांच्या अशा स्वभावामुळे माझ्या मनाला स्वस्थता लाभली. आपण योग्य मार्गावर आहोत असे आश्वासन एका सिध्दपुरुषाने दिल्याने माझ्या आनंदाला पारावर राहिला नाही.

'श्री' महाराजांचे सगुण रुप दृष्टी आड झाल्यानंतरही आजतागायत ''आपल्यावर संत माहात्म्यांचे/परमेश्वराचे कृपाछत्र आहे'' अशी जाणीव टिकून आहे.

******

> समर्थ या नावे दीनांचा कृपाळ
> हे तव सकळ स्वामी अंगी ॥
> -तुकाराम महाराज

## देव सन्निध आहे

विपदा म्हणजे संकट नेहमीच आमच्यावर येवोत हे मागणे कुंतीने परमात्मा कृष्णाकडे मागितले. कारण संकटातच तुमचे तीव्रतेने स्मरण होते, असे स्मरण झाले की परमात्म्याचे भक्त वात्सल्य उफाळून येते, त्यामुळे आपली भेट घडते. या भेटीतच जीवनाचा खरा आनंद आहे, हा भाव कुंतीमातेचा आहे.

श्रींच्या भक्त परिवारातील एका परिवाराचा भाव याहून वेगळा नव्हता. प्रपंच चालण्यासाठी कोणतातरी व्यवसाय अर्थार्जनासाठी करावाच लागतो. त्यामध्ये शारीरिक, मानसिक कष्ट असतात. मानहानीचेही प्रसंग येतात. पण व्यवसाय सोडून देता येत नाहीत. अशी अनेक व्यवसायातील संकटे या कुटुंबावर आली. पण श्रींच्या कृपेने यातून ते बाहर पडले. श्रींनी त्यांना आधार दिला आणि दु:खाकडे बघण्याची दृष्टी दिली.

या परिवारातील एक जण सांगतात, 'दु:खद प्रसंगांचा वादळासारखा सर्व उध्वस्त करणारा प्रसंग आला पण या उध्वस्त करणाऱ्या वादळाचे **आम्ही शतश: आभारी आहोत**. आमचे कुटुंब जेंव्हा संकटाच्या गर्तेत कोसळले होते, सर्वत्र अंधार दिसत होता, वर कोणी काढेल असा आशेचा किरण दिसतच नव्हता परंतु श्री महाराजांच्यावरील अढळ श्रध्देचा आधार होता. त्यांची कृपा एक ज्योतीरूपाने आली व प.पू. सौ. ताई महाराज यांच्याकडे हाताला धरून आणले. साक्षात् भक्तिमयी तेजांचे दर्शन घडून सहस्त्र चंद्राच्या शीतलतेत न्हाऊन निघालो. ''तस्मिंस्तज्जने भेदाभावात् '' असे एक सूत्र 'श्रीं'च्या पत्रात व्यक्त झालेले आहे. सौ. ताई महाराज या अशा ''तज्जन'' आहेत. 'श्रीं'च्या फोटोपुढे बसून कांही निवेदन केले, प्रश्न मांडले की त्याचे न विचारत उत्तर त्या देतात. समाधान करतात. संपूर्ण मार्गदर्शन मिळते व सर्व चिंतांचे मळभ जाऊन 'श्रीं'च्या भेटी इतकाच परमानंद प्राप्त होतो. हाच खरा आनंद आहे ही त्यांची भावना आहे.

श्री दत्ताचे चार प्रकारचे भक्त आहेत. अर्थार्थी, आर्त, जिज्ञासू व मुमुक्षू. या चार पायऱ्या क्रमाने उच्चतर भावाकडे नेणाऱ्या आहेत. ज्याचा भाव गुरूचरणी ''हे सर्व तारक आहेत'' असा दृढ असतो त्याला अर्थार्थी म्हणजे प्रापंचिक समस्यांनी ग्रासलेल्या महान संकटातून 'श्री' हाताला धरून वर काढतात व अलगदपणे आर्त अवस्थेला नेतात.

व्यावहारिक दृष्टीने पाहिल्यास ही आर्तता निर्माण करण्यासाठी आलेली अवस्था अधिकच दुःख कष्ट देते. असह्य वेदना, भवितव्यात संपूर्ण काळोख, सगळीकडून निराशा, विरूद्ध घटनांचे आघात होणे ही 'श्रीं'चीच ''**आर्तता निर्माण करण्याची एक योजना आहे**''. ही जाण जर आर्त अवस्थेत निर्माण झाली तर परम पदाच्या अधिक जवळ नेणारी जिज्ञासा सहज प्रकट होते. हेच ''वरील परिवाराला'' लाभलेले भाग्य आहे. आता त्यांनां विपदांचे वावडे नाही. 'श्रीं'च्या प्रवचनांचे सर्व लहान मोठे ग्रंथ तन्मयतेने वाचणे व त्यावर मनन होणे हा मनाला छंद जडला आहे. प्रपंच दुःखमय नाहीच हा भाव उमलतो आहे.

सदा सर्वदा देव सन्नीध आहे.। कृपाळूपणे अल्प धारिष्ट्य पाहे ।। असे कृपाळू 'देव' आमचे श्री दत्तमहाराज आहेत असा पूर्ण विश्वास या परिवाराचा आहे.

******

## भयकृत्- भयनाशक -परमात्मा- श्री दत्तमहाराज

श्रीविष्णुसहस्त्रनामात ''भयकृत भयनाशनः'' असे विष्णुंचे नाम आहे. संकटग्रस्त भक्तांना 'श्री' सांगत असत, ''देवाची प्रार्थना करा. भयकृतभयनाशन परमात्मा आहे. संकटे तेच आणतात (आमच्या चुकांमुळे), त्या संकटकाळी सहनशक्तीही तेच देतात व अत्यंत दयाळूपणे त्या संकटांचेही निवारणही करतात. आपण फक्त प्रार्थना सोडू नये. हा ह्या नामातील भाव आहे.''

एकदा डिसेंबर महिन्यात एका भक्ताच्या गावी श्रीदत्तयाग आयोजित केला होता. 'श्रीं'चे वास्तव्य तसेच सर्व ब्रह्मवृंदाचे वास्तव्य यांच्या घरी होते. रात्री हा ब्रह्मवृंद 'श्री' चे समोर बसून '**मंत्रजागर'', चर्चा, प्रार्थना,''** अशा स्वरुपाचे वेद पठण करीत असे.

श्रीदत्तयागाच्या पूर्णाहुतीच्या आदल्या दिवशी रात्री यागाचे जे आचार्य, जे उत्तम मंत्रज्ञ विद्वान वैदिक होते त्यांनी यागादी कर्माच्या निर्विघ्न समाप्ती व्हावी यासाठी कांही मंत्रात्मक प्रार्थना केली.

प्रार्थना पूर्ण झाल्यावर 'श्रीं'नी आचार्यांना विचारले ''काय, आज देवाला काय मागितले?'' या नंतर 'श्रीं'चे व आचार्याचे कांही संभाषण झाले व शेवटी आचार्यांनी 'चुकलो'' म्हणून 'श्रीं'ची क्षमा मागितली. 'श्री' उत्तरले-'' तुम्ही चुकलात पण देव चुकणार नाही. तो फलित देणारच आहे.''

या नंतर 'श्रीं'नी यागाचे यजमानांना बोलावून सूचना दिली. ''उद्या सकाळी बाजारातून मिळतील तितक्या ताडपत्र्या घेउन या व संपूर्ण मंडप आदि झाका. दुपारी पूर्णाहुतीत पर्जन्यामुळे विघ्न येउ नये.''

यांना आश्चर्य वाटले. डिसेंबर महिना, पावसासारखे काहीही वातावरण ही नाही. या दिवसात असे संकट संभवत नाही. तरी असे कां सांगितले? तथापि त्यांची आज्ञा पालन झाली. त्यानुसार ताडपत्र्या आणल्या व सर्व सुरक्षा केली.

दुपारी पूर्णाहुतीला आरंभ झाला व अनपेक्षित पणे जोरदार पर्जन्यवृष्टी सुरु झाली. (''देव चुकणार नाही''- याची प्रचीती आली)

'श्रीं' नी त्यांचे दैवी-संरक्षक कवच सर्वत्र पांघरलेलेच होते. लौकिक विधी म्हणून ताडपत्र्याही घातल्या होत्या. त्यामुळे सगळे सुरक्षितपणे सुरळीत निर्विघ्न पार पडले.

नंतर जिज्ञासा म्हणून यजमानांनी यज्ञाच्या आचार्यांना थोडे आग्रहपूर्वक विचारले तेंव्हा कळून आले की आदल्या रात्री प्रार्थना मंत्र म्हणताना कांही स्खलन झाले, अनुस्वाराची चूक झाली. त्या मुळे मंत्राचा अर्थ बदलला व त्याचे फळस्वरुप अनपेक्षित जी पर्जन्य वृष्टी झाली ते आहे. (हेच 'श्रीं'नी आचार्यांना सांगितले होते.)

मंत्ररूपी व मंत्राचे फल देणारे श्रीदत्तप्रभू हे स्वतः श्री महाराजच आहेत. मंत्र चुकला म्हणुन विपरीत फल मिळाले(ते ही त्यांचेच ईश्वरी न्यायाच्या निष्ठुरते मुळे) . तसे स्व सामर्थ्याने त्यांनीच रक्षणही केले-'' **हे 'श्रीं'चे भयकृत् भयनाशक**'' स्वरुप प्रकट झाले तो हा अविस्मरणीय प्रसंग आहे.

*****

## ।। प्रेरयत्तीर्थयात्रायै तीर्थरूपोऽपि यः स्वकान्।।

-श्री दत्तभावसुधारस

''स्वत: सद्गुरुमहाराजांचे ठिकाणी सर्व तीर्थांचा वास असतो. ज्याला सर्व तीर्थयात्रा कराव्या असे वाटेल त्याने श्रीचरणांना स्मरण सेवन वंदन इ. प्रकारे भजावे. हीच सगळ्यात फलदायी व सोपी तीर्थयात्रा आहे.'' हे श्रीगुरुचरित्र-गुरुगीता इ. ग्रंथांचे सार आहे.

तथापि कांही वेळा श्रीगुरुमहाराज एखाद्या भक्ताला अथवा भक्तांना तीर्थयात्रा करण्यास प्रेरित करतात. इतकेच नव्हे तर स्वत: बरोबर जाऊन त्यांची यात्रा सफल करतात. हे काय रहस्य आहे ते त्यांचे तेच जाणोत. श्रीगुरु चरित्रात ''तंतुकाला श्रीशैल्य यात्रेला नेऊन ''क्षेत्र माहात्म्य'' ही सांगितले आणि दृष्टांत द्वारा शेवटी ''तूच माझा मल्लिकार्जुन'' असे म्हणणाऱ्या त्या तंतुकाला तसेच रूप दाखवून तृप्त केले व भक्ताची वाणीही सार्थ केली. हे सगळेच आश्चर्य आहे. लीला आहे.

असाच एक भक्तमेळा सोबत असताना त्रिस्थळी यात्रा करून आणली, असा प्रसंग या भक्तांपैकी एका कडून कळला. त्यात जी विशेष लीला त्यांनी केली ती केवळ भक्त वात्सल्य व ''भक्त प्रतिज्ञा'' खरी करणे. ह्यामुळे घडली. प्रयाग व काशी पर्यंत सर्व मंडळी 'श्रीं'चे सोबत सुखाने प्रवास करून आली. आता गयेला जाउन त्रिस्थळी पूर्ण होणार होती. पण या भक्ताच्या तिसऱ्या स्थळीत अकल्पित अडचण निर्माण झाली. यांच्या मातोश्री प्रवासात सोबत होत्या. त्यांची प्रकृती एकाएकी बिघडली. दिवसात २०-२५ प्रसंग शौच्याचे आले. अशक्तपणा, ताप सगळेच संकट प्रवास करायला विरोध करणारे असे आले. 'श्रीं'च्या सोबत उर्वरित भक्तमंडळी गयेला निघून गेली. पण यांना मातेच्या सेवेत मागे रहावे लागले.

गयेला प्रस्थान करण्याआधी 'श्रीं'नी मातोश्रींजवळ येऊन कृपादृष्टीने त्यांना न्याहाळले. धीर दिला. काशीला जेथे मुक्काम होता तेथे आसपास डॉक्टर असतील. पहा, असे 'श्रीं'नी सांगितले. गया क्षेत्री जाणे होणार नाही याचे वाईट वाटले. 'श्री' म्हणाले 'प्रार्थना करा. महाराज पाहतील काय ते.' त्या

प्रमाणे समोरच राहणारे डॉक्टर गाठले. ते प.पू. श्री. गुळवणी महाराजांचे भक्त आहेत असे कळले. ते डॉक्टर 'श्रीं'नाही जाणत होते. ते लगेच यांच्या बरोबर 'श्रीं'च्या दर्शनाला आले. म्हणाले अहो तुमच्यामुळे आज केवढा मोठा लाभ झाला. या डॉक्टरांच्या औषधाने मातोश्रींना फारच जलद आराम पडला. तथापि अशक्तता होती.

मुक्काम ज्यांच्या घरात होता ते क्षेत्रोपाध्याय महोदय यांच्या मातोश्रींची भेट घेऊन सांत्वना द्यावी, हवे नको ते पहावे या हेतूने आले. मातोश्रींना बरे आहे हे पाहून त्यांनीच सल्ला दिला. या भक्ताला सुचविले, 'अहो आपले कुटुंबही बरोबर आहे. त्यांच्यासह मातोश्री येथे राहून विश्रांती घेतील. दुपारच्या गाडीची वेळ पाहून सांगितली. म्हणाले- आज जा. रात्री मुक्काम करा. मी पत्ता देतो तेथे जा. उद्या तीर्थविधी करून सायंकाळी परत या. तोपर्यंत आम्हीही लक्ष ठेवू.'

सर्व मंडळींचे असे सहाय्य होत गेले व गयाश्राध्द करून हे भक्त परत आले. प्रवासात संकटे आली व 'श्री'कृपेने त्यांचे निरसन ही झाले. अंधारात मार्ग दर्शक रिक्षेवाला भेटला, गयेचे क्षेत्रोपाध्याय **यांचीच वाट पहात** दारातच उभे असलेले भेटले. यांनी न कळवताच तेथे यांच्या विष्णुपदावरील श्राध्दविधीसाठी जणू पूर्व सूचना दिल्याप्रमाणे व्यवस्था झाली व सर्व आटोपून परत श्रींच्या सह परत आले.

निज कृपार्द्र कटाक्ष निरीक्षणात्
हरति यो निजदुःखमपि क्षणात्
स वरदो वरदोषहरो हरो
जयतियो यति योगि गतिःपरा ।।
-प्रार्थनातारावली.

यातील निजदुःख म्हणजे 'श्री' ज्याला **'निज'** म्हणजेच माझा म्हणतात त्याचे दुःख ते क्षणात नाहीसे करतात. हे स्वतःचे माहात्म्य या प्रसंगातून स्वतःच प्रकट केलेले पाहून भक्त गहिवरुन गेला.

******

## दीनाचा दयाळू मनाचा मवाळू

'श्री' महाराजांच्या एका भक्ताने एका निसर्ग रम्य स्थानात 'श्रीं' च्या सेवेसाठी आश्रम निर्माण केला आहे. तेथे 'श्रीं' चे जाणे व बरेचदा राहणे होते. यज्ञादि अनुष्ठाने,उपासना प्रवचने असे विविध उपक्रम 'श्री' कृपेने होतात. येथे एकदा 'श्री' आलेले होते, या कथेतील 'श्रीं' चा भक्त ही तेथे दर्शनाला गेला व सेवेत रमला होता. अचानक असे वृत्त कानावर आले की 'श्री'महाराज या भक्ताकडे (परतीच्या प्रवासात) येउन पुढे जायचे ठरले आहे. यांना मोठा अभिमान वाटला. आपण कोणीतरी विशेष कृपापात्र आहोत असा अहंकार उफाळून आला. 'श्रीं' ना समक्ष जाऊन प्रार्थना करावी असे वाटले.

एक मन असेही म्हणत होते की आपण ऐकलेले सत्य नसावे 'श्री' महाराज आपल्याकडे कसे येतील? आपली अशी काय योग्यता आहे? बर! येण्यासारखा कांही प्रसंगही नाही. तरी भीत भीत म्हटले ''महाराज! आमच्याकडे या ना ! '' 'श्री' लगेच उत्तरले ''हो! येऊ! मग मात्र यांना एकदम वर्तमानाचे भान आले.

यांचे कुटुंब बाहेरगावी गेलेले होते. हे स्वतः नोकरीची वेळ सांभाळून सायंकाळी घरी आल्यावर घर उघडणार. तो पर्यंत कुलूप! आणि गंमत म्हणजे 'श्रीं' च्या आगमनाची वेळ नेमकी संध्याकाळची होती. यांनी १-२ दिवस रजा घेऊन तयारी करण्यासाठी परवानगी विचारली. तर 'श्री' नको म्हणाले. कामावरुन अगदी दोन तास आधी घरी यायलाही नकार दिला. म्हणाले''अहो! तुम्ही घरी याल त्याच वेळी आम्ही तेथे पोहोचणार आहोत.'' करता करता मोठ्या मुष्किलीने दोन तास आधी सुट्टी घेऊन घरी यायला परवानगी दिली.

पण 'श्रीं'ची योजना यांना थक्क करणारी अशी होती. यांचे कडे 'श्रीं' ची येण्याची वेळ साधून एक भक्त दांपत्य नेमके यांचेकडे पोचले. त्या वहिनींनी सगळी तयारी केली. 'श्रीं' चे आगमनाचे औक्षण करून त्यांना आत घेतले पूजा उपहार सगळे त्या उभयतांच्या नियोजनामुळे व्यवस्थित झाले. हा भक्त केवळ मंत्रमुग्ध होऊन कठपुतळीच्या बाहुलीसारखा त्या प्रसंगात वावरत होता.

******

## साधनाशक्ति माहात्म्य

असाच एक प्रसंग एका साधकाच्या स्मृतीतील आहे. श्री गोविंदराव यांना लहान वयातच शक्तिपात दीक्षा लाभ झाला. आई वडील व इतर मंडळींना गुरुमहाराजांकडून दीक्षा मिळाली ते पाहून यांनीही दीक्षेसाठी विचारले व दीक्षा मिळाली. यांचे लहान वय असल्याने यांच्याशी 'श्रीं'चे बोलणे वागणे यांच्या वय-बुध्दी-समज याला अनुलक्षून हलके फुलके असे असायचे. त्यामुळे दीक्षा प्राप्ती व श्रीगुरुकृपा, योग, साधना, या गोष्टींचे **महात्म्य** न कळताच फार मोठा काळ निघून गेला. यांच्या वाढत्या वयानुसार 'श्रीं' नी यांना आश्रमात सगळे उत्सवादि प्रसंगी अवश्य येत जावे असे सांगणे सुरु केले. भेट झाली की पुढील कार्यक्रम केंव्हा आहेत ते सर्व आवर्जून सांगत असत. गोविंदरावांना याचा व्हावा तसा बोध तेंव्हा झाला नाही. 'श्रीं' चे वारंवार सांगणे होत असूनही 'श्रीं' च्या दर्शनाला व आश्रमातील कार्यक्रमांना जावे असे वाटतच नसे.

अशा प्रकारे वयाची ५० हून अधिक वर्षे उलटून गेली. एकदा गोविंदरावांना मुंबईच्या लोकलने रोज 'जाणे येणे' प्रवास घडू लागला. कामाचे स्वरुप तसे होते. आता प्रवासात वेळ कारणी लागावा व सभोवतालच्या लोकांचे बोलणे इत्यादि विषय त्रास देऊ नयेत असे वाटू लागले. तशात श्री दत्त महाराजांच्या संबधी अनुभव, समस्यापूर्ती अशा स्वरुपातील माहितीचे पुस्तक प्रवासात नेण्याची बुध्दी झाली. १-२ दिवस पुस्तक पिशवीतच प्रवास करुन परत आले. एकदा पुस्तक उघडण्याची संधी आहे असे वाटले म्हणून हातात घेतले व १-२ पाने वाचायला आरंभ केला. त्या बरोबर साधनेतील शक्तीच्या क्रियांचा आवेग येऊन खूप आनंद व वेगळेच कांहीतरी वाटू लागले. नुसते पुस्तक हाती घेण्याचे हे फळ आहे असे लक्षात आल्यावर वाचनाची तीव्र ओढ लागली व एका लयीत सर्व वाचन पूर्ण झाले. जे वाचले त्यातून व आतून शक्तीने केलेल्या बदला मुळे मनात समजून आले की '' 'श्री' महाराज, श्री गुरुमहाराज यांचे काय माहात्म्य आहे, आपल्याला दीक्षा मिळाली गुरुकृपा झाली म्हणजे नक्की काय प्राप्त झाले. 'श्रीं' चे दर्शन घेणे, आश्रमात जाणे साधना करणे या सर्व गोष्टींचे किती महत्व आहे'' हे सर्व जणू आतून समजून आले. पण काय उपयोग? 'श्रीं' चे सगुण

रुप दृष्टीआड होऊन ही ६-७ वर्षांचा काल निघून गेलेला होता. तथापि **''देर से आये- दुरुस्त आये''** या म्हणी प्रमाणे उशीरा कां होईना पण गोविंदराव सन्मार्गावर आले.

त्यांनी हे सर्व सांगताना जो भाव व्यक्त केला तो पश्चाताप युक्त हळ हळ व्यक्त करणारा असा आहे. ''मी मोठी चूक केली व तीन चतुर्थांश आयुष्य फुकट घालविले, 'श्रीं' च्या मोठ्या कृपे पासून वंचित राहिलो. तसे इतरांनी करु नये व माझे अनुभवातून सावध व्हावे, या साठी ही कथा सांगत आहे.'' असा त्यांचा अभिप्राय आहे.

******

## आठ दिवसात ''शासन निर्णय'' बदलला

शासकीय सेवेत असणाऱ्या व नसणाऱ्यांनाही हे माहीत आहे की एकदा सरकार दरबारी एक निर्णय घेतला गेला की त्या निर्णयातील ''जाचक अटी व कांही सेवकांवर येणारे संकट'' या विरुध्द कितीही आवाज उठवला तरी प्रथमतः दगडाच्या भिंतीवर डोके आपटल्याने जे होईल तेवढेच हाती येते.

एक गुरु भगिनी म्हणतातः-

शाळेतील नोकरी सुरू असताना, घर प्रपंच सांभाळून ४२ व्या वर्षी बी.एड्. करण्याचे प्रयत्न सुरू झाले. परीक्षेच्या दहा दिवस आधी धाकट्या भावाला दुर्दैवी अपघात होऊन तरुण वयात देवाज्ञा झाली. अशाही मनस्थितीत पेपर लिहिले व 'श्री' महाराजांच्या कृपेनेच परीक्षा उत्तीर्ण झाले. ती **'अन्नामलाई'** ह्या विद्यापीठाची बी.एड्. परीक्षा होती.

परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या एक महिन्यातच **शासन निर्णय** जाहीर होऊन महाराष्ट्रातील शिक्षक सेवेसाठी बी.एड्. ची या 'अन्नमलाई' विद्यापीठाची पदवी 'अग्राह्य' ठरवली गेली. पदरात शेवटी काहीच पडले नाही. दुसऱ्या शासनमान्य विद्यापीठाची परीक्षा पुन्हा सगळी तयारी करून देणे हे अशक्य प्रायच होते. (कोणी म्हणेल- असे का? त्यात काय? तर । जळामध्ये मासा। निद्रा घेतो कैसा। जावे त्याच्या वंशा। तेंव्हा कळे।। हेच उत्तर संभवते.)

याच सुमारास श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथे श्रींची स्थानिक **'काल भैरव** मंदिर स्थानी प्रवचने सुरू होती. श्री. नागले या भक्ताने 'श्रीं'ना हरिहरेश्वरला कांही वार्षिक उत्सवासाठी आमंत्रित केल्यावरून श्रींचे वास्तव्य तेथे होते.

प्रवचन श्रवणाला गेल्यावेळी स्वतःची प्रापंचिक **समस्या इतकी ज्वलंत** असल्याने ऐकायला बसल्या जागेवरूनच मनोमनी 'श्री' महाराजांना प्रार्थना केली. ''महाराज मला पुन्हा बी.एड्. करणे शक्य नाही आणि आता या शासनाच्या धोरणामुळे एक तर **''अनट्रेंड''** शिक्षक म्हणून नोकरी जाईल किंवा अल्प पगारावर नोकरी करावी लागेल. आता माझा भार तुमच्यावरच !''

ही घटना आदल्या गुरुवारची. आणि बरोब्बर पुढल्या गुरुवारी **(आठ दिवसात)** सरकारचा नवा सुधारित निर्णय जाहीर झाला व माझ्या सह आणखी पुढील दोन बॅचेस पास होई पर्यंत या विद्यापीठाची पदवी ग्राह्य राहील असा आदेश आला.

आरंभाला म्हटल्याप्रमाणे शासन दरबारी हे अशक्यच! तरी घडले.

।। भीषस्तपति सूर्यः ।।

''आपले कर्तव्यात कसूर झाली तर भयंकर शिक्षा होईल ''

अशी **ज्यांच्या बद्दल** साक्षात् ''सूर्यदेवालाही '' भीती वाटते म्हणून तो नियमितपणे प्रकाश व उष्णता देतो. **''त्यांच्यापुढे''** पृथ्वीवरील एकादे राज्य शासन- काय आहे?

**।। श्री गुरुदेव दत्त।।**

******

## आठवी चित्ता तूं गुरु दत्ता। जो भवसागर पतिता त्राता ।।

भवसागरात पडलेल्या भक्तालाही जो भवसागरातून तारून नेतो त्या प्रभूला भक्तावरील कितीही कठीण प्रसंग असला म्हणून तारणे काय कठीण आहे? **''जो अंतरी चिंती''** एवढे एकच कर्तृत्व भक्ताला पुरे आहे. बाकी सर्व तो पाहून घेतो.

एक गुरु भक्त सांगतात की आमच्या वरील दोन भीषण संकटे 'श्री' कृपेने निवारण झाली. 'श्रीं'चे स्मरण व 'श्रीं'चा फोटो बॅगेत सतत ठेवला असतो, त्याचे स्मरण दोनही संकट समयी घडले ते प्रसंग असे :-

सप्टेंबर १९९७ मध्ये उभयता पतीपत्नी बदरी-केदार क्षेत्रासह ३५ दिवसांच्या 'जय अंबे' यात्रा कंपनी तर्फे आयोजित यात्रेला गेलो. हिमालयाच्या पर्वत राजीत, गंगेच्या अवखळ उड्यामारीत उतरणाऱ्या प्रवाहात वळसे घालत जायचे. कोणी खेचर, कोणी डोली, कोणी कंडी तर कुठे घोड्यावर बसून असे जात असताना काही संयोगवश **आमचा** घोडा वाट सोडून खोल दरीकडे घसरू लागला. खाली खोल श्री गंगाजी, निरुंद व खडकाळ अवघड वाट आणि तशात ८-१० फुट घसरून जाणारा घोडा. साक्षात काळाचेच आमंत्रण होते. कुठे, कसे, कोणाला सावध केले की नकळत एकजण पुढे झाला व घोड्याचे घसरणे थांबवले. सर्व सहप्रवासी ओरडू लागले आणि येथे मात्र 'श्री' कृपेने हस्तक्षेप करून सगळे चित्र बदलविले. प्रयत्नपूर्वक आमचा घोडा पुनश्च मूळ वाटेवर आला. प्राणावरचे संकट 'श्रीं'नी टाळले म्हणून कृतज्ञतेने स्मरणपूर्वक वंदन केले. पुढची यात्रा मात्र निर्विघ्नपणे पूर्ण झाली.

**दुसरा प्रसंगः-**

गुरुपौर्णिमेच्या उत्सवासाठी आम्ही कांही भक्त जीपने जालन्याला निघालो. देउळगांव मही गांवा जवळ आलो तो अचानक जीपचे पुढचे एक चाक निखळले व घरंगळत १५० फूट दूर जाऊन पडले. इकडे जीपचा ताबा पूर्णपणे सुटला पण रस्त्याकडेला खाली घसरत जाणारी जीप चिखलात रुतून बसल्याने थांबली. फारसे कांहीही न होता सर्वजण बाहेर आलो. 'श्री' महाराजांच्या कृपेनेच जीपचा अपघात होऊनही सर्व कुशल राहिले. अशा प्रसंगी वास्तविक कांहीही होऊ शकते.

मारणाऱ्यापेक्षा तारणारे हात लांब आहेत, मग असे रक्षण होणारच !

******

# संकटमोचन सद्‌गुरु

या संकट मोचन प्रसंगातील आणखी एक पुष्प :-

मी पुण्याला श्री. गुळवणी महाराजांच्या उत्सवास गेले होते. उत्सव संपल्यावर घरी परततानाचा दर्शन व निरोप सोहळा सुरु होता. **'' केव्हा परत जातो, कोणची गाडी ''** अशी परतीच्या प्रवासाची माहिती 'श्रीं'ना सर्वजण नित्य प्रथेप्रमाणे निवेदन करीत होते. माझे दर्शन झाले व पुणे-मुंबई एशियाड बसने जात असल्याचे सांगितले परंतु 'श्रीं'च्या दृष्टीतील भाव लक्षात आले. माझी **दिवस व वाहन** यांची निवड त्यांना मान्य नव्हती हेच जणू त्या दृष्टीतून सूचित झाले.

व्यवहारी मन हा सूक्ष्म संकेत मानायला तयार नव्हते. म्हणून शेवटचा उपाय म्हणून 'श्रीं'नाच मनोमन प्रार्थना केली व म्हटले ''महाराज आपण नेहमी कर्तव्याला न चुकण्याची शिकवण आम्हाला देता. उद्या **''मी शिकवीत असलेल्या''** विषयाचा पेपर आहे त्या मुळे शाळेत हजर होणे अनिवार्य आहे. तथापि हे ही जाणवते आहे की आपण परतीच्या या वेळेला व वाहनाला अनुमती दिली नाही. मी आपली क्षमा मागते आणि प्रार्थना करते की आपल्या शिकवणुकी नुसार, कर्तव्यपूर्तीसाठी अनुज्ञा द्यावी. '' आणि निर्धारित बसने मुंबई प्रवास सुरु झाला.

खोपोली नंतर मी सीट बदलून ड्रायव्हरच्या मागील सीट वरून उठून कंडक्टरच्या मागे बसले. इतक्यात समोरुन एक भरधाव टँकर आला आणि ड्रायव्हर कडील बाजूने बसवर खडखड आदळत घासून गेला. काही क्षणातच ही घटना धडली. ड्रायव्हरला निश्चित वाटले की मागची सर्व प्रवासी मंडळी आता वाचणे कठीण आहे. बस उभी करून निरीक्षण केले तो बसची एखादी सुध्दा काच फुटली नव्हती. मी तर बळजबरीने 'श्रीं'ची आज्ञा मोडून पण प्रार्थना करून आले होते. पण बाकीची प्रवासी मंडळी ?

भजती त्याते उध्दरसी । न भजती त्यांहि कृपा करिसी ।।

ह्या आरतीतील ओळी स्मरल्या व मन कृतज्ञतेने भरून आले.

******

## शास्त्र प्रमाण

श्री पुरुषोत्तम भट यांचा मोठा मुलगा १६ व्या वर्षी रेल्वे अपघातात, देवाघरी गेला. 'श्री' महाराज परगावी गेलेले होते. आल्यावरती भेटायला म्हणून आमचे बिऱ्हाडी आले. या दुःखद घटनेस सुमारे महिना उलटून गेला होता. सकाळी ९ च्या सुमारास श्री दत्तमहाराज घरी आले. कांही बोलण्या पूर्वी त्यांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. आम्ही उभयता ते पाहून गहिवरून गेलो.

''आत्म्याच्या अमरत्वाचे सिध्दांत'' ह्या प्रसंगी त्यांनी सांगितले नाहीत. या संतमाहात्म्याच्या स्थितप्रज्ञ अंत:करणाला ''परदु:ख '' शीतल नव्हतं. तर ''दुसऱ्याच्या दु:खे दुखवावे'' या सिध्दान्ता नुसार व्यापक झालेले त्यांचे स्थिर अंत:करण कमल कोमल होऊन द्रवलं, पाझरलं !

थोड्या वेळाने त्यांनी विचारले'' मुलाची पत्रिका कोणाला दाखवली नव्हती का? वडील श्री. श्रीपाद के. भट हे प्रख्यात ज्योतिषी होते. पण घरातील लोकांच्या पत्रिका ते सहसा पाहात नसत. त्रास होतो म्हणत. इतर कोणीही ''ही पत्रिका अल्पायुषी आहे-अपघाती मरण दाखविते असे सांगितले नव्हते.

'श्री' महाराजांना विचारले की ''समजा आधी कळलं असतं तर ही विधी घटना टाळता आली असती का?''

भारतीय शास्त्रांवर पराकोटीची निष्ठा असलेले महाराज म्हणाले ''शास्त्रात अपघाती मृत्यू टाळण्यासाठी उपाय सांगितले आहेत नां? टाळता येत नसले तर त्या उपाय वाक्यांना वैयर्थ्य येईल. ''

आम्ही अवाक् झालो. विचारात भिनलेली, आचारात साक्षात साकारलेली ही निष्ठा आम्हाला खूप काही सांगून गेली.

******

## निर्विघ्नं कुरु मे देव

एका भक्ताच्या सौभाग्यवतींचे एक मोठे ऑपरेशन करायचे ठरले. तसे 'श्री' महाराजांना कळविले. 'श्रीं' नी दैवी उपाय सांगून ''तो करा'' व डॉक्टरच्या सल्यानुसार उपचार ही करा असे सांगितले. श्री विष्णु सहस्त्रनामाचे रोज एक प्रमाणे पाठ व ''घोरात् कष्टात्'' स्तोत्राचे १०८ पाठ करायला

सांगितले. ती उपासना त्यांनीच करवून घेतली व ऑपरेशन ही व्यवस्थित पार पडून आरोग्य प्राप्ती झाली.

याच भक्ताचा नातू चि. तेजस हा लहान असताना त्याच्या डोक्याचा आकार सामान्यतः असतो त्या पेक्षा जास्त मोठा वाटत होता. डॉक्टरांना शंका वाटली की डोक्यात पाणी झाले असावे. ते पाणी ऑपरेशन द्वारा काढावे म्हणजे सामान्य आकार येईल.

'श्री' महाराज देउळगाव राजा येथे आले आहेत असे समजल्यावर नातवाला तेथे नेऊन 'श्रीं'ना सर्व सांगितले.

'श्रीं'नी त्याला जवळ बोलावून त्याच्या मस्तकावरुन आपला वरदहस्त फिरविला व आशीर्वाद ही दिला ''ईश्वर कृपेने सर्व ठीक होईल. काळजी करू नका.'' तज्ञ डॉक्टरांकडून उपचार करुन घ्या. तसेच कुलस्वामिनीची आराधना चालू ठेवा.

'श्रीं' च्या कृपेने नातवाचे ऑपरेशन करायची वेळच आली नाही. औषधोपचाराने व उपासनेनेच काम झाले.

व्यावहारिक उपाय व ईश्वराची सेवा उपासना ही दोनही शस्त्रे वापरून संकटात न घाबरता 'श्रीं' वर भरवसा ठेवून निश्चिंत रहाण्याचा अभ्यास सर्वांनाच हितकारक ठरावा.

******

## पत्नीचा विरह

माझ्या सौभाग्यवतीचे अकाली निधन ही जीवनातील भरून न निघणारी मोठी पोकळी . ९७ सालची दिवाळी मोठ्या आनंदात पार पडली. भाउबीजेनंतर तिसऱ्या दिवशी सौ. चे हृदयविकाराने निधन झाले. अकल्पित व आगंतुकपणे घडलेली ही घटना जीवाला चटका लावून गेली. जीवन एकाकी आणि भकास वाटू लागले. सेवानिवृत्तीनंतर काळ कसा घालवावा ही चिंता. अशा नैराश्यात कोणाचा आधार? नातेवाईकांची समजावणी! सर्वच खोटा आधार.आपणच आपल्याला सावरायला हवे. जायचे हे प्रत्येकास आहेच. काळ जातच असतो. तो काय थांबतो कोणासाठी?

दुसऱ्याच दिवशी 'श्री' महाराजांना पत्र लिहिले. पत्रावर अश्रूंचे थेंब पडत होते. पत्रात सर्व सांगितले. म्हणालो'' आपणच या जीवाला सांभाळा!'' आपणावाचून कोण आहे? कोणाचा आधार शोधावा?''

'श्रीं' चे त्याच आठवड्यात पत्र आले. सांत्वनपर पत्र. ते म्हणाले ''जाणारा काळच आपले दुःख विसरावयास लावील. सर्व धीराने घ्या. नामस्मरण करा. सर्व ठीक होईल.''

असे हे आमचे **'श्री'**

सगुण रुपात नसले तरी त्यांची अनुभूती येतच असते. त्यांनी आम्हा सर्वां लेकरांना भगवती प.पू. श्री. ताई महाराजांचे पदरात घातले आहे.

'श्री' चरणी एकच मागणे-

हेचि दान देगा गुरूदेवा।
तुझा विसर न व्हावा ॥

******

## 'श्रीं'ची दयादृष्टी

एकदा एका भक्ताला सकाळी उठल्यावर अंगात ताप असल्याचे जाणवले. म्हणून ऑफिसला जाणे रहित केले. थोडा वेळ झोप विश्रांती घेऊन नंतर डॉक्टरकडे जाईन असे सांगून निद्राधीन झाला. पण ऑफिसची वेळ टळून गेली. आणि यांची प्रकृती ठीक झाली. अशा प्रकारे घरी राहणे झाले. दुपारी मुला मुलांचे भाडण झाले. एक वाजताची वेळ असेल. त्या प्रकारात एका लहान मुलाचे हाताचे हाड डिसलोकेशन मुळे सरकले व असह्य वेदनांनी तो रडू लागला. यांनी हलक्या हाताने प्रयत्न केला तर कांही वेळातच ते हाड पुन्हा स्थानावर आले व वेदना कमी झाल्या.

हा भक्त घरीच होता म्हणून इतक्या चटकन सर्व नॉर्मल झाले. मग हा ताप कुठून आला? व कसा गेला?

गुरु भक्ताला या प्रसंगात ''त्यांची '' आश्चर्यकारक कृपाच दिसणार! कारण तर्क बुद्धीला या प्रश्नाचे उत्तर सापडणारच नाही.

******

## अस्थमा अटॅक

एकदा एका भक्ताच्या पत्नीला अस्थमा विकाराचा त्रास होऊ लागला. त्यातच एकदा जोराचा अटॅक आला; म्हणून दवाखान्यात ठेवले. त्या काळात त्यांना गर्भधारणा झालेली होती हे डॉक्टर जाणून होते. सलाईन व त्या सोबत तीव्र शक्तीची इंजेक्शने असा उपचार करणे अपरिहार्य असून त्याचा साईड इफेक्ट गर्भावर होऊ शकेल. कदाचित गर्भपातही होईल. पण दुसरा पर्याय नाही असे डॉक्टरांचे सांगणे झाले, व ती उपाय योजना सुरु झाली.

एका गुरुबंधूंनी 'श्री' महाराजांना पत्र लिहून या भक्ताची समस्या कळविली. 'श्री' महाराजांचे लगेच पत्र आले. 'श्रीं' नी यांना कांही जप दिला व त्याचे अनुष्ठान करायला सांगितले. ती जप संख्या पूर्ण होता होताच यांच्या पत्नीला आराम पडला. प्रकृती अगदी सामान्य झाली. सगळी संकटे टळली व पुढे प्रसूतीही नॉर्मल झाली.

******

## वैद्यक शास्त्र दृष्ट्या चमत्कार

याच भक्ताच्या बाबतीत दुसऱ्या अपत्यप्राप्तीच्या वेळी सात महिने झाल्यावर अचानक गर्भाशयाचे मुख उघडे झाले. ताबडतोब डॉक्टरांकडे नेले. स्त्री रोग तज्ञ म्हणून दूरवर कीर्ती पसरलेले असे हे डॉक्टर आहेत. त्यांनी पूर्ण तपासणीनंतर दोन प्रकारांची शक्यता वर्तविली. एक तर मुदतपूर्व बाळंतपण होईल किंवा दीर्घकाल पर्यंत संपूर्ण विश्रांती (बेड-रेस्ट) घेतली तर कदाचित पूर्ण दिवस भरु शकतील. दर १५-१५ दिवसांनी तपासणी करुन घ्यावी असे सांगून घरी पाठवले.

या नंतर 'श्री' महाराजांना पत्राने सर्व वृत्त कळविले. याही संकटातून पार होण्यासाठी 'श्री' महाराजांनी कांही मंत्र देउन त्याचा जप करवून घेतला. जप सुरु झाला व पुढची चेक-अप ची तारीख आली. डॉक्टरांनी तपासून सांगितले की गर्भ पिशवीचे तोंड बंद झाले असून धोका टळला आहे. मात्र त्यांनी असेही म्हटले की वैद्यक शास्त्राच्या दृष्टीने पाहता ही घटना म्हणजे एक अतर्क्य चमत्कारच आहे.(डॉ.चे शब्द''**मिरॅकल** इन गायनॅकोलॉजी'').

******

## अठ्ठेचाळीस तास मुदत

एका भक्ताचे वडील ७०-७१ वर्षे वयाचे असताना त्यांना हृदय विकाराचा उपद्रव झाला. नायर हॉस्पिटल मध्ये उपचारार्थ नेले होते. तपासणीनंतर डॉक्टर म्हणाले की पेशंटच्या हृदयाचा आकार अवास्तव वाढला आहे (एनलार्जमेंट) व त्या मुळे हा त्रास आहे. केंव्हा काय होईल सांगता येत नाही. पुढील ४८ तास सतत निरीक्षणाखाली ठेवून नंतरच कांही सांगता येईल असे म्हणाले.

या भक्ताने वडीलांचे जवळ बसून मोठ्याने ''घोरात कष्टात् '' स्तोत्र म्हणायला सुरवात केली. सुमारे १॥-२ तासानंतर मुख्य डॉक्टर पुन्हा तपासायला आले. पेशंटच्या परिस्थितीत सुधारणा जाणवली म्हणून पुन्हा संपूर्ण तपासणी केली. ते म्हणाले आता हार्ट एकदम नॉर्मल आहे कांही धोका नाही. यांना घरी घेऊन जा. ४८ तासांचे नंतर काय होणार होते ते एक 'श्री' महाराज जाणो. पण २ तासात काय घडले ते मात्र सर्वांनी पाहिले.

******

## ॥ मग या विठ्ठले कृपा केली ॥

हे सत्य आहे. आपल्या अंतःकरणातील सद्गुरुकृपेविषयीची तळमळ तीव्र असेल आणि सद्गुरुंशी सतत अनुसंधान असेल तर त्याला प्रतिसाद निश्चितच मिळतो. त्यांच्याशी संभाषण घडून मार्गदर्शनही घडते.

एका साधक भगिनीच्या बाबतीत असेच घडले. वृद्धापकाळात एका रात्री ह्या भगिनीच्या आजीची तब्येत खूप बिघडली. तिला ॲटॅक आला होता. त्यामुळे ती श्वास लागून तळमळू लागली. त्या भगिनीला हे बघवत नव्हते. ती अत्यंत तळमळीने हातात अंगारा घेऊन आजीचा त्रास कमी व्हावा म्हणून श्रींच्या भव्य तस्वीरीसमोर उभे राहून प्रार्थना केली व तो अंगारा आजीच्या कपाळी लावला.

तथापि, त्यांच्या आयुष्याची मर्यादाच संपली होती. तिने अंगारा लावला आणि दुसऱ्या क्षणी आजी शांत झाल्या. त्यांना उत्तम गती प्राप्त झाली. जीवाची पुण्याई आणि गुरुकृपा एक झाली.

******

## लक्षचंडी ? -हो, करा.

'श्री' महाराजांच्या आशीर्वादाने बीड येथील घरात 'श्री भगवती 'ची उपासना सुरु झाली. त्यांनी सातत्याने ते सर्व समारंभ करवून घेतले. स्वतः उपस्थित राहून त्यातील न्यूनाधिक्य, दोष दूर करुन सर्वही कर्म शुद्ध करुन घेतले.

डॉ. दिलीप यांना या वास्तूमध्ये ''श्री लक्षचंडी याग'' व्हावा असे सारखे वाटू लागले. त्या संदर्भात 'श्रीं' ना विचारले असता त्यांनी सांगितले की प्रपंचात अनेक अडचणी येत असतात. या दैवी कार्यात अडथळे नकोत. ''अयुतचंडी याग'' जर यथावकाश झाले तर हा ही संकल्प पूर्णत्वास जाईल.'' असे सागितले.

'श्रीं'च्या देहाला वयोमान परत्वे व व्याधींच्या भोगामुळे प्रवासाची दगदग होईल म्हणून प्रथम ''अयुतचंडी'' यागाचा संकल्प श्रीवासुदेवनिवास मधे 'श्री' महाराजांनी करवून घेतला. त्या साठी सुमूहूर्त काढून दिला. त्या नंतर त्या कार्यासाठी आम्ही आश्रमात गेलो.

तेथे कळले की नित्य स्वयंपाक नैवेद्य करणारे आचारी गावाला गेलेले आहेत आणि दोन-चार दिवस तरी परत येणार नाहीत. आमच्या बरोबर १५-२० लोक होते. त्यामुळे आश्रमाचे व्यवस्थापकही चिंतेत होते.

'श्री' महाराजांनी मूहूर्त काढून दिलेला असल्याने आम्ही मनात निश्चिंत होतो. कर्म आरंभाची वेळ सकाळी आठची होती. आश्रमातील लोक म्हणाले तुम्ही फार लवकरची वेळ ठरवली. 'श्री' महाराजांना ही वेळ कळवूच नका. ते मग फार लवकर उठून स्नानादि आन्हिक आटोपण्याची घाई करतील. ही धावपळ त्यांच्या सध्याच्या नाजुक प्रकृतीमानाला मानवणारी नाही. ते आम्हीपण मान्य केले. सर्व प्राथमिक कर्मे होऊन मुख्य कार्यक्रमाला आरंभ होणार इतक्यात बरोबर आठच्या ठोक्याला 'श्री'महाराज त्यांच्या आसनावर विराजमान झाले. सर्वांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला. पूर्ण कर्म त्यांनी व्यवस्थित करवून घेतले. त्याहूनही आश्चर्य म्हणजे गावाला गेलेले आचारी सकाळी ७ वाजतांच आश्रमात हजर झाले. ''कामे लवकर आटोपल्याने परत आलो'' असे ते म्हणाले.

''अयुतचंडी यागाचा'' संकल्प हा या प्रमाणे 'श्री' महाराजांचा संकल्प आहे. 'सत्य संकल्पाचा दाता नारायण त्यात अडचणी येण्याचे कारणच नाही. योग्य बुद्धी देऊन तेच सर्व अडथळे दूर करतात.

त्यादिवशी 'श्री'महाराजांनी स्थानिक ब्राह्मण व बीड चे ब्राह्मण यांच्या कडून मिळून श्रीगणपती अथर्वशीर्षाचे सहस्त्रावर्तन करवून घेतले. शंभरएक मंडळींनी प्रसादाचा लाभ घेतला. 'श्री' महाराज स्वतः भोजनाला उपस्थित राहिले. सर्व कर्म यथासांग करवून घेतले. त्यानंतर आम्ही सर्व बीडला परतलो.

**''सद्‌गुरुसारीखा असता पाठीराखा''** याची प्रचीती आली.

******

## चंचलवृत्ती साधनेमुळे स्थिरावली

**(डॉ.देशमूख-बीड यांचेकडे नित्य देवी पाठ करणारे वैदिक ब्राह्मण यांचा वृत्तांत त्यांच्याच शब्दात दिलेला येथे पहावा-)**

''मी जेंव्हा चौदा वर्षाचा होतो तेंव्हा बार्शीला होतो. माझ्या तीर्थरुप वडिलांना देवाधर्माची खूप आवड होती. कथा कीर्तनाची आवड होती.

त्या काळात प.पू.श्री. दत्तमहाराज बार्शीला एका गृहस्थाकडे एक महिना येऊन राहिलेले होते. रोज सायंकाळी 'श्रीं'ची ''ज्ञानेश्वरी'' वर प्रवचने ६ ते ७ वाजेपर्यंत होत होती. माझे वडील श्रवणाला जायचे. आल्यावर भरभरून स्तुती करुन 'श्रीं'चे सांगण्याबद्दल आनंद व्यक्त करीत. मलाही म्हणायचे 'बघ' जेमतेम २५-३० वर्षांचे 'श्रीं'चे वय आहे. विद्वत्ता किती मोठी आहे. तू ही ऐकायला येत जा.'' त्यांच्या बरोबर गेलो तेंव्हा 'श्री'महाराजांचे मला प्रथमदर्शन घडले. ती प्रतिमा अंत:करणात घर करुन आहे.

पुढे **''पोलीस ॲक्शन''** काळात हैद्राबादला ६-७ वर्षे राहणे झाले. त्याच काळात तेथील ''सनातन संस्कृत पाठशालेत'' शिक्षण झाले. तेथील आमचे गुरुजी धनपाठी विद्वान ब्राह्मण होते. त्यांनी यजु:संहितेचे ६० अध्याय माझ्याकडून मुखोद्गत करुन घेतले. नंतर इकडे परत येणे झाले व प्रपंच सुरु झाला. संसारातील अडचणी मुळे असमाधानी वृत्ती बनली. तशात पंढरपूरच्या

वाऱ्या घडल्या. तथापि वृत्तीतील अशांतता गेली नाही. एक वृद्ध साधक श्री.दत्त महाराजांचे नि:सीम भक्त होते. त्यांचा अनायासे सहवास लाभला. माझ्या चंचल वृत्तीत स्थिरता येण्यासाठी काय करावे असे त्यांना विनवून विचारले असता त्यांच्या प्रेरणेने त्यांच्याच घरी ७-८ वर्षापूर्वी 'श्रीं'चे दर्शन पुन्हा झाले. त्या नंतर 'श्रीं'ना दीक्षेसाठी प्रार्थना केली. त्यांनी पुण्याला परत गेल्यानंतर पत्र पाठवून मला दीक्षा दिली व साधना सुरु झाली. अवघ्या दोन वर्षाच्या साधने नंतर प्रत्यय आला. मन पूर्ण समाधानी,तृप्त,शांत झाले आहे. त्यांच्याच कृपे मुळे मी श्री. डॉ. देशमुख यांचे कडे नित्य सप्तशती व श्रीगुरुचरित्राचे पाठ करण्यास येतो व त्या प्रसंगी वेगळीच प्रसन्नता सतत जाणवते.

''माझ्या मनात आता कुठल्याही वासना नाहीत मी तृप्त-समाधानी आहे.'' हे सांगताना त्या गुरुजींना गहिवरुन येते. ते म्हणतात '' 'श्री' महाराज सूर्यनारायणाप्रमाणे सर्वांना प्रकाश व तेजाने दान करतात. कांही क्षणांचा सहवास घडूनही अनेक जीव कृतार्थ होतात.''इत्यादि.

******

## आपली बुद्धी-श्रींची आज्ञा

श्री मनोहर पंतांना एका गावास नोकरी लागली. रहायला खोली मिळाली. 'श्रीं'नी विचारले ''जेवणाचे काय ?''

मी म्हटले ''मी स्वत:च करुन घेतो.''

'श्रीं'नी माझी परीक्षा पाहण्यासाठी बहुधा सुचविले की एवढा त्रास करण्यापेक्षा खाणावळीत जावे.

'श्री' कृपेनेच प्रेरणा झाल्यामुळे निर्धाराने उत्तर दिले की खाणावळीत कांदा-लसूण असतो व विटाळाचेही पाळत  नाहीत.

त्यावर 'श्री' म्हणाले,'तुमचा निर्धार' आहे तर सर्व सांभाळले जाईल.

या नंतर १० दिवसातच यांची पुण्याला बदली झाली. 'श्रीं'नी दयाळू होऊन सर्व चक्रे फिरवून यांना पुण्यात आणले व आश्रमात सेवा कार्य दिले व

त्या मुळे अन्नासंबधीचे नियम सहज पाळले जाऊन आश्रमातील पवित्र अन्नही मिळू लागले.

॥ ऐशी कळवळ्याची जाती ॥

॥ धर्मो रक्षति रक्षितः॥ जो धर्माचरणाचा कटाक्ष सांभाळील त्याचे रक्षण धर्मच करतो असे श्रृतीचे आश्वासन आहे. 'श्री' म्हणजे साक्षात धर्मच आहेत. त्यांनी धर्म, धैर्य तपासून निष्ठा पक्की आहे असे पाहून या भक्ताचा धर्म सांभाळला.

श्री मनोहर पंत पुढे सांगतात- यांचा पुण्याला नोकरी निमित्त निवास असताना दर आठवड्याला गावी जाणे आवश्यक होई. रेणुका निवासात जाऊन दर्शन करून निवेदन करुन यायचे व दुसऱ्या दिवशी पहाटे गावी जायचे, असे चालायचे.

एकदा रेणुका निवासात जाउन परतायला रात्री १० चा सुमार झाला होता. 'श्री' म्हणाले ''येथे जेऊन घ्या व मग आश्रमात जा.''

मी विचार केला ''आपण 'श्रीं'च्या घरातील मंडळींची गुरुगृही कांही सेवा जमली तर करावी पण त्यांना असा आपल्यासाठी त्रास देऊ नये.'' म्हणून स्वतःची बुद्धी वापरून 'श्रीं' चा जेवून जाण्याचा आदेश नाकारला. 'श्री' म्हणालेही ''अहो! रात्री तेथे कांही करीत नाहीत. त्यांतच उशीर झाला आहे. कांही शिल्लक नसेल.''पण मी ऐकले नाही. आश्रमात आल्यावर 'श्रीं'च्या शब्दांचा प्रत्यय आला व उपाशी झोपावे लागले.

आपल्या बुद्धीने वागून 'श्री' आज्ञा मोडून याहून अधिक काय पदरात पडणार?

******

> **ऐसी वर्मे मज दावी नारायणा**
> **अंतरीच्या खुणा प्रगटोनी।**
> **-तुकाराम महाराज**

## स्मरण तुझे नित्य असावे

श्रीवासुदेव निवासात सायंकाळी 'श्रीं'चे प्रवचन होते. सदर भक्त त्यावेळी ~~अपरिहार्य~~ बाजार करण्यासाठी तुळशीबाग परिसरात गेला पण मन 'श्रीं'च्या आठवणीने व्याकुळ झाले. त्याला कारण म्हणजे लवकरच इतरत्र जाऊन रहाणे अपरिहार्य झाले होते पण जाण्याची इच्छा होत नव्हती. बाजाराचे काम अर्धवट टाकून आश्रमात परतले. तर 'श्रीं'चे प्रवचन संपत आलेले. गर्दीत अगदी दूर बसायला जागा मिळाली. 'श्रीं'नी आसनावरुन अगदी थेट यांचे कडे पाहून वाक्य उच्चारले-'' जे लाडके असते त्याला लांब ठेवावे, म्हणजे त्याला इकडची ओढ लागते व आपलेही त्याच्याकडे लक्ष राहाते.''

विशेष म्हणजे हेच वाक्य आणखी काही प्रसंगी या भक्तालाच जणू सांगितल्या सारखे उच्चारले होते.

******

## तव पदरी असता ...

सद्गुरु हे 'साक्षात परब्रह्म' आहेत याचा उचार संतसज्जन आणि अध्यात्म-शास्त्राने वारंवार केला आहे. शरणागताची वाहे चिंता । तो एक सद्गुरु दाता। जैसे बालक वाढवी माता। नाना यत्ने करुनी ॥ हे समर्थ वचन प्रसिद्ध आहे.

ह्याचे प्रत्यंतर श्रींच्या वागण्यातून अनेकदा येत असे. ''सांभाळूनी मार्गावरता। आणिता न दुजा त्राता।।'' हे श्रींच्या विषयी अत्यंत खरे होते. सद्गुरु हे नेहमीच आपल्याला सांभाळून घेतात याची बोलकी प्रचीती मुंबई निवासी भक्ताला आली.

'श्रीं'चे आगमन मुंबईत जेंव्हा होई तेंव्हा त्याची सूचना व दर्शनासाठी ठिकाण व वेळ याची माहिती परस्परांना आवर्जून कळविली जात असे हे सर्वश्रुत

आहे. माधव-कृष्णाला-कृष्णा-नारायणाला असं हस्ते परहस्ते निरोप वेळे आधीच दिले जात. ही सहृदयता '' **'श्रीं'चा सर्वांना लाभ मिळावा** '' या सद्हेतूनेच अद्यापी सर्व भक्तांची दिसून येते. तशा प्रकारची सूचना एकदा अभय पर्यंत पोहोचली. सुटीचा दिवस-मोकळा वेळ, हे सर्व जुळून आले व निवांतपणे २-२॥ तास आधी घराबाहेर पडू, असे ठरले.

''पण काय परिस्थिती होती न कळे. मनात कांही तरी चलबिचल सुरू झाली. 'श्रीं'च्या दर्शनाला जाण्याच्या आनंदामुळे जे मंगल भाव अंतःकरणात प्रकट झाले होते ते कांही विरुध्द विचाराच्या हल्ल्यामुळे वाहून गेले. विवेकी मनाला याची कुठेतरी टोचणी झाली. ''अशा अमंगल विचारांनी भरलेल्या अंतःकरणाने 'श्रीं'च्या दर्शनाला जाणे एकदम नको वाटू लागले घृणा व आत्मग्लानी ने फार दोलायमान अवस्था झाली व दर्शनाला जाण्याचे रद्द केले. पुन्हा त्या विचित्र चिंतनात मन केंव्हा रमले ते कळलेच नाही. असा किती वेळ गेला. कळलेच नाही. पण विजेचा धक्का बसावा तसे अचानक भानावर आलो तो पूर्वी ठरवलेली **''निघायची वेळ''** झाल्याचे घड्याळ सांगत होते. अलार्म लावून झोपलेल्या प्रमाणे खाडकन भानावर आलो. जाऊ नये असेच वाटत होते. मनात प्रसन्नता अजिबात नव्हती. तरी ही कोठली तरी सूक्ष्म शक्ती कार्य करून घेत असावी तसे यंत्रवत तयार होऊन बाहेर पडलो व ईष्ट वेळी इष्ट स्थानी पोचला. अद्याप बाहेरच्या दारातच पोहोचलो असेन नसेन तोच 'श्रीं'ची प्रवचनातील वाक्ये ऐकू आली-

**मातुः शिशोर्दुगुण नाशनाय न ताडने निर्दयता न दोषः ॥१॥**
**आर्द्रमतिकोमलं सांद्र करुणालयं सांद्रचिति सोज्वलं सुकृतशीलं ॥२॥**

**''परमेश्वर हा माते प्रमाणे आहे. माता बाळाला स्वच्छ करते. ते पुन्हा मलीन होते तशी पुन्हा धुते पुसते, आळस नसतो नां! तसा परमेश्वर मलीन अंतरातील दोष सारखे धुत असतो. पुन्हा मलीनता येती व पुन्हा धुणे असे त्याचे, माते च्या ममतेने भक्तासाठी सुरु असते. पण परमेश्वराच्या दर्शनाला न जाण्याचा करंटेपणा मात्र आपण करू नये.''**

******

## भ्रमनिरास

अभय तसा मनाचा भोळा. एक श्री तुळसीदासांच्या जीवनात घडलेल्या चर्चेचा प्रसंग याने कुठेतरी वाचला. श्री तुलसीदास प्रश्नाला उत्तर देताना म्हणतात **“ मी जिंव्हेने नाम घेतो तेव्हा द्वैतात असतो, पण ते नाम आंत उतरले की मी अद्वैती होतो.”**

कांही ग्रंथ वाचून अर्धवट समज आलेल्या अभयला असे वाटू लागले की अरे माझे ही नाम जिंव्हेच्या खाली उतरले आहे(मनातल्या मनात जप होतो की!) म्हणजे आता मी अद्वैती झालो. मला द्वैतभावातून कर्म-पूजा अर्चा आदि करण्याची आता काय गरज?(मी इतर साधक सहकाऱ्यांपेक्षा वेगळा(मोठा) आहे) अशा ‘अहं’ मध्ये अभय वावरू लागला.

तशात आश्रमात उत्सवासाठी पुण्याला सर्वांबरोबर हा ही आला. ‘श्रीं’चे प्रवचन सुरुच होते. तितक्यात ही मंडळी हातपाय धुवून मांडवाच्या प्रवेशाकडे निघाली. आणि अगदी कानाशी मोठ्याने कोणी बोलावे तसे प्रवचनातील वाक्य कानावर पडले.

**“जो पर्यंत आपण नाम घेत असतो तो पर्यंत आपण द्वैतवादीच असतो. द्वैताची परिसीमा, पूर्णत्व येण्याची स्थिती मिळे पर्यंत कोणालाही अद्वैतवादी स्वतःला मानता येत नाही. आणि “ द्वैताची पूर्णता” साध्य करून घ्यावीच लागते.” जणू अभयच्या मनाचा भ्रम निरास व्हावा म्हणूनच बोलले.**

ह्या दोन्ही प्रसंगी, ‘श्रीं’च्या मुखातून निघणारी आर्षवाणी नेमकी **त्याच क्षणी उपस्थित झालेल्या ह्या साधकासाठीच असावी** अशी कशी प्रकट झाली, हेच सद्‌गुरु प्रेमाचे सामर्थ्य आहे.

******

## गुरु निष्ठेची परीक्षा

मधुकर ह्या भक्ताला श्री दत्त महाराजांकडे येण्याची प्रेरणा ज्या महाभागामुळे झाली त्याच्या बद्दल अर्थातच पूर्ण आदर भाव मनात होता.

जेंव्हा श्रीगुरुंना शिष्याची निष्ठा तपासण्याची इच्छा होते तेव्हा जे नाट्य घडून येते त्याचे ते स्वतःच सूत्रधार असतात. दीपकाला-भगवान विष्णु-भगवान शिव-रुपात येऊन श्रीगुरुंनी त्याची निष्ठा पारखली हा प्रसंग श्रीगुरुचरित्राच्या आरंभालाच आहे.

ह्या भक्ताला गुरुभक्तीच्या प्रशस्त मार्गाचे दिग्दर्शन करणाराच्या रुपानेच हे नाट्य आरंभ झाले. हे महाभाग एकदा मधुकरला भेटले तेंव्हा श्री रामनवमी जवळ आलेली होती. रामरक्षा रोज १०८ वेळा आवर्तन केल्यास ती ''सिध्द मंत्र'' होऊ शकते. पण त्या साठी ''श्री राम नवरात्रात '' नियम घेऊन पाठ करायचे असतात. असे या महाभागांनी सुचविले. भक्ताने '' हे मी करू का? असा प्रश्न ''मानस पूजे'' नंतर श्रीमहाराजांना विचारला.'' कांही संकेत मिळाला नाही.

देव भक्ताचे भांडणे । पराभक्तीचे ते ठाणे॥

वासुम्हणे हा विनोद । देतो दत्ता परानंद ॥

पाडव्याच्या ४-५ दिवस आधी पुन्हा प्रार्थना आरंभिली. ध्यानातच 'श्रीं'चा आवाज आला- म्हणाले ''आम्हाला कशाला विचारता? तुमचा आणि आमचा काय संबध? मधुकराने ध्यानातील ह्या संवादात उत्तर दिले. महाराज! आपण असे कां विचारता? मला आपण दीक्षा दिली आहे. मी आपला शिष्य आहे व आपली लहानशी इच्छाही माझ्यासाठी ''गुरुआज्ञा'' आहे. 'श्रीं' म्हणाले''मग काय आम्ही सांगू ते ऐकणार?-

''महाराज! आपण सांगून तर बघा '' असे विनविल्यावर 'श्रीं'ची आज्ञा झाली. म्हणाले- ''आठ दिवस पर्यंत देवाचे नांव अजिबात घ्यायचे नाही'' उत्तर दिले ''चालेल. आपली आज्ञा म्हणून येते आठ दिवस मी देवाचे नाव अजिबात घेणार नाही.'' असे संभाषण ध्याना बरोबरच संपले.

मनाचा ओढाळपणा अनेक संतांच्या अनेक अभंग रचनांमधून आपण वाचतो. पण मधुकराला ह्याची प्रत्यक्ष अनुभूती या कठीण परीक्षेच्या काळात

आली. ''**जे करू नको**''सांगितले तेच नेमके करावेसे वाटणे व घडणे या मनाच्या ओढाळपणानेच असे होते. हीच परीक्षेची सुरवात असते.

ध्यानाचा प्रसंग संपल्यावर मधुकराच्या लक्षात आले की या ८ दिवसांपैकी शेवटचे ४ दिवस ''श्रीरामनवरात्राचे''-आरंभीचे आहेत. म्हणजेच ''रामरक्षेचे १०८ पाठ'',''सिध्द मंत्र- हे गणित तेथेच संपले. आठ दिवस देवाचे नाव न घेणे साठी प्रचंड प्रयत्न करून मनाशी झटापट करीत करीत हळूहळू जाऊ लागले.

पूजा करायची पण स्तोत्र मंत्र बंद.

ऑफिसला जाताना गाडीच्या खिडकीतून पाहताना नेमकी मंदिरेच लक्षात यायची व हे रामाचे- हे देवीचे- हे लक्ष्मी नारायणाचे हे मारूतीचे देउळ असा मनात उच्चार झाला की महाराजांची ''चुकलो'' म्हणून क्षमा मागायची हे ही चालू होते.

शेवटी 'श्रीं'च्या फोटोसमोर बसून शरणागती पत्करली. मनाच्या शक्तीपुढे माझा निर्धार टिकूच शकत नाही-हे कार्य अशक्य आहे.तरी क्षमा करावी. असे दीनपणे मान्य केले.

''**देवाचे नांव बंद करणे न जमणे** '' हाच परीक्षेचा निकाल होता.

******

## जैसा देव तैसा गुरु

आपल्यावर आलेले संकट निवारण व्हावे अशी प्रार्थना एका **आर्त** भक्ताने केली. हृदय विकाराचे निदान डॉक्टरांनी केलेले व अँजिओग्राफी ही चाचणी करावी असा सल्ला मिळाला. प्रार्थने प्रमाणे 'श्री' महाराजांच्याकडून एक गुरुमंत्र मिळाला. त्याचे अनुष्ठान ५ माळा रोज असे करायला सांगितले. जप सुरू केला. भक्ताच्या इच्छा ''आशा'' पूर्ण व्हाव्यात अशी प्रार्थना त्या मंत्रात आहे असे सकृत् दर्शनी वाटले.

आपल्या संकट समयी 'श्री' महाराजांनी मंगल आशीर्वाद या मंत्राने पाठविला आहे. अशी भावना झाली. परिचयाचे डॉक्टर उपचार करीत होते. अँजिओग्राफीचा रिपोर्ट ''सर्व नॉर्मल '' असा आला. डॉक्टरांनाही आश्चर्य वाटले. तथापि ''गुरुमंत्र'' आहे या भावनेनेच जप सुरू राहिला.

हा प्रसंग घडला त्या काळात ह्या भक्ताला 'श्री' महाराज यांचा परिचय अल्पकाळाचाच होता.इतर गुरुबंधू दीर्घ काला पासून 'श्री' सेवेत असलेले होते. त्यांच्या परस्पर चर्चेत ऐकायला मिळायचे ''देवा पेक्षा गुरु श्रेष्ठ आहेत. '' पण पूर्वापार नेहमीचे मनावरील संस्कार असे की ''आधी वंदू गणनायका'' ''गणपती म्हणजे आदिदेव'' इत्यादि. त्यामुळे आधी गणेशाला वंदन करायलाच पाहिजे. नंतर श्रीगुरुंना वंदन.'' असे ठाम मत. यातून निर्णय होत नसे.

विस्मयकारकरीत्या यांना कळले की श्रीमहाराजांनी यांना जो 'गुरुमंत्र' दिला ते श्रीगणपतीचेच नाम आहे. गुरुमंत्र म्हणजे गुरुचे नांव असा साधा सरळ विचार मनात असताना '' आम्ही आणि गणेश एकच '' हे निश्चितपणे सांगणाराच मंत्र 'श्रीं'नी दिला होता.

पण दुर्दैवाने हे कळायला इतका वेळ लागला की तत्पूर्वी 'श्री'महाराजांचे सगुण रुप दृष्टी आड झाले होते. फार वाईट वाटले. 'श्रीं'नी यांच्या मनातली द्वैत भावना ओळखून ती घालवण्यासाठी हा मंत्र दिलेला असूनही त्याची स्पष्ट कल्पना ''त्यांच्या'' पश्चात् होऊ दिली. यात ही त्यांचे अतर्क्य नियोजनच जाणवते. कारण हे जर आधी कळते तर मानवी स्वभावाला धरून सहाजिकच सगळ्यांना सागितले असते. ''अहो! माझ्या मनातील भाव ओळखून 'श्रीं'नी हा मंत्र दिला '' पहा श्री कसे अंतर्ज्ञानी आहेत. '' अशी स्वतःची स्तुती कुठे व्हावी हे त्यांना अजिबात मान्य नव्हते. अमानित्वाची पराकाष्ठा म्हणजे आमचे महाराज.

पुढे एका भक्तिगीतांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत लिहिलेले वाचले '' आपले सद्गुरु जो पर्यंत सदेह आपल्यात असतात तो पर्यंत आपल्याला त्यांची महती कळत नाही. मात्र त्यांचे सगुण रुप काळाच्या पडद्याआड झाले नंतर आपल्याला त्यांची खरी ओळख व्हायला लागते.'' इत्यादि.

उशीरा का असेना - कळले हे महत्वाचे.

श्रीगुरु तर सतत आपल्या अंतःकरणात असतात. आणखी सान्निध्य काय असणार ?

******

## 'श्री' चरणी समर्पित जीवन

श्री गुरुचरणी समर्पित जीवन असणाऱ्या एका भक्ताची कथा येथे वर्णन केली आहे. यांना दीर्घ काल पर्यंत, बऱ्याच प्रापंचिक अडचणी आल्या.

गृहस्थाश्रमात 'प्रपंच' तर करावाच लागतो. पत्नी,अपत्ये, जवळचे नातेवाईक व इतर सुहृद मंडळी आपल्याकडून बऱ्याच अपेक्षा ठेवून असतात. मुख्यतः भरपूर अर्थार्जन करुन सर्व प्रकारची ऐहिक सुखे मिळवावीत. समृद्धी असावी, वैभव असावे, नाव लौकिक असावा आणि हे सगळे मिळवून आणण्याचे कर्तृत्व,कर्त्या पुरुषाने दाखवावे ह्या मुख्य अपेक्षा असतात. परंतू ही सर्व सुखे मिळविणेकेवळ स्वकर्तृत्वाने शक्य नाही. त्याला प्रारब्धाची जोड असावी लागते. प्रारब्ध अनुकूल नसेल तर प्रयत्न व्यर्थ जातात. हे **''सत्य''** सर्वांच्या परिचयाचे आहे. या परिस्थितीत घराचे वासेही फिरले जातात.

तथापि, 'श्री' चरणी असलेली निष्ठा जशी दृढ होत जाईल तसे उत्तम अनुभव येऊ लागतात. या अनुभवांना ''चमत्कार'' समजणे उचित नाही. गुरु माउलीच्या **''करुणा मयी''** मूर्तीचे प्रकटीकरण यातून होत असते.

१) आर्थिक स्थिती सामान्य असतानाच या भक्ताला एकदा ज्वराचा त्रास सुरु झाला. सायं. ५ वाजे पासून वाढत-वाढत रात्री दीड पर्यंत ज्वर १०२ डिग्रीवर जायचा व नंतर कमी व्हायचा. डॉक्टरांनी दिलेल्यातीव्र शक्तीच्या गोळ्या बरेच दिवस घेणे सुरु असूनही कांहीच उतार पडत नव्हता. अचानक एक दिवस श्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या घरी आले. क्षीण प्रकृतीमुळे विचार शक्तीही क्षीण झाली होती. काय बोलावे कसे स्वागत करावे हे काही सुचेना. **तेथे अंथरलेल्या एका जुन्या साधारण स्थितीतल्या सतरंजीवर 'श्री' महाराज इतके झटपट येऊन बसले की कांहीही करायला संधीच दिली नाही. तसेच उठून एक चौपदरी आसन 'श्रीं'ना देण्यासाठी कष्टाने आणले. पण 'श्री' म्हणाले, 'आपण बसा! आपल्याला बरं नाही.'**

वास्तविक पाहता 'श्री' महाराजही लांबच्या प्रवासातून थकून आलेले होते. त्यांनी सर्व चौकशी केली व सांत्वन पर कांही सांगितले त्या नंतर 'श्रीं'

नी यांना सांगितले काळजी करू नका. 'घोरात् कष्टात्' या स्तोत्राचे पाठ करा. असे म्हणून 'श्रीं' नी स्वमुखाने यांना हे संपूर्ण स्तोत्र सावकाश म्हणून ऐकविले. एक प्रकारे संथाच दिली म्हणानां ! यांना नित्य उपासनेत हे स्तोत्र म्हणायची नेहमीच सवय आहे व 'श्री' महाराजांनाही हे माहीत होते. तथापि मुद्दाम "**स्वतः म्हणून**"ऐकविले. 'श्री' महाराज स्वतःच दत्तप्रभू आहेत. त्यांनी स्वमुखाने आपलेच स्तोत्र म्हणून त्याचे अनुष्ठान करायला सांगितले. "**पंचावन्न हजार पर्यंत संख्या झाली म्हणजे बरे वाटेल** " असे ही सांगितले.

आपणहून आले, आसनाचीही अपेक्षा केली नाही, सांत्वना दिली व मंत्रयुक्त उपासना ही दिली. पूर्ण आश्वासन ही दिले. असा कळवळा, असा साधेपणा, अशी निरभिमानी, अमानित्व दर्शक सहज वागणूक पाहून हे प्रत्यक्ष दत्तप्रभू आहेत अशी जाणीव कशी होईल?

'श्रीं' नी सांगितलेल्या प्रमाणे पाठसंख्या झाली व विना औषधाचीच व्याधी गेली.

--------oooooo--------

२) याच काळात आर्थिक स्थिती इतकी खालावली की मुलांना २-२ वर्षे पर्यंत नवे कपडे घेणेही होईना. घरात फारतर चारदोन किलो गहू एकावेळी संग्रहात राहात. या वरुन बाकीच्या गोष्टी किती व कशा असतील ते समजून येते. अशातच एकदा 'श्री' महाराज मुक्कामाला २-३ दिवसां साठी यांचे कडे येणार होते. 'श्री' नुसतेच नाही तर त्यांच्या आगमनाचे वृत्त गावात इतर भक्तांना विदित होउन दर्शनाला व 'श्रीं' चा प्रसाद मिळावा या हेतूने मंडळी येणार असे कळले. सर्व अंदाज १५०-२०० पर्यंत पात्राचे भोजन प्रसाद होण्याचा आहे हे लक्षात आले. घरात जेंव्हा कळले तेंव्हा आधीच त्ररत अरालेल्या बाळ गोपाळांना 'श्रीं' चे आगमन म्हणजे संकटच वाटले.

तथापि सहधर्मचारिणीची साथ मिळाली. कुठूनतरी महत्प्रयासाने गहू आणले. कशी बशी तयारी केली. पण झाले असे की 'श्री'महाराज यांचे कडे येणार हे जाणून गावातील व आसपासच्या भक्तांनी यांचेकडे येऊन पूर्ण व्यवस्था ताब्यात घेतली व उत्तम कार्यक्रम झाला. भरपूर अन्नदान , 'श्रीं' ची पाद्यपूजा,

उपासना इत्यादि नियोजनाशिवायच संपन्न झाले. संतुष्ट होऊन 'श्रीं' नी आशीर्वाद दिले व पुढील दौऱ्यावर रवाना झाले. सर्वकाही आश्चर्य करण्यासारखे घडले व श्रीगुरुचरित्रातली ब्राह्मणाची कथा आठवली. ३ माणसे जेवतील इतक्या सामुग्रीत ४००० लोक जेवले होते नां? आणि आता काय वेगळे घडले?

--------oooooo--------

३) या भक्ताचा एकुलता एक पुत्र मौंजीच्या वयाचा झाला होता. 'श्रीं' नी यांना सांगितले की मुलाला घेऊन पुण्याला या. श्रीवासुदेवनिवास आश्रमात मौंज करा. यांनी भीत भीत आर्थिक स्थितीची गोष्ट काढली. 'श्री' महाराज म्हणाले अहो! मौंजी संस्कार झाला म्हणजे झाले, आश्रमात 'श्री' महाराजांच्या समोर बटुच्या शिरावर अक्षता पडल्या म्हणजे झाले. असे म्हणून आपला स्वतःचा दौरा कधी संपेल- आश्रमात कधी पोचतील ते पाहून तारीखही सांगितली.

आश्रमाच्या व्यवस्थेची जबाबदारी सांभाळणाऱ्या इतर पदाधिकारी व सेवेकरी मंडळींना बहुधा 'श्रीं' नी योजना पूर्वक त्या मुहूर्तावरच इतरत्र गुंतवून ठेवले. म्हणजे मौंजीच्या दिवशी हे कुटुंब व 'श्री' महाराज एवढीच मंडळी उपस्थित होती. नंतर कळून आलेली वार्ता अशी की 'श्री' महाराजांनी कांही इतर भक्तांकडून मौंजी च्या तयारीची कामे उदा. भिक्षावळीचे पदार्थ, उपाध्यायाची योजना इत्यादि सर्व आवश्यक तयारी या भक्ताच्या नकळत पूर्ण करवून घेतली होती. मौंजीच्या दिवशी आश्रमात पुरणा-वरणाचा नैवेद्य झाला व यथाशास्त्र मौंजीबधन संस्कार झाला. कांहीही कष्ट व खर्च करावा न लागता संपूर्ण कार्य निर्विघ्न संपन्न झाले. अन्यथा या भक्ताला हे कार्य करण्याचे कल्पनेने ही अशक्य वाटत होते.

।। सद्गुरुसारिखा असता पाठीराखा।। ह्याची प्रत्यक्ष अनुभूती 'श्रीं' नी यांना सहजपणे दिली.

******

## ‘श्रीं’चे वत्सल अंतःकरण

एका मुक्कामाचे ठिकाणी ‘श्री’ महाराजांच्या कक्षाला जी खिडकी होती तिथे जाळी लावलेली होती. खिडकीच्या आतील बाजूला जवळच फळांनी भरलेले पात्र होते. ‘श्री’ एका भक्तासह शांत बसून होते. इतक्यात एक माकड त्या खिडकीशी आले. त्याने ती जाळी थोडी उचलली व हात घालून एक फळ उचलून खाऊ लागले ‘श्री’ व तो भक्त उभयतांकडे ते पाहात होते. ‘श्री’ हळूच म्हणाले ‘‘घ्या! घ्या! खा!’’

‘श्रीं’ च्या कृपा दृष्टीत मानव,पशू हा भेद कसा असेल?

******

## ‘श्रीं’चा प्रेमादर

१) स्थळः- श्री वासुदेव निवास. माडीवरची पहिली खोली. ‘श्री’ महाराज श्री गुरुमहाराजांच्या फेटा घातलेल्या फोटोच्या खाली आसनावर बसून दृष्टी स्वतःच्या हातावर ठेवून वाकून बसलेले होते. इतक्यात एक भक्त हातात उत्तम फुलांचा भरगच्च दाट असा केलेला हार घेऊन आला. त्याने ‘श्रीं’ ना वंदन केले की नाही कुणास ठाऊक. मात्र वरच्या फोटोला हातातील हार घातला व निघून गेला. तेथे उपस्थित असलेल्या भक्ताने हा प्रकार पाहिला आहे.

तो हार घालून निघून गेल्यावर ‘श्री’ आसनावरून उठले. मागे फिरले व गुरुमहाराजांच्या फोटोला आतांच घातलेला हार काढला कारण त्याचा मोठा पदर, श्री गुरुमहाराजांच्या डोळ्यावर आला होता. हार आखुड आहे. दोरा मोठा करून फुले सरकवून नीट घालावा अशी इच्छा त्या बिचाऱ्याला झाली नाही. पण ‘श्रीं’ ना ही हाराची अवस्था खाली मान घालून बसलेल्या अवस्थेतही कळली.

‘श्रीं’ नी तो हार ज्या पध्दतीने व्यवस्थित बसेल तसा नीट करून पुन्हा घातला व कांहीही न बोलता पुन्हा आपल्या शांत अवस्थेत लीन झाले. न बोलता केवळ कृतीने ‘श्रीं’ नी आम्हाला किती मोठी शिकवण दिली.

--------००००००--------

२) ‘श्री’ महाराज स्वतःच्या देहाला होणारे क्लेश कष्ट या बाबत, तसेच स्थितप्रज्ञ अवस्थेत असलेले पाहिले आहे.

ज्या कार्याची संपूर्ण धुरा 'श्रीं' नी सांभाळली होती ते कार्य जणू काही आम्ही बघतो- करतो म्हणूनच होत आहे अशा अविर्भावात बरेच लोक होते. 'श्रीं' ना प्रसंगी अधिक-उणे बोलणे, असे करा असे करू नका- असा स्पष्ट संकेत देणे अशी वागणूक काहींची होती. परंतु सर्वज्ञ, अंतर्यामी व पूर्ण शक्तिसंपन्न आपण आहोत असा भास सुध्दा त्यांनी आपल्या कृतीने वा बोलण्यातून होऊ दिला नाही. ''महाराज ! इथे बसा ''- तेथे बसले. '' आज अमुक येथे जायचे आहे''- ''चला!'' म्हणायचे.

देह ईशेच्छेने जसा चालविला जाईल तसा चालवू द्यायचा केवळ साक्षी भावाने सगळे पहायचे. तक्रार नाही. क्रोध नाही. कुणालाही कधीच नांवे ठेवायची नाहीत.

असे स्वतः आचरुन आम्हाला मोठे मार्गदर्शनच ते करीत होते. हे समजला तो तरेल इतकेच.

******

## मध्यान्ही अतिथीला परतवू नये.

एक दिवस सर्व भक्त-उपस्थित मंडळींचे दुपारचे भोजन आटोपल्यावर मागचे आवरून, सेवेकरी विश्रांतीस गेले. आश्रमाची प्रमुख प्रवेशद्वारे जी सायंकाळी कार्यक्रमाचे वेळी उघडतात पण दिवसा बहुधा बंद असतात ती त्या दिवशी सायंकाळी सहज उघडायला गेले तर कांही केल्या उघडेचनात. रोज उघड-बंद होणारी व सहजगत्या उघडणारी ही दारे आज महत्प्रयासाने ही उघडेचनात. हा काय प्रतिबंध आहे हे कळेनासे झाले.

शेवटी महाराजांना कोणीतरी हा प्रकार सांगितला.

तेंव्हा 'श्रीं' नी विचारले ''आज दुपारी कोणी अतिथी न जेवता गेले का?''

चौकशी केल्यावर 'श्रीं' ची शंका खरी आहे असे कळले. सर्व संबंधितांना देवा जवळ जाऊन क्षमा मागून प्रार्थना करायला सांगितले. त्याप्रमाणे प्रार्थना केली व दारे उघडली.

******

## २९जुलै'९४ गुरु पौर्णिमा -प्रसंगी

''अर्जुनाचा मोह दूर करण्यासाठी गीता सांगितली. श्रेष्ठांच्या मार्गदर्शनामुळे विजय होतो.''

''मनुष्य देह महत्वाचा आहे. संसार सागरात नौका (देह) तरुन जायचे आहे. सर्व इंद्रिय,मन,बुध्दी,अनुकूल दिली आहेत. सद्गुरु पैल तीराला पोचवतात. परमेश्वर अनुकूल आहे अशी भावना उपासकांनी ठेवावी. ईश्वरावर श्रध्दा ठेवावी. देवानी सांगितलेला मार्ग -प्रेम, भक्ती अंतःकरणात वाढली पाहिजे.''

''शरीरामध्ये वाणी, मन, विवेक आहे. धन मान ईश्वराला नको. भक्ती पाहिजे. प्रवृत्ती पासून अलिप्त असणाऱ्या जीवाचा परमात्मा उध्दार करतो. ''

--------००००००--------

## गुढीपाडवा १९९७ च्या प्रसंगी

''गोपी भाव धरा. स्वतःला विसरुन जा. भक्तिभाव उत्पन्न होणे, स्थिर होणे ही भगवंताचीच कृपा आहे. काम, धाम संसार विसरून कृष्णमय व्हा. हरीभजनी दंग होऊन जावे. **परमेश्वरावर सर्व सोडावे**. नामस्मरण करावे.''

******

## मूर्तिमंत अमानित्व

माझ लंगड अध्ययन येथेच संपलं. वेदान्त अध्ययनाला मननाची दुसरी पायरी आहे हे विसरुन संसारात आकंठ बुडाले. मन खंतावतच होतं. संसाराची कर्म संपत नव्हती. सद्गुरु श्री. गुळवणी महाराजांच्या उपदेशानुसार-

वेद अनंत बोलला । अर्थ इतुकाचि शोधला ।
विठोबासी शरण जावे । निज निष्ठा नाम गावे ॥

या चार ओळी श्री. गुळवणी महाराजांनी मला स्वच्छ, स्पष्टपणे आवर्जून सांगितल्या, अन् मी नाम घ्यायला सुरवात केली.

कांही वर्षांनी अचानक योगाचे अनुभव, यायला लागले. त्या क्रीयांनी रात्री झोप लागेना. माझ्या पतींना सांगितले. ते म्हणाले की, आपण भक्ती-ज्ञानाच्या मार्गाने जावे. पू.श्री.कवीश्वर महाराजांकडे जाऊन हे अनुभव बंद करायला सांग.

तेव्हा ही श्री दत्तमहाराज नारायण पेठेतच राहात होते. मी यांचा निरोप त्यांना सांगितला. इतर अनेक शंका विचारल्या. **'श्री' महाराज म्हणाले ''संसारातले प्रसंग कसे अलिप्ततेने पहावेत तसेच अंतरीच्या अनुभवाकडेही अलिप्ततेने पहावे.''** किती योग्य-अचूक अनूअमूल्य मार्गदर्शन झाले.

माझे लहान दीर श्रीकृष्ण श्रीपाद भट यांनी ''ज्योतिषाच्या गाभाऱ्यात'' हे पुस्तक लिहिले. त्याच प्रकाशन प.पू.श्री.दत्तमहाराजांचे हस्ते श्रीवासुदेव निवासात झाल. मा.श्री. दत्तमहाराज मोजके, शास्त्रपूत व सत्य बोलणारे. त्यातली प्रास्ताविकातली त्यांची वाक्ये मला स्पष्टपणे आजही आठवतात. ते म्हणाले ''भटांच्या घराण्यावर थोरल्या स्वामी महाराजांची कृपा होती. यांचे म्हणजे श्रीकृष्ण भटांचे मोठे बंधू वैद्य पुरुषोत्तम भट हे आत्मज्ञानी आहेत. ''ज्ञानी ओळखावा ज्ञानेश्वरे हेच खरे. नाहीतर ह्यांच्या अंतरंगाची ही झेप मला कशी कळावी.

''तयांचे विराट शब्द । सुखे म्हणो येती वेद ॥
या सहज शब्दांनी आम्हा अडाण्यांना किती आधार मिळतो!

शनिवार पेठेतील आमच्या सदनिकेत प.पू.श्री. गुळवणी महाराजांची पाद्यपूजा होती.

त्या आधीच प.पू. श्री दत्तमहाराज हे श्री वासुदेव निवास आश्रमाचे उत्तराधिकारी म्हणून ज्ञात झाले होते. मा. श्री. दत्तमहाराजांनी मा.श्री.गुळवणी महाराजांच्या जवळपास बसायला हव होत.

**सदनिकेत गर्दी झाली होती. मा. श्री. दत्तमहाराज कुठे बसले होते? कल्पनाच करता येणार नाही! मा. श्री. दत्तमहाराज, दारात लोकांनी काढलेल्या चपलांच्या ढिगाजवळ आत्मरंगात रंगून शोभत होते! जणू मूर्तिमंत अमानित्व।**

******

## व्यवहारात सदैव दक्ष असणारे श्री महाराज

मलकापूरच्या श्री भागवत सप्ताहात सकाळचे संहिता वाचन तेथील श्री.बंडूनाना घिर्णीकर करीत. दर्शनार्थी भक्त मंडळी सकाळी व दुपारी 'श्रीं'चे स्थानापन्न होणे पर्यंतच्या वेळेत पोथी पुढे द्रव्य दक्षिणा अर्पण करीत असत. परंतु 'श्री' तेथे जाऊन बसे पर्यंत हे द्रव्य तसेच तेथे राही. श्री महाराज रघुनाथ रावांना ती सर्व रक्कम गोळा करुन स्वतंत्र पणे ठेवून देण्यास सांगत असत. सप्ताह पूर्ण झाला. बाजूला ठेवलेली जी द्रव्य दक्षिणा होती ती 'श्रीं'नी श्री बंडूनाना घिर्णीकर यांना द्यायला सांगितली, त्यांचा तो अधिकार आहे असे सांगितले तथापि श्री. घिर्णीकर गुरूजींनी ती रक्कम स्वीकारली नाही.

सप्ताह समाप्ती नंतर पुढच्या प्रवासाला मलकापूरहून निघाले ते स्थान घिर्णीकर गुरुजींच्या चुलत बंधूचे घरच होते. देवा जवळ दर्शनाला 'श्री' महाराज देवघरात गेले व ती रक्कम हळूच देवासमोर ठेऊन दिली.

******

## महाभारत हा ग्रंथ सरस्वतीचे रुप आहे.

मलकापूर चे श्री रमेश घिर्णीकर यांच्याकडे कांही धार्मिक ग्रंथ वाचनासाठी व पुढील पिढीलाही वाचनाची गोडी लागावी म्हणून संग्रहात ठेवले आहेत. त्यात 'श्री महाभारत'' आहे.

काही मंडळींनी यांना सांगितले ''अहो महाभारत ग्रंथ घरात ठेवू नये. नाही तर घरात 'महाभारत' होते.'' या बाबतीत 'श्री' महाराजांचे मार्गदर्शन घ्यावे ह्या विचाराने स्वस्थ राहिलो. पुढे देऊळगाव राजा येथे 'श्रीं' चे दर्शनार्थ गेलो तेंव्हा 'श्रीं'नाच विचारले.

'श्री' महाराज हसले व म्हणाले ''तसे काही नसते. ते सरस्वतीचे एक स्वरुप आहे. घरात ठेवण्यास काहीच हरकत नाही. फक्त सलगपणे असे वाचन करु नका म्हणजे झाले.''

या प्रमाणे शंका निरसन झाल्याने आनंद झाला व समाधान वाटले.

******

## ‘दीक्षा’ ये तो होने पाने की चीज है ।

**‘श्री’महाराजांना आम्ही कधी ‘मी’ माझे, मला या ‘मी’ संबधी शब्दांचा उच्चारही करताना ऐकल नाही. त्यांची वाक्यरचना अशी खुबीची असे की हा ‘मी’ वापरावाच लागू नये. जेथे अहंभावच नाही तेथेच हे शक्य आहे.**

‘दीक्षा’ देताना त्यांच्या पत्राचा मजकूर साधारणपणे असा असायचा ‘‘अमुक दिवशी, सकाळी या’ वेळेला देवासमोर नारळ ठेवून नमस्कार करून डोळे मिटून बसावे काळजीचे कारण नाही. ‘‘श्री महाराज कृपा करतील’’ म्हणजे परत ह्यांचा संबंध नाही.

मला दीक्षा झाल्यावर आम्ही उभयता ‘श्रीं’ च्या दर्शनाला पुण्याला गेलो. त्या वेळी ‘श्री’ महाराज पेपर वाचत होते. दीक्षा झाल्याचे सांगितल्यावर अंमळ वर बघत म्हणाले-झाली वाटतं.’’ आणि पुन्हा वाचन सुरू झालं. जणू आम्हाला दीक्षा होण्याबद्दल कांही त्यांच्या गावीही नव्हत.

दीक्षे बद्दल बोलताना ‘श्री’ महाराज म्हणाले होते, की -‘‘दीक्षा देताना सत्पुरुषांची वृत्ती ही पोस्टमन सारखी असते. किती पत्रांच वितरण केल याची नोंद पोस्टमन ठेवत नाही. तो फक्त पत्र टाकायच काम करतो. ’’ पुढे प.प.श्री सद्गुरु लोकनाथतीर्थ स्वामी महाराजांचे विचार उद्धृत करताना ते म्हणाले ‘‘दीक्षा लेने देने की चीज नही’’ ये तो होने पाने की चीज है’’.

******

## त्यांचे शब्द हा ईश्वरी संकल्पच

**वाचा सिध्दी बद्दल बोलताना ‘श्री’ महाराजांनी म्हटले आहे-‘‘नेहमी सत्य बोलण्याचा जर आपण अभ्यास केला तर मनात येणारा विचारही सत्यवत् होतो.’’**

सुमारे १९९७ सालची गोष्ट. आम्ही ७-८ मुंबईकर मंडळी मुंबईहून पुण्याला ‘श्रीं’ चे दर्शनार्थ आलो व पुढे रात्री जालन्याला जायचे होतो.

पुणे जालना ‘‘अंबड गाडीने’’ जायचे होते. रात्री पुण्याला रेणुका निवास ला पोचे पर्यंत ८॥ वाजले. दर्शन घेतानाच अंबड गाडी व ११ ची निघण्याची

वेळ असे कोणीसे बोलले असेल. -आम्ही नमस्काराला पुढे होत असताना 'श्री' म्हणाले,''गाडी ११॥ वाजता आहे वाटतं!''

वंदनासाठी वाकणाऱ्या भक्ताने म्हटले ''नाही महाराज ! गाडी ११ वाजता आहे. हे जणू ऐकून न ऐकले असे पुढच्या भक्ताला पुन्हा विचारले ''गाडी ११॥ वाजता आहे वाटत?'' परत उत्तर आल! ''नाही महाराज ! गाडी ११ वाजता आहे.''

असे तीन वेळा झाले.

आम्ही बस स्टँड वर पोहोचलो. पावणे अकरा वाजताच बस प्लॅटफॉर्मला लागली आणि बरोबर ११ वाजता ड्रायव्हरने गाडी स्टार्ट केली. जेमतेम १-२ मिनिटे इंजिन चालू ठेवून पुन्हा बंद केले. नंतर समजले की त्या बसचे दिवे सुरु होत नव्हते. त्यानंतर इलेक्ट्रिशियन आला. दुरुस्ती केली आणि ११॥ वाजता बस निघाली. ११ चे ११॥ होणे हा प्रकार काय झाला हे आम्हा ८-१० मुंबईकरांच्याच फक्त लक्षात आला.

त्यानंतर ची गंमत म्हणजे कालांतराने त्या अंबड गाडीची वेळ ११ ऐवजी रात्री ११॥ अशीच निर्धारित केली गेली.

******

## संशयात्मा विनष्यति

'विनष्यति' हे गीता वचन म्हणजे संशयाचा ज्याच्या बुध्दीत अतिरेक होईल त्याच्या साठी चे अंतिम ''निकालपत्र'' आहे. गुरु मार्गातील साधक भक्त जर या संशय पिशाच्याने थोडा ही ग्रासला तरी लगेच त्याचा ''झाडणी अंगारा'' करण्याची लीला श्रीगुरु करतात व पुढे असा प्रमाद घडू नये इतपत सावध करतात . याचाच प्रत्यय या भक्ताला आला.

एका श्री गुरुद्वादशीचे पूर्वी श्री दत्त महाराज व प.पू. सौ. ताई महाराज हे रेणुका निवासात होते. पण कांही अपरिहार्य कारणाने प.पू.श्री.ताई महाराजांना दवाखान्यात उपचारार्थ ठेवावे लागले म्हणजे हे दिसून आले की 'या' श्री गुरु द्वादशीला ह्या दोन्ही विभूती पुण्यातच असणार. मग विचार आला की आता नेहमीच्या प्रथेप्रमाणे जालन्याला जाऊन काय उपयोग? तेथे तर दोघांपैकी

कोणीच नसणार! त्यामुळे ठरवले की जर 'श्री' महाराजांनी संकेत दिला तर गुरु द्वादशीला पुण्यातच थांबायचे. मी एक दिवस आधी शनिवारी सकाळी पुण्याला पोहोचलो. लगेच रेणुका निवास येथे दर्शनाला गेलो. बहुधा फारसे न बोलणारे 'श्री' महाराज त्या दिवशी मला म्हणाले ''मुक्काम आहे वाटतं?''

मी म्हटले ''नाही-गुरु द्वादशी करता म्हणून जालन्याला जातोय.'' त्यावर 'श्री' म्हणाले ''उत्सव इथेही असतो'' ही मला सूचना वाटली. पण मन गोंधळलेलेच राहिले.

त्याच दिवशी सायंकाळी पुन्हा दर्शनाला गेलो असता 'श्री' महाराजांनी पुन्हा विचारलं ''मग काय ठरविलय?'' मी म्हणालो ''आपण सांगाल तसे मी करीन.''

त्यावर दोन्ही हातांनी नकार दर्शवीत 'श्री' महाराज म्हणाले.''आम्ही सांगणार नाही.''

आज पर्यंत त्यांनी कुणाला''अमुक करा '' तथा ''अमुक करु नका'' म्हणून कधी सांगितले नाही तेंव्हा आम्ही अपवाद कसे असू ? अस्तु.

दुसरे दिवशी परत (रविवारी) रेणुका निवासात पोचलो. बाकीचे मुंबईकर भक्त अजून आलेले नव्हते म्हणून मी एकटाच दर्शनाला गेलो. 'श्री' महाराजांनी परत तोच प्रश्न विचारला,'' मग काय ठरविलं?''

मी म्हटल ''नाही जाणार, महाराज.''

त्यावर 'श्री' म्हणाले ''हांऽऽ! उत्सव इथेही असतो.'' मला वाटले हा जालन्याला न जाण्याचा निर्णय म्हणजे अगदी आध्यात्मिक सिक्सर मारली.

तेवढ्यात बाकीचे साधक भक्त मुंबईहून आले आणि दर्शनार्थ 'श्रीं'च्या खोलीत गेले. मी बाहेरच्या हॉलमधे बसलो होतो, पण आतील संभाषण ऐकायला उत्सुक होतो.

'श्रीं' ना नमस्कार करताना ते सगळे म्हणाले ''आता जालन्याला जायला निघणार.''

'श्री' महाराजांनी सर्वांचा उत्साह वाढवीत विचारल ''जालन्याला किती दिवस राहणार?''

माझा चेहरा अगदी बघण्यासारखा झाला.

आमच्या आध्यात्मिक सिक्सरचा बाउडरी लाईनवरच कॅच गेला होता!

झाल्या घटनेचा पूर्ण विचार केल्यावर लक्षात आलं की प.पू. श्री महाराज व श्री. प.पू.सौ. ताई महाराज **''पुण्यात आहेत''** म्हणजे **''जालन्यात नाहीत.''** हा संशय- हा विकल्प मनात आल्यामुळे मला 'श्री' महाराजांनी जालन्याला जाण्याचे रहित करण्या इतके भटकविले! पण शेवटी विवेक जागृत करुन मार्गावर ही त्यांनीच आणले.

******

## भारताच्या राष्ट्रपतींनी सन्मान - मानधन दिले

भारताच्या राष्ट्रपतींनी (पं. शंकर दयाळ शर्मा) 'श्री'महाराजांचा सत्कार दिल्लीहून पुण्याला स्वतः येऊन पुण्यातच केला. सत्कार समारंभाला जायची तयारी झाली. घरातील तसेच भक्त मंडळींनी 'श्रीं'ना नवीन वस्त्रे धारण करावीत अशी प्रार्थना केली. पण आपल्या नेहमीच्या वापरण्यातील धोतर, उपरणे याच पोशाखात जायचे असे स्पष्ट सांगितले. ''नवी वस्त्रे आम्ही ब्राह्मणांना देण्यासाठी ठेवलेली असतात आणि हे कांही मळले फाटलेले नाही. तेंव्हा हेच धारण करण्यास काहीच हरकत नाही'' असे सर्वांना समजावून सांगितले.

******

## निःस्पृहस्य तृणं जगत

'श्रीं'चा भारताच्या राष्ट्रपतींनी या पुर्वीही गौरव केलेला होता व कांही वार्षिक मानधन मंजूर केले होते. पुढे कारकुनी खाक्या मध्ये ह्या मानधनाची बरीच रक्कम मिळालीच नाही.

कांही भक्तांनी प्रयत्न करुन मागील रक्कम शासना कडून प्राप्त होण्याचा मार्ग प्रशस्त केला व त्या प्रमाणे कांही ३५०००/-रुपये एकदम ड्राफ्ट ने पाठवलेले मिळाले. प्रयत्न करणारांना अर्थातच आनंदा बरोबर थोडा अहं ही वाटला.

**प्रत्यक्षात जेंव्हा ड्राफ्ट 'श्रीं' चे पर्यंत पोचला तेंव्हा लगेच बँकेचे चेकबुक मधून ५-५ हजाराचे ७ चेक तयार करवून विविध श्रध्दा स्थानांना (वाडी-वगैरे) ताबडतोब पाठवून देवविले.**

**''राजाचे धन '' काम करत नसताना'' घेऊ नये.'' म्हणाले.**

******

## अंतरीच निवृत्त

काही भक्तांनी मिळून 'श्रीं'च्या नित्य उपयोगाला येणारी जी उपकरणे असतात त्याचा एक संपूर्ण संच चांदीचा करुन अर्पण केला. सेवकांनी 'श्रीं'ना त्यातील उपकरणी रोज वापरायसाठी जागेवर मांडून ठेवावीत. पण कुठेतरी''सगळे ठीक '' नसल्याचे जाणवे.

एकदा धारवाडचे श्री. राजेश्वरशास्त्री रेणुकानिवासात 'श्रीं'च्या दर्शनार्थ आले. दर्शनाला आलेली इतर भक्त मंडळी निघून गेली. शास्त्रीजी थांबलेले होते. सेवकाला आज्ञा दिली- ''ती सर्व चांदीची भांडी आणा'' म्हणाले. श्री कपिल शास्त्रींच्या हस्ते ती सर्वच्या सर्व श्री शास्त्रीजींना अर्पण करविली. त्यांचाही स्वभाव फार संकोची व तेही **'श्री'** सारखेच आत्मतृप्त. 'श्रीं'चेच शिष्य ना?

तथापि गुरु आज्ञा मोडता आली नाही. 'श्री' त्यांना म्हणाले ''तुम्ही मोठे कार्य करीत आहात. याचा उपयोग होईल. घ्या!''

दुसरे दिवशी आपली नेहमीची तांब्या-पितळीची उपकरणे समोर दिसली तेंव्हा कोठे ''सर्व ठीक '' झाले. त्या नंतर ताकीद केली''पुन्हा अशी उपकरणे कोणी करु नका.''

******

## जसे वचन तसेच आचरण--

'श्रीं' चा कांही काल बाहेरगावी दौरा होता. त्या दरम्यान रेणुका निवासच्या देवघराच्या हॉल मधे देवासमोरील भिंतीवर भक्तांनी एक भव्य शो केस बसवली. त्यात 'श्रीं'ना मिळालेली सन्मान पत्रे इत्यादि- उत्तम प्रकारे

रचना करुन मांडून ठेवली (अद्यापही आहेत). हे मांडणारे भक्तांना वाटले तसे मात्र काहीच झाले नाही.

**'श्री' जेव्हा रेणुका निवासला परत आले तेंव्हा कौतुकाने 'श्रीं' ना सर्व दाखविले. त्यांनी एका कटाक्षात सर्व न्याहाळले व दुसऱ्या क्षणी त्याकडे पाठ फिरवून खोलीकडे गेले. जाता जाता म्हणाले, ''हे कशाला केले?''**

**पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानी नायकावी ।**
**हा अमुका ऐसी नोहावी सेचि लोका।। -- ही माउलीची ओवी म्हणून दाखवली.**

******

## शास्त्र ज्ञान अमर्याद आहे.--

एक काशी कडील पंडित ज्यांनी व्याकरणाचा १७ वर्षे अभ्यास केला होता असे- व्याकरणाचार्यच जणू- आलेले होते. त्यांना स्वतःच्या शास्त्र ज्ञानाचा यथार्थ अभिमान होता. त्यांच्या तोडीचा व्याकरणातील अग्रणी पंडित त्यांना भारतात कोणी भेटला नव्हता.

श्री दत्त महाराजांचे प्रवचन ज्या स्थळी होणार होते तेथे हे पंडित जेंव्हा आले तेंव्हा त्यांचा यथोचित सन्मान केला गेला. त्या नंतर 'श्रीं'च्या प्रवचनास आरंभ झाला.

प्रवचनाच्या ओघात 'श्री' महाराज सांगत होते-''इंद्राला गुरु बृहस्पती महाराज व्याकरण शिकवीत होते. देवांच्या मानाने एक हजार वर्षे झाली हे शिकवणे सुरुच होते. शेवटी इंद्र कंटाळला'' इत्यादि.

आलेले पंडित महाशय बहुधा काय समजायचे ते समजले असावेत.(हे ही गुरु कृपे शिवाय कसे समजेल म्हणा).

भारद्वाज ऋषी कल्प पर्यंत ब्रह्मचर्याश्रमात राहून वेद शिकत राहिले पण ''किंचित''शिकून झाले, ही कथा श्रीगुरु चरित्रात आहे. तिचे स्मरण झाले.

******

# प्रेमाला मोल नसते

(विदुरा घरी रमणारे भगवान)

लातूर सारख्या मोठ्या शहरी श्री दत्त महाराजांचे कांही धार्मिक कार्यक्रमासाठी ३-४ दिवस वास्तव्य होते. निवास व्यवस्था तेथील स्थानिक धनिक व्यापाऱ्याच्या बंगल्यात करण्यात आली होती. राज वैभव सगळीकडे जाणवत होते. अन्नदानात रोज विविध पक्वान्नांची योजना होती व प्रसादाला भरपूर मंडळी येत होती.

या नंतर पुढे 'श्री' महाराज खर्डा या लहान गावी गेले. प.पू.श्री.सद्गुरु धुंडीराज महाराजांच्या वेळे पासूनची जुनी श्रध्दावान भक्त मंडळी येथे होती. लक्ष्मी देवी फारशी इकडे फिरकलेली नसावी असेच बेताचे घर दार असणारी पण प्रेमळ माणसे.

'श्रीं'च्या बरोबर लातूरला असताना वैभवाचा झगमगाट अनुभवलेले कांही साधक खर्ड्याला बरोबर होते. गावात पोचल्यावर एका लहान घरात खाली वाकूनच शिरावे लागेल अशा ठेंगण्या व लहान दारातून 'श्री' महाराज गेले. समोरच्या अंगणात कोणीच नव्हते. 'श्रीं' नी तेथील कोपऱ्यातील एका बादलीतील पाणी पायावर घेतले. उपरण्याने हात,तोंड व पाय टिपले व घरात गेले. इतके झाले तरी यजमानांचे दर्शन नव्हते. 'श्रीं' नी आतील पडवीत जाऊन एक पाट स्वहस्ताने घेतला व एका विशिष्ट जागी पाट मांडून त्यावर बसले.

इतक्यात घरातली माणसे पुढे आली व वंदन केले. येथे सात दिवस मुक्काम झाला व अशा अनेक लहान लहान अडचणीच्या जागांमध्ये प्रेमाने जाऊन पूजा स्वीकारल्या. पाय पुढे करुन पाद्यपूजा घेतल्या.

नंतर कळून आले की या घरी प.पू.श्री. सद्गुरु धुंडीराज महाराज येत असत तेंव्हा घरात जाउन पाय धुवून पाट मांडून बसण्याची त्यांची हीच पध्दत व हीच जागा होती.

घरची गरीबी. तरी 'श्री' महाराजांची सोय व्हावी म्हणून तेवढ्या लहान जागेतच न्हाणी इ. घाईने बांधून काढलेली दिसत होती.

शहरी वातावरणात 'श्रीं' ना नेहमी पाहणाऱ्यांना या मनाने श्रीमंत भक्तांचे-चंद्रमौळीत रमणारे 'श्री' पाहून आश्चर्य वाटले.

******

## ‘श्रीं’चा अभिप्राय

एक वृध्द साधक भगिनी, (प.पू.श्री. गुरुमहाराज गुळवणी महाराज यांचे कृपापात्र दांपत्य) ‘श्रीं’ कडे आल्या. मुंबईहून त्या ज्या ज्या वेळी येत त्या त्या वेळी श्री गुरुमहाराजांच्या प्रेमळ आदेशामुळे त्यांचा मुक्काम श्री वासुदेव निवासात असे.

या विशिष्ट प्रसंगी काय घडले- की यांच्या बरोबर पुण्याच्या राहणाऱ्या एक सुहृद भगिनी ही ‘श्रीं’ समोर दर्शनाला उभ्या होत्या. मुंबईकर भगिनींनी ‘श्रीं’ ना म्हटले ‘‘महाराज ह्या आपल्या प्रेमातल्या सुहृद भगिनी मला यांच्या पुण्यातील घरी चलण्याचा आग्रह करीत आहेत. ‘‘त्यावर ‘श्रीं’ नी त्या पुणेकर भगिनींना लगेच सांगितले ‘‘अहो ह्या पुण्याला आल्या म्हणजे आश्रमात थांबतात व मग कोणाकडे जात नाहीत.’’

आता ‘श्रीं’ नी परस्पर त्या पुणेकर भगिनींना सांगून विषय संपविला होता. मुंबईकरांनी आश्रमातून कोठे जाऊ नये हा आपला अभिप्रायही स्पष्ट केला होता. तरी ही त्या मुंबईकर भगिनींनी पुन्हा ‘श्रीं’ ना विचारले ‘‘महाराज, मी प्रत्येक वेळी यांना नाही नाही म्हणते. आज जाऊ कां?’’ जाऊ कां? विचारल्यावर ‘श्री’ म्हणाले ठीक आहे.

येथे हा प्रसंग सांगण्याचे प्रयोजन इतकेच की ‘श्रीं’ च्या दीर्घकाळ सहवासात असणाऱ्या अभ्यासू-ज्ञानी अशाही मंडळींना केंव्हा केंव्हा ‘श्रीं’ च्या शब्दातला आपल्यासाठीचा आदेश म्हणा- अभिप्राय म्हणा- लक्षात येत नाही. व ह्या मुळेच आपल्या प्रारब्धाला संधी मिळते. **‘श्रीं’ ची शक्ती त्या प्रारब्धावर मात करण्याची आहे पण तसे तेव्हा घडेल, जेंव्हा भक्त ‘श्रीं’ च्या शब्दाचा बरोबर अर्थ समजून ‘‘त्यांना जे आवडते ’’ ते करेल.**

******

## रांजणगांव गणपती दर्शन

एकदा आम्ही उभयता पुण्याहून जालन्याला प.पू.श्री.ताई महाराजांच्या दर्शनाला स्वतःच्या वाहनाने निघालो. वाटेत रांजणगावचे गणपतीचे स्थान आहे. नेहमी जालन्याला जाण्याची ओढ असल्याने श्रीगणेशाचे दर्शन जाता जाता हात जोडूनच घेतले जाई. पण आज सवड काढून थांबलो व त्यातल्या त्यात कमी वेळ

जावा म्हणून रांजणगांवच्या गणेश मंदिराच्या मागील दाराने बागेतून प्रवेश केला. मंडळी दर्शन करून आल्यावर मी श्री गणेश मूर्तीच्या मागच्या बाजूने दर्शनास निघालो. गणपती मंदिराच्या मागे शंकराचे मंदिर आहे.

शंकरा समोरील नंदीचे दर्शन घेतले व गडबडीने शिवपिंडीकडे नजर टाकली तर मला महादेवाची पिंड दिसलीच नाही. त्या ठिकाणी प.पू.श्री.दत्तमहाराज पिवळ्या रंगाचे सोवळे-चष्मा अशा रुपात बसलेले दिसले. त्यांच्या दृष्टीत थोडा रोष असल्याचे जाणवले. अचानकपणे, बेसावध क्षणी 'श्रीं'चे हे झालेले दर्शन बुध्दीत नोंद होण्यास विलंब लागला. त्या क्षणी काय घडते आहे ते कळलेच नाही.

श्रीगुरु चरित्रात तंतुक भक्ताला श्रीशैल्याच्या मल्लिकार्जुन शिव पिंडीच्या ठिकाणी श्रीगुरु-नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांनी स्वत:चे रुप दाखविल्याचे वर्णन आहे. फरक इतकाच कि तो तंतुक त्या क्षणी सावध होता !

******

## नव्या घरात 'श्रीं'चे आगमन

आमच्या नव्या घरात 'श्री' महाराजांचे शुभागमन, त्यांच्याच असीम कृपेने झाले. सर्व वास्तू फिरून पाहिली. धन्यता वाटली. घरच पावन करुन टाकले असे वाटले.

त्या प्रसंगी 'श्रीं' ना विचारले ''महाराज! साधना मिळाल्यानंतर पहिली २-३ वर्षे चांगले अनुभव येत होते. साधना चांगली चालत आहे याचा आनंद वाटायचा. पण आता मात्र साधनेत म्हणावा तसा आनंद मिळत नाही. दोष आमचाच आहे. काय करावे?'' सौ.ने ही माझ्या प्रश्नाला दुजोरा दिला.

'श्री' महाराज शांतपणे म्हणाले '' काही काळजीचे कारण नाही. आपण संसारी माणसे. संसार सांभाळून हे करीत आहात. मात्र साधनेचे सातत्य ठेवा, म्हणजे झाले. श्री महाराज कृपा करतील.''

सर्व काही स्वत:च करीत असताना 'अमानित्व '' व श्री महाराजांना श्रेय देणे हे त्यांचे तेच करू जाणे !

******

## त्यागार्थ गुरु

श्री दत्त प्रभुंनी दोन प्रकारच्या हेतूने २४ गुरु केले. कांहीचे गुण ग्रहण करण्यासाठी त्यांना गुरु मानले तर कांहींचे दोष आपल्या मध्ये येऊ नयेत म्हणून (त्यागार्थ) गुरु मानले.

येथे माझ्या अनुभवाला आलेला प्रसंग ज्या मंडळीच्या संबंधी घडला त्यांचा माझा प्रत्यक्ष परिचय नाही पण 'श्री' महाराजांचे समोर बसून जी याचना त्यांनी केली व 'श्री'नी त्यांना समजावले. त्या सर्व संभाषणातून 'त्यागार्थ '' गुरु म्हणून ह्या मंडळींना मी गुरु मानले. प्रसंग असा होता.

त्या कुटुंबातील विवाहित कन्या नवऱ्याशी व सासू-सासऱ्यांशी न पटल्याने माहेरी आली होती व ते माता पिता तिला 'श्रीं' कडे घेऊन आले होते. ते 'श्रीं' ना सांगत होते की ह्या मुलीच्या सासरकडची मंडळी चांगली नाहीत तिला फार त्रास आहे. तिला घटस्फोट मिळावा असा आम्ही प्रयत्न करीत आहोत. आपले आशीर्वाद असावेत.

'श्री' महाराज म्हणाले यांचे साठी आम्ही गुरु महाराजांना प्रार्थना करु व यांचा विस्कटलेला संसार पुन्हा सुरळीत व्हावा यासाठी त्यांना विनंती करु.

समोर बसलेल्या मंडळींचा मात्र ''घटस्फोटासाठी आशीर्वाद'' हा आग्रह संपेचना. शेवटी 'श्रीं' ना स्पष्ट बोलावे लागले. 'श्री' म्हणाले,''आमच्याकडे घटस्फोट मिळावा यासाठी आशीर्वाद मागण्याची पध्दत नाही. आशीर्वाद चांगल्या गोष्टीसाठी मागितला जातो. आपण आता या.''

आम्हाला चुकुनही असला आशीर्वाद मागण्याची बुध्दी होऊ नये यासाठी ह्या मंडळींना गुरु केले आहे.

******

## सेवेची पोच

प.पू. सौ. आईसाहेब आजारी होत्या. त्यांच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी सेवा म्हणून एका भक्ताने 'घोरात्कष्टात्' स्तोत्राचे १०८ पाठ एके दिवशी पहाटे उठून ३॥ ते ६ वाजेपर्यंत केले.

या आधी कांही दिवसापूर्वी 'श्री' महाराजांना नित्याप्रमाणे कांही रक्कम मनी ऑर्डर करून पाठविलेली होती. 'श्रीं' चे नेहमी पत्र येत असे व मनी ऑर्डर मिळाल्याच्या सुमारास आलेल्या पत्रात तसा उल्लेख असे.

ज्या दिवशी पाठ केले त्याच दिवशी सकाळी १० च्या सुमाराला 'श्री' चे पत्र आलेले दिसले. त्यात 'श्रीं' नी लिहीले होते.''सौ.आईसाहेबांची प्रकृती आता ठीक आहे.''

आश्चर्याचा भाग असा की 'श्रीं' नी ते पत्र त्याच दिवशी पुण्याहून लिहून पाठवलेले त्याच दिवशी स.१० ला मुंबईला आलेले होते.

अवितर्क्य लीला विहारी 'श्रीं ' ना शतशः प्रणाम!

******

## शिकविणे ही ईशसेवा आहे

एक भक्त भगिनी 'अपंग व मतिमंद'' अशा लहान वयातील मुलांच्या शिक्षिका म्हणून सेवारत आहेत.

एकदा यांना शाळेत पोचायला थोडा उशीर झाला. आपल्या कक्षात जाण्यापूर्वी स्टाफरुम मधील कपाटाजवळ त्या गेल्या तोच बाजूच्या पडद्याचे जागी श्री. प.पू. गुळवणी महाराज व प.पू.श्री दत्तमहाराज दिसले. ते यांना विचारत होते **''आज कामावर यायला उशीर कसा केला. लहान लहान बाल विद्यार्थी तुमच्यासाठी खोळंबून आहेत. त्यांना शिकविणे ही ईश्वरसेवाच आहे. त्यात निष्काळजीपणा नको.''**

या भगिनी सावध झाल्या.(त्या भगिनी विनावेतन अध्यापन सेवा करीत होत्या)

******

## डॉ. - पेशंट -उपासना

वैद्यकीय व्यवसाय जर सेवा भावाने व नि:स्वार्थ भावाने करायचा असेल तर जे पथ्य पाळायला पाहिजे त्याचे मार्गदर्शन 'श्री' कृपेने एका व्यावसायिकाला असे लाभले-

'श्रीं'ना यांनी विचारले की नित्याचे आन्हिक व वाचन, पूजा इ. ह्यात बरेचदा अचानक पेशंट आल्याने व्यत्यय येतो. द्विधा अवस्था होते. नित्यकर्म मधेच सोडावेसे वाटत नाही. पण तसेच चालू ठेवायचा प्रयत्न केला तर त्यांत लक्ष लागत नाही. असे वाटते, अरे ! पेशंट ला वेदना होत असतील! कदाचित बाहेर गावाचा असेल तर परतीची गाडी चुकण्याचा संभव असतो. मग या विचाराच्या जोडीला कर्तव्याचीही टोचणी मनाला लागते व नाखुषीनेच सर्व थोडावेळ आवरुन ठेवून ''**समयाला सादर**'' व्हावे लागते.

अशा प्रसंगी काय करणे योग्य होईल असे एकदा 'श्रीं'ना विचारले. त्यांनी सांगितले-

**''अशावेळी परमेश्वराला मनोभावे एक नमस्कार करावा व आपले विहित कर्तव्य करावे. परपीडा निवारण करण्याचा यथाशक्य प्रयत्न करणे हेच परमेश्वराला प्रिय आहे. ''उर्वरित उपासना आठवणीने, सवडीने पूर्ण करावी.'' असे अचूक मार्गदर्शन मिळाल्यावर द्विधा मन होईलच कसे?**

******

**तो बहुतांचे पालनकर्ता**
**त्यास बहुतांची असे चिंता।**
**- समर्थ रामदास**

## ॥ गच्छतः स्खलनं क्वापि ॥

मधुकर या साधकाला वयाच्या ३५ नंतर 'श्रीं'ची दीक्षा मिळाली. आणि- 'श्रीं'च्या प्रवचनातील ''रसास्वादाचा'' दोष पत्करून मधुकर - केवळ 'श्रीं'चे माहात्म्य सांगण्यासाठी कथन करीत आहे--दीक्षे नंतर २-३ वर्षातच कुंडलिनी जागृती ते ध्यानात समाधी अवस्था येण्या पर्यंतच्या सर्व पायऱ्या अगदी विनासायास 'श्रीं'च्या कृपादृष्टीने पार झाल्या.

नंतर 'श्री' आज्ञेने विवाह झाला. प्रपंचात बुडायला काय वेळ लागणार? हरीची **'माया'** तत्परतेने संधीच पहात होती.

अशी दीक्षेनंतर सुमारे २४ वर्षे होत आली. साधनेच्या उत्तम अनुभवांचाही विसर पडला. मग साधना बंद पडली. हे काय आश्चर्य.

अशा एके रात्री निद्रेतून 'श्रीं'च्या प्रेमळ आवाजाने जाग आली. लक्षात आले की स्वप्न पाहिले आहे. त्यात 'श्री' आत्ताच येउन सावध करून सांगून गेले. अरे! २ तपे पूर्ण झाली जागा हो!

किती सहनशील गुरुमाउली! माझ्या निष्काळजी पणाने मी स्खलन मार्गावर घसरत असताना त्यांना काय हो गरज होती? म्हणून प्रार्थना आहे--

त्वयि भक्तिं नैव जाने न जानेर्चपध्दतिम् ।
कृतं न दान धर्मादि प्रसादं कुरु केवलम् ॥
ब्रह्मचर्यादि नाचीर्ण नाधीता विधितः श्रुतिः।
गार्हस्थ्यं विधिना दत्त न कृतं तत् पसीद मे ॥
न साधुसंगमो मेऽस्ति न कृतं वृध्द सेवनं ।
न शास्त्रशासनं दत्त केवलं त्वं दयांकुरू ॥

--श्री दत्त भावसुधारस

******

## माझ्या भक्ता कैचे दैन्य

'श्री' महाराज प्रवचनातून जेंव्हा **पापं तापं व्याधिमाधींच दैन्यं** ।। याचे विवेचन करतात तेंव्हा **दैन्य** शब्दाचा अभिप्राय असा सांगतात की ''आमच्या कडून इतकी नियमित उपासना,जप,वगैरे कसे घडेल'' अशी विचार सरणी असणे हेच बुध्दीतील दैन्य आहे. ही नकारात्मक विचार करण्याची वृत्ती त्यागून धाडसाने- 'श्रीं' वर भार टाकून आरंभ करावा. पुढचे ते पाहून घेतात.

**''माझ्या भक्ता कैचे दैन्य ''** हे त्यांचेच आश्वासन आहे. यदाकदाचित् भक्ताने असे दैन्य प्रकट केलेच तर 'श्री' त्याच्या हाताला धरून खोल पाण्यात ढकलतात व **''मला उत्तम पोहता येते की!''** हा आत्मविश्वास त्याच्यात ओततात, व तो तरून जातो. नंतर मात्र आश्चर्य चकित होतो की खरच आपण हे केले? की त्यांचे कृपेने हे घडले?

श्री चिदंबर ह्या भक्ताचा या संदर्भातील बोलका अनुभव असा.- एकदा तो श्री रामदासस्वामी महाराजांचे चरित्र वाचत होता. श्री समर्थांनी १२ वर्षात १३ कोटी रामनामाचा जप केला असे वर्णन आहे.

हे वाचल्यावर मनाच्या कंप्युटरने उत्तर काढले- एका सेकंदाला २.९११ म्हणजे तीन वेळा हा मंत्र उचारला असला पाहिजे. या गतीने अखंड २४ तास ३० दिवस असे १२ महिने व असे १२ वर्षे बापरे! आपल्याला हे केवळ अशक्य आहे!

'श्रीं' ना हे 'दैन्य' बहुधा मान्य झाले नसावे.

घडले ते आश्चर्यकारकच होते.

महिना अखेरीस ऑफिसची कामे संपवून घरी यायला रात्री उशीर झाला. दिवसभर श्वास विकार वाढल्याने खाता-पिता आले नव्हते. घरी आल्यावर त्रास अधिकच बळावला. शेवटी हातात औषधाची गोळी घेउन 'श्रीं'च्या फोटो समोर बसलो. प्रार्थना केली. महाराज पोटात भूक असूनही जेवता येत नाही. औषध योजना करायला डॉक्टर भेटले नाहीत, औषधाची दुकाने बंद आहेत. आता ही एक गोळी आहे ती घेतो. पुढचे आपल्या मर्जीवर! ''गोळी घेऊन झोपलो. काही क्षणात गाढ झोप लागली. पहाटे ६-६॥ ला कोणीतरी जागे करून चहा

घ्यायला लावला तो घेउन पुन्हा झोपलो. मात्र आताची अर्धवट गुंगी होती. दुरून कोणी तरी अंत्ययात्रेला जाणाऱ्यांचा राम नामाचा स्वर येतो आहे असे अर्धवट निद्रावस्थेत जाणवत होते. कांही वेळाने त्या जपाची गती अतिशय तीव्र होऊन व कानाच्या जवळ म्हटल्या प्रमाणे स्पष्ट ऐकू येऊ लागले.

गणितात उत्तर मिळाले तितकी जलद म्हणजे सेकंदाला तीन तरी गती असावी हे सर्व जाणवत होते पण जाग येत नव्हती. दुपारी १२॥ वाजता पूर्ण जागृत अवस्था आली व क्षणातच लक्षात आले की **''अंत्ययात्रा''** वगैरे कांही नसून हा जप आपणच करतो आहोत. 'श्रीं'नी यांना त्यांच्या सामर्थ्याची, प्रत्यक्ष कृती करून घेऊन खात्री करून दिली. आता 'दैन्य' राहील का?

तुम्ही त्यांचे वर भार टाकला की ते ''२४ तास -३० दिवस-१२ महिने१२ वर्षेच नव्हे अखेरच्या श्वासापर्यंत आपल्या कडून हवा तो जप करून घेतात.''

करू या तर प्रयोगाला आरंभ !

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥

******

## अज्ञान तिमिरांधस्य

शास्त्रज्ञ माहात्म्यांच्या ग्रंथांचे वाचन करणे, चिंतन करणे, त्या प्रमाणे आपल्या बुध्दीतले दोष जाणून घेणे ते दोष जाण्याकरता ईश्वराला शरण जाणे हे उपाय आहेत. त्या ईश्वराच्या कृपेनेच सर्व विघ्न दूर होतात.ईश्वराची कृपा म्हणजे श्रीगुरुंची अनुग्रहरुपी दीक्षा मिळाली म्हणजेच 'श्रीं' नी वर म्हटल्यानुसार बुध्दीतले दोष जाऊ लागतात. म्हणूनच '' यत्र शक्तिर्नपतती तत्र सिध्दिर्न भवती''॥

हा सिध्दांत सांगितला आहे.

या विवेचनाचा स्वतः अनुभव घेतलेल्या एका साधक भगिनीने प्रकट आत्मपरीक्षणाद्वारा सांगितलेली अनुभूती प.पू.श्री.दत्त महाराजांच्या दीक्षा अनुग्रहामुळे मिळालेल्या लाभांशी संबंधित असल्याने येथे अंतर्भूत केली आहे.

जुन्या वळणाच्या मध्यम स्थितीतील माता-पिता यांनी बाल्यावस्थेत कांही सवयी जसे सकाळी उठल्यावर कांही घेण्यापूर्वी देवाला नमस्कार करुन कांही प्रार्थना म्हणणे, सायंकाळी दिवा लागल्यावर देवाजवळ बसून स्तोत्र इ. प्रार्थना करणे इत्यादि प्रयत्नपूर्वक यांच्या सर्वच भावंडांना लावल्या. वाढत्या वयाबरोबर सभोवतालच्या संभ्रमात्मक वातावरणाच्या आहारी मन जाऊ लागते. काही काही बाबतीत योग्य शंका-समाधान न लाभल्याने आधुनिकतेकडे वळत वळत बरीच नास्तिकता ,'' यांत काय आहे?'' ही वृत्ती बळावली. विवाहापूर्वी, नियोजित वराबरोबर  चर्चा करून,''मी अशी वागणार! मला या-या गोष्टी जमणार नाहीत, माझ्या मना विरुध्द कांही माझ्यावर लादण्याचा प्रयत्न झाला तर घटस्फोट होईल'' एथपर्यंत सांगूनच विवाहाला संमती दिली. सासर कडे ''साधना ''करणारी सर्व मंडळी, नियमांचे पालनाविषयी दक्ष अशा स्वभावाच्या सासू-सासऱ्यांच्या बरोबर एकत्र राहताना या विरोधी विचार सरणीचे परिणाम जे व्हायचे तेच होत होते. फक्त कोणीतरी संयमाने माघार घेऊन प्रसंग ''निर्णायक'' होऊ देत नव्हते.

यांनी 'श्री' महाराजां कडून दीक्षा घ्यावी असे पतिदेवांनी आग्रहपूर्वक समजावून सांगितले परिणामी '' 'श्रीं' ना दीक्षेसाठी प्रार्थनापत्र लिहा'' अशी संमती यांनी मोठ्या कष्टानेच दिली. दीक्षा ज्या दिवशी झाली त्या दिवशी विशेष कांहीच जाणवले नाही. त्या मुळे विरोध आणखीच तीव्र झाला.

पण 'श्रीं'च्या ''शिवसंकल्पाचा '' परिणाम यांच्या स्वभावावर मात करू लागला व हळू हळू विरोधाची जागा ''परस्परांना समजून घेऊन '' वागण्याने घेतली. प्रपंचातील उतार-चढावात 'श्री' कृपे मुळे अनुकूलता, समाधानकारक प्राप्ती, अनेक सूक्ष्म इच्छांच्या पूर्ती साठी आर्थिक अनुकूलता अशा लाभांची मालिका सुरु झाली.

'श्रीं' च्या दर्शनाचे प्रसंगी छोट्या छोट्या प्रसंगातून त्यांच्या शक्तीची चुणुक दिसू लागली. एकदा 'श्रीं' नी दिलेला खडीसाखरेचा प्रसाद सेवन न करता पर्समधे ठेवून दिला. अचानक कांही तीव्र व्याधी, कांही कारण नसताना शरीरात प्रकट झाली. सहन करणे अशक्य होऊ लागले. अशाही स्थितीत

''साधनेला बसावे '' असे वाटू लागले. व ध्यानाला बसताच ''खडीसाखरेचा प्रसाद घेतला कां? अशी पृच्छा स्पष्टपणे कानावर आली. कोण बोलले कांही कळले नाही. पण प्रसादाचा छोटासा खडा मुखात टाकल्या क्षणी व्याधीची तीव्रता कमी होऊ लागली व अल्पकाळात सर्व पूर्ववत ठीक झाले.

'श्रीं' च्या मार्गदर्शनाप्रमाणे चांगल्या क्षेत्रांची तीर्थयात्रा घडली. तेथे गेल्यावर संकेत मिळून एका अपरिचित शेजाऱ्यासाठी प्रसाद आणायला आज्ञा झाल्याचे कानावर स्पष्ट शब्दात कोणीतरी सांगितले. ते शेजारी नंतर परिचित झाले व गुरु परंपरेतीलच असल्याचे लक्षात आले.

अशा असंख्य अनुभूतींच्या मालिकेतून आज त्यांच्या विचारांची जी स्थिती आहे. ती जर तरुण पणी विवाहापूर्वी असलेल्या स्थिती बरोबर पडताळून पाहिली तर आश्चर्यच वाटेल इतका अंतरंगात बदल, विचार सरणीत बदल लक्षात येतो. या बदलांचे केवळ एकच कारण आहे. ते म्हणजे :-

अज्ञान तिमिरांधस्य, ज्ञानांजन शलाकया चक्षुरुन्मीलनं।।

ही किमया 'श्रीं' च्या दीक्षा अनुग्रहाने घडून आली आहे.

******

## देणे ईश्वराचे

लौकिक शिक्षण घेतलेले आधुनिक विज्ञानाचे शास्त्रज्ञ रोज नवीन शोध लावतात व ''मी हे शोधले'' असेही त्यांना वाटते. तथापि ईशेच्छे शिवाय झाडाचे पानही हलू शकत नाही. ही ईशेच्छा म्हणजेच निर्मितीची आदिशक्ती आहे. ही शक्ती श्रीगुरुंच्या स्वाधीन आहे व त्यांच्या कृपेनेच जीवाला सहज प्राप्त होऊ शकते. याचा अनुभव घेतलेल्या भक्ताची ही कथा आहे.

या भक्ताला लौकिक विज्ञानाच्या रसायनशास्त्र शाखेत विशेष प्राविण्य प्राप्त झाले. त्या ज्ञानाला अनुसरुन नोकरी मिळाली. मुंबई सारख्या ठिकाणी राहून मोठी प्रापंचिक जबाबदारी सांभाळायला पगार फारच कमी पडत होता. प.पू. श्री. गुळवणी गुरुमहाराजांनी याला स्वतःचा व्यवसाय सुरु करावा असे सुचविले.

एका सहज उपलब्ध व स्वस्त कच्च्या मालापासून मौल्यवान असे उत्पादन कसे मिळवावे ह्याची संपूर्ण रासायनिक प्रक्रिया 'श्री' महाराजांच्या कृपेने यांना

अंतः प्रेरणेने समजून आली. तसा प्रयोग केला व यश मिळाले. श्री गुरुमहाराज म्हणाले या उत्पादनाचे पेटंट घ्या. त्या प्रमाणे महत्प्रयास करुन पेटंट मिळविले. पण कांही प्रापंचिक त्रासामुळे स्वतः उत्पादन करुन व्यवसाय करणे जमलेच नाही. महत्वाचे संशोधन मात्र 'श्री' कृपेने यशस्वीरीत्या पदरात पडले होते. या घटनेला बरीच वर्षे लोटली. प्रपंचाची ओढगस्त संपत नव्हती. इतरही नाते-गोते संबंधातील समस्या डोके वर काढू देत नव्हत्या. दरम्यान १९७४ मध्ये श्री गुरुमहाराज ब्रह्म तत्वात लीन झाले. त्या नंतर कांही वर्षानंतर चा प्रसंग. हा भक्त प.पू.श्री दत्तमहाराजांच्या दर्शनार्थ गेला असता 'श्रीं' नी अचानक विचारले ''काय, तुम्ही काही शोध लावला आहे वाटत! आता स्वतः चे उत्पादन सुरु करावे''. श्री गुरुमहाराजांनी केलेली सूचनाच 'श्रीं' कडून पुन्हा पुढे आली. तेंव्हा विलंब न करता प्रयत्नाला लागावे असे ठरवले. पण आश्चर्य असे की यांनी जो प्रयोग सिध्द करुन पेटंट ही मिळविले होते त्याच्या महत्वाच्या टप्प्यातील प्रक्रियेची यांना संपूर्ण विस्मृती झाली. कांही केल्या तो प्रयोग पुन्हा यशस्वी होईना. पुन्हा यश वाकुल्या दाखवून लांब गेले.

'श्रीं' च्या पुढच्या भेटीच्या वेळी हा विषय निघाला. तेंव्हा 'श्री'महाराज म्हणाले,''हरकत नाही. कांही प्रतिबंध असतील. पुन्हा प्रयत्न करा.''

ताबडतोब घरी गेले व घरातील प्रायमस स्टोव्ह वापरुन व साहित्य जुळवून रासायनिक प्रयोग स्वयंपाक घरातच सुरु केला. आणि या वेळी मात्र संपूर्णपणे यशस्वी झाला. हवे ते उत्पादन मिळण्याची दिशा स्पष्ट झाली. प्रथम यश मिळाले होते तो प.पू.श्री.गुळवणी महाराजांचा संकल्प होता व या वेळी प.पू.श्री दत्तमहाराजांच्या संकल्पाने यश मिळाले. ज्ञान जर स्वतःच्या प्रयत्नाने मिळविले असते तर विस्मृती कशी झाली? मग हे ज्ञान कुठुन मिळाले? प्रयोग सिध्द कोणी केला? साक्षात् दत्तप्रभूंनीच दोन रुपांनी दोन प्रसंगी कृपा करुन यांना यशस्वी केले ही दृढ श्रध्दा यांची आहे.

*****

## लौकिक सर्वज्ञता

दुसरा एक प्रसंग याच भक्ताच्या व्यवसायाच्या संबधात घडला. फोटो ग्राफिच्या क्षेत्रातील कोडॅक,आग्फा अशा नामांकित आंतरराष्ट्रीय कंपन्यांना लागणारे एक रासायनीक द्रव्य पावडर स्वरुपात पुरवठा करण्याचे कंत्राट ह्यांच्या कंपनीला मिळाले. त्या साठी सादर केलेला द्रव्याचा नमुना उत्कृष्ट, म्हणजे ९९ टक्के शुध्द असल्याने ऑर्डर मिळाली. त्या ऑर्डर सोबत शुध्देतेव्यतिरिक्त कांही अन्य अटी ही होत्या.

या द्रव्याने भरलेल्या डब्यांचा पहिला लॉट यांनी कंपनीकडे पाठवला. पण ९९ % शुध्द असूनही तो नाकारला गेला. कारण एका डबीत किती वजनाची पावडर असावी या संबंधीची त्याची अट यांनी पूर्ण केली नव्हती . कारण इतकेच होते की डबी प्रयत्नपूर्वक पूर्ण भरुनही तितके वजन भरत नव्हते. याला कांही उपाय यांना दिसत नव्हता. सर्व अति खर्चिक पदार्थ वापरुन केलेला माल अंगावर पडला. कामगारांचे वेतन, कारखान्याचा खर्च, बँकेचे कर्ज परत फेड व स्वत:चा प्रपंच ह्या सगळ्याच बाजूने आर्थिक संकट ओढवले. यांना सतत एकच वाटत होते की आपली कांही चूक नसताना कंपनीचे लोक माल परत करुन विनाकारण त्रास देत आहेत. ९९% शुध्दता असून ही स्थिती कां? हे कळत नव्हते.

या समस्यांच्या जाळ्यात अडकलेले असतानाच यांचे जालन्याला येणे झाले. प.पू.श्री. ताई महाराजांच्यासमोर हा प्रकार निवेदन केला. प.पू.भगवतींनी प्रथम यांनाच थोडे रागावून म्हटले, ''अहो तुमची कांहीच चूक नाही असे कसे म्हणता?'' या प्रकारे त्यांनी थोडी व्यावहारिक समज दिली. ईश्वराला भक्ताचे वागण्यातील चूक झालेली आवडत नसते. या नंतर भगवतींनी अतिसाध्या उदाहरणाने यांच्या समस्येचे जे उत्तर यांना दाखवले तो भाग असा. **त्या म्हणाल्या '' अहो! असं पहा! एका बाटलीत तुम्ही नुसते चणे भरले तर तिचे एक वजन होईल. चण्याच्या मधे मधे पोकळ राहिलेली जागा जी तुम्ही भरडलेली डाळ,पीठ इ. घालून भरुन काढली तर बाटलीचं वजन वाढेल की नाही?''** इतके समजून सांगितल्यावर यांच्या डोक्यात प्रकाश पडला.

लगेच त्यांनी बाजारातून त्या कंपनीची बाजारात विकल्या जाणाऱ्या त्याच रासायनिक पावडरची एक डबी नमुना म्हणून खरेदी केली व कारखाना गाठला.

तेथे चाळणी यंत्राचा उपयोग करुन त्या नमुन्याचे विभाग कले असता त्यात त्यांना भगवतींनी समजावल्याप्रमाणेच प्रकार मिळाला. त्या डबीत विविध जाडीच्या कणांचे यथायोग्य मिश्रण करुन भरलेले असल्याने वजन हवे तितके बरोबर मिळालेले होते. यांनी मात्र एकाच नमुन्याच्या पावडरने डब्या भरल्या होत्या त्या मुळे वजन कमी भरत होते. इतकी त्रुटी दूर केल्या बरोबर यांचेही सर्व डबे स्वीकारले गेले. सर्व समस्यांचा अंत झाला.

हे सर्व वाचल्यानंतर हे समस्येचे समाधान भगवतीने केलेले म्हणजे अगदी सोपी गोष्ट आहे असे वाटेल. पण ९९% शुध्दता असून असं का अशा विचाराच्या चक्रव्यूहात अडकलेल्या भक्ताला ज्ञानामृत पाजून सावध करायला त्यांनी उदाहरणच इतके साधे निवडले की शांतपणे विचार केल्या शिवाय सर्व अंगांचा उलगडा होत नाही.

विविध आकारमानाचे कणांचे मिश्रण त्या डबीत असते हे ज्ञान असणारी व्यक्तीच असे उत्तर देऊ शकेल. हे ज्ञान भगवतीला कसे झाले याचा विचार केला तरच ईश्वरी सामर्थ्याची ओळख येथे होऊ शकेल.

******

## कर्माबद्दल ईश्वरार्पण बुध्दी व्हावी ह्यासाठी काय करावे

एक भक्त, दीक्षा झाल्या नंतर ही रात्री नऊला जेवण झाल्यावर लगेच झोपेच्या आधीन होई. असेच एकदा झोप लागते न लागते इतक्यात 'श्री' महाराजांचा आवाज कानी पडला व जाग आली. '' पांच मिनिटे तरी उठून बसा'' असे 'श्री' म्हणत होते, हे लक्षात आले. पण पुष्कळ विचार करुनही ५ मिनिटे उठून बसून नक्की काय करावे हे समजेना.

'श्रीं' ना प्रार्थना करून पाहिली की, महाराज आता मी नक्की काय करणे योग्य होईल.

तेव्हा 'श्रीं' च्या उपदेशा पैकी हा उपदेश आठवला की- रात्री झोपण्यापूर्वी- पाच मिनिटे हात जोडून आपण दिवस भरात केलेली कर्मे आठवावीत व '' सर्व-चांगली वाईट - कर्मे '' हे सद्गुरु महाराज ! आपल्या चरणी अर्पण करतो''

अशी प्रार्थना म्हणून मग झोपावे. ''कर्मे ईश्वरार्पण केली म्हणजे आपला त्या कर्माशी संबध संपला.''

नवीन प्रारब्ध निर्माण होणे ह्या मुळे थांबेल.''

किती सोपा उपाय सहज करण्या सारखा ! पण तोही विसरलेल्या ह्या भक्ताला श्री गुरुंनी स्वतःच जागे केले.

******

## प्रार्थनेची शक्ती

इ.स. २००६ चा मे महिना होता. आम्ही काही सहकारी मित्र एकत्र येऊन नवीन कंपन्यांची कामे करीत होतो. नवीन कंपनीची स्थापना करताना व्यवसाय क्षेत्रातील विविधतेमुळे प्रकरणा-गणिक वेगळ्या समस्या असत. केंव्हा कोठे कशासाठी काम अडेल कांही सांगता येत नसे. या अचानक उपस्थित होणाऱ्या परिस्थितीतून मार्ग काढायला मार्गदर्शक म्हणजे आमचे आम्हीच. त्या मुळे प्रयत्न करीत असताना प्रत्येक वेळी श्रीदत्तमहाराजांचे स्मरण करुन - यशासाठी प्रार्थना करीत असे. तेच सांभाळून घेतात व म्हणून प्रपंच - व्यवसायातही कठीण प्रसंगातून निभावून जातो अशी प्रचीती कित्येकदा घेतली आहे. त्यातील हा प्रसंगः-

मुंबईला नव्याने स्थापन होणाऱ्या कंपनीचे सरकारी कार्यालया संबंधीचे काम एक सहकारी पहात असे. त्या कंपनीच्या प्रकरणातील एका डायरेक्टर कडील कागदपत्रे घेउन मुंबईला जाणाऱ्या आमच्या सहकाऱ्याकडे द्यायची होती.

डायरेक्टरने बंद पाकिटात घालून ठेवलेली कागदपत्रे सहाव्या मजल्यावरील ऑफिस मधून मिळाली. वाटेत पाकीट उघडून पाहता एका ठिकाणी सही-शिक्का करायचे सुटले होते. मुंबईला जाणारा माणूस सायंकाळी ६.३० च्या रेल्वेने जाणार होता. आता दुपारचे ५ वाजायला आलेले. तशात पुन्हा डायरेक्टर ला गाठले. सही शिक्का मिळविला. मुंबईला जाणारा सहकारी म्हणाला ५.३० पर्यंत पाकीट तयार असेल तर ऑफिसात आणून द्या अन्यथा स्टेशनवर द्या. शेवटच्या बोगीत भेटेन. सगळ्या धावपळीनंतर स्टेशनवर ६.२८ ला पोचलो. मनात 'श्रीं'चा धावा करीत होतो. ''हे काम आज होऊ द्या. त्यावर पुढची बरीच कामे अवलंबून आहेत.''

एकाने प्लॅटफॉर्म तिकिट घ्यायला जायचे व मी प्लॅटफॉर्मवर पुढे जाऊन ट्रेन गाठायची असे ठरवून धावत निघालो.

तिसऱ्या प्लॅटफॉर्मवर पोचलो तो गार्ड हातात हिरवी झेंडी घेऊन शिट्टी फुंकण्याच्या बेतात होता. त्याला विनंती केली. ''साहेब एवढे पाकीट देई पर्यंत वेळ द्या! त्याने शिट्टी बाजूला केली. शेवटची बोगी दाखवायचे सौजन्यही त्याने दाखविले. आमच्या माणसाला हांक दिली तो झटकन पुढे आला व काम झाले.

गार्ड चे आभार मानले. त्याने शिट्टी व झेंडी वापरुन इशारा दिला व गाडी सुटली.

तिकीट काढणारा मित्र जवळ जवळ धरून चालला होता की गाडी गेली व काम झाले नाही.

पण प्रार्थनेची शक्ती त्याला काय ठाऊक? 'श्रीं'नी गार्डच्या बुद्धीला प्रेरणा देऊन माझ्यासाठी गाडी थांबविली होती.

******

## कर्ता एक सद्गुरु

इ.स. १९९७ मधील एका कंपनीच्या सेवेत असतानाचा एका भक्ताचा हा अनुभव संस्मरणीय आहे.

स्पर्धेच्या युगात टिकून राहायला आवष्यक म्हणून या कंपनीतील कांही कर्मचारी व कामगारांची कपात होणार होती. वातावरण गरम होते. प्रत्येकाला ''आपले'' कसे होईल याची चिंता होती.

मी व पत्नी सौ. शुभांगी आम्ही 'श्री' महाराजांचे दर्शनाला गेलो. समस्या थोडक्यात निवेदन केली. आपादमस्तक आम्हाला न्याहाळले व म्हणाले ''दिगंबरा चा जप सुरू ठेवा. सर्व काही ठीक होईल.''

या नंतर १५० कर्मचारी व कामगारांबरोबर मलाही एका नव्या व्यवस्थापनाकडे पाठविले गेले. कामाचे स्वरुप नवीन, पूर्वानुभव कमी पडत होता. सारख्या धास्तावलेल्या मनाने जीव मुठीत धरून एकेक दिवस पार पडत होता. 'प्रार्थना व जप' याचाच एकमेव आधार होता.

या नव्या कंपनीच्या परवाना नूतनीकरणाचे अर्ज संबधित शासकीय कार्यालयात दिले होते पण नवीन परवाना मिळाला नव्हता. मुदत संपत आली होती. साहेबांनी या कार्यालयात मला पाठवले-''आजच्या आज कसेही करून काम करून आणा''. ''अडचण आल्यास मला फोन करा'' असे सांगून पाठवले. जुन्या अर्जाची कॉपी सोबत घेउन तेथे पोचलो. संबधित अधिकारी म्हणाले '' आम्ही या पूर्वी जो परवाना दिला आहे तो दाखवा. त्यावरच मुदत वाढवून सही शिक्का करून देतो.'' मज जवळ तो जुना परवाना नव्हता. काम यशस्वी न झाले तर काय प्रसंग ओढवेल या चिंतेत 'श्रीं'ची प्रार्थना करीत बाहेरच्या बाकावर बसलो.

काही वेळाने ते अधिकारीच बाहेर आले. मला पाहून म्हणाले '' काय तुम्ही इथेच बसून आहात. तुमच्या कंपनीतून जुना परवाना आणायला गेला कां नाहीत?'' मी धीर एकवटून म्हटले '' काम पूर्ण झाल्याशिवाय परत येऊ नको असा हुकूम आहे व साहेब फोनवरही भेटत नाहीत. मी तरी काय करु?''

ते अधिकारी विचार करीत परत टेबलावर बसले. २ पुस्तके काढली मला समोर बसवले व जवळ जवळ १५-२० मिनिटे त्यांचे पुस्तक पहाणे व माझा जप व प्रार्थना एवढेच चालू होते.

एकदम पुस्तकातून वर डोके काढून ते अधिकारी म्हणाले, तुमचे नूतनी करण अर्जाचे पत्र दाखवा. ते पाहिले व हसत म्हणाले, तुम्ही अर्ज मुदतीच्या आत केल्यावर परवाना आम्ही द्यायला पाहिजे होता. जर तीन आठवड्याच्या आंत नूतन परवाना प्राप्त नाही झाला तर तुम्ही ते ''नूतनीकरण झाले'' असे समजावे. अशी नियमात तरतूद आहे. ती मी आत्ताच पाहिली. आणा तुमचा कागद. - मी पत्र तयार करून देतो. पण शिक्का देणार नाही कारण पूर्वीच्या अधिकाऱ्यानेही दिला नव्हता.

काम यशस्वी झाले ही माझी **कर्तृत्व शक्ती** असे कसे म्हणू. 'श्रीं'नी सर्व करवून घेतले. श्रेय मात्र मला मिळाले.

******

# गुरुमहिमा न कळे आगमनिगमासी

इ.स.१९७०-७१. माझा मोठा मुलगा चि. प्रमोद इंटर सायन्स झाला. त्याला एम्.बी.बी.एस्. ला प्रवेश मिळविण्यासाठी प्रयत्न सुरु होते. मुंबई. पुणे, आर्मफोर्स मेडिकल कॉलेज पुणे, सोलापूर, गुलबर्गा, बेंगलोर, सर्व ठिकाणी प्रयत्न सुरू केले. निकालाची शेवटची तारीख दोन दिवसावर आली तरी कोणत्याही कॉलेजकडून कांहीही उत्तर आले नाही. मन अतिशय उदास व अस्वस्थ झाले. श्री दत्त महाराजांचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. रात्री सोलापूर मार्गे रेल्वेने पुण्यास सकांळी पोंहोचलो. त्या वेळी महाराज शनिवार पेठेत राहात होते. त्यांचे दर्शन घेतले. ''अचानक कसे आलात'' असे महाराजांनी विचारले. मी सर्व हकीगत सांगितली. अद्याप कोणत्याच कॉलेजचे काहीच उत्तर आले नाही. मन फार उदास झाले म्हणून दर्शनाला आलो.

महाराज म्हणाले '' लगेच स्नान करुन आश्रमात श्री गुळवणी महाराजांचे दर्शन घेउन या''. त्याप्रमाणे मी आश्रमात गेलो. श्री गुळवणी महाराज नित्य कर्म आटोपून बसले होते. बरेच लोक दर्शन घेत होते. मी तेथे गेलो. मी दूर उभा होतो. महाराजांनी मला पाहिले. लगेच हाक मारली. ''अरे यशवंता केंव्हा आलास? ये'' त्यांचेजवळ गेलो जवळच बसलो. थोड्या वेळाने सर्वांचे दर्शन झाले. लगेच मला म्हणाले ''काळजी करतोस? कांही काळजी करु नको.'' मी काही सांगण्या-पूर्वीच त्यांचे हे उद्गार ऐकून समाधान झाले. माझ्या मनात असा विचार आला. या एकाच प्रश्नाची नाही तर आपली सर्व काळजी दूर करण्यास महाराज आहेत.

या प्रमाणे विचार आल्यावर मी काहीच विचारले नाही. त्यांनी प्रसाद दिला पुन्हा दर्शन घेतले, देव दर्शन घेतले व घरी आलो.

महाराजांनी विचारले ''दर्शन झाले का?'' मी होय म्हणून सर्व हकीगत सांगितली व माझ्या मनातील विचारही सांगितला. त्यावर महाराज फक्त हसले. त्यांची परवानगी घेऊन संध्याकाळी निघालो.

वैरागला आल्यावर सौ. सुमनने सांगितले की गुलबर्गा कॉलेजचे पत्र आले आहे. ''ताबडतोब पैसे भरा व प्रवेश घ्या.'' आनंद झाला. असा विचार मनात आला की श्री दत्त महाराजांनाही हे सांगता आले असते पण श्री गुळवणी महाराजांकडून आशीर्वाद मिळावेत ही त्यांची इच्छा व स्वतःचे **अमानित्व.**

## श्री महाराजांचेअंतर्यामित्व व भक्तवात्सल्य

१९९० साली माघ वद्य षष्ठी ते एकादशी म्हणजे १५ ते २१ फेब्रु. १९९०, या कालावधीत प.पू. 'श्री'महाराजांचा भागवत सप्ताह मलकापूरला ठरला. निमंत्रण पत्रिका छापून वाटल्या. आरंभीच्या ४ दिवस आधी पू. श्री. अशोकराव महाराज निरोप घेऊन आले ''काही अडचणी मुळे 'श्री' महाराज सप्ताहाला येऊ शकत नाहीत. पुढे केव्हातरी ठरवता येईल.

सर्वजण खूपच निराश झालो.

शेवटी प.पू. 'श्री' महाराजांना समक्ष भेटून प्रार्थना करुन पहावी म्हणून घिर्णीकर बंधू पुण्याला पोचलो. तेथून 'श्री' महाराज नाशीकला ''संत निवृत्तिनाथ'' या ग्रंथाचे प्रकाशनार्थ गेल्याचे कळले. नाशिक गाठले व प्रकाशन समारंभानंतर 'श्रीं'ना प्रार्थना केली.

'श्रीं'नी स्वीकृती दिली. प्रथम ठरलेला -- रद्द झालेला सप्ताह पुन्हा पक्का ठरला ह्या आनंदात 'श्री' ना वंदन करून निरोप घेतला.

नंतर श्री रघुनाथरावांचे कडून जे कळले ते असे की मलकापूरची मंडळी 'श्रीं'चे पर्यंत पोहोचण्या पूर्वीच 'श्रीं' नी मलकापूरला जाण्याचा निर्णय घेउन रेल्वेचे आरक्षणही करायला लावले होते. फक्त पूर्वीचे प्रथम श्रेणी चे आरक्षण रद्द केले होते त्या ऐवजी श्री टायर मधे जागा मिळाल्या होत्या. 'श्रीं'नी आमच्या भावना अंतर्ज्ञानाने आधीच जाणल्या होत्या व भक्तांना निराश करायचे नाही म्हणून गैरसोय व त्रास पत्करुनही सप्ताहाला येण्याचा निर्णय आधीच घेतला होता.

******

## हंसकल्पोक्त विधीने सूर्योपासना

या भक्तांचे घरी सूर्योपासना पूर्वापार चालत आलेली आहे. वडील श्रीधरपंत त्या नुसार ''हंस-कल्पोक्त'' विधीने ''अर्घ्यप्रदान'' हे व्रत करीत असत. २४ वर्षे पर्यंत हे व्रत त्यांनी निष्ठेने सांभाळले. प्रवासाला जातानाही सूर्य यंत्र व इतर पूजा साहित्य बरोबर नेत व सोवळे नेसून दर रोज 'अर्घ्यप्रदान'' करीत. त्यांचे इच्छे नुसार १९९० नंतर मी हे व्रत त्यांचे मार्गदर्शनानुसार करु लागलो. त्याच वर्षी श्रीमद् भागवत सप्ताहानिमित्त प.पू.श्री दत्तमहाराज आमचे

घरी आले होते. मी 'श्री' महाराजांना या व्रताविषयी सांगितले व माझी हस्तलिखित पोथी दाखविली. 'श्री' महाराजांनी त्यात एकदोन ठिकाणी दुरुस्ती सांगितली व ते नियमित करण्यास सांगितले.

'श्री' महाराजांना मी विचारले-''प्रवासात, बाहेरगावी असताना सर्व नियम पाळून हे व्रत करणे आजकालच्या परिस्थितीमुळे जमेल असे वाटत नाही. अशावळी काय करावे.''

'श्री' महाराजांनी यावर उपाय सांगितला तो असा-

''घरी असताना नेहमीच्या पध्दतीने करा. मात्र प्रवासात असाल त्या वेळी स्नान संध्या झाल्यानंतर केवळ मानसोपचाराने अर्घ्यप्रदान केले तरी चालते.''

असे अचूक मार्गदर्शन मिळाल्याने हे कठीण वाटणारे व्रतही नियमित पणे सुरु ठेवता आले.

******

## अहो! आम्ही वाफ घेतली बर का!

'श्रीं'च्या आजारपणाचे काळात रेणुका निवासात डॉ. तळवलकर येत असत. डॉक्टरांची वेळ झाली की **'श्री'** उठून बसत . त्या निमित्त उपस्थित भक्तांना दर्शनही मिळत असे. 'श्री' महाराज या डॉक्टरांची वाट पहात असत. एकदा 'श्री' डॉक्टरांना म्हणाले ''अहो! आठवड्यातून १-२ वेळा आल तरी चालेल. आपला वेळ वाया जातो.''

डॉक्टर म्हणाले ''महाराज मी माझ्या करता येतो.'' या उत्तराने 'श्रीं'ना समाधान वाटले.

एकदा सर्दी बरीच झाली होती. बराच उपद्रव होतो आहे असे पाहून डॉक्टरांनी 'श्रीं'ना वाफ घ्यायला सांगितले.

त्याप्रमाणे सेवकाने गरम पाणी पातेल्यात आणले. पण वाफ घेणे राहूच द्या! त्याला रागावल्यासारखे करून म्हणाले ''एवढे गरम पाणी! सांडले तर काय होईल? कशाला आणले? आता वाफ घेतली आहे- पुरे झाले-आता घेउन जा.''

सेवकाला पूर्वानुभवाने माहीत होते की 'श्रीं'ना वाफ घेतल्याने उलट त्रास वाढतो. सर्दी कमी व्हायची ती वाढते. त्यामुळे 'श्रीं'नी नको म्हटल्यांवर त्याचे ही समाधान झाले.

मात्र-दुसऱ्यादिवशी डॉक्टरांना आल्या आल्या, कुणी काही बोलायच्या आत घाईने, 'श्रीं'नी सांगितले. ''अहो तुम्ही सांगितल्या प्रमाणे आम्ही वाफघेतली बर का! यांनी आणून दिले गरम पाणी.''

म्हणजे डॉक्टरांचे ही समाधान-सेवकाचेही समाधान व आपले इच्छे विरुध्द करायचा उपचार ही टाळला.

याला व्यवहारातले कौशल्य म्हणता येईल पण कोणालाही न दुखवता स्थिती सांभाळून घेण्याचे हे **'वात्सल्यच'** खरे!

******

## आता खिडक्या बंद करा

श्री भाउसाहेब वाकडे हे 'श्रीं'चे अत्यंत प्रेमळ भक्त. श्रीवासुदेव निवासात दीर्घकाळ 'विश्वस्तही' होते. केंव्हा केंव्हा रेणुका निवासात ('श्री'ची प्रकृती ठीक नव्हती त्या काळात) भेटायला येत असत.

एकदा त्यांच्या लक्षात आले की 'श्री' महाराजांच्या खोलीच्या खिडक्या व दार बंद आहेत.

ते 'श्रीं' ना म्हणाले-'सर्व खिडक्या बंद असल्याने हवा- उजेड येत नाही- त्या मुळे आपणाला बरे वाटत नाही- त्रास होतो. हवा उजेड मोकळा खेळला पाहिजे!''

'श्रीं' नी लगेच सेवकाला आज्ञा केली ''खरच'' म्हणाले सगळ्या खिडक्या बंद केल्यावर हवा-उजेड कसा येणार! त्यामुळेच आम्हाला बरे वाटत नाही.'' जा, या सर्व खिडक्या उघडा. बाहेरुन जाऊन पहा-कांही अडसर वगैरे लावला असेल.''

त्यांच्या आज्ञे नुसार केले. श्री भाऊसाहेबांनाही समाधान वाटले थोडा वेळ बसून ते परत गेले. त्यानंतर लगेच 'श्रीं' नी सेवकाला सांगितले 'अहो- खिडक्या व दार बंद करा! आता ते गेलेत्''

खरे तर 'श्री' महाराजांना आवडते म्हणूनच त्या खिडक्या व दार बंद असत! छोट्याशा कृतीतून त्यांचेही मन सांभाळले-न रागावता! ('श्रीं'च्या जागी आपण असतो तर?)

## तू माझा सांगाति

'श्री' महाराजांनी १९९९ मध्ये सगुण रुप अदृष्य केले. त्या नंतर असे वाटे की आता आपल्या पाठीशी कोणी नाही. कसे होईल अशी चिंता वाटायची. अशाच मनस्थितीत एकदा शेतातील औदुंबर वृक्षाखाली बसलो होतो. थोड्या वेळाने सायकलने घरी निघालो. कांही अंतर गेल्यावर अचानक डोक्यावर गुं-गूं असा मोठा आवाज करीत भला मोठा आग्या मोहोळातील माशांचा थवा घोंगावताना दिसला. मनात फार भ्यालो. आता या आपल्याला चावणार! आपले कांही खरे नाही! अशी अवस्था मनाची झाली व अचानक मुखातून 'श्री' महाराजांचे स्मरण व प्रार्थना मोठ्याने बाहेर पडली. वाचवा! वाचवा ! म्हणून 'श्रीं' ना आळवू लागलो. आणि क्षणभरात चित्र पालटले. वरचा थवा कोठे अदृष्य झाला कळलेच नाही.

मनाची भ्रांती फिटली. 'श्री'महाराज आपल्या जवळच सतत आहेत फक्त त्यांचे स्मरण आपण करीत रहावे.

******

## ना मांगे मोती मिले । मांगे मिले न भीख ।

एका भक्ताला एका सुहृदाने सुचविले की आपल्या सद्गुरुंची जेंव्हा भेट होईल तेव्हा त्यांच्या 'श्री'चरणावर डोके ठेवावे व त्यांचा कृपा हस्त आपल्या अंगावर फिरविण्याची त्यांना विनंती करावी.

पुढे श्रीवासुदेव निवासात दर्शनाला जाणे झाले. योगायोगाने 'श्री'महाराज एकटेच होते. मी प्रार्थना केली ''महाराज आपल्या 'श्री' चरणांवर डोके ठेवायचे आहे.''

माझ्या कडे पाहून किंचित रोषाने 'श्री' म्हणाले ''पायावर डोके ठेवल्याने काम होते काय? '' त्या नंतर लांबूनच दर्शन घेऊन परतलो. रोषाचे कारण लक्षात येत नव्हते.

काही कालानंतर असेच एका सधन गुरुभक्ताला 'श्रीं' चे दर्शन घेताना बघितले. हार,फुले,पेढे, अत्तर इत्यादि व्यवस्थित आणले होते ते 'श्रीं' नी

स्वीकारले. मला वाटले ''आपण रिक्त हस्ताने आलो. निदान थोडे अत्तर तरी लावता आले असते तर?''

त्या गुरुबंधुची पूजा झाली व तो परतू लागला. मी त्याच्या कडून उर्वरित अत्तर मागून घेतले. पुढे रांगेत माझा नंबर लागला. 'श्रीं' ना विचारले ''महाराज! अत्तर लावू का?''

'श्रीं' च्या रागावण्याचे कारणाचा फार विचार केल्यानंतर लक्षात आले-

दुसऱ्याची अक्कल व दुसऱ्याची नक्कल भक्ती मार्गात उपयोगाची नाही. स्वतःच्या कुवतीनुसार अर्पण केलेले पत्र, पुष्पम् सुध्दा त्यांना अत्यंत प्रिय आहे.

मी मनःपूर्वक प्रार्थना करुन प्रेमाने अर्पण केलेली आधी स्वतः वापरलेलीही ''सुवर्ण मुद्रिका'' 'श्रीं'नी स्वीकारली व तसा त्याबद्दल अहंकार मला न व्हावा म्हणून सावधही केले.

******

## आज एकादशी आहे

'श्री' महाराजांचे प्रकृती स्वास्थ्यासाठी डॉक्टरांनी दिलेल्या रोज घ्यायच्या सुमारे १०-१२ गोळ्या विविध प्रकारच्या व ठराविक वेळांनी घ्यायच्या अशा होत्या. प्रसाद,विद्याधर आदि मुले डॉक्टरांच्या सूचने प्रमाणे गोळ्या देण्याचे काम करीत होते. 'श्रीं' ना मुळात हे सगळे आवडत नसे. पण सर्वांच्या समाधाना करता घेत असत. त्यातूनही अति आवश्यक अशी एक गोळी रोज सकाळी घेण्याची चुकवू नये अशी डॉक्टरांची इच्छा असे. एकादशीला कोणतेही औषध गोळ्या घ्यायच्या नाहीत असा 'श्रीं' चा कटाक्ष असे. तरीपण डॉक्टरांना नाराज करायचे नाही म्हणून एकादशीलाही ती पहिली गोळी घेईपर्यंत एकादशी कधी ते स्मरणात नसल्यासारखे भासवीत. नंतर मात्र मुलांना विचारीत. ''काय एकादशी कधी आहे?'' **''आजच आहे''**असे सांगितले की लगेच आदेश देत ''आता आम्हाला कोणतेही औषध देउ नका. आज एकादशी आहे.''

******

## उंच नीच कांही नेणे

लहान लहान खेड्यापाड्यामधे राहणारे सामान्य परिस्थितीचे असे अनेक भक्त येत असत. रेणुका निवासात आल्यावर ही मंडळी लाजून,बुजून, संकोचून जात. '' 'श्रीं' चे दर्शन दुरुन घ्यावे, त्यांना बोलण्याने त्रास होईल म्हणून लवकर आटपावे इत्यादि प्रेमाच्या सूचना सेवक वर्ग सर्वच भक्तांना देत असत. पण भक्तवत्सल 'श्रीं' ना ह्या स्पेशल मंडळीचा जो प्रेमा वाटे त्या पुढे कुठलीच नियमावली टिकत नसे.

पायावर डोके ठेवून ('श्री'. सोवळ्यात असले तरी ) वंदन करू देत असत, लहानसा साधा हार जो प्रसंगी डोक्यातून खाली उतरणार नाही इतका छोटा असे तरी प्रेमाने घालून घेत. सगळ्यांची विचारपूस नावानिशी होई. प्रसाद देऊन समाधान करुन पाठवीत असत.

उंच नीच काही । नेणे साधुसंत ॥
जेथे भाव भक्ती तेथे भगवंत ॥

******

## फिक्स डिपॉझिट मोडा

एका भक्त भगिनींना प.पू.ताई महाराजांनी विचारले ''काय हो, काहीतरी ठेव पावती (फिक्स डिपॉझिट ची ) केली आहे नां, ४०-५० हजाराची? '' तर हो केली आहे म्हणाल्या.

प.पू.श्री. ताई महाराज त्यांना म्हणाल्या ''ती मोडा आणि सुनांना दागिने करा.''

तर त्या म्हणाल्या ''सुनांना कशाला दागिने करू? मला चांगलं वर्षाच व्याज येत आहे. त्यातूनच मला कुठे कुठे हिंडता येत''.

मग त्यावर मात्र प.पू. श्री. ताई महाराज कांही बोलल्या नाहीत.

पुढे ३-४ महिन्यांनी त्यांचे मिस्टर आजारी पडले. दवाखान्यात ठेवावे लागले आणि बर वाटेपर्यंत च्या उपचारांचा बरोबर ५० हजार रूपये खर्च आला.

नंतर जालन्याला येऊन हे सर्व निवेदन केलं. ५० हजार खर्च झाला. वगैरे सर्व सांगितलं.

त्यावर प.पू. श्री. ताईमहाराज म्हणाल्या ''म्हणुनच मी त्या वेळेला तुम्हाला आधी सांगितले होतं. तुमचा खर्च होणार होता. म्हणून मी म्हटल होते. सुनांना दागिने करा आणि त्यांना देऊन टाका''. तुमचाही खर्च झाला असता. त्यांचही आजारपण वाचल असत.(म्हणजे दवाखान्यात जायची वेळच आली नसती.)

आता हा जो कार्य-कारण संबंध आहे-''जवळचा पैसा ''सुनांना दागिने करण्यासाठी खर्च केला''-तर ''पती देवांचे आजारपण टळेल '' हा आमच्या बुध्दीला कसा कळणार? निदान त्या कांही सांगतात त्या प्रमाणे ''सावधान '' राहून तशी कृती केली असती तर?

******

## जाल तर आजारी पडाल

एका संन्यासी माहात्म्याने एका साधकाला त्या साधकाचा एकंदर उत्साह-तरूण अवस्था-सेवा भाव हे सर्व पाहून असे विचारले की, ''कांहो आम्ही ''चारधाम '' यात्रेला निघालो आहे तर तुम्ही बरोबर याल का?'' त्यावर ''यायला आवडेल '' असे उत्तर दिले. हा संवाद श्री वासुदेव निवासात घडला. तेंव्हा 'श्री'. घरी होते.

काही वेळातच 'श्रीं' चा निरोप एकाने येऊन या साधकाला सांगितला - ''त्याला म्हणावे-त्यांच्या बरोबर यात्रेला गेलास तर आजारी पडशील.''

दुसऱ्या दिवशी 'श्रीं' च्या दर्शनाला हा साधक गेला तेंव्हा 'श्रीं' नी विचारले ''आपण काय त्यांच्या सोबत जात आहात? साधक म्हणाला ''आपणाला विचारून ठरवायचे''

'श्री'. म्हणाले-''जायच असेल तर जा-पण आजारी पडाल.''

इतक स्पष्ट मार्गदर्शनही केंव्हा केंव्हा होत असे.

******

## बिल्डरच निधन पावला

आम्ही त्या काळात नगर रोडला भाड्याच्या घरात राहात होतो. लहान जागा, फार अडचणीची अशी होती. एका रात्री मोठ्या मुलीच्या नजर चुकीने तिचे पाऊल धाकट्या मुलीच्या पोटावर पडले. फार त्रास झाला. तात्पुरती व्यवस्था एका साधक बंधूंनी करून दिली. त्यांच्या फ्लॅटमधून दोन खोल्या आम्हाला दिल्या.

त्यानंतर आम्हा उभयतांना 'श्रीं'नी ९२ च्या गुरु पौर्णिमेला अनुग्रह-दीक्षा दिली. तो दिवस योगायोगाने माझा वाढदिवसच होता. ''दीक्षा म्हणजे साधक जीवाचा पुनर्जन्मच असतो'' हे ''अशा'' अर्थानेही खरे झाले. आमच्या राहत्या घराजवळ इमारतीचे बांधकाम सुरू होते. तेथे आम्हाला फ्लॅट बुक करायला मिळाला. हाऊसिंग लोन काढून त्या बिल्डरचे देणे भागविले. पूर्ण पैसे दिले गेले आणि अचानक त्या बिल्डरचे निधन झाले. बांधकाम ठप्प झाले. ओढाताण सुरू झाली.

'श्रीं' च्या कानावर ही अडचण घातली. त्यांनी एक मंत्र सांगून २१ दिवस रोज ५ माळा या प्रमाणे जप करायला सांगितले व लवकरच घराचा ताबा मिळेल असा आशीर्वाद दिला.

बरोबर २१ व्या दिवशी इमारतीचे थांबलेले बांधकाम पुढे सुरू झाले व थोड्याच दिवसात स्वत:चे घर मिळाले.

'श्रीं' साठी ही अतिसामान्य गोष्ट झाली. पण साधकाचा साधनेतला मार्ग प्रशस्त करण्यासाठी त्याच्या लहानसहान प्रापंचिक असणाऱ्या समस्याही सहजतेने दूर करतात. मात्र आम्ही त्या प्रपंचात जास्त न रमता आपल्या मुख्य ध्येयाकडे साधनेकडे अधिक लक्ष दिलेले त्यांना आवडते.

******

## पेट्रोल विरहित प्रवास

एकदा ऑफिसच्या कामानिमित्त स्वत:च्या वाहनाने सांगलीला जाणे झाले. कामे उरकून तसेच पुढे जाऊन श्रीक्षेत्र नृसिंहवाडी व अमरापूर (औरवाड) येथे जाऊन 'श्री'चे दर्शन घेउन परतीचा प्रवास सुरू झाला. खंबाटकी घाटा

जवळ जेमतेम पोचलो असू की गाडीतील पेट्रोल संपले. इंजिन बंद पडले. पुढचा रस्ता उताराचा आहे त्यावरून तसेच हळू हळू घाट पार केला. पुढे पेट्रोलपंप शिरवळ म्हणजे २५-३० कि.मि. वर आहे.

'श्रीं'ची मनोभावे प्रार्थना करून स्टार्टर दाबले तो गाडी सुरू झाली ती नीट शिरवळच्या पंपावरच बंद पडली.

आमची खात्री आहे की हा प्रवास, टाकीत थेंबभर ही पेट्रोल नसताना केवळ 'श्रीं'च्या संकल्पाने झाला.

पुण्यात प्रथम श्रीवासुदेव निवासला जाउन 'श्रीं'चे दर्शन घेतले व सगळे सांगितले.

''बर!'' एवढीच प्रतिक्रिया 'श्रीं'ची होती. जणू कांही त्यांचा कांहीच संबंध नाही.

******

## अतिवृष्टीचे संकट

२६ जुलै २००५ हा मुंबई करांना अतिवृष्टीचा तडाखा देणारा अविस्मरणीय प्रसंग असा आहे.

मी ही ह्या संकटात सापडलो.

दुपारी आमच्या ऑफिसच्या तळ मजल्यात पाणी शिरले. पाहता पाहता गुडघाभर पाणी झाले.

स्टाफ पैकी आम्ही दोघे पाण्यातूनच वाट काढीत पायी निघालो. रस्तेही पाण्याखाली गेलेले. वाहने बंद पडून जागोजागी उभी होती. चालतच अंधेरी स्टेशन गाठले. तेथेही सर्व बंद होते. हळू हळू चालत जुहू गल्लीचा रस्ता धरला. कोपऱ्यावरील दुकानात दूध मिळत होते. ती पिशवी एका हातात व छत्री दुसऱ्या हातात असे कसरत करीत पुढे निघालो. बरीच मंडळी आमच्या प्रमाणेच जुहू चौपाटीच्या दिशेने चालत जात होती.

आमच्या घराच्या गल्लीत पाणी जास्त दिसले म्हणून दुसऱ्या गल्लीत शिरलो. तेथे कमरेपर्यंत पाणी होते. त्यातच हळू हळू अंधार पडला व रस्ते उमजेनासे झाले. एका वळणावर वळलो तो पाणी गळ्यापर्यंत आले. पाण्याचा

जोर वाढतच होता व पाऊसही सुरुच होता. हातातली दुधाची पिशवी पाण्यात सोडून दिली व आसपास भिंत -झाड कांहीतरी आधार चाचपडून शोधू लागलो. तेथे एक काटेरी झाड हाताला लागले व आधार मिळण्याची आशा मावळली.

इतक्यात वरून आवाज आला ''उपर आ जाओ हमारे घर में'' जीव एकवटून कंपाऊंड वॉल वरून उडी मारून आत गेलो. तेथे खालच्या मजल्यात पाणी होतेच. कसा बसा वरचा मजला गाठला. त्या सद्गृहस्थानी आम्हाला लगेच आत घेतले. टॉवेल-कोरडे कपडे दिले. चहा दिला. झटपट-भात आमटी करवून जेवायला दिले. पुण्याला आमच्या सुरक्षिततेे बद्दल कळवायला फोन केला तेव्हा रात्री १०.४० झाले होते. आमचे बोलणे झाले व फोन बंद पडला.

रात्रभर तेथेच निवारा मिळाला. जप व 'श्रीं'चे स्मरण करीत रात्र जागून काढली . पहाटे उजाडल्यावर पुन्हा चहा मिळाला. सावकाश-सांभाळून जा असे त्यांनी प्रेमाने सांगितले.मी कुतुहलवश त्यांना विचारले की तुम्ही आम्हाला ''वर या'' असे कसे काय सांगितले. तर ते म्हणाले अहो आम्हाला खालून ''बचाव! बचाव-! वाचवा! वाचवा! असा ओरडा ऐकू आला.'' खरे तर आम्ही मुळीच आवाज दिला नव्हता. फक्त खिशातील रेल्वेपासच्या पाकिटात 'श्री'महाराज तस्वीर रुपाने विसावलेले होते. त्यांनीच सर्व किमया केली.

'स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान मेऽस्ति परावरागती:॥'

*****

## व्ही. आर. एस्. घ्यावी कां?

दुपारी एक भक्त अचानक आश्रमात आले. 'श्रीं' चे दर्शन झाले. त्यांनी एकदम विचारले ''महाराज! आमच्या कंपनीने व्ही.आर.एस.(स्वेच्छा सेवा निवृत्ती योजना) जाहीर केली आहे. तर मी घेऊ का नको?

दुसऱ्याच क्षणी 'श्रीं' नी उत्तर दिले.''सगळीच्या सगळी रक्कम आरंभालाच देणार असतील तर घ्या म्हणाले ''पांच वर्षात देणार असतील तर नको म्हणून सांगा.''

प्रपंचातील - व्यवहार निर्णयाचे किती बिनचूक मार्गदर्शन !

*****

## भजनसेवा करुन घेतली

श्रीदत्त महाराजांचा अनुग्रह ७४ च्या सप्टेंबर मधे झाला. तेंव्हा पासून वारंवार 'श्रीं'चे दर्शन व्हावे असे वाटे. १-२ वेळा योगही आला. त्या नंतर एकदा दादरला एके ठिकाणी 'श्रीं' चे येणे होणार असल्याचे यजमानांकडून कळले. तेथे गेलो तेंव्हा सौ. शिरीष जोशी यांच्या गीत गायनाचा कार्यक्रम 'श्रीं' च्या सेवेत सुरू होता. मी पोचलो तेंव्हा भैरवीचे स्वर ऐकू आले. लवकरच गायन संपले. मला 'श्रीं' च्या समोर बसायला जागा मिळाली.

एका परिचिताने मला भजन म्हणण्यास सुचविले. पण संगीताच्या कार्यक्रमाची नुकतीच भैरवीने सांगता झाली आहे. 'श्रीं' च्या समोर आपण काय म्हणू शकणार? अशी संभ्रमावस्था झाली. 'श्री' महाराजांचा ''सद्गुरु वाचूनी सापडे ना सोय '' हा अभंग माझ्या मनातील भाव दर्शविणारा असा, त्या वेळी म्हणायची अंतरी इच्छा होती. पण 'श्रीं' च्या समोर ही संत वाणी गाण्याचा आपला अधिकार आहे कां? अशीही मनात शंका आली. तथापि 'श्रीं' नी स्वतःच अनुमोदन दिल्यामुळे थोडा संकोच कमी झाला. कशीबशी सुरवात केली. 'श्रीं'नी टाळी ने उत्तम ताल धरला व आनंदाने श्रवणाचा लाभ घेतला.

माझी गायन कलेतील प्रगल्भता नसताना केवळ एक बालक पित्याला आनंद देत कांही म्हणून दाखवते तितकाच भाव माझा होता. तरी सेवा गोड मानून घेतली. त्या नंतर आणखीही एक पद म्हणून घेतले. 'श्री' नंतर म्हणाले तुमची गाण्याची ही भजनी पध्दत आहे '' मी **होय** म्हणून '' लहानपणा पासून भजनाची आवड असल्याचे सांगितले. '' मग पुढे कां नाही चालू ठेवले?'' या 'श्रीं' च्या शब्दांना मात्र मज आळशाजवळ उत्तर नव्हते व नाही.

******

## अनन्यता

आपल्या गुरुमहाराजांबद्दल **'अनन्य'** भाव असला म्हणजे साधना चांगली होते. केंव्हातरी ह्या अनन्यतेची परीक्षा श्रीगुरु घेतात. एकाला स्वप्नातील दृष्यात कांही परिचित व कांही अपरिचीत स्थान दिसले व त्या घरात एका महात्म्याचे

वास्तव्य आहे असे जाणवले. ते महाराज आजारी असावेत. सभोवताली त्यांचे भक्त सेवेत मग्न होते. अचानक ते दृष्य बदलले व एका एकांत स्थानात फक्त मी व ते महाराज असावेत असे जाणवले. त्यांच्याशी कांही संभाषण झाले. त्यांनी ''दुसऱ्या दिवशी सकाळी सहाला ये, दीक्षा देईन'' असे सुचविले मात्र. माझा नूर एकदम पालटला व स्पष्ट स्वरात नकार देऊन तेथून जाऊ लागलो. तेवढ्यात स्वप्न संपले.

या नंतर जेंव्हा प्रत्यक्ष साधनेला बसलो तेंव्हा काही अपूर्व अनुभव येऊन उत्तम साधन झाले. परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे ते जणू प्रमाणपत्रच होते !

******

## याला काय उत्तर ?

या जन्मात कोणताही लौकिक प्रयत्न घडला नाही की जेणे करुन श्रीगुरु प्राप्ती मला होईल. असे असताना 'श्री' महाराजांनी त्यांचे विषयी माझ्या मनात श्रध्दा व भेटीची ओढ निर्माण केली. कित्येक लोक गुरुप्राप्तीसाठी वर्षोनुवर्षे धडपड करताना दिसतात. पण कदाचितच यश मिळते. याचे उत्तर व्यावहारिक पध्दतीने देणे अशक्य आहे.

माझी एक लहानशी पण स्वत:ची जागा मला विकायची होती. जागा जेथे होती त्या भागात किमती खूप वाढल्या होत्या. त्याचा लाभ घेता येईल असे ठरवले होते. विक्री व्यवहारा करितां मध्यस्थाची मदत आताच्या काळात आवश्यकच असते. तसे एका व्यक्तीला मध्यस्थ नेमले. त्याने खरेदीदारांना जागा दाखवून प्रयत्न तर केला. पण काय योग होता न कळे. बऱ्यापैकी किंमत देणारे एक ग्राहक आले असताना या मध्यस्थानेच माझ्या बद्दल खोटी माहिती पसरवून त्या ग्राहकाचे मन कलुषित केले. जवळ जवळ निश्चित झालेला व्यवहार ऐन वेळी फिसकटला. काय करावे कळेना. स्वप्नात 'श्री' महाराजांचे दर्शन झाले. म्हणाले, ''काळजी करु नका. दुसरे ग्राहक उद्या येतील. त्या प्रमाणे खरोखरच पहिल्यापेक्षाही अधिक किंमत देऊन दुसऱ्याने दुसऱ्याच दिवशी जागा विकत घेतली व माझी समस्या सुटली. ही घटना मी 'श्रीं' चा अनुग्रह घेण्या पूर्वीची आहे.

त्याच सुमारास एकदा 'श्रीं' च्या दर्शनाला जाणे झाले. माझा व्यवसाय वाढवण्यासाठी मला 'शेअर ब्रोकर' या कार्य क्षेत्रात प्रवेश मिळावा असे वाटत होते. परंतु माझ्या सारखे पुष्कळ लोक तशा व्यवसायाचे लायसेन्स मिळविणेसाठी मोठमोठ्या रकमा देण्याची तयारी दर्शवून ही यशस्वी होत नाहीत हे मी पहात होतो. हा विचार मनात असतानाच 'श्रीं' च्या दर्शनाचा योग आला होता. 'श्रीं' ना प्रकटपणे मी कांही सांगितले अथवा विचारले नाही. तथापि 'श्रीं'च्या कृपाशक्तीला अशी कांही अपेक्षाही नसावी असे अनुभवाला आले. परत आल्यावर असे झाले की कांहीही खर्च न करावा लागता एका गुजराथी ब्रोकरने मला सब-ब्रोकर करून घेतले.

माझ्याकडे असलेला उपयुक्त गुण म्हणजे गुजराथी भाषा मला चांगली बोलता येते. व्यापारी वर्तुळात हा ही एक महत्वाचा फायदा मला मिळाला. पण हे काही व्यवसायात प्रवेश होण्याला पुरेसे कारण निश्चितच नाही. 'श्रीं' नी काय किमया केली हे एक अतर्क्य गूढ आहे. 'श्रीं' नी माझ्या साठी त्यांच्या शक्तीला आज्ञा देऊन कोणाचे कसे मत परिवर्तन केले न कळे. पण खरा प्रश्न हा की माझ्यावर ही अकारण व न मागता कृपा कां केली याला उत्तर काय?

येथे एकच शास्त्रशुद्ध कारण आहे जे या प्रश्नाचे उत्तर आहे. ते म्हणजे **''गुरु-शिष्य''**, **''देव-भक्त''** ही नाती अनंत जन्मांची असतात. त्यांना पूर्ण ज्ञानामुळे आपला भक्त-शिष्य जिथे असेल तिथे ओळखू येतो व योग्य वेळी त्याच्या कल्याणासाठी ते कृपाळू पणे स्वतःच पुढे होऊन न मागताच त्याचा ''योग-क्षेम '' चालवितात. भगवद्गीता उपदेशात भगवंताने ही ग्वाही स्वतःच दिली आहे. भगवान सांगतात-

बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप ॥५॥

हे अर्जुना! तुझे आणि माझे अनेक जन्म होऊन गेलेत. त्या सर्वांचे स्मरण तुला नाही परंतु त्यांचे संपूर्ण ज्ञान मला आहे.

******

## व्यवसायातील श्री महाराजांचे कृपासान्निध्य -

आर्थिक गुंतवणुक करुन जास्तीत जास्त लाभ पदरात पडावा, कर आकारणीत सवलत मिळावी अशा अनेक परस्पर विरोधी समस्यांचा समन्वय करण्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन लागते. असे मार्गदर्शन देण्याचा थोडाफार अभ्यास माझा आहे व तोच व्यवसाय ही आहे. या व्यवसायात ज्या गुंतवणूकदारांशी संबंध येतो त्यांच्याशी होणारे संभाषण इ. '' **करकरीत व्यवहार** '' याच स्वरुपाचे असते. ह्या संबंधातून आपल्याला ''भक्ती-उपासना'' या मार्गातील कांही लाभ होईल याची सुतराम शक्यता नसते. त्यामुळे अशीलांबरोबरचे संभाषण पूर्णतः व्यावहारिक पातळीवर असते.

अशा स्थितीत अनवधानाने व व्यावसायिक दृष्टीकोनामुळे माझी हानी होऊ नये याची 'श्रीं' ना किती काळजी आहे याचे हे प्रत्यक्ष घडलेले उदाहरण आहे.

एक दिवशी ऑफिसमधे मला एका गृहस्थांचा ऑफिस मधे फोन आला व त्यांनी माझ्या गुंतवणुक व्यवसायाबद्दल माहिती विचारून दुसऱ्या दिवशीची भेटीची वेळ ठरविली.

त्याच दिवशी रात्री 'श्री'महाराज स्वप्नात दर्शन देऊन सांगू लागले की उद्या अमुक नावाच्या व्यक्तीकडे तुझे व्यावसायिक कामासाठी जाणे होणार आहे. ती व्यक्ती श्री. सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या भक्त परंपरेतील आहे.''

दुसऱ्या दिवशी भेटीमध्ये प्रथम त्यांना आवश्यक ती व्यावसायिक माहिती दिल्यावर मी विचारले, ''आपण श्री दत्त संप्रदायातील ''भक्तीमार्गात आहात कां? '' त्यांना खूपच आश्चर्य वाटले. मी माझ्या स्वप्नातील हकीकत त्यांना सांगितली. त्या नंतर कळले की गोवा प्रांतात ''श्री दत्त स्वरुप साठे महाराज ''या नावाचे एक सत्पुरुष सद्गुरु श्री. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या शिष्य परंपरेत होऊन गेले त्यांचेच आम्ही चिरंजीव आहोत. असे ह्या गृहस्थांनी सांगितले. ज्या अर्थी 'श्री' महाराजांनी हा परिचय घडवून आणला आहे त्या अर्थी ह्या परिचयातून माझा कांहीतरी उत्कर्ष साधणार आहे अशी माझी श्रद्धा आहे.

*****

## शाळेला सुट्टी आहे

श्रींचे लक्ष सर्व भक्तांकडे असायचे. आत्यंतिक दया आणि करुणा हा सदगुरुंचा स्थायी भाव असतो. मुंबईच्या एका भक्ताची लहान लहान मुले किंग जॉर्ज शाळेत शिकत होती. त्या मुलांना नेणाऱ्या स्कूल बस साठी त्यांना सकाळी लवकर उठवून तयार करण्याचे काम या भक्ताकडे होते.

पावसाळ्यातल्या एका शनिवारी सकाळी यांना गाढ झोप लागलेली होती. शाळेची वेळ झाली म्हणून त्यांच्या वडीलांनी त्यांना हलवून जागे केले व मुलांची शाळेची बस येण्याची वेळ झाली आहे याची जाणीव करून देऊ लागले.यांनी वडीलांना सांगितले-

''आज शाळेला सुट्टी आहे.''

व नंतर पुन्हा निद्राधीन झाले.

वास्तविक त्या दिवशी सुट्टी नव्हती. इतर मुलांना घेऊन स्कूल बस गेली व त्या नंतर थोडक्याच अवधीत इतका जोराचा पाऊस झाला की रस्ते जलमय झाले रहदारी हळू हळू बंद पडली.

पावसाचा रागरंग बघून मुलांना आणायला पालक शाळेत गेले. पण वाहतूक बंद पडली व शिक्षक- मुले व पालक सगळेच शाळेत अडकून पडले. यांची मुले गेली नाहीत म्हणून त्या अडचणीत सापडली नाहीत. आरामात घरी राहिली.

******

## मेकॅनिक आले

'श्री'महाराजांच्यावर आत्यंतिक निष्ठा असलेली एक मुलगी - पतीसह स्वत:च्या गाडीने प्रवासाला निघाली. वेळ पहाटेची होती. कांही अंतर गेल्यावर एका भर चौकात गाडी बंद पडली. कांही इकडून तिकडून पाहून जमते का तो प्रयत्न केला. एखादा मॅकेनिक आणणे जरुर आहे असे लक्षात आले. पतिदेव आसपासच्या भागातील असंख्य दुकान ओळी मधून फिरले पण कोणतेही दुकान उघडे नव्हते. गॅरेज उघडे नव्हते. कसलीही मदत मिळू शकली नाही.

इकडे गाडीत बसल्या बसल्या या मुलीने 'श्रीं' चा धावा करणे सुरु ठेवले होते.

एका एकी दोन तरुण यांच्या गाडीजवळ आले. त्यांनी विचारले ''तुमची गाडी नादुरुस्त झाली आहे कां? आम्ही कार मेकॅनिक आहोत. आम्ही पाहू का?'' तिने लगेच पहा म्हणून सांगितले इतक्यात पतिदेव ही हताश होऊन परत आले होते. त्या मुलांनी तपासणी करुन सांगितले की ह्या गाडीचा अमुक एक पार्ट खराब झाला आहे. तो बदलणे आवश्यक आहे. पतिदेव म्हणाले अहो! या भागातील सर्व बाजार मी फिरुन आलो आहे. एकही दुकान किंवा गॅरेज उघडे नाही. त्यावर ती मेकॅनिक मुले म्हणाली ''आमच्या जवळ हा पार्ट आहे. आम्ही बदलून देतो.' त्या नंतर थोड्याच वेळात गाडी दुरुस्त झाली व ती मेकॅनिक म्हणवणारी मुलं कुठे नाहीशी झाली कळलेच नाही.

******

## थांबा ! 'श्री' पुण्यात नाहीत

मुंबईहून कांही भक्त मंडळी पुण्याला 'श्री' महाराजांच्या भेटीसाठी निघाली. त्यांच्या जवळ आर्किटेक्ट ने दिलेली कांही कागद पत्रे होती. 'श्री' च्या सह्या त्या कागदावर घेतल्या म्हणजे पुण्याच्या घराच्या बांधकामाला पुढे गती येणार होती.

एकाची स्वत:ची गाडी होती. तो भक्त घरोघरी फिरुन एकेकाला गाडीत घेत घेत जेंव्हा पांचव्या घरी पोचला तेंव्हा दारातच तेथील गृहिणीने त्या सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. तेथे 'श्री' महाराजांचे एक दिवस आधीची तारीख असलेले पत्र खर्ड्याहून आलेले होते. 'श्री' महाराजांचा दौरा सुरु होता व ते २-३ मुक्काम आटोपून बुधवार पर्यंत पुण्याला पोचतील. तेव्हा आपण भक्त मंडळींनी सोमवारी पुण्याला येउ नये असा मजकूर त्या पत्रात होता. वास्तविक 'श्री' महाराजांना न कळवताच, 'श्री' घरी असतील असे गृहीत धरुन ही मंडळी पुण्याला निघाली होती. 'श्रीं' ना पूर्व सूचनाही दिलेली नव्हती. पण त्यांचे भक्त वात्सल्य पहा! आणखी एक आश्चर्य म्हणजे खर्डा ह्या लहान गावातून 'श्रीं' नी पाठविलेले पत्र दुसऱ्या दिवशी मुंबईला पोचले होते. यांची पुणे वारी असफल झाली असती म्हणून काय काय केले?

******

## कॉलेजच बंद पडले

या भक्ताने आपल्या मुलाला एका मेडिकल कॉलेज मधे प्रवेश मिळण्यासाठी सर्व प्राथमिकता पूर्ण केल्या. आता फी भरायची तेवढी होती. दरम्यान हा भक्त 'श्रीं' च्या दर्शनाला गेला व झालेले सर्व वृत्त सांगितले. 'श्रीं'नी त्यांना सांगितले की तो मिळालेला प्रवेश ताबडतोब रद्द करा. नंतर दुसऱ्या एका कॉलेजात प्रवेश घेण्यास 'श्रीं' नी सांगितले. त्याप्रमाणे केले. थोड्याच दिवसांनी कळले की ते पहिले कॉलेजच बंद पडले.

******

## चोरे द्विजासी मारीता

॥ चोरे द्विजासी मारीता मन जे कळवळले तें..।

गाव भिवंडी जि.ठाणे विभागात राहणाऱ्या एका भक्ताची ही गाथा आहे- हा भक्त लिहितो-

''मला घरमालकानी (नियमाप्रमाणे डिपॉझिट इ.दिलेले असून सुद्धा) १२ वर्षानंतर जबरदस्तीने घर सोडायला लावले. त्या साठी गुंडांचे करवी मारहाण करवली. पोलीस कडूनही महाय्य मिळाले नाही. न्यायालयात दाद मागितली. प्रकरणात न्याय मिळाला नाही.

शेवटी 'श्री' महाराजांना सर्व परिस्थिती निवेदन केली. 'श्री' फार दयाळू होते. माझ्यावरील झालेल्या अन्यायाबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केले. आणि त्या वेळचे ठाणे जिल्ह्याचे कलेक्टर श्री मधुकर पाटील यांना (''मला न्याय मिळवून देण्यासाठी'') पत्र लिहिले.

मला महाराजांचे प्रेम व आशीर्वाद मिळाले आहेत. मी समाधानात आहे.

पण त्या पाटील साहेबांना माझे काम करण्याची सद्बुद्धी झाली नाही. इत्यादि.

******

## हे तर 'श्री' मोठ्या महाराजांचे भक्तमंडळींपैकी आहेत...

प.पू.श्री. दत्तमहाराजांकडून मंत्रदीक्षा व शक्तिपातदीक्षा प्राप्त होऊन इहपर कल्याणाचा मार्ग प्रशस्त झाला. पुढील कालक्रमण प.पू.श्री.ताई महाराजांचे पदरी राहून घडत असल्याने पूर्ण निश्चिंतता लाभली आहे. मागची कृपा परंपरा म्हणजे यांचे वडील प.पू.श्री. धुंडीराज महाराजांचे शिष्य व भक्त होते. लहानपणी वडीलांबरोबर यांनाही त्यांच्या दर्शनाचा लाभ होई. वडीलांनी स्वतःच्या गावात मंदिर बांधले त्यात श्री विठ्ठल रुक्मिणी देवतांची प्रतिष्ठा केली. तेथेच प.पू.श्री. धुंडीराज महाराज व शेगावचे श्री गजानन महाराज यांच्या मुर्तीचीही प्रतिष्ठा केली. हा स्थापना सोहळा श्री दत्त महाराजांचे हस्ते संपन्न झाला. 'श्री' व प.पू. ताईमहाराज परिवारासह या स्थापनेला उपस्थित होते. अशा पितरांचे अनुकरण करीत 'श्रीं'च्या तसेच प.पू.श्री ताईमहाराजांच्या भक्ती मध्ये सहजच लीन झालेला हा परिवार आहे.

व्यवसायासाठी विविध ठिकाणी राहणे झाले. तेथे तेथे 'श्रीं' चे आगमन घडून पाद्यपूजा सेवा घडली. श्रीमद् भागवत सप्ताह श्रवण दोनदा घडले त्या पैकी एक सप्ताह स्वग्रामी घरीच झाला. या सगळ्या पुण्याईचे पाठबळ आहे. प्रारब्धभोग भोगूनच संपविले पाहिजे ही शिकवण मिळाली. प्रकृती अस्वास्थ्य काळातही साधना सुरु राहिली. त्या मुळे बरेचसे रोग निवारण केवळ साधनेमुळे होते याची अनुभूती आली. व उर्वरित व्याधी प्रारब्ध भोग म्हणून मानल्या. त्यांच्या त्रासांचे सहन करण्याची शक्तीही साधनेद्वारा 'श्रीं'नी दिली आहे.

यांच्या नवीन उपक्रमात बसविण्याची यंत्र सामुग्री उभारणेचे काम होते. नेमकी अमावस्या येत होती. 'श्रीं'नी रोज १२ वेळ व्यंकटेश स्तोत्राचे पाठ करवून घेतले व कृपा आशीर्वाद दिला. त्या मुळे सर्व सुयोगच झाला. अव्याहत रोज १२ तास ही यंत्रे बिन तक्रार काम करीत आहेत व १२ वर्षे झाली तरी पूर्ववत सुरु आहेत. श्री व्यंकटेश स्तोत्र रोज पाठ म्हणण्याची सवय लागली. प्रत्येक जीवाच्या अन्य जन्मातील उपासनेला अनुलक्षून या जन्मी त्याला कोणती उपासना करायची ते 'श्री' सांगतात. बहुधा ही मंडळी बालाजी उपासक

असतील म्हणून व्यंकटेश स्तोत्र म्हणायला सांगितले आहे. सर्व देव व त्यांच्या शक्ती एका गुरुचरणीच समाविष्ट आहेत. त्या मुळे या विविध उपासनांची परिणती श्रीगुरु सेवेतच होते ही दृष्टी 'श्रीं' च्या मार्गदर्शना मुळे लाभते.

यांनी श्रीगुरुपौर्णिमेला पुण्याला 'श्री'महाराजांकडे जायचे योजले. नेमकी प्रकृती बिघडली व प्रवास रद्द करावा लागला. तरी प्रत्यक्ष उत्सवाच्या दिवशी बरे वाटले व जालन्याला प.पू.ताईमहाराजांकडे गुरु पौर्णिमा वारी व 'श्री' सेवा घडली. हा 'श्रीं'चा संकेतच झाला असे मानून पुढील गुरुपौर्णिमा जालन्यालाच करण्याची प्रथा सुरु केली. ''संत दिसती वेगळाले-परी ते स्वरुपी मिळाले.'' ह्या वाक्याचा अनुभव येऊन आनंद द्विगुणित झाला. दत्तआश्रमात बसले तरी 'श्रीं'चे समोर बसले आहोत असे नेहमी जाणवते. ''मद्भक्ता यत्र गायंती। तत्र तिष्ठामि नारद॥'' श्री भगवान सांगतात.

******

(डॉ.भातलवंडे यांच्या डायरीतून)

## आयकर अधिकारी कडक ? भक्त ?

सोलापूरचे 'आयकर' अधिकाऱ्यास बार्शी भागातील प्रकरणे पाहण्यासाठी बार्शी रेस्ट हाऊस मधे ८ दिवस कँपची सोय केलेली होती. वकीलासह मी केस पडताळणीसाठी गेलो. ''दक्षिण भारतीय अधिकारी स्वभावाने प्रामाणिक पण वाणीने कडक आहेत. थोडक्यात काय ते सांगावे'' इत्यादि पूर्व सूचना वकीलांनी मला दिल्यामुळे जरा मानसिक ताण होता. 'श्रीं'ची प्रार्थना सुरु होतीच. माझे नाव पुकारल्यावर पुन्हा एकदा 'श्रीं'ना प्रार्थना केली. ''सर्व निभावून न्या'' म्हणून विनविले व ''आत येऊ का? '' असे अधिकाऱ्यांना विचारले. त्यांनी समोरच खुर्ची दिली. सोबत वकीलही बसले.

मला अचानक त्या अधिकाऱ्यांशी कांही बोलण्याची प्रेरणा 'श्री' इच्छेने झाली. मी त्यांना म्हटले ''आपणास एक विचारु का?'' त्यांनी अनुमती दिली. मी त्यांना विचारले ''आपणास मुळव्याधीचा त्रास होतो का?'' अचानक

विचारलेल्या प्रश्नाने ते ही चकित झाले. ''तुम्हाला कोणी सांगितले? '' असे मला विचारू लागले. मी म्हटले मला कोणी सांगितले नाही, पण आपण ज्या रीतीने खुर्चीत बसलात त्या वरुन मला शंका वाटली म्हणून विचारले. त्यांचे या उत्तराने समाधान झाले व त्या विषयी थोडे बोलणे झाले. मी त्यांना कांही उपचार सुचविले व हे ही सांगितले की हे रेस्ट हाऊस मधील काम आटोपून मी बार्शीच्या बाजारात माझ्या दवाखान्यास लागणारी कांही औषधे खरेदी करणार आहे त्या बरोबरच आपलीही औषधे घेउन आपणास पोचती करीन. त्यांनी त्यास होकार दिला . माझी 'आयकर' विवरणासंबंधीची चौकशी व माझी फाईल हे सर्व बघून त्यांनी वकीलांना सर्व ठीक असल्याचे सांगितले व आम्हाला जाण्यास परवानगी दिली. त्यांची औषधे त्यांना पोचती करुन आम्ही परत आलो.

पुढे बार्शीचा कँप मुक्काम संपला व ते अधिकारी सोलापूरला परत जाताना वैरागला दवाखान्यात आले. मनात वाटले की आता आणखी काय चौकशी करतात कुणास ठाऊक. त्यांचे स्वागत केल्यावर ते म्हणाले मला तुमची पुढील उपचार चालू ठेवण्यासाठीची औषधे लिहून द्या. तुमच्या आयुर्वेदिक उपचाराचा मला फायदा जाणवला. तुमचे बिलही सांगा. त्यांना अवघड वाटणार नाही अशा शब्दात त्यांची समजूत घालून व पुढील योजना देऊन रवाना केले. हे सर्व धडले हा केवळ 'श्रीं' ना केलेल्या प्रार्थनेची फलश्रुती होती, हे निश्चित.

******

## लगीन घाई

प.पू.श्री दत्तमहाराजांच्या अनुग्रहीत, कृपांकित अशा एका भगिनीने सांगितलेला अनुभव-

पुण्याला वरचेवर रेणुकानिवास मधे दर्शन घेण्यास जात होतो. एकदा काही आप्त मंडळींसह 'श्रीं'चे दर्शनाला गेलो असता महाराजांनी लग्नाचा विषय काढला. म्हणाले आता मुलगा विवाहयोग्य झालेला असल्याने लवकरात लवकर वधुचा शोध घेऊन कार्य उरकून घ्यावे. नुकतेच शिक्षण आटोपून स्वतःच्या

पायावर उभे राहिलेल्या मुलाचे लवकरच लग्न करावे असे आमच्या कोणाच्याच ध्यानीमनीही नव्हते. आपला मुलगा काही फार मोठा नाही झाला. सावकाश बघता येईल असे मनांत असताना अचानक 'श्रीं'चे असे सांगणे झाले. पुढे महाराज हे ही म्हणाले, जास्त चिकित्सावृत्ती ठेऊ नका. पत्रिका जुळत असल्यास आणि मुलाला पसंत असल्यास लगेच ठरवून टाका.

घरी परत गेल्यावर त्याप्रमाणे वधू संशोधन सुरु झाले. मुंबईतलीच एक मुलगी सांगून आली. पत्रिका जुळली. मुलालाही मुलगी पसंत होती. पण 'श्रीं'चे कानावर घालून मगच कायते ठरवावे असे सर्वांचेच मत होते. त्यातून माझ्या मनांत एक शंकाही होती. मुलगी फारच बारीक आहे. आपल्या खटल्याच्या घरांत हिचा काय निभाव लागेल म्हणून माझ्या मनांत हो-नाही हा प्रकार चालू होता.

शेवटी पत्रिका वगैरे घेऊन 'श्रीं'चे दर्शनास गेलो. सर्व कानावर घातले. प.पू.महाराजांनी स्वतः पत्रिका हातात घेऊन पाहिल्या. पत्रिका उत्तम जुळते, **मैत्री योगाचे पाच गुण आहेत.** मुलाचा होकार असल्यास ठरवायला काही हरकत नाही. हे बोलणे चालू असताना मला काही राहवेना. मी मधे माझ्या शंकेचे पिल्लू सोडलेच, त्यावर 'श्री' हसून म्हणाले,''अहो! पत्रिकेवरून रोगट किंवा अशक्त असे काही लक्षणं नाही आहेत. मुलगी चांगली आहे. लठ्ठ मुलगी असती तर तिला हे खाऊ नको-ते खाऊ नको, कमी खा असे सारखे म्हणाला असता. हिला तुम्ही प्रेमाने पोटभर खाऊपिऊ घालाल. असो तुमचा काय निर्णय असेल तो त्यांना लवकर सांगा. उगाच त्यांचा आठ-आठ दिवस खोळंबा नको.''

एवढे झाल्यावर हीच मुलगी करायची हे निश्चित झाले. घरी आल्यावर लगेच वधूपक्षाशी संपर्क साधला. बोलणी झाली.

लग्नाची तारीख उपाध्यायांच्या संमतीने २३ फेब्रुवारी ठरली, आता तारीख ठरवताना 'श्रीं' ना विचारावे हे काही मनांत नाही आले. पुढे दर्शनाला गेलो आणि तारीख वगैरे सगळे कानावर घातले. यावर घाईघाईने 'श्री' म्हणाले. एवढी लांबची तारीख नको. या वर्षी सिंहस्थ लागणार आहे. या मुलीची रास सिंह आहे. सिंह राशीच्या जातकांचा विवाह सिंहस्थात करुन चालत नाही. तुम्ही

असं करा १४ जुलै तारीख ठरवा. घरी जावून लवकरात लवकर तयारी करा. १५ दिवस पुष्कळ आहेत. जास्त मंडळींना बोलावू नका. आप्तेष्ट तुमचे तुम्ही जमून कार्य संपन्न करा.

हे ऐकल्यावर आम्हाला अक्षरश: ''लगीन घाई'' ची प्रचीती आली. सर्वांनी एकेक जबाबदारी घेऊन 'श्रीं'नी सांगितलेल्या तारखेस पंधरा दिवसांत सगळी तयारी करुन जवळच्याच हॉल मधे लग्न समारंभ ठेवला. 'श्रीं'च्या सांगणे वरुन कमीत कमी लोकांना आमंत्रण होते, पण यांना बोलावणी करायला वेळ नसेल झाला. घाईत लग्न ठरलं, एकुलतेएक कार्य आहे तेंव्हा आपण गेलेच पाहिजे, हा विचार करुन अनेक मंडळी स्वत:हून आली आणि शेवटी शेवटी आमची फजिती झाली. बऱ्याच लोकांना जेवण पुरले नाही. आम्हाला त्या गोष्टीचे वाईट वाटले. 'श्रीं'नी सांगितलेल्या सूचनेचे आपण पालन करु शकलो नाही त्यामुळे आलेल्यांचे आदरातिथ्य योग्य तऱ्हेने झाले नाही याची खंत वाटली.

पण 'श्रीं'च्याच कृपेने वधु सुलक्षणी सुस्वभावी आहे आणि आमच्या परमार्थात आणि सेवाकार्यात पूर्णपणे अनुकूल आहे.

या पुढे अजून विशेष म्हणजे लग्नाची जी तारीख २३ फेब्रुवारी अगोदर ठरवली होती त्याच दिवशी वधुची या कार्यात सर्व जबाबदारी उचलणारी त्यांच्याकडची कर्तीसवरती जी तिची 'मावशी' तिच्या यजमानांचे देहावसान झाले. या घटने नंतर आम्हाला समजले की, 'श्रीं'नी हे कार्य लवकरात लवकर करण्याची एवढी घाई का केली !

त्यांचे सांगितल्या प्रमाणे वागणे झाले तर आपला सर्वथैव लाभ निश्चित आणि तसे नाही झाले तर फजीती निश्चित.

******

## फाईल हरवली -सापडली

१. 'श्रीं'चे भक्त मनोहरपंत सांगतात-१९९७ साली नोकरी लागली व ७-८ महिन्यानंतर शासकीय सेवा पुस्तक(सर्व्हिसबुक) भरायचा प्रसंग आला. त्या साठी शालांत परिक्षेचे प्रमाण पत्र इत्यादि कागदपत्रांची फाईल तयार केली. उन्हाळ्याचा दिवस होता. फाईल सायकलच्या मागच्या कॅरीयरला लावून निघालो. प्रथम आश्रमात जावे म्हणून सायकल तिकडे वळवली. जवळ जवळ ३ किलोमीटर सायकल ने प्रवास झाला असेल तोच लक्षात आले की फाईल जागेवर नाही. उन्हाळ्याच्या उष्म्यापेक्षाही ही घटना जास्त तापदायक होती. पुन्हा उलट दिशेने फाईल शोधत जाऊ लागलो. मनात 'श्रीं'ची तळमळीने प्रार्थना केली.

झाली घटना ऑफिसमधे कळवावी असा विचार डोक्यात आला. समोर एक अनोळखी दुकान ट्रान्सपोर्ट कंपनीचे दिसले तेथे शिरलो. काउंटरवरच्या माणसाला फोन वापरायची परवानगी मागितली. तसा तो एकदम भडकला. हे काय एसटीडी आहे कां? पुढे जा. आत कसे आलात? इत्यादि. तरी मी त्याला विनवून सांगितले की माझी फाईल हरवली आहे व मी आधीच चिंताग्रस्त आहे. ऑफिसला फोन करायचा आहे. तो दुकानदार अचानक म्हणाला तुमचे नांव काय? कुठू आलात ? याच दुकानात कसे आलात? मी त्याला सर्व सविस्तर सांगताच त्याने टेबलाच्या ड्रॉवरमधून माझी हरवलेली फाईल काढून दिली.

सायंकाळी रेणुका निवासात 'श्रीं'चे दर्शनाला गेल्यावर ही घटना सांगितली. तेंव्हा 'श्री' म्हणाले, ''अरे बाबा! सर्व लक्षपूर्वक व्यवस्थित ठेवत जावे म्हणजे आपल्याला व इतरांनाही त्रास होत नाही.''

ज्या ठिकाणी हरवलेली फाईल होती त्यांच दुकानात फोन करायला मी गेलो कसा? यात माझे काय कर्तृत्व, कुठले कौशल्य? केवळ 'श्रीं'नी प्रेरणा देऊन त्या दुकानदाराला व मला बुद्धी देऊन योग्य ते करवून घेतले, म्हणून मोठ्या संकटातून मी सहजपणे पार पडलो.

******

## भुसावळला जायचंय -५-६-७- सीटवर बसा

'श्रीं'च्या भक्त परिवातील सौ.अंजली ताई यांचा हा अनुभव-या ताई पतिदेव व मुलगा यांचे सह पुण्याहून 'श्रीं'चे दर्शन घेऊन भुसावळला जाण्यासाठी रात्री स्टेशनवर आल्या. या तिघांचे रिझर्वेशन कनफर्म झालेले नव्हते. वेटिंगमधे नांव होते. गाडी आल्यावर एका डब्यातील टीसी ला विनंती केली. पण उपयोग झाला नाही. एक रमाबाई नावाच्या गुरुभगिनीही त्या वेळी ह्याच समस्येने ग्रस्त असलेल्या त्याच डब्यात भेटल्या. ह्या दोघी कशातरी एका सीट वर रिकामी जागा पाहून बसल्या. रमाबाई त्याच बाजूला जळगावला जाणार होत्या. इतक्यात एक गृहस्थ अचानक तेथे आला. त्याने सौ.अंजलीताईना विचारल ''तुम्हाला कुठे जायच आहे?'' यांनी ''भुसावळ'' असे सांगितले व दोन सीट हव्या होत्या असे बोलल्या. त्या रमाबाईंनीही एक सीट मिळावी असे म्हटले.

त्या गृहस्थांनी लगेच त्यांना सीट क्र.५,६,७ या ठिकाणी नेऊन बसवले. आमची तिकीटे आम्हाला दिली व कुठलाही मोबदला न घेता ''मी तुम्हाला जागा देण्याचे म्हटले होते. तेवढे केले.'' असे म्हणून निघून गेला. यांचा प्रवास सुरळीत झाला. पहाटे ३ वाजता जाग आली तेंव्हा सुंदर असा मोगऱ्याचा सुगंध दरवळलेला जाणवला. पहाटेची ब्राह्ममुहूर्ताची वेळ. 'श्रीं'चे स्मरण झाले. 'श्रीं'नी त्या सुगंधाच्या रुपाने भेट दिली असे मनोमन जाणवले.

प.पू. 'श्री'व प.पू.श्री.ताई महाराज यांच्या चरणी भक्ती श्रद्धा स्थिर रहावी अशी मनोमन प्रार्थना केली. त्यांच्या संरक्षक कवचा मुळेच असे प्रसंग सहज पार होतात.

******

**ते ज्ञान पै गा बरवे । ते मनी आथी आणावे**
**तरी संता या भजावे। सर्वस्वेशी ।।**
**-ज्ञानेश्वर महाराज**

## चारी मुक्ती दायक दाता

चारी मुक्ती दायक दाता । उदार कल्पतरु ।
जय जय गुरुमहाराज गुरु। जय जय परब्रह्म सद्गुरु।।

हा उद्गार अतिशय यथार्थ व सत्य आहे. चारही मुक्ती तसेच चार पुरुषार्थ भक्ताला प्राप्त करुन देणारी श्री गुरुंची शक्ती आहे, याचे प्रत्यंतर देणाराच हा प्रसंग प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या भक्ताने 'याची देही याची डोळा पाहिला' त्याची ही कथा.

'श्रीं'च्या कृपेने ज्यांना ''सलोकता'' मुक्ती मिळाली त्या शंकर नामक भक्ताचे गोव्यातील ''मंगेशी'' हे कुल दैवत. त्याच्या राहण्याच्या गावापासून अंतर बरेच आहे. तथापि प्रतिवर्षी एकदा महाशिवरात्री यात्रेला जाण्याचा नियम आहे. जाण्या आधी 'श्रीं' चे दर्शन घेउन, जाण्याचा दिवस इ. निवेदन करायचा. त्यांनी आशीर्वाद दिला की मग कोणीतरी गुरुबंधू सहकारी त्याच्या सोबत जात, उतार वयातही ही यात्रा नित्य घडत होती. आजन्म ब्रह्मचारी व सदा साधनरत असणारे हे श्री शंकरराव.

एकदा 'श्रीं'नी सांगितले ''गोकर्ण महाबळेश्वर'' या शिवस्थानाला जावे.'' सोबत काणीतरी असावे, म्हणून गुरुबंधू पैकी कोणीतरी एकजण त्यांच्या सोबत,(रजा/प्रपंच सांभाळून) जाऊ लागले. असे सुरू असताना १९९२ सालची महाशिवरात्री जवळ आली. पुण्याला जाऊन 'श्रीं'ना निवेदन केले. सोबत कोण आहे? असे 'श्रीं'नी विचारले. **नेहमी येणारे** म्हणून लक्षात असलेले श्री. केशवराव यांचे नाव सांगितले. 'श्रीं' नी आशीर्वाद दिला. परत गावी येऊन केशवास सांगितले. '' तुम्ही आमच्या बरोबर येणार '' असे 'श्रीं' ना सांगितले आहे. प्रवासाची दोन तिकिटेही काढलेली दाखवली. केशवरावांना कांही अडचण-कार्यालयीन कामाची होती. तथापि गुरु आज्ञा आहे तेंव्हा

गेलेतर पाहिजेच. म्हणून वरिष्टांकडे अर्ज दिला. काय ! कुठे जाणार आहात? असे वरिष्ठांनी विचारले. श्रीगोकर्ण महाबळेश्वर व महाशिवरात्रीला जातो म्हणताच रजा मंजूर केली. वरिष्ठांचे कोणी आप्त गोकर्णाचे होते त्यांना देण्यासाठी छोटे पार्सलही केशवरावांना दिले. असा मार्ग सुकर झाला.

पूर्वी आरक्षित केलेली तिकिटे होती त्यामुळे प्रवास सुकर झाला. गोकर्णाचा वास्तव्याचा कालावधी २ दिवसांचा म्हणून परतीच्या प्रवासाचे आरक्षण **'गेल्या गेल्या'** करावे म्हणून पाहतात ''तो आज रविवार'' आरक्षण कार्यालय बंद आहे. असे कळले म्हणून क्षेत्रस्थ उपाध्यायांकडे वास्तव्याची सोय करून घेतली. स्नान-आन्हिक आटोपून श्री महाबळेश्वराचे दर्शन घेतले. प्रार्थना करून परतले. वरिष्ठांचे पार्सल ज्यांना पोचते केले ते श्री नामधारी भेटले. तेथे ही सुटीमुळे सवड होती म्हणून गप्पा मारून परिचय करून घेऊन परतले.

क्षेत्र उपाध्यायांना क्षेत्र यात्रेची पध्दती समजावी म्हणून तसे विचारले. श्रीकोटीतीर्थ या तलावात प्रथम स्नान करावे तेथून आणलेले थोडे पाणी प्रथम श्रीमहागणपतीला अर्पण करावे व नंतर उर्वरित पाणी श्रीमहाबळेश्वराला घालावे अशी पध्दत कळून आली. सामान्यतः म्हणजे यात्रा प्रसंग नसताना ह्या क्रमाने स्नान-पाणी घालणे इ. सुलभ असते पण महाशिवरात्रीची ''महा'' यात्रा जमलेली होती **''श्रीगणपतींचे फक्त दुरून दर्शन घ्या -तरी पुरे झाले- तसेच पुढे शिवाला पाणी घाला''**. असा मध्यम मार्ग क्षेत्रोपाध्यायांनी सुचविला. त्या प्रमाणे पहाटे ३ला प्रथम समुद्र स्नान करून नंतर तीर्थात स्नान करून हातात कलश घेऊन श्रीगणपतीचे महाद्वारात जेमतेम पोचू शकले. पहाटे ३ पासून उठून रांगेत अक्षरशः हजारो भक्त पाण्याच्या कलशांसह उभे होते. ''आता काय?'' दारातून लांबूनच दर्शन घडणार'' अशा विचारात हे दोघे गुरुभक्त असताना अचानक आतून एक सिक्युरीटी गार्ड दारात आला. यांना बरोबर घेऊन आत नेले व क्षणभरात श्री महागणेशासमोर उभे केले. पाणी घालून परत दारात आले तर मागे कोणीच नव्हते.

महाबळेश्वराला मात्र काहीच गर्दी नव्हती. थेट पिंडी शेजारी बसून सावकाश पाणी घातले. पूजा केली. मनोसक्त उपचारादी वाहून पूर्ण समाधान मिळाले.

इतक्यात मंडळीची गर्दी वाढू लागली म्हणून उठून बाहेर आले व आनंदाच्या लाटांवर तरंगतच भक्तांचा महासागर पार करून ' **मुक्कामाला** ' आले.

आणि अचानक, श्री शंकररावांच्या छातीत दुखून असह्य वेदना होऊ लागली. मंडळी धावली. बाकावर निजविले. कपाळी कुंकू लावले. कॉफी घोट दोन घोट दिली. यात्रेमुळे सर्व वाहने पार लांब अंतरावरच थांबविलेली होती. डॉक्टारांचे घरी प्रयासानेच घेऊन गेले. डॉक्टरांनी तपासून तात्काळ निर्णय दिला.

**''यांची प्राणज्योत मालवलीआहे.''**

संपूर्ण अपरिचितांच्या मध्ये एक सुहृद होता तो असा समोर निष्प्राण देहात पडलेला. **''राहिले दूर घर माझे.''** माझे व **यांचेही**. यांचे आप्तबंधू कोणीही सोबत नाही. आता काय करावे! डॉक्टरांनी निर्णय देताच **साथी सोबती** सर्व निघून गेले. अचानक श्री नामधारींचे स्मरण झाले. डॉक्टरांनीच त्यांना फोन वरुन सर्व सांगून बोलावून घेतले. त्याच दिवशी सुरू झालेल्या एस्.टी. डी. सेवेची मदत मिळून आप्त बंधू यांना फोन करून कळवले. 'श्रीं'चा संकल्प तसा होता म्हणून सर्वांनी क्षेत्राचे ठिकाणी अंत्य संस्कार उरकून घेण्यास अनुमती दिली.

डॉक्टरांनीच एक मिलीटरी ऑफिसर, एक नात्यातले, एक स्नेही इत्यादि चौघे जमवले. केशवरावांनी अग्नीचे मडके घेतले! वाळू तुडवून समुद्र किनारी असलेल्या दहन भूमीत पोचले. क्षेत्रोपाध्यायांनी पुढे जाऊन सर्व बघितले होते. त्यांनीच 'मंत्राग्नि देवविला. स्पेशल केस म्हणून डॉक्टरांनी मृत्यूचे प्रमाणपत्र लगेच दिले व नगरपालिकेचा दाखला मिळाल्याबरोबर पाठवून देईन अशी तीही क्लिष्ट कामाची जबाबदारी स्वत:कडे घेतली. क्षेत्रातील एके ठिकाणच्या पवित्र उदकात, तेथील प्रथेप्रमाणे अस्थिविसर्जन करून- सर्व घटनेचा सिंहावलोकना सारखा चित्रपट पहात पहात केशवराव एकटेच परत आले.

या भक्ताच्या अंत प्रसंगावरील 'श्रीं'च्या पत्रात असे होते-'' श्री शंकर रावांना मृत्यू शिवक्षेत्रात महाशिवरात्रीचे दिवशी, शिव सान्निध्यात झाल्याने शंकराच्या कृपेने ते **'कैलास'** लोकात शिव सान्निध्यात निश्चित जाऊन राहिले आहेत. त्यांच्या जन्माचे सार्थक झाले.''(स्वतः सर्व कर्ते असून श्रेय मात्र आपल्याच शिवस्वरुपाला वाहिले).

## श्रीं'च्या शब्दातील अभिप्राय

नवरात्र उत्सवात 'श्रीं' च्या घरी रेणुका निवास मध्ये प.पू.श्री. ताई महाराज असताना एकदा 'श्रीं' नी त्यांच्या संबंधात कांही प्रश्न विचारला(इतरांना) व त्या प्रश्नाला अनुलक्षून प.पू.श्री. ताई महाराजांनी काय कृती केली. याचे प्रसंगाच्या निरीक्षणात टिपलेले हे क्षण आहेत-

एकदा 'श्री' म्हणाले ''ताई महाराजांना काही खायच नाही कां? आणि त्या दिवशी प.पू.श्री. ताई महाराजांनी कांहीही अन्न आदि ग्रहण केले नाही? त्यांना आग्रह करणाऱ्याला त्यांनी 'श्रीं' चे शब्द काय होते व त्याचा अभिप्राय काय हे समजावून सांगून समाधान केले.

असेच एकदा ''ताई महाराजांना भात नको का?'' असे शब्द 'श्रीं' चे ऐकून त्या दिवशी प.पू. श्री.ताई महाराजांनी भोजनात ''भात'' अजिबात घेतला नाही.

'श्रीं' च्या शब्दांचा अभिप्राय काय हे समजण्यासाठी हे प्रसंग सर्वांनाच मार्गदर्शक ठरावेत.

******

## गुरुप्राप्तीची तळमळ

श्री गुरु प्राप्तीची तळमळ मनाला लागलेली होती. बराच काळ कांही मार्ग मिळत नव्हता.

प.पू.श्री. गुळवणी महाराजांचे व ते देत असत त्या शक्तिपात दीक्षेच्याबद्दल कोठून तरी माहिती कळली. त्यानंतर श्रीगुरुमहाराजांच्या दर्शनाचाही दोन वेळा योग आला. योगवाणी आदि पुस्तके वाचून व इतरांबरोबर जी चर्चा यातून शक्तिपात योगाच्या साधनेची माहिती मिळाली. त्या साधनेत अनुकूल प्रगतीसाठी नियम आदि जेव्हा कळले तेंव्हा बुध्दीतील दैन्य आडवे आले. हे आपल्याला कसे जमेल? हा यक्ष प्रश्न होता. तथापि कांही मंडळीनी समजूत काढली व मी श्री गुळवणी महाराजांना ११ जानेवारी १९७४ रोजी दीक्षेसाठी प्रार्थना पत्र

पाठवले. पण ईश्वरी योजना वेगळी होती. १४ जानेवारी १९७४ ला श्री गुरुमहाराज अनंतरूपात, विश्वरूपात विलीन झाले व माझी दीक्षा मिळण्याची आशा मावळली.

त्या नंतर श्री. शिवोहम् तीर्थ स्वामी मुंबईला आले असता त्यांना सर्व वृत्त कथन करण्याचा योग आला. ते म्हणाले प.पू.श्री गुळवणी महाराजांचे दीक्षेचे उत्तराधिकारी प.पू.श्री दत्तमहाराज आहेत. आम्ही स्वत: त्यांचेकडे शिफारस करू. ते थोर माहात्मे आहेत. मोठे अधिकारी आहेत. त्यांच्याकडून तुम्हाला अनुग्रह नक्की मिळेल.

त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे 'श्रीं' ना पत्र पाठवले. उत्तर लगेच आले. पण त्यात थोडा काळ प्रतिक्षा करण्याचे सांगणे झाले. प.पू.श्री गुळवणी महाराजांचा अस्थिकलश श्री प्रयागराज (अलाहाबाद-त्रिवेणीसंगम) येथे नेऊन अस्थि विसर्जन 'श्रीं' चे हस्ते व्हायचे होते. श्री गुरु महाराजांचा किंचित पार्थीव अंश (अस्थि-रक्षा रुपाने) असे पर्यंत त्यांच्या उत्तराधिकारी पदाची स्वीकृती मानायची नाही असा 'श्रीं'चा निर्धार होता. त्या प्रमाणे प्रयागराजाचा कार्यक्रम संपन्न झाल्यावर मला 'श्रीं'चे कृपापत्र आले. २६-९-७४ रोजी सकाळी सहाला बसण्याची आज्ञा झाली. (मला एकट्यालाच) त्या दिवशी पहाटे श्री गुरुमहाराजांचे अनुग्रहीत दोघे साधकही मला आवश्यक त्या सूचना देण्यासाठी आले.

सौ.मीराला त्या दिवशी दीक्षा होणार नव्हती. तथापी ह्या गुरुबंधूनी प्रेरणा देउन माझ्या दीक्षा प्रसंगाचा अनुभव दुरून पाहण्यास तिला सांगितले. दीड तास साधन झाले. स्वत:ची व विश्वाची पूर्ण विस्मृती होउन शांत अवस्थेत बराच वेळ बैठक झाली. त्यानंतर सौ. मीरानेही 'श्रीं' ना पत्र पाठवून दीक्षा मिळण्यास प्रार्थना केली. गुढीपाडव्याच्या सुमूहूर्तावर सौ. मीराला अनुग्रह मिळाला. आमचे जीवन कृतार्थ झाले. 'श्री'चे दयाळुत्व म्हणूनच कांही योग्यता नसताना ही कृपा झाली.

******

## महापर्जन्य काळात सुखरुप प्रवास

'श्री' महाराजांना प्रिय असणारी कृती भक्ता कडून घडू लागली म्हणजे 'श्री' विशेष प्रसन्न असतात. अशा वेळी या भक्ताला अति कठीण प्रसंगातूनही सहजपणे पुढे नेऊन संकल्पित कार्य करुन घेतात.

'श्री' महाराजांचे, श्री क्षेत्र वाडी व श्री क्षेत्र अमरापूर (औरवाड) या स्थानांवर अवर्णनीय प्रेम आहे. कारण ही त्याचीच स्थाने आहेत. या क्षेत्री दर्शनाला जाणे ही 'श्रीं' ना विशेष प्रसन्नता देणारी गोष्ट आहे. मुंबईच्या एका भक्ताचा अनुभव तसा बोलकाच आहे. पावसाळ्याच्या दिवसात एक अतिपर्जन्य वृष्टीचा (मुंबईचा पाऊस) काळ होता. या भक्ताला औरवाडला दर्शनाला जायचे होते. बरोबर २-३ वर्षे वयाचा मुलगाही नेणार होते. विजांच्या गडगडासह जोरदार पर्जन्य वृष्टी सुरु होती. रस्त्यांवर पाणी असल्याने वाहने, वाहतूक सगळे विस्कळित झालेले असताना यांना एक टॅक्सी मिळाली. थोडे पुढे जातात तो टॅक्सीमधेही पाणी शिरु लागले.

एलफिन्स्टन पुलावरुन दादरच्या एका सिग्नल पर्यंत टॅक्सीने पोचले. त्या सिग्नल जवळ बाहेर गावी जाणाऱ्या बसेस थांबतात. नेमकी त्याच वेळी बेळगावला जाणारी एस्.टी.बस तेथे थांबली. रिकामीच होती. त्यांनी या बसने प्रवास सुरु केला व सुरळीत प्रवास होऊन औरवाडला पोचलो व्यवस्थित दर्शन झाले. एक माहिती पत्रक मुंबईला द्यायचे होते ते त्यांनी दिले. 'श्रीं' च्या संरक्षक कवचामधे कसे फुलासारखे अलगद गेले व आले. अशाच एका पावसाच्या तडाख्यात कांही दिवसापूर्वी मुंबईचा एक १०-१२ वर्षाचा मुलगा वीज पडून मृत्यू पावला होता. ही आठवण स्मृतीत ताजीच असल्याने आपला प्रवास सुरक्षित झाल्याचे विशेष जाणवले.

मुंबईला परत आल्यावर यांना एका भक्ताकडे जाऊन औरवाडहून आणलेली पत्रके पोचवायची होती. अपरिचित व्यक्तीकडे व पूर्वी माहीत नसलेला पत्ता शोधत हिंडावे लागणार होते. म्हणून स्वतःच्या दुचाकी वाहनाने निघाले. वाटेत एका ठिकाणी एका टॅक्सीने समोरून यांच्या दुचाकीला धडक दिली. त्या शॉक मधून सावरण्यापूर्वीच दुसरी कडून दुसऱ्या टॅक्सीने धडक मारली. त्या अचानक

घडलेल्या गोंधळात मागून येणाऱ्या इतरही दुचाकीवाल्याचा तोल गेला व त्यानेही यांना ठोकरले. ह्या प्रकारात हा भक्त रस्त्यावर अशा ठिकाणी फेकला गेला की डोक्यापासून एक फूट अंतरावर पुढून येणाऱ्या सीटी बसचे चाक आले होते. मोठ्या प्रयासाने बस ड्रायव्हरने बस थांबवली होती म्हणून वाचले. बस ड्रायव्हर खाली उतरुन पहायला आला. त्याला या भक्ताच्या डोक्याजवळ टायरच्या व डोक्याच्या मध्ये फोटो पडलेला दिसला. तो यांच्याच खिशातून उडून पडलेला 'श्री' महाराजांचा फोटो होता. तो ड्रायव्हरच अचानक म्हणाला ''ह्यांनी तुम्हाला वाचवले.''

******

## साई हॉस्पिटलमध्ये सूचना दिली

एका भक्त भगिनीची ही कथा आहे.

या भगिनी माहेरी आलेल्या होत्या. त्या वेळी एकदा अचानक चक्कर आली व शुध्द गेली. १०-१५ मिनिटेपर्यंत ती अवस्था होती. कांहीच कळत नव्हते. त्या नंतर ही भानावर आल्यावर सुध्दा कांहीच सुचत नव्हते. जवळच्या मंडळींनी यांना दवाखान्यात नेण्याची लगेच योजना केली. सकाळी ८ ची वेळ तशी लवकरचीच म्हणावी लागेल. दवाखान्यात पोचूनही त्वरित वैद्यकीय सहाय्य मिळेलच ह्याची शाश्वती नव्हती. साई हॉस्पीटल असे त्या दवाखान्याचे नाव होते. तेथे जाऊन पोहोचले. बाहेर भेटलेल्या कंपाउंडर सदृश सेवकाला आपले नांव सांगून त्वरित मदतीची प्रार्थना केली. पण आश्चर्य असे की तो सेवक हे नांव ऐकताच सावध झाला व म्हणाला ''अहो-हो तुमचे नांव नोंदवलेले आहे व पुढची व्यवस्था त्वरित करण्याची पूर्व सूचनाही मिळाली आहे. काळजी करू नका.

पेशंट सोबत गेलेल्या मंडळींना कळेना! असे काय बोलतो आहे हा! आताच तर आमचा निर्णय झाला व दवाखान्यात येण्यापूर्वी कोणीही संपर्क केला नाही. कांही चूक होत असेल. म्हणून पुन्हा चौकशी केली. कोणी नांव नोंदवले?

त्या सेवकाने सांगितले '' एक धोतर-उपरणे-कपाळी गंध अशा वेशातील वृध्द गृहस्थ येऊन सर्व सूचना देऊन गेले. त्यांना आम्ही विचारले तो त्यांनी आपले नांव 'कवीश्वर' असे सांगितले!

## भक्ताला अग्नीही दाहक होत नाही

चि. वैशालीची पाठ दुखत होती म्हणून तिने झोपताना इलेक्ट्रिकची हीटींग बॅग पाठ शेकायला घेतली. त्या बॅगेतून निघालेल्या वायरला हाताजवळ यावे असे चालू बंद करायचे बटन होते. त्या बॅगेला थर्मोस्टॅट नसल्याने स्वतःजागरुक राहून ठराविक वेळाने ती बंद करावी लागत होती. त्याप्रमाणे वैशालीने शेकून झाल्यावर ते बटन बंद केले आणि ती झोपली. रात्री बारा एकच्या सुमारास तिच्या आईला गुदमरल्यासारखे होऊन जाग आली. तिने बाबांना उठवले आणि काय झाले ते पहाण्यास सांगितले. त्यांनी दिवा लावून पहातात तो काय सगळी खोली धुराने भरुन गेली होती.

वैशालीच्या पाठीखालच्या हीटींग बॅगने पेट घेतला होता पण ती मात्र त्या धगधगत्या ज्वाळांवर शांत झोपली होती. नंतर तिला सद्गुरुंनी उठवले तेव्हां तिला जाणीव झाली ती कशावर झोपली आहे याची. तिच्या पाठीखालच्या गाद्यांना होळीप्रमाणे गोल खड्डा पडला होता आणि ज्वाळा खाली जात असल्याने एकेक गादीचा तिच्या अंगाखालचा भाग जळत जळत जाऊन लोखंडी कॉटच्या पत्र्यापर्यंत त्या गेल्या व तेथे जाऊन अडल्या होत्या. इतके सगळे होऊन वैशालीला अगरबत्तीचा लागतो तेवढाही चटका बसला नव्हता.

******

## टेस्ट रिपोर्ट बदलले

सौ. सीमाबरोबर नीलाताई जोशींकडे गेलो होतो. त्या दिवशी त्यांनी सीमाला पहाताच म्हटले, काका, मला काकूंची तब्येत कांही ठीक वाटत नाही. मी डॉ. ना बोलावते.(वास्तविक आम्हा कोणालाच सीमाच्या प्रकृतीत कांही अॅबनॉर्मल दिसत नव्हते) डॉक्टर आले त्यांनी दारातूनच सीमाला पाहिले व नंतर घरी जाताना त्यांना भेटून जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे निघताना त्यांच्याकडे गेलो. त्यांनी एका कागदावर कांही टेस्ट करण्याकरता लिहून दिल्या. मला वाचायला सांगितले. मी आपली नजर फिरवली आणि सहजतेने विचारले, कुठे करायच्यात त्या? त्यावर त्यांनी मला गंभीरपणे म्हटले, तुम्ही तो कागद नीट

वाचलेला दिसत नाही. तुम्हाला कळलं का मी कोणत्या टेस्टस् करायला सांगितल्या आहेत? तरीही मी सहजतेने म्हटले, कोणत्या का असेना, आम्ही कुठे करु ते सांगा. त्यावर ते म्हणाले, काकूंच्या वडिलांशी बोला आणि ठरवा. त्याप्रमाणे सीमाच्या वडिलांना तो कागद दाखवला आणि त्या टेस्टस् तिच्या माहेरच्या परिचित डॉक्टरांच्या पॅथॉलॉजीत करायचे ठरले.

नीलाताईंनी मात्र मला सांगितले, टेस्टचा रिपोर्ट आला की मला लगेच कळवा. त्या प्रमाणे टेस्टस् झाल्या आणि त्याचा रिपोर्ट नीलाताईंना व डॉ.आनंदना फोनवर वाचून दाखवला. तो एकून ते गंभीर झाले. नीलाताईंनी लगेच 'श्रीं'ना फोन लावून रिपोर्ट सांगितला. 'श्री' म्हणाले, कांही तरी चूक झाली असेल पॅथॉलॉजी लॅबमध्ये. नमुने बदलले गेले असतील. काही काळजी करु नका. परत टेस्टस् करा. 'श्रीं'च्या आज्ञेप्रमाणे परत तिथेच टेस्ट केल्यावर

रिपोर्ट वेगळे आले. नीलाताई व डॉक्टरांनी सुस्कारा सोडला. त्याचे कारण असे होते ती टेस्ट कॅन्सरची होती व सुरवातीला ती पॉझिटीव्ह आली होती. 'श्रीं' च्या कानावर गेल्यावर त्यांनी काय कृपा केली कॅन्सरचा शरीरात मागमूसही राहीला नाही. 'श्रीं'नी जरी सांगितले की नमुने बाटल्या बदलल्या गेल्या असतील वगैरे तरी स्वत:च्याकडे कर्तृत्व घ्यायचे नाही म्हणून. त्या दिवशी सीमाशिवाय त्या लॅबमध्ये इतर कोणाच्याच टेस्टस् झाल्या नव्हत्या त्यामुळे नमुने बदलण्याची शक्यताच नव्हती.

सौ. सीमाला पुढे क्षयाने ग्रासले. 'श्रीं'नी तिला ''दत्तस्तवस्तोत्र'' एकदा म्हणून त्यातल्या एका श्लोकाचा मंत्राप्रमाणे १०८ वेळा जप करायला सांगितल्यावर ती व्याधी दूर झाली.

******

## पवित्र ही गंगा तुझ्या पायापाशी

एका भगिनीचा अनुभव-

घरातील 'श्रीं'च्या भव्य तसबीरी समोरच्या जागेत वावरत असताना ह्या 'श्रीं'चे पद गुणगुणत होत्या. त्यातील कांही ओळी-

''पवित्र ही गंगा तुझ्या पाया पाशी।
कशाला मी जाऊ तीर्थ क्षेत्र काशी ॥

अशा ओळी आळवून म्हणताना अचानक 'श्रीं'च्या फोटोकडे लक्ष गेले. 'श्रीं'च्या चरणा समोरच्या फोटोच्या कांचेवर पाण्याचे बिंदू जमलेले दिसले. यांना जरा आश्चर्य वाटले. त्या फोटो समोरुन पाणी नेणे- आणणेची कोणतीच घटना तेवढ्यात घडली नव्हती. फोटो वर बाहेरुन पाणी उडण्याचे कांहीच कारण नव्हते. तरी पाणी मात्र होते. लगेच ते पाण्याचे थेंब पुसून काढून कोरडे केले. पद गुणगुणणे बहुधा सुरुच होते. आणी थोड्या वेळाने पाहिले तर पुन्हा जलबिंदू जमा झालेले दिसले. एकदम लक्षात आले की आपल्या पदातील वर्णनाला 'श्रीं'नी **'दाद'** देऊन **'गंगा'** प्रत्यक्षच प्रकट केली होती.

**''तुझा वास जेथे तेथे तेचि पुण्यधाम ''.।**
**''कवीश्वर दत्त दत्त घ्यावे गोड नाम ॥''**

******

## तितीक्षा

प.पू. श्री. दत्तमहाराजांच्या 'तितीक्षा वृत्ती' बद्दल विचार करावा तेवढा थोडा आहे. वयाच्या सत्तरी नंतर त्यांचे बीडला येणे होऊ लागले. त्या काळातील प्रसंग आहे. येथील जुन्या बाजारातील एका भक्ताने त्यांची पाद्यपूजा करण्याचे ठरविले व त्या प्रमाणे आमंत्रण दिले. आम्ही सर्वजण 'श्री' महाराजांच्या सोबत गेलो. वेळ संध्याकाळची होती. बरीच मंडळी जमल्यामुळे त्यांनी 'पाद्यपूजा' वरच्या मजल्यावर करण्याचे ठरविले. लाकडी जिना होता. एकदम खडा! पूजा पार पडल्यानंतर सर्वजण खाली उतरु लागले. श्री रघुनाथराव 'श्रीं'च्या पुढे होऊन उतरत होते व मी 'श्रीं'च्या मागे होते. अंधुक प्रकाश असल्यामुळे दिसले नाही व 'श्रीं'चा पाय निसटला. त्यांच्या डाव्या नडगीवर जोरात आघात होऊन जखम झाली. रक्त वाहू लागले. त्यांनी अजिबात प्रतिक्रिया दर्शवली नाही.

घरी आल्यावर जखम पाहिली की आम्ही कळवळलोच. ताबडतोब हाडांच्या डॉक्टरांना बोलावले. त्यांनी औषधे वगैरे दिली. आम्हालाच त्यांच्या झालेल्या गैरसोईबद्दल खूप विषाद वाटत होता. पुण्यातील आश्रमावासी आता आपल्याला रागावतील. 'श्रीं'च्या प्रकृतीची नीट काळजी घेतली नाही म्हणून दोष देतील असेही वाटू लागले. पण प.पू.'श्री' महाराज अतिशय शांत होते. ती तिथी अमावास्या होती. ते म्हणाले ''गंडांतर होते. आता टळले. कांही काळजी करु नका.'' 'श्रीं'च्या जागी दुसरे कुणीही असते तर एवढे सहन करणे शक्यच नव्हते.

यानंतर कांही दिवसांनी एकदा बीडला कावीळीची साथ सुरु झाली. ती इतकी पसरली की प्रत्येक घरात एक तरी रुग्ण कावीळाचा असायचाच. दूषित पाण्याच्या पुरवठ्यामुळे ही साथ पसरली होती. त्या वेळी प.पू.श्री दत्तमहाराज पुण्याहून बीडला येणार होते. पण तेथील सर्वांनी त्यांना सांगितले की आपण बीडला अजिबात जाऊ नका. सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेऊन ते म्हणाले ''बीडला इतरही माणसे राहतातच की! सर्वांना थोडाच कावीळ झाला आहे. त्या मुळे आमची काळजी करु नका!'' त्या नंतर 'श्रीं'चे येणे होऊन २-३ दिवस वास्तव्य झाले व नंतर पुढील प्रवासाला गेले.

******

## देवाची काळजी

'श्री' महाराजांचा बीडचा अखेरचा येण्याचा प्रसंग घडला तो त्यांची देऊळगावराजा व हिंगोलीला संपन्न झालेल्या वाढदिवसाच्या सोहळ्यानंतर. हिंगोलीहून बीडला येऊन २ दिवस राहणे झाले. तत्पूर्वी डॉ.दिलीप पुण्याला दर्शनाला गेले होते. तेंव्हाच पुणे-देउळगाव वाहन पाठवून सेवा करण्याची परवानगी 'श्रीं'नी दिली होती. त्या नुसार डॉ.दिलीप यांनी योजना केलेल्या वाहनांनी सर्व परिवार व भक्त जनांसह 'श्री' महाराज प्रथम देऊळगाव व नंतर हिंगोलीला गेले. उत्तम प्रकारे उत्साहात सर्व कार्यक्रम संपन्न झाले पण

हिंगोलीच्या कार्यक्रमानंतर 'श्रीं'ना बरेच श्रम झाल्याने थकवा आला होता म्हणून तेथून बीडला न येता थेट पुण्याला जायचे आहे असा निरोप बीडला आला. अशा निरोपामुळे काळजीत पडल्याने डॉ.दिलीप व सौ.सासूबाई(सिंधुताई) ताबडतोब हिंगोलीस गेल्या.

रात्री तेथे पोहोचायला उशीर झाला. रात्रीच 'श्रीं'चे दर्शन झाले. तेंव्हा 'श्री' म्हणाले ''डॉक्टर साहेब आम्हाला बीडला नेण्यासाठी आले आहेत. त्यामुळे आता जावेच लागेल.'' सर्वाना खूपच आश्चर्य वाटले. सुदैवाने प्रकृतीस थोडा आराम पडला. 'श्री' स्वतः सौ आईसाहेब, सौ ताईमहाराज श्री अशोकराव महाराज व परिवार जनांसह बीडला आले. एक-दीड दिवस मुक्काम झाला.

त्यानंतर त्यांना लातूरला नेण्यासाठी तेथून भक्त मंडळी बीडला आली. सर्वांनी त्यांना सांगितले की 'श्रीं'ची प्रकृती ठिक नाही. ते आता लातूर इ. कुठेही न थांबता थेट पुण्याला जातील.

लातूरच्या भक्त मंडळींनी तेथे दत्तयाग आयोजित केलेला होता. व 'श्रीं'च्या उपस्थितीत तो संपन्न व्हावा यासाठी ते आले होते. ती मंडळीपण हिरमुसली झाली. पण 'श्रीं'च्या प्रकृती मुळे त्यांनीही आग्रह सोडला.

दुसरे दिवशी सकाळी 'श्रीं'नी आम्हा उभयतांना बोलावून घेऊन सांगितले ''आम्ही १-२ दिवस येथे राहिलो. पुरेशी विश्रांती मिळाली. आम्हाला आता लातूरला गेले पाहिजे. आम्ही जर तिकडे गेलो नाही अथवा उशीरा गेलो तर ''देव उपाशी राहतील. त्यांचा नैवेद्य होणार नाही. तेंव्हा आताच इथून प्रस्थान ठेवावे.''

आम्ही तर थक्कच झालो. ''देवाची'' इतक्या कळकळीने काळजी फक्त देवच घेऊ शकतात. त्यांनी संकल्पित केलेले देवकार्य ते स्वतःच्या प्रकृ तीची काळजी न करता अगदी निर्विघ्नपणे पार पाडीत. असे कितीतरी प्रसंगी दिसून येई.

******

## आनंदमानंदकरंप्रसन्नम्

प.पू. महाराज कधीही, कोठेही प्रवचन करीत असले अथवा भक्त गणांबरोबर बोलत असले तर तेंव्हा तेथे उपस्थित श्रोत्यापैकी प्रत्येकाला 'श्री' महाराज माझ्याशीच बोलत आहेत, किंबहुना ते माझ्या मनातील प्रश्नांचेच उत्तर देत आहेत मलाच दिलासा देत आहेत असा प्रत्यय येत असे.

घरातील अनेक समस्यांचे व वैताग दायक प्रसंगांचे स्मरण करीत करीत 'श्रीं'ना भेटायला गाडीत बसून निघावे, तेंव्हा 'श्रीं'ना हे सांगू. ते विचारू अशी मोठी यादी तयार होई.

अशा विमनस्क अवस्थेत श्री रेणुका निवासच्या फाटकाची कडी काढतानाची माझी ही अवस्था, '' कोठून तरी मंद सुगंधी वायू लहरी स्पर्शून आनंद देउन गेल्या प्रमाणे'' एकदम प्रसन्नता मनाला येऊन बदलून जाई.

त्यानंतर 'श्री' महाराजांचे ते शांत धीर गंभीर तेजस्वी आणि संपूच नये असे वाटणारे दर्शन होताच मन शांत होत असे. महाराजांचे शब्द कानी पडताच मन भारावून जात असे. प.पू. सौ. आई साहेबांचे दर्शन झाले की सर्व शीण-मरगळ-वैताग-विचारांचे काहूर- कोठे जाई ते कळतच नसे.

आनंदाची, धीराची संजीवनी बरोबर घेउन येताना जेंव्हा पुन्हा परतीचा प्रवास आरंभ होई तेंव्हा आपलेच आपल्याला आश्चर्य वाटे की अरे! आपण तर महाराजांना काहीच विचारले नाही. पण हे 'वाटणे' पश्चात्तापाचे नसून श्रींच्या आश्चर्यकारक आनंददाई अनुभूती देणाऱ्या अल्प सहवासाचे, कृतज्ञतेतून येणाऱ्या धन्यतेचे असे.

******

## सर्वा मुखी मंगल बोलवावे

'श्री वासुदेव निवास'चे 'श्री वासुदेव भजनी मंडळ' प.पू. श्री दत्त महाराजांच्या आशीर्वादाने स्थापन झाले. मंडळाला नावही त्यांनीच दिले. किती वर्षे झाली पण ही यांची सेवा नियमित चालू आहे. 'श्री' महाराज स्वतः श्रवण करीत असत. ते म्हणायचे ''भक्तिभाव धारण करणाऱ्या सात्विक व श्रध्दा असणाऱ्या भगिनी लाभल्या. आवाज गोड. ''जसे गोरेबाई भजन शिकविणाऱ्या होत्या, सात्विक होत्या म्हणूनच सात्विक भाव जागृत होतोय.

'श्री' महाराज आपल्याकडे कधीच मोठेपणा घेत नव्हते. ''मला शेवटपर्यंत भजन ऐकू येऊ दे. त्यानी मला समाधान व शांती मिळते'' असेच म्हणत असत.

भजनातील सहभागी भगिनी मंडळाचे कौतुक करीत ''पेटी, तबला, टाळ सगळी साथीची संगत त्याने भजन रंगते'' असे सर्वांचेच कौतुक करीत. शाली देऊन-प्रसाद देऊन-सौ.आईसाहेबांचे हस्ते हळद कुंकू देऊन सत्कार करीत असत.

गुढीपाडव्याला भजनी मंडळाचा वाढ दिवस असे. श्री. दादा सबनीस यांचा सिंहाचा वाटा या कार्यात होता. वाढदिवसाच्या दिवशी त्यांना आपल्या गादीजवळ बसवून घेत असत. त्यांनीच स्वरचित ''श्री सद्गुरु वासुदेवायन'', प.पू. श्री लोकनाथ तीर्थायन व प.पू. श्री. गुळवणी महाराजांवर सद्गुरू श्री वामन गीतायन भजन पद्य रचना करुन चाली लावून शिकविले. 'श्रीं' ना ''ठेविले अनंते'' हा अभंग फार आवडे. तसेच भैरवीतील ''माता यशोदा चलना सिखावे। हाथ मे लेकर उंगलिया । बाजे किसन की पैंजनीया '' हे पद फार आवडते होते.

कधी चार उपदेशाचे शब्द मंडळातील भगिनींना सांगत असत ''आदराने प्रेमाने निरंतर सेवा केली पाहिजे. वेद-शास्त्रांचे सार-हे हरीचे स्मरण अखंड चित्तात राहिले पाहिजे. काया, वाचा, मनाने प्रार्थना चालू ठेवायची. परमेश्वराने मनुष्य देह उध्दारासाठी दिला आहे.

श्री शुकाचार्य महाराज पूर्ण ज्ञानी होते. तरी पण प्रभुच्या गुण गौरवात पूर्ण रंगून जात होते. परीक्षिता सारखा ऐकणारा पाहिजे मनाचा अभ्यास पाहिजे. स्मरण-निदिध्यास पाहिजे. भजन श्रवणाने मनापर्यंत परिणाम होतो.''

''त्या गोपी कामात असताना सुध्दा चिंतन करीत होत्या. भक्ति-ज्ञान-कर्म हा मार्ग परिपूर्ण रुपात भारतातच बघायला मिळेल.''

******

## साधेपणा

(डॉ.देशमुख यांच्या स्मृतीसुमनामधून)-

'साधेपणा' 'श्री' महाराजांचे ठिकाणी ओतप्रोत भरलेला होता. त्यांच्या येथील मुक्कामात हे वारंवार जाणवायचे.

एकदा आमच्या जुन्या घराच्या ओसरीवर 'श्री' बसले होते. बाजूला सुपामध्ये काळ्या मसाल्याच्या तयारीसाठी सर्व सामान काढून ठेवलेले त्यानी

पाहिले तेंव्हा 'श्री' म्हणाले''आमच्या आईसाहेबही काळा मसाला वगैरे असाच घरीच करायच्या''. हे ऐकून खूप छान वाटले.

कधी कधी 'श्री' महाराज खर्ड्याला जाताना बीड ला सहज विश्रांती म्हणून एखाद दोन दिवस मुक्काम करुन पुढे जात असत. पुढच्या प्रवासात रिझर्वेशन कांही नसायचे. गर्दीचा त्रास 'श्रीं'ना होऊ नये म्हणून आम्ही 'श्रीं'ना लवकर स्टँडवर नेऊन बस''डेपोमधे'' असतानाच त्यांना बसवून देत असू. त्या मुळे जागेची समस्या सुटायची पण विलंब व्हायचा. बराच वेळेचा अपव्यय होई. पण 'श्रीं' नी त्याचा कधी त्रास मानला नाही. उलट ''आम्हाला चांगली जागा मिळवून दिली'' असे म्हणायचे.

त्यांचे साधे राहणे, साधा पोषाख, भोजनही साधे पण चवीने जेवत असत. आवाजात मार्दव, वागण्यातील ऋजुता मनाला त्याचे ठायी आकर्षून घेत असे. सर्व चांगल्या गोष्टींचे श्रेय ते कार्यकर्त्याला देत. स्वतःकडे कांहीही न घेता- ''ईशकृपेने झाले'' असे म्हणत. अशा कौशल्याने त्यांनी स्वतःला झाकून घेतले की त्यामधे खरे महाराज कोण आहेत ते आम्हा सामान्यांना कधीच कळले नाही. आता या सगळ्या आठवणी दाटून येतात तेव्हा खूप वाईट वाटते की प्रत्यक्ष ईश्वराचा सहवास मिळूनही आपण ओळखले नाही.

ईश्वराशी तादात्म्य पावून शांत भावात ते पूर्ण अंतर्मुख व्हायचे तेंव्हा खूप जाणवायचे.

श्रीमद्‌भागवत कथा सांगताना समोर ग्रंथ उघडा असायचा. यथावकाश ते पानेही उलटायचे पण नजरेसमोर जणू तो तो प्रसंग त्यांना प्रत्यक्ष दिसत असायचा. ग्रंथातील ओवीवर त्यांची नजर स्थिर झालेली कधीच दिसायची नाही. श्रीकृष्णालीला वर्णन करताना ते सर्व काव्य स्वतः अनुभवताना जाणवायचे. गोकुळातील कृष्णाचे वर्णन करताना ''त्या वेली वृक्षांना विचारा, त्या भूमीला विचारा, त्या गोवर्धनाला श्रीकृष्णाच्या लीलांबद्दल विचारा'' असे सांगताना त्यांचा दाटून आलेला गळा'' सर्व अलौकिकच होते. अगदी मूर्तिमंत भागवतच जगत होते ते.

******

| |
|---|
| **निर्गुण गे माये गुणवंत झाला।** |
| **- ज्ञानेश्वर महाराज** |

## स्वप्नदृष्टांत

१) एकदा स्वप्नात असे दिसले की आपण श्रीवासुदेव निवास आश्रमात आहोत. वेळ रात्रीची. बराच उशीर झाल्या सारखे. सर्वत्र शुक शुकाट. बाहेर सुसाट वारा व जोडीला धो धो पाऊस कोसळतो आहे. सोबतीला कोणीही नाही.

इतक्यात आश्रमाचे समोरचे दार बाहेरून वाजवल्याचा आवाज आला. एवढ्या रात्री ते ही अशा पावसात कोण आले असा विचार करीतच दार उघडले- तो दारा बाहेर 'श्रीं' ना हातात छत्री घेऊन उभे असलेले पाहिले. 'श्री' दारातून आत आले. यांना म्हणाले तुम्ही एकट्या आहात म्हणून सोबतीला आलो व येऊन बसले.

वाऱ्या बरोबर आश्रमाची एक खिडकी उघडून तिचे शटर मधून मधून जोरात खडखड वाजून आदळत होते. एकदा त्या खिडकीची एक कांच फुटली. तुकडे खाली पसरले. इतक्यात स्वप्न संपले.

दुसऱ्या दिवशी सकाळी कांही काम नसतानाही उत्सुकते पोटी पहाटेच आश्रमात गेल्या. रात्रीच्या **''पाऊस/वादळ''** ह्याचे चिन्ह म्हणून प्रत्यक्ष त्या खिडकीची ती फुटलेली कांच समोर दिसली. **स्वप्नाचा अर्थ-प्रसंगाचा अभिप्राय, त्यांचा त्याच जाणोत.**

--------oooooo--------

२) एकदा स्वप्नात दिसले की या श्रीवासुदेव निवास आश्रमात रात्री आरतीसाठी म्हणून गेल्या. आश्रमात कोणी नाही. श्रीकृष्णा पळसकर गाभाऱ्यात बसून पाठ करतो आहे. गाभाऱ्याचे ग्रील चे शटर उघडलेले आहे. गेल्याबरोबर तो म्हणाला ''बरे झाले तुम्ही आलात. सोवळ्यात स्वयंपाक करून वाढायचे आहे. अतिथी आहेत. मी पाठाला बसलो आहे त्या मुळे उठता येत नाही.'' ठीक आहे म्हणून हातपाय धुवून आत गेल्या. कोण आले असेल याची उत्सुकता

होती. मधल्या खोलीत तीन तेजस्वी अतिथी-भस्माचे पट्टे लावलेले-रुद्राक्षांच्या माळा धारण केलेले जणू श्री दत्तप्रभूच असे होते. त्यांनी यांचेकडे प्रसन्नतेने पाहिले. वंदन करुन आत जाताना पाहिलेले स्पष्ट आठवते की तिघापैकी एक जण तीर्थाच्या कपाटा जवळ, एक जण त्यांचे समोर खिडकीखाली व तिसरे दाराच्या बाजूला बसले होते.

(आता पर्यंत यांना श्रीवासुदेव निवास मधे स्वयंपाकघरापर्यंतच वावरण्याचा व चहा दूध इ. करुन देण्याचा सराव होता पण स्वयंपाकाची वेळ आली नव्हती.)

तथापी स्त्री धर्मास अनुसरुन सर्व सुचत गेले. स्नान केले. दांडीवर सोवळ्यात ९ वारी घातलेले होते ते परिधान करुन पाक आरंभ केला. शेजारच्या फळीवरुन २ डबे काढले. एकात कणीक व एकात तांदूळ होते. स्वयंपाक करुन अतिथींना भोजन वाढले इत्यादि फारसे बारकाईने स्मरत नाही पण हे सगळे व्यवस्थित करुन मागची आवराआवर करुन ठेवल्याचे स्वप्नातील दृश्य आठवते. येथे स्वप्न संपले.

दुसरे दिवशी सकाळी आश्रमात जाणे झाले. स्वयंपाक घरात काही चहा इ. करणेसाठी गेल्या. इतर सेवेकऱ्यापैकी नित्याचे दोघेजण तेथे होते. अचानक यांचे लक्ष ओट्यावरील दोन पत्र्याच्या डब्यावर गेले. पाहिले तो एकात कणीक व एकात तांदूळ. आणि तत्क्षणी स्वप्नाचे स्मरण झाले. यांनी विचारले कांहो हे दोन डबे नेहमी इथेच असतात का? त्या सेवकाचे लक्ष इकडे गेल्यावर त्यांनी कपाळावर हात मारून घेतला. म्हणाले ‘अहो त्या आचाऱ्याने कालच रात्री सर्व डबे व संपूर्ण स्वयंपाकाचे तयारी चे साहित्य **गॅरेज मधे** (येथे आश्रमाचे मोठे स्वयंपाकघर आहे) नेउन ठेवले होते. सकाळपासून तो आचारी हे डबे शोधतो आहे. हे इथे कसे आले? कोणी आणले? कांही कळत नाही. कोणालाही आठवले नाही.’

‘श्री’नी त्या साधिकेला अति आश्चर्याने मुग्ध करुन टाकले. त्या कांहीच उत्तर देऊ शकल्या नाहीत. ही श्रीदत्तप्रभूंनी यांना नुसतेच दर्शन देऊन नव्हे तर यांचे हातून सोवळ्यात स्वयंपाक करवून सेवा ग्रहण केली हे खरे की स्वप्न?

*****

# भाव तेथे देव

अहो! हा भास नव्हे हे तर साक्षात दर्शन! जागेपणी- स्पष्टपणे आपल्याच साठी समोर आले असे निश्चित वाटण्या सारखे-

तीन चार भक्तांनी त्यांच्या समक्ष 'श्री' महाराज प्रत्यक्ष प्रकट झाले-ते वर्णन केले आहे.-

१) इ.स.१९९९, 'श्रीं' नी देह ठेवला- सर्व भक्त आपापल्या भाव भावना आवरुन ''अंत्य'' दर्शन व नंतर वैकुंठ भूमीकडे नेणार अशा वातावरणात 'श्री रेणुका निवासच्या' अंगणात जागा मिळेल तेथे बसलेले होते. फाल्गुन म्हणजे मार्च महिन्याचे उन बऱ्यापैकी वर आल्याने अंगणात स्वच्छ स्पष्ट उजेडच उजेड होता.

'रेणुका निवासाच्या' अंगणात झोपाळ्याच्या जागेजवळ थांबलेल्या कांही भक्तांपैकी फक्त एकाच दंपतीला दिसले की-

'श्री' महाराज निळी शाल पांघरून हातात काठी घेऊन उजव्या हाताच्या बोळातून बाहेर आले. समोर आले. प्रसन्न मुद्रा होती. हात उचलून (नामस्मरण चालू होते नां !) चालू द्या ! असा भाव दर्शविला व सगळीकडे पाहिले. सुमारे १-१॥ मिनिट पर्यंत यांनी 'श्रीं'ना तेथे पाहिले व नंतर मात्र ते स्वरूप मागे वळून परत गेल्या प्रमाणे अंतर्धान पावले.

२) दुसरा प्रसंग इ.स. २००५ मधील एका **आर्त** भगिनींचा आहे. दवाखान्यात ऑपरेशन झालेल्या स्थितीत त्यांचे यजमान होते. अचानक प्रकृती बिघडली व सर्व संपले की काय अशी धास्ती वाटू लागली. आपल्या समक्ष सौभाग्याला धक्का पोचण्याची वेळ आल्यावर स्त्री मनाची काय अवस्था होईल ते शब्दात सांगणे कठीण पण ह्यांनी तो क्षण प्रत्यक्ष अनुभवला. हताशपणे मदतीसाठी धावपळ सुरू होती. नवल म्हणजे दवाखान्यात पोस्ट ऑपरेटीव्ह केअर युनिट मधे असलेला रुग्ण सीरीयस झाला व एकही डॉक्टर उपलब्ध नाही. दवाखान्यातले तर नाहीच-गावातही कोणी जागेवर भेटले नाहीत. शेवटी नामस्मरण व 'श्रीं'चा तीव्रतेने धावा सुरू झाला. खोलीत बंद दारामागे बसून समक्ष घडणारे काल पुरुषाचे भीषण नाट्य बघत आहोत व आपण कांहीही करू शकत नाही ही

विफलतेतून आलेली आर्तता अंतःकरणातून नेत्राव्दारे वाहात होती.

आणि अचानक खोलीचा दरवाजा उघडून प्रत्यक्ष श्री दत्तमहाराज धोतर-उपरणे अशा नेहमीच्या पोषाखात धोतराचे टोक एका हातात -असे आंत आले व यांना धीर देऊन म्हणाले-''काही काळजी करू नका बर! यांना लवकर बर वाटेल.'' हे सर्वजागेपणी समक्ष डोळ्यांपुढे दिसले व ऐकू आले. अचानक आपण हे काय पाहतो आहोत व ऐकतो आहोत याचे भान येई पर्यंत ते रुप अदृश्य झाले.

आणि पंधराच मिनिटात एक(कोण होते न कळे) डॉक्टर आले. त्यांच्या यजमानांना तपासून कांही इंजेक्शन वगैरे दिले. आणि थोड्याच मिनिटांनी ते पूर्णपणे सावध झाले. सर्व संकट टळले.

३) सद्गुरुंच्या आजारपणातील काळात श्री.प.पू. अशोक महाराजांना कधी कधी प्रवचनासाठी जावे लागे. जाताना 'श्रीं'ना नमस्कार करताना ''आज कोणता विषय घ्यावा?''ते विचारून आज्ञे प्रमाणे तेथे तो विषय घेत असत.

'श्रीं'च्या ''नंतर च्या काळात एकदा देऊळगावराजाला जायचे होते. कांही क्षण वर्तमानाचे संपूर्ण विस्मरण झाल्या सारखे झाले. 'श्रीं'च्या नेहमीच्या बसण्याच्या खोलीचे दार उघडले. एकदम भानावर आले. अरे! आता कोणाला विचारायचे? असा कांही भाव मनात प्रकटला असेल नसेल तोंच- ''श्री एकनाथ महाराज '' असे शब्द स्पष्टपणे कानी आले! व तोच विषय घेतला . ते प्रवचन उत्कृष्ट झाले हे सांगायला नको!

******

## पितामहस्य जगतो

**पितामहस्य जगतो माता धाता पितामह ः।।**

(।।गीता अ. ९ श्लोकार्ध १७।।)

अखिल जगताचा पिता मी आहे असे परमेश्वर स्वतः सांगतो. नव्हे तसे तो दाखवूनही देतो-

'श्रीं'च्या निर्गुणरुपात लीन होण्यानंतर म्हणजे इ.स. २००० मध्ये एप्रिल महिन्यात मुलाची मौंज करण्याचे ठरवले. पहिली पत्रिका 'श्रीं'च्या फोटो समोर ठेवली व त्यांच्या अनुमतीची व आशीर्वादाची प्रार्थना केली.

पुढे मुंजीला १५-२० दिवस असताना माझ्या सासुबाईंचा फोन आला- ''अहो!तुमचे महाराज आज माझ्या स्वप्नात आले होते. ते माझ्या उशाशी बसले व त्यांनी सांगितले की तुम्ही काही काळजी करू नका. बटुच्या मौंजीची सर्व जबाबदारी आमची आहे. तो ''**आमचा** नातू आहे.''

मी सासूबाईंना म्हटले की तुमच्या स्वप्नातील व्यक्ती म्हणजे आमचे महाराजच होते हे कसे जाणले? कारण त्यांनी 'श्रीं'ना तर नाहीच पण 'श्रीं'चा फोटोही पाहिलेला नव्हता. त्यावर त्यांनी खुलासा केला की त्या स्वप्नात तुम्ही उभयता (लेक-जावई) आम्हाला आमंत्रण द्यायला पुढे होतात व मागून ते आले खोलीत आले आणि उशाशी बसले व त्यानींच सांगितले की बटु हा आमचा नातू आहे. मग सांगा बरे ते तुमचे महाराजच होते की नाही? अहो! तुमच्या महाराजांशिवाय एवढी काळजी कोण करेल?

'श्रीं'नी ज्याला आपला मानले त्याचे 'पुत्र'-'नातू' हे सर्व नातेही ते स्वतः सांगतात-आणि स्वतःची गीतोक्त अभिवचने सत्य करतात. हा त्यांचा महिमा आहे. माझे मोठेपण नव्हे.

******

## श्री गुरु चरित्र श्रवण

श्री गुरुचरित्र ग्रंथ ''श्रवण'' करावा असे त्या ग्रंथातच अनेक ठिकाणी सांगितले आहे. मात्र स्त्रियांनी तो ग्रंथ स्वतः वाचू नये हा ही दंडक आहे. श्री थोरल्या महाराजांच्या (टेंबेस्वामी महाराज) लिखाणात स्पष्टपणे उल्लेख आहे''वाचता येत असले तरी, स्त्रियांनी गुरुचरित्र वाचू नये.'' ''श्रवण करावे, ग्रंथाला प्रदक्षिणा घालाव्यात ते पुण्यही फार मोठे आहे.''इत्यादि.

हा ग्रंथ काय आहे. कोणत्या कथा आहेत हे सर्व सौ. ला समजावे अशी माझी इच्छा होती. म्हणून उभयतांच्या कागाच्या वेळा सांभाळण्याची कठीण कसरत करत करत सावकाश वाचन करीत पूर्ण ग्रंथ तिला ऐकविला. ग्रंथरुपी श्रीगुरुंची पूजा केली. त्या वेळी समोर जे दर्शन झाले ते असे होते. प.पू. श्री गुळवणी महाराज बसलेले होते व त्यांच्या पुढ्यातच प.पू. श्री दत्तमहाराज बसलेले होते. त्यांच्या उजव्या बाजूला समई लावलेली होती. वंदन करताना

लक्षात आले मी 'श्रीं' च्या मांडीवर ताजी फुले तुळशी व बेल वाहून पूजा केलेली होती.

''भाव असावा आपुले मनी । पूजा करावी श्री गुरुचरणी ।। ही श्री गुरु चरित्रातील ओवी सार्थ झालेली अनुभवाला आली.

******

## अलौकिक दर्शन

प.पू. सौ. ताई महाराजांनी 'श्रीं'च्या अपरोक्ष श्रीक्षेत्र वाडीला जाऊन समारंभ पूर्वक भगवती कृष्णामाईची पूजा केली. तिला साडी नेसवली. तो फार मोठा सोहळा झाला. नावेतून या तीरावरुन त्या तीरावर अमरापूर च्या घाटा पासून आरंभ केला व साडी नेसवीत पर तीरावरून पुन्हा अमरापूर घाटापर्यंत नांवा आल्या. सुमारे ८०-९० साड्या ९ वारी, प्रकारच्या नेसविण्यासाठी लागल्या. त्या नंतर क्षेत्रातील सुवासिनी स्त्रियांना बोलावून त्यांची खणानारळाने ओटी भरून प्रत्येकीला श्रीकृष्णामाईचा प्रसाद म्हणून १-१ साडी दिली. अन्नदान मोठ्या प्रमाणात झाले. खूप आनंद झाला.

सर्व सोहळा आटोपून दुपारची विश्रांती घेणाऱ्या एका भक्ताला डोळ्या समोर चित्रपटा सारखे हे सर्व आठवताना दिसत होते. त्यात अचानक त्याला दृष्य दिसले की - हा साडी नेसवण्याचा सोहळा पाहण्यासाठी आकाश मार्गाने श्रीदत्तमहाराज कवीश्वर एका भव्य रथात बसून संचार करीत आहेत. आशीर्वाद देत आहेत. हा अनुभव जेव्हा प.पू.श्री. ताई महाराजांना सांगण्यात आला तेव्हा त्यांनी हा अनुभव पूर्णतः सत्य आहे, खरा आहे अशी पुष्टी दिली.

******

## भक्तकाम कल्पद्रुम 'श्री' महाराज

श्री वासुदेवनिवास स्थानात संपन्न होणाऱ्या 'श्री' महाराजांच्या श्री भागवत सप्ताहाच्या श्रवणाचा लाभ अनेक महानुभावांनी घेतला आहे व त्या आनंदाचे वर्णन ही ऐकायला मिळते. त्यामुळे लक्ष्मींना तीव्र इच्छा झाली की आपणही सप्ताहाला बसावे. इतका वेळ आपल्याच्याने स्वस्थ बसवेल की नाही याची शंका मनाला जाचत होती.

प्रत्यक्ष सप्ताह सुरू असताना एकंदर व्यवस्थेसाठी सेवेकरी स्त्रिया आश्रमात हाताला मिळेल ते काम करण्यात मग्न असत. हॉल मधे एका ठिकाणी बसून सप्ताह ऐकायची जरी इच्छा केंव्हा केंव्हा होत असली तरी त्या इतकीच महत्वाची गोष्ट म्हणजे ही व्यवस्थे संबंधीची सेवा आहे. लक्ष्मी या सेवेत नेहमीच असत.

''तुझ्या भजकांची सेवा करो कर ।
हाची देई वर वरदेशा ॥''--श्री सद्‌गुरु वासुदेवानंद सरस्वती महाराज
ह्या भावनेने सर्व सेवा सुरू असे.

त्यापैकी एका सेवक भगिनींनी लक्ष्मींची इच्छा जाणून त्यांना सुचविले की ज्या वास्तुत 'श्री' महाराज बसून श्रीमद् भागवत कथा सांगतात त्या वास्तुला यथाशक्ती प्रदक्षिणा घातल्या तर सप्ताह श्रवणा इतकाच लाभ आहे. ही सूचना त्यांना एकदम आवडली व तात्काळ अंमलात आणली, यथाशक्ती वासुदेव निवासाला प्रदक्षिणा घालणे सुरू केले. अर्थात त्यावेळी 'श्रीं' चे भागवत आंत सुरू असे.

एके सकाळी लक्ष्मी आश्रमात गेल्या गेल्या 'श्रीं' नी त्यांना त्यांचे नाव एकेरी उच्चारून जवळ बोलावले. हे प्रथमच घडले. 'श्री' कधी अहो-जाहो शिवाय बोलत नसत. काय महाराज? म्हणून जवळ जाऊन विचारले. 'श्रीं' नी जवळचे कोऱ्या नोटांचे बंडल यांना दिले व सांगितले ''इथे ऐकणाऱ्या सर्व सुवासिनींना हळद-कुंकू लावून एक एक नोट दक्षिणा देऊन वंदन करावे तसेच प्रत्येकीचे नांव एका कागदावर लिहून घ्यावे''. ह्या प्रमाणे काम पूर्ण केले तो त्यांच्या हातात तीन नोटा उरल्या. 'श्रीं'ना देण्यासाठी गेल्या, तितक्यात आणखी दोन सुवासिनी आल्या. 'श्रीं'नी त्यांनाही देणेस सांगितले. उरलेली एक नोट 'श्रीं' ना परत केली. 'श्रीं' नी ती यांना आग्रहपूर्वक **'प्रसाद'** म्हणून दिली. ''सुवासिनींच्या नावाची यादी चांगल्या अक्षरात लिहून आणून देते '' असे म्हणताच ''आम्हाला तुमचे अक्षर कळते '' म्हणाले व कागद ठेवून घेतला.

एवढी सेवा यांच्या कडून करून घेतल्याचे प्रतिफळ जे मिळाले ते आश्चर्यकारकच होते--

**''स्वप्नात लक्ष्मींना श्रीवासुदेव निवास चा हॉल दिसला. 'श्रीं' त्यांच्या व्यासपीठावर विराजमान होते. त्यांच्या गळ्यात ताजा हार होता. समोर श्री**

**गोपाळ कृष्णांच्या मूर्तीला ताजा हार व फुले वाहिलेली होती. संपूर्ण हॉल मध्ये नव्या कोऱ्या लाल रंगाच्या सतरंज्या अंथरलेल्या होत्या. वातावरण पूर्ण शांत प्रसन्न होते. मात्र लक्ष्मी या एकट्याच तेथे 'श्रोता' होत्या व 'श्री'महाराज श्रीमद् भागवत कथा यांना सांगत होते'' अखंड असा ७ दिवस व ७ रात्री मिळून सांगितलेला कथाक्रम सुरू होता व श्री शुक मुनींनी परीक्षित राजाला सांगितलेली संपूर्ण कथा 'श्रीं' नी सांगितली.''**

******

## दुसऱ्या रुपाने येऊन भेटले

मुंबईच्या एका भक्ताचे वडील कॅन्सरने आजारी होते. दवाखान्यात होते. तशातच 'श्री' महाराज मुंबईला आलेत असे कळले. या भक्ताने 'श्रीं' ना विनंती केली की त्यांनी एक वेळ वडीलांना आपल्या कृपादृष्टीने पहावे. त्या साठी नेण्या आणण्याची गाडीची व्यवस्थाही त्यांनी केली होती. पण 'श्रीं'च्या दौऱ्या दरम्यान सर्व नियोजनाचे काम पाहणाऱ्या भक्ताने सांगितले की 'श्रीं'ना दवाखान्याकडे यायचे अजिबात जमणार नाही. निराश मनाने हा भक्त परतला. 'श्रीं' ची प्रार्थना सुरुच होती.

दुसरे दिवशी सकाळी त्या हॉस्पिटल समोर एक पांढरी फियाट गाडी येऊन थांबली. 'श्री' महाराज त्यातून उतरले. ह्या भक्ताच्या आजारी असलेल्या वडीलांना भेटून विचारपूस करुन सांत्वना दिली व सर्वांचा निरोप घेउन त्याच गाडीत बसून 'श्री' निघून गेले. त्या भक्ताला समाधान वाटले. प्रार्थना 'श्रीं' नी ऐकल्यामुळे आनंदही झाला.

प्रत्यक्ष मात्र वेगळेच घडलेले नंतर कळले. 'श्री' महाराज प्रत्यक्षात आदल्या दिवशीच मुंबईहून परत गेले होते.

दुसऱ्या रुपाने येउन (''गाडी मुळे शंका आली नाही'') भेटून गेले.

******

> **जगत्पितरो वंदे पार्वती परमेश्वर।**
>
> -...............

## प. पू. सौ. आईसाहेब

भजनी मंडळातील सर्व भगिनींना, सौ.आईसाहेब म्हणजे आपल्यातल्याच एक, असे वाटे. बरोबरीने गप्पा, प्रसंगी चेष्टा, हास्य विनोद अशा बोलण्याने त्या आपले शक्तिस्वरुप झाकून घेत असत. प.पू.श्री गुळवणी-गुरुमहाराजांच्या अत्यंत लाडक्या सूनबाई आईसाहेब होत्या. यांचे वंदन करणे (नमस्कार) व त्यांचे प्रेमभाव वेगळ्याच अधिकाराची जाणीव करून देत असे.

एकदा सौ.आईसाहेब भजनी मंडळातील भगिनींना म्हणाल्या ''मला सौभाग्याने मरण हव आहे.'' हे ऐकून सर्व भगिनींनी एकत्र बसून मनोभावे प.पू.श्री.गुळवणी महाराजांना तशी प्रार्थना केली.

वास्तविक उभयता 'श्री' व सौ.आईसाहेबांच्या प्रकृती स्वास्थाचा उत्तम उत्साही व आनंदी असा तो काळ होता.अशा वेळी आपण हे भलतेच काय मागितले? असे नंतर भगिनींना वाटू लागले व आपल्या सहज भावात केवढी अनर्थकारी मागणी आहे हे जाणवून,''आपण हे काय केले?'' असे वाटू लागले.

शेवटी मात्र सौ.आईसाहेबांनी **आपलेच** खरे करून घेतले.

******

## देव देवा दत्ता

प.पू.सौ.आईसाहेब बऱ्याच आजारी झाल्या. काही काळ हॉस्पिटल मध्ये नेले होते. घरी नवरात्र स्थापनेचा काळ असताना 'श्रीं' नी सौ.आई साहेबांना दवाखान्यातून घरी आणविले आणि त्यांच्या प्रकृतीला बराच आराम पडला. रोज त्यांच्या जवळ बसून -

''देव देवा दत्ता, तव पदी चित्ता
ठरवी विश्वनाथा, कथा गाता ॥१॥
माझी वाणी गुण तुझे वाखाणून
रमो हेचि धन दान दे गा ॥२॥

तुझ्या भजकांची सेवा करो कर।
हा चि देई वर वर देशा ॥३॥
मन द्रवो माझे गुण गात तुझे ।
उतरे कर्म ओझे माझे जेणे ॥४॥
सकंप रोमांच अंगी व्हावे ऊंच ।
न दिसावे उंच नीच कोठे ॥५॥
जेवी श्येन जाळे तोडूनिया पळे ।
तैसे भव जाळे तोडवी हे ॥६॥
आता माझा भाव तव पदी ठाव ।
घेवो हे वैभव नित्य असो ॥७॥

प.पू. सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांनी रचलेली ही प्रार्थना रोज म्हणायला सांगितली.

ब्राह्मण द्वारा श्रीगुरुचरित्र सप्ताह पारायण संकल्प पूर्वक करविले. श्री क्षेत्र नरसोबाची वाडी येथील प्रसिध्द वैदिक वे.मू.श्री.बोरगावकर यांना मुद्दाम पत्र-पैसे पाठविले व तेथेही सौ.आई साहेबांच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी संकल्प पूर्वक अनुष्ठान करविले.

त्या नंतर सौ. आई साहेब बऱ्या झाल्या पण त्यांनी आपल्या वाणीचा संकोच केला. बोलत नव्हत्या.

******

## शिवशक्तीचे अद्वैत

त्याच सुमारास एक साधक भगिनी रेणुका निवासात 'श्री' महाराजांचे दर्शनास मुंबईहून आल्या होत्या. या भगिनींच्या मनात असे तीव्रतेने आले की 'श्री' महाराजांनी डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद द्यावा. पण 'श्रीं' ना वंदन केल्यावर तसे घडले नाही. त्या नंतर या भगिनी सौ. आईसाहेबांना वंदन करण्यास आल्या. सौ. आईसाहेबांना खुर्चीवर बसविले होते. त्या साधक भगिनींनी 'हे गुरु आप चिन्मयानंद' ही महाराजांची स्तुतीपर रचना म्हणून दाखविली व नमस्कारासाठी पायावर डोके टेकवले. वर उठणार तेवढ्यात सौ.

सुलभाताई म्हणाल्या, ''उठू नका, आई डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद देत आहे.'' महाराजांनीच जणू डोक्यावर हात ठेवला होता !'

अतरंगातून 'श्रीं' चे व सौ. आई साहेबांचे काय संकेत वहन झाले न कळे पण एका ठिकाणी धरलेली इच्छा दुसरी कडे पूर्ण झाली, शिवःशक्ती चे असे ''अद्वैत'' क्वचितच प्रकट होत असे.

--------०००००० --------

भक्त मंडळींनी 'श्री' महाराजांना वारंवार प्रार्थना करून '' सौ.आई साहेबांना बरे करा'' असे विनविले. त्याचे प्रतिक्रियात्मक स्वरुपात 'श्रीं' नी सौ आई साहेबांना हळद-कुंकू लावण्यासाठी दिले व तीर्थ ही पाठवले. ते रोज दिले जात असे.

'श्री' महाराजांचा व सौ.आईसाहेबांचा कांहीतरी संवाद व्हावा व आपल्याला श्रवणाचा लाभ व्हावा म्हणून खूप प्रयत्नपूर्वक सौ.आई साहेबांना त्या अस्वस्थ अवस्थेत हळूहळू 'श्रीं' चे खोलीत नेले. 'श्री' त्यावेळी पेपर वाचत होते. आसनावर थोडे बाजूला सरकून सौ. आई साहेबांना जवळ बसवून घेतले. व पुन्हा पेपर वाचू लागले. सगळ्यांनी उभयतांना पुन्हा प्रार्थना केली. सौ.आई साहेबांनी पेपर वर थाप मारली. तेव्हा ''काय पाहिजे?'' एवढेच विचारले. व पुन्हा वाचन सुरू झाले. सौ आई साहेब भक्तांना म्हणू लागल्या '' हे बघा! अस असत यांच.'' भक्तांनी 'श्रीं' जवळ कुंकू व तीर्थ ठेवले. 'श्रीं' नी सौ. आईसाहेबांना कुंकू लावले व तीर्थ दिले व ह्या प्रसंगानंतर 'श्री' महाराज सगळ्यांना तीर्थ देऊ लागले. ''ह्यांना आत घेऊन चला'' म्हणाले.

--------०००००० --------

एकदा सौ.आईसाहेबांना श्रीगणपतीची पार्थीव पूजा करायची होती. तेंव्हा 'श्री'महाराजांनी स्वतःपूजा सांगितली. नंतर 'श्री' खोलीत गेले.

सौ. आई साहेबांनी मुलांच्या हातून रु.१० दक्षिणा म्हणून 'श्रीं' ना देण्यासाठी पाठवले. ''गुरुजींना दक्षिणा द्या''.

'श्री'. म्हणाले गुरुजींना इतकी दक्षणा पुरत नाही. ''एवढ्या दक्षिणेत कोणी काम करीत नाही'' म्हणाले.

*****

## पत्रे

### प.पू.श्रीदत्त महाराज यांचा धारवाडचा संबंध

'श्री' महाराजानीं वाडीला वेदाध्ययन आपल्या पू.वडीलांकडे संपवून तसेच श्रीब्रह्मश्री पूर्वाश्रमीय शंकरशास्त्री जेरे यांच्याकडे साहित्य व्याकरण अध्ययन करून धारवाडला १९३०-१९३१ साली न्याय वेदांत शास्त्राभ्यासाकरिता आगमन केले. आरंभापासून बाधांत (संपूर्ण न्यायशास्त्र) अध्ययन आपल्या पूज्य वडीलांचे (श्री. पू. नागेशाशास्त्री) कडे अध्ययन केले. न्यायाशास्त्रातील प्रौढवाद ग्रंथ पाठा बरोबर प्रस्थानत्रयी शांकरभाष्य प्रकरण ग्रंथासह अद्वैतसिद्धी पर्यन्त वेदांत ग्रंथांचाही पाठ घेतला. मध्ये मध्ये नरसोबावाडीला ब्रह्मश्री पंडितप्रवर आत्मारामशास्त्री जेरे यांचेकडे अधीतग्रंथांची चिंतनिका ही करीत असत. यांची मेधाशक्ती विलक्षण असल्याने दहा वर्षाचे अध्ययन अवघ्या पांच सहा वर्षामध्ये पूर्ण केले. न्याय वेदांतांची निरूपण पध्दत उत्तमरीतीची असल्याने काही दिवसानंतर आलेल्या पंडित श्रीपादशास्त्री जेरे, पंडित आखुरडेकर, पं.कोडणीकर, पं गाडगीळ, श्रीमान् ह.रा. महाजनी (मुंबईच्या लोकसत्ता वृत्तपत्र संपादक) ,पं. विष्णुशास्त्री खरे, पं. फडके शास्त्री यांना स्वतः पाठ सांगून तयार करीत होते. शेवट पर्यंत त्यांनी अध्ययन करून पुणे वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या न्यायशास्त्रातील तीन परीक्षा व म्हैसूरचे विद्वत् पूर्वभाग परीक्षांमध्ये उत्तमश्रेणीत उत्तीर्ण होवून गुरूजीनां ही कीर्ती आणली. बाकी यांचे सहाध्यायी अर्धवट अध्ययन करून आपापल्या गांवी गेले. मला पण धारवाडला न्यायातील काही विशिष्ट विषय तसेच नंतर पुण्यातील श्री शंकराचार्य मठात व नरसोबावाडी येथे उत्तरवाद न्यायशास्त्राचे काही ग्रंथ सांगितले. धारवाडला हे श्रीमान् केळकर वकील यांचेकडे मुक्कामाला होते. पाठशाळेत व आमच्या घरी पाठाला येत असत. त्या विद्यार्थिदशेतही ह्यांचे सात्विक व गांभीर्ययुक्त स्वभाव पाठशाळेच्या विद्यार्थी वर्ग, व्यवस्थापक व परिचित लोक या सर्वांना आदर व आत्मीयता प्रापक होता. यांचे सभेतील

भाषणे व पाठ सांगणे वगैरे अत्यंत बोधक व परिमित होत असे. आपल्या बुध्दिमत्तेने इतर सर्व शास्त्रांचेही अवलोकन, संशोधन पुस्तक लेखन, प्रवचन वगैरे केले होते. विनोद, चेष्टा, इतर निन्दा, रागात बोलणे वगैरे आम्ही त्यांच्या हयातीत केव्हा ही पाहिलेले नाही. धारवाड, मद्रास, कांची शकटपुर मध्ये झालेल्या विद्वत्सभामध्ये मोठ मोठ्या नावाजलेल्या पंडितसमुदायामध्ये यांचे वाक्यार्थ निरूपण निर्दुष्ट व वर्णनीय होत असे.

धारवाड पाठशाळेवर त्यांचा विशेष आदराभिमान असल्यामुळे स्वतः व भक्तलोकां कडून पुष्कळ मदत करवीत होते. म्हणूनच त्यांचे आज्ञेने, आता ही त्यांच्या आज्ञेवरून श्रीवासुदेवाश्रम संस्थेकडून साहाय होत आहे. त्यांच्या हयातीं आम्हाला व चि. राजेश्वराला शेकडों पत्रें लिहीलेली आहेत. प्रत्येक पत्रामध्ये त्यानीं पुष्कळ शास्त्रीय विषयांचा व्यवहारातील सात्विक वागणुकीचा प्रमाणपूर्वक उल्लेख केला असून ती मननीय होत आहे. आम्हाला कित्येक शास्त्रीय विषयांतल्या संशयाचे पुष्कळ वेळ निवारण केले आहे. श्री जगद्गुरु शृंगेरी, कांची कुडली शृंगेरी, द्वारका, संकेश्वर या सर्व पीठाधिपति जगद्गुरूंचा यांच्यावर अनुग्रह झालेला आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे. एकंदर त्यांची व्यक्तिमत्ता दुसऱ्या ठिकाणी आम्हास कोठेही दृष्टीस पडत नाही. शास्त्रीय ज्ञान, सदाचार संपत्ति, पारमार्थिक विचार, विवेक, वैराग्य, सर्वत्र आत्मीयता, माननीय मान्यता, केवल गुणग्राहकत्व हे सर्व असाधारण गुणांचा एकत्र समुदाय यांच्या ठिकाणी दिसत होता. म्हणून त्यांच्या स्मरणाने संसारात आम्हाला वरचेवर होणाऱ्या सुखदुःख द्वंद्वांमध्ये समाधान होत असते. त्यांच्या सहवासात घडलेले पुष्कळ प्रसंग आहेत. त्या सर्वांचा येथे संक्षेप केले आहे.

- भालचंद्रशास्त्री अग्निहोत्री

श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य संस्कृत पाठशाळा
धारवाड.

******

## 'श्रीं'चे धारवाड स्थानाशी असलेले नाते

श्री प.पू. दत्तमहाराजांचे स्मरणीय चरित्रांश

''अभ्यासयोगेन तथा मामिच्छाप्तुं धनंजय''।

ब्रम्हश्री विजरामान विद्यावाचस्पति श्री दत्तात्रेय शास्त्री कवीश्वर महाराज यांची चरित्रें, त्यांचे भक्तांनी या पूर्वी काही प्रसिध्द केलेली आहेत. त्यांमध्ये जन्मापासून त्यांचे सचरित्र प्रकाशित केलेले आहे. प्रायः त्यांच्या जन्मापासून सर्व विषय यथोचित आलेले आहे. आता त्यांचे परमभक्त श्रीयुत रघुनाथराव कुलकर्णी यांनी त्यांचे बरोबर पुष्कळ ठिकाणी सभा आणि शास्त्र वाक्यार्थ श्री भागवत सप्ताह प्रवचनादिकामध्ये पुष्कळ वेळा प्रत्यक्ष संनिध होवून त्यांच्या थोरवी बद्दल अनुभव घेतलेला आहे. यातील काही अंश दुसऱ्या चरित्रामध्ये आलेले दिसत नाही. त्यांच्या प्रकाशनासाठी यांनी सध्या उपक्रम केला आहे.

'श्री' महाराज हे धारवाडला आमचे वडीलांच्या ठिकाणी न्याय वेदान्तादि प्रौढ शास्त्रामध्ये अध्ययन करीत असताना त्यांची बुद्धीमत्ता सूक्ष्म विषय ग्राहकता, आपल्या सहाध्यायांना सुध्दा अवांतर ग्रंथ बोध करुन देणे, तथा सर्वांशी अत्यंत प्रेमाने व सात्विकपणाने वागणूक हे सर्व आम्ही प्रत्यक्ष पाहून अत्यंत अचंभा वाटत होता. नित्यानुष्ठानतत्परता, शास्त्रव्युत्पत्तिमुळे नूतन ग्रंथांचे अवलोकन,निबांर्कादि इतर मताचार्यांचे सविस्तर ग्रंथ लिहून त्यांना उपकृत करीत होते. आपण स्वतः श्री शंकराद्वैतमतानुयायी असून केवल द्वैत तत्वाचा त्यामध्ये प्रवेश खंडनादिक मुळीच करीत नव्हते. काही जिज्ञासू आयुर्वेद बौध्द जैन ग्रंथ सुध्दा शिकविले तरी त्यांचे कडून गुरुदक्षिणा त्यांनी आग्रह केला तरी घेत नव्हते.

आमच्या पाठशाळेवर अत्यंत आत्मीयता बाळगून जिकडे तिकडे भागवत सप्ताहादि द्वारा मिळालेला दक्षिणा संभावनादि अर्थसंग्रह सुध्दा इकडे पाठवित असत.

आमच्या पूज्य वडिलांच्या विषयी त्यांची पूज्य भावना, निष्ठा तर अत्यंत अभिनंदनीय असे. त्या निमित्ताने मला आमचा चिरंजीव राजेश्वराला न्याय

वेदांत मीमांसा शास्त्रांचे अध्यापन केले होते. श्री जगद्गुरु शृंगेरी मठ, श्री कांची मठ,शकट श्री विद्या मठ वगैरे पीठाधिपतींचे सभामध्ये यांचे निरुपण योग्य व अनाक्षेप्य असे होते.

आमच्याकडे काही कठीण प्रसंग आल्या वेळी सूक्त सल्ला देऊन समाधान करत होते. आणि साधारण विद्वानांचे गुण परमाणु पर्वतीकरणरुप संतांचे सद्गुण त्यांच्या ठिकाणी अनेक वेळा दृष्टीस पडत होते म्हणून

मनसि वचसि काये पुण्यपीयूषपूर्णाः
त्रिभुवनमपकारश्रेणिभिः प्रीणयन्तः।
परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं
निजहृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः।

या वर्णनातील सर्वगुण त्यांचे ठिकाणी आत्मीयांना भासत होते.

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यवर्य परमपूज्य श्री वासुदेवानंदसरस्वती (श्री टेंबेमहाराज) स्वामींचा अनुग्रह यांच्या बालपणामध्येच आपल्या पिताजींच्या मांडीवर असताना मस्तकावर हात ठेवून झाला होता असे यांचे सौ. मातोश्रींकडून समजले होते. श्री महाराजांचे (श्री टेंबे महाराज) ग्रंथ समुदायांचे लेखन करुन, पुष्कळ श्रम वाहून, प्रकाशन केलेले सर्वांना माहीत आहे. यांच्या घराण्यात प्रत्यक्ष श्री मंगलमूर्ती गणपतीचा अनुग्रह झाल्याचे अत्यंत विशेष आहे. देऊळगांवराजा नगरातील आसपास लोक यांना व यांच्या वडीलांना देव मानीत होते. अशी लाखातील एक व्यक्ती भारताचे भूषणरत्न असून अजरामर की भाजन आहेत. त्यांचा अदृश्य आशीर्वाद सदा आमच्यावर असो अशी श्री दत्तमहाराजांच्या चरणी प्रार्थना आहे.

भालचंद्रशास्त्री उप्पिनबेटगेरी

-श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य संस्कृत पाठशाला, धारवाड

******

## वात्सल्यमय श्री दत्तमहाराज

१९७३ मध्ये मी वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या पहिल्या परिक्षेसाठी आलो होतो. त्या वेळी माझे परिक्षक म्हणून श्री दत्तमहाराज आले होते. त्यावेळी महाराजांनी सांगितलेले अनेक हित वाक्ये माझ्या अध्ययनाच्या मार्गात दीपस्तंभासारखी झाली. 'श्री' महाराजांचे संबंध व सहवास आमच्या घराण्याला अत्यंत निकट असे होते. त्यावेळी त्यांनी माझ्यावर दाखविलेल्या वात्सल्याला सीमा नाही.

१९८० मध्ये मी महाराजांकडे वेदांत वगैरे शास्त्रांच्या अध्ययनासाठी आलो असता श्री वासुदेवनिवास मध्ये पू. 'श्री' महाराज नव्हते. परगावी गेले होते. लगेच दुसरे दिवशी महाराजांनी मला एक पत्र पाठविले, ''नचिकेत ब्रह्मविद्या शिकण्यासाठी यमराजाच्या घरी गेले असता ते घरी नव्हते. यमाच्या स्थितीप्रमाणे झालेल्या माझ्या प्रमादाबद्दल देवांनीच क्षमा करावी.'' हे वाक्य बघून मला अत्यंत आश्चर्य वाटले व भ्रमित झालो.राष्ट्रीय पंडित,विद्यावाचस्पती व महापंडित यांच्या तोंडून अशी वाक्य प्रगट होणे म्हणजे सर्वातिशय विनयच याचे कारण होऊ शकते. प्रथम न्याय चूडामणि परीक्षेसाठी काही प्राचीन न्याय ग्रंथ सांगून नंतर वेदांतातील प्रकरण ग्रंथ व प्रौढ ग्रंथ यांचे पाठ घेतले. पाठ सांगताना त्यांचे वाक्‌चातुर्य, सरळ व सउदाहरण समाजावून सांगण्याची पध्दत अत्यंत आश्चर्यकारक होती. त्यांचा सरळ स्वभाव, सहनशीलता, समन्वय दृष्टी, निरपेक्ष वृत्ती, उपकार प्रवृत्ती, संस्था चालविण्याची क्षमता, मार्मिक गोष्टी सांगणे, दुसऱ्याच्या मनाला खेद होऊ नये अशा गोष्टी करणे, कष्ट सहिष्णूता हे सर्व असाधारण गुण त्यांच्यामध्ये होते.

पू.महाराजांच्या ७५ वर्ष जयंती उत्सवामध्ये प्रदान केलेल्या मानपत्रामध्ये त्यांच्या सहिष्णुतेविषयी मी एक श्लोक लिहिला आहे.

''क्षान्तिर्धर्ममहिरूहस्य निबिडच्छायेति जेगीयते
पूर्वैर्योगिभिरेतया स्वतपसः साफल्यमासद्यत।
तिष्येऽ स्मिन् कलुषाधिके हि भुवनं स्वाधारशून्यात्मकं
जानन्ती नितरामशिश्रयदिमान् विद्यानयद्यन्वितान्॥''

धर्म नांवाच्या वृक्षाला सहिष्णुता ही सावलीप्रमाणे आहे. स्वतःच्या तपश्चर्येच्या साफल्यासाठी योगीजन या सहिष्णुतेचा आश्रय घेतात. या कलीकाळामध्ये पाप अधिक झाल्यामुळे मला कोणाचाही आश्रय नाही. म्हणून ही सहिष्णुता त्यांचाच आश्रय घेते.

या श्लोकाचा अर्थ महाराजांमध्ये अक्षरशः दिसून येतो.

पुण्यात मी अध्ययन करीत असताना मला एकदा ताप आला. हे कळल्यानंतर पू. 'श्री' महाराजांनी मला एक खडीसाखरेचा खडा अभिमंत्रून दिला. दुसरे दिवशी ताप कमी झाला. व मी स्नान केले. पू. 'श्री' महाराजांनी नको म्हणत असता स्नान केल्याचे पाहून ''तुझी सदाचार निष्ठा चागली आहे'' असे व्यंग वाक्य मनाला लागण्यासारखे सांगितले.''

बेंगळूर मध्ये लोककल्याणासाठी ''गायत्र्यादी कोटी होम'' संपन्न झाले. त्यावेळी हजारो ऋत्विजांनी १०८ कुंडामध्ये होम केला. एवढ्या मोठ्या कार्यामध्ये अधिकारी मंडळांमध्ये वैमनस्य निर्माण होणे सहाजिक आहे. पू. 'श्री' महाराजांमुळे वैमनस्य दूर होऊन निर्विघ्नपणे होम संपन्न झाला.

एकदा कांची जगद्गुरु श्री जयेंद्र सरस्वती पुण्यात आले असता पू. महाराजांचा सत्कार खालील शब्दात केला.

''आचार्याः शंकराचार्याः सन्तु मे जन्मजन्मनि''

श्रीशंकर भगवत् पादाचार्य एकदा गुरु झाले म्हणजे पुन्हा जन्म नाही. येथे ''जन्मजन्मानि ''म्हणून दोन वेळा का म्हटले आहे? असे शंकराचार्यांनी विचारले, तेव्हा महाराज म्हणाले, शंकर भवत् पादाचार्याच्या अद्वैत तत्वाने ज्ञान प्राप्ती झाल्यानंतर एकच जन्म होतो सामान्यजनांना निष्काम कर्म द्वारा ज्ञान प्राप्ती करुन घेऊन प्रारब्ध भोग भोगण्यासाठी जन्मांतर आहे.'' असे तात्पर्य सांगून दहा मिनिटे प्रौढ संस्कृत भाषेमधील निवेदन ऐकून श्री स्वामी महाराज (श्री शंकराचार्य) आश्चर्यचकित झाले.

पू.महाराजांच्या सान्निध्यात असताना अविस्मरणीय असे अनुभव दररोज मला येत होते. तेच अनुभव आज प्रति क्षणाला सुख व समाधान देत आहेत.

विद्वत्जनांच्या संपर्कामुळे आमचे अज्ञान कसे विलयाला जाते याचे अनुभव 'श्री' महाराजांकडूनच अनुभवाला आले व पहावयास मिळाले.

पू. 'श्री' महाराजांबद्दल पुष्कळ गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. मुख्य गोष्टी मात्र मांडल्या आहेत.

-राजेश्वरशास्त्री उप्पिनबेटगेरी

प्रधानाध्यापक

श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य संस्कृत पाठशाला, धारवाड.

******

**माझ्या हृदयीचा विसावा**
**गीती गाता जीवा गोड वाटे**
**- नामदेव महाराज**

## एका भक्तांचे डायरीतून

श्री दत्त महाराजांचे वैरागला पत्र आले. राजा देउळगावला दत्त याग (तीन दिवसांचा कार्यक्रम) तेथील ब्रह्मवृंदांनी श्री. दत्तमहाराजांच्या हस्ते करण्याचे ठरविले. त्यासाठी निमंत्रण. महाराजांचे अनेक कार्यक्रम वरचेवर होत असत. सर्व कार्यक्रमांना जाणे मला जमत नसे. सौ. सुमनला मी पाठवीत असे. मी एखाद्यावेळी जात असे. पण या वेळी मी जाण्याचे ठरवले व तसे 'श्री' महाराजांना कळवले. दहाबारा दिवस अवकाश होता. मी हॉस्पीटल मधे नवे रुग्ण ठेवणे थांबविले. हळू हळू आधीचे रुग्ण घरी पाठवणे सुरू केले. दोन दिवसांनी माझ्या मामांचे पत्र व त्याच्या नातवाची लग्न पत्रिका आली. नेमकी तारीख दत्तयागाचे तिसरे दिवशी व श्रीमंत पूजन दुसरे दिवशी रात्री. माझे मामा माझे पालक. मी सहा महिन्यांचा असताना माझे वडील वारले. तेंव्हा पासून मामा माझे पालक. त्यामुळे मानसिक ताण आला. मी दत्तयागासाठी येईन असे महाराजांना कळवले होते. आता काय करावे सुचेना. विचार करून मी दत्त यागाला जायचे ठरवले. त्या प्रमाणे राजा देउळगावी गेलो. पहिला दिवस उत्तम पार पडला. त्या संध्याकाळी मनोनिग्रह करुन श्री. दत्तमहाराजांना भेटून सर्व परिस्थिती सांगितली. 'श्री' महाराजांनी मला लगेच पुण्याला जाण्यास सांगितले. **ते म्हणाले ''शरीराने येथे राहून मन सारखे तिकडे जाणार '' त्या पेक्षा शरीराने तिकडे रहावे, त्या मुळे मामांनाही बरे वाटेल आणि तुमचे मन इकडचे राहील.''**

त्या प्रमाणे मी त्या रात्रीच निघालो व पुण्याचे लग्न विधीस हजर झालो. असे आदर्श व अचूक मार्गदर्शन व पूर्ण समाधान 'श्री' महाराजच करू शकतात.

--------००००००--------

## धन्य तो दिन

बार्शीला प.पू. श्री. डोंगरे महाराज यांचा निरोप त्यांच्या उपासकांपैकी चंडक दौलत यांना आला. श्री. डोंगरे महाराजांना त्यांचा भागवत सप्ताह भगवंताच्या नगरीत (बार्शीत) करावयाचा आहे.

त्यांचा सप्ताह फार मोठ्या स्वरुपाचा असतो. त्यासाठी भगवंत मंदिराजवळचे भगवान मैदान आहे. मोठा सभामंडप घालून कार्यक्रम करणेचे ठरले. त्या प्रमाणे पंधरा हजार लोकांना बसता येईल अशी सोय करण्याचे ठरले. त्या प्रमाणे लाऊड स्पीकर, लाईटची सोय व अनेक टी.व्ही. सेट (मागील लोकांना नीट दिसेण्यासाठी). अशी सोय करण्याचे ठरले. व तसे श्री डोंगरे महाराजांना कळविले. नंतर त्यांनी तारीख दिली.

त्या नंतर श्री. डोंगरे महाराजांनी श्री दत्तमहाराज यांना पत्र पाठवून विनंती केली या सप्ताहात एक दिवस आपण यावे. त्याला श्री. दत्तमहाराजांनी संमती दिली व तारीख सांगितली. ठरल्या प्रमाणे सप्ताह सुरू झाला. प्रचंड लोक समुदाय हजर होता. मंडप थोडा वाढवावा लागला.

ठरल्या प्रमाणे श्री दत्तमहाराज बार्शीला भगवंत मंदिरालगत असलेल्या गणपती मंदिरात श्री. विठ्ठल कुलकर्णी यांचे कडे उतरले. व सकाळी सप्ताह स्थानी येत आहोत असा निरोप श्री. डोंगरे महाराजांना पाठवला.

सकाळी लवकरच आन्हीक आटोपून सप्ताह मंडपाकडे निघणार एवढ्यात श्री. डोंगरे महाराज स्वत: गणपती मंदिरात आले. श्री दत्तमहाराज सामोरे गेले. श्री. डोंगरे महाराजांनी साष्टांग नमस्कार घातला. सर्वांना महद् आश्चर्य वाटले. श्री. दत्त महाराज नमस्कार करण्याचे तयारीत असतानाच त्यांचे दोन्ही हात धरून पुन्हा वंदन केले व नम्रतेने विनंती केली- ''आम्ही पुढे जात आहोत, आपणही थोड्याच अवधीत यावे.''

त्या प्रमाणे सुमारे दहा मिनिटात श्री. दत्तमहाराज निघाले. मांडवात पोचताच सर्व लोक उभे राहून दोन्ही महाराजांचा जयजयकार झाला. स्वत: श्री. डोंगरे महाराज पीठावरून खाली येउन श्री. दत्तमहाराजांना सामोरे आले व पीठावर घेऊन गेले.

तेथे पीठावर एक व्यासपीठ असून त्यावर बसून रोज श्री. डोंगरे महाराज भागवत कथन करीत असत. त्या व्यासपीठावर बसण्याची विनंती श्री. डोंगरे महाराजांनी श्री. दत्तमहाराजांना केली.

**श्री. दत्तमहाराज म्हणाले ''आपण त्यावर रोजच्या प्रमाणे बसून भागवत निरुपण करावे आपण 'शुक' आहात.''**

**श्री. डोंगरे महाराज म्हणाले ''आपण साक्षात व्यास आहात'' आणि श्री. दत्तमहाराजांना सर्वासमक्ष साष्टांग नमस्कार घातला. सर्वांनी मोठ्या आवाजात दोन्ही महाराजांचा जयजयकार केला.**

तेथील व्यवस्थापकांनी लगेच दुसरे एक व्यासपीठ तेथे जवळच ठेवले. त्यावर लगेच श्री. डोंगरे महाराज व्यवस्थापकांना म्हणाले ''हे काय करता?'' श्री दत्त महाराजांच्या समोर मी व्यासपीठावर कसा बसू?''''श्री दत्तमहाराज व्यासपीठावर बसतील व मी त्यांच्या पायाशी बसण्याचे भाग्य आज घेणार.''

शेवटी श्री. दत्त महाराजांना व्यासपीठावर बसवून कार्यक्रम सुरु झाला. कार्यक्रम झाल्यावर प्रमुख श्री. बुडूख बोलण्यास उभे राहिले. ते म्हणाले ''आज श्री. दत्त महाराजांचे दिव्यत्व आम्हा बार्शीकरांना श्री. डोंगरे महाराजांच्या कृपेने समजले.''

श्री. धुंडीराज महाराजांचे पुराण वाचन पूर्ण चातुर्मासात श्री भगवंत मंदिरात असे. श्री दत्त महाराज बाल वयात होते तेव्हापासून बार्शीकरांना त्यांचा सहवास घडतो आहे. दैव योगाने बार्शी श्री. दत्तमहाराजांची सासुरवाडी.

त्यामुळे-'अति सहवासात् अवज्ञा' अशी अवस्था झाली.(अती परिचयात् अवज्ञा).

--------००००००--------

श्री क्षेत्र वाराणसीला, वाराणसी विद्यापीठात वेदान्तावर चर्चासत्र तेथील श्री. शंकराचार्यांनी आयोजीत केले होते. त्याचे निमंत्रण श्री.दत्त महाराज यांना आले होते. त्या साठी महाराज एकटेच वाराणसीला गेले. सत्र बरेच दिवस चालले होते. त्या साठी अनेक पंडित सर्व भारतातून आले होते. त्यांत प्रथम पारितोषिक श्री. दत्तमहाराजांना मिळाले.

श्री. वाराणशी शंकराचार्यांनी त्यांचा सत्कार केला. ते म्हणाले ''मला आनंद होतो की दक्षिण भारतात प्रथमच हे पारितोषक जात आहे.'' पगडी-शाल, धोतर-उपरणे व दहा तोळ्याचे (त्या वेळचे) सुवर्ण कंकण महाराजांना दिले.

त्यावर श्री. दत्तमहाराजांनी त्यांना वंदन केले व थोडे भाषण केले-''मला माझे माता पिता व गुरु यांनी जे मार्गदर्शन केले व शिक्षण दिले त्याचे कांही अंशी सार्थक झाले. या विद्यापीठात वेदाध्ययनासाठी जे विद्यार्थी आहेत त्यांचे साठी याचा विनियोग करावा'' असे म्हणून त्यांनी ते कंकण तेथे ठेवले. त्या नंतर बोलताना त्यांना गहिवरुन आले. ते म्हणाले,''मी अकिंचन असल्यामुळे मी यात काही भर घालू शकत नाही याचा मला विषाद वाटतो.''

त्यावर समारोपात श्री. शंकराचार्य म्हणाले ''मी अनेक विद्वान पंडित पाहिले पण इतकी विनम्रता व निरहंकार मला आज प्रथमच जाणवला'' व आग्रहाने कंकण पुन्हा प्रदान केले व हे वचन म्हणाले:-

तपः पूतं परं पूज्यम् वन्दे दत्तं कवीश्वरम्।
विनम्रता पराकाष्ठा वन्दे दत्तं कवीश्वरम् ।
निरहंकारं अलंकारं वन्दे दत्तं कवीश्वरम् ।
वेद वेदाङ्ग पारंङ्ग वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥

पुण्यात परत आल्यावर हा प्रसंग त्यांनी कोणासही सांगितला नाही. आपल्या सर्व भक्तांच्या सुदैवाने पुण्याचे लोकमान्य टिळकांचे नातू या कार्यक्रमाला तेथे हजर होते. कांही दिवसांनी ते पुण्यास परत आल्यावर श्री. गुळवणी महाराजांना त्यांनी सर्व वृत्तांत सांगितला. त्यानंतर श्री. गुळवणी महाराजांनी श्रीवासुदेवनिवास आश्रमात श्री दत्तमहाराजांचा सत्कार केला. त्यामुळे सर्वांना हा वृत्तांत समजला. विद्वत्ता-विनम्रता व निरहंकार (अमानित्व) यांचा त्रिवेणी संगम म्हणजेच श्री.प.पू. ब्रह्मर्षी, पंडित, विद्यावाचस्पती श्री दत्तमहाराज कवीश्वर.

--------००००००--------

बार्शीला माझे मामा किसन कमलदास शेटे, वकील होते. त्यांचेकडेच मी हायस्कूलच्या शिक्षणसाठी १९४२ ते ४७ होतो. त्या वेळी श्री दत्त महाराज, बार्शी येथे नेहमी येत असत. बार्शीत सौ. आईसाहेब मुलांना घेऊन राहात होत्या. 'श्री' महाराजांचे अनेक कार्यक्रम भगवंत मंदिरात असत.

एकदा सकाळी 'श्री'महाराजांना माझ्या मामींनी सकाळी घरी बोलावले व त्यांचे साठी मुद्दाम दुधातली कॉफी केली. महाराजांनी घेतली. नंतर भगवंत मंदिरात गेले. ते गेल्यावर राहिलेली कॉफी सौ. मामींनी घेतली. लगेच त्यांना चूक लक्षात आली. त्यात साखर घालण्याचे विसरल्या होत्या. त्यांना खूप वाईट वाटले. सायंकाळी त्या भगवंताचे मंदिरात महाराजांचे पुराण एकायला रोजच जात असत. पुराण संपल्यावर त्यांनी महाराजांची क्षमा मागितली व कॉफीत साखर न घालताच दिली असे सांगितले.

त्यावर महाराज म्हणाले ''कॉफीत साखर नव्हती का? आम्हाला तर चांगली लागली.'' साधकाचे सांत्वन व समाधान कसे करावे हे अलौकिकत्वच आहे. शिवाय लक्ष फक्त परमेश्वराकडेच असून या शारीरिक सुखाकडे नाहीच असे जाणवते.

--------oooooo--------

पुण्यातील रास्तापेठेत निवडुंग्या विठ्ठल मंदिरात एक युरोपियन उतरला होता. तो श्री. दत्त महाराजांच्या दर्शनाला शनिवार पेठेत आला. महाराजांचे दर्शन घेऊन त्याने महाराजांना विठ्ठल मंदिरात येण्याची विनंती केली. महाराज म्हणाले उद्या येणे जमेल. दुसरे दिवशी सकाळी तो गाडी घेऊन महाराजांना घेऊन जाण्यास आला. महाराज त्याला म्हणाले ,''माझे दैनंदिन आन्हिक होण्यास वेळ लागेल आपण पुढे जा. मी नंतर येईन.'' आन्हिक आटोपून सुमारे ११.३० ला महाराज भर उन्हात अनवाणी निघाले. महाराजांचे दोघे शिष्य विद्यार्थी त्या वेळी घरी होते. त्यांना वाईट वाटले. महाराजांना उन्हाचे पायपोळ होत त्रास होतो म्हणून ते आपसात बोलत होते की महाराजांनी त्यांच्यासाठी इतका त्रास सहन का करावा ?

महाराजांना त्या गृहस्थाने पुन्हा घरी आणून सोडले. दुसरे दिवशी सकाळी तो गृहस्थ क्षौर करुन , शेंडी ठेवून, सोवळे नेसून हातात पळी भांडे घेउन महाराजांचे दर्शनास आला. त्याला थोडा वेळ मार्गदर्शन केले व तो परत गेला. नंतर या दोन विद्यार्थ्यांच्या लक्षात आले की त्या गृहस्थाची किती नितांत श्रध्दा होती हे महाराजांनी जाणूनच त्या साठी तशी वागणूक दिली.

धन्य ते अंतर्ज्ञानी महाराज।

--------००००००--------

एक फ्रान्स मधील गृहस्थ 'श्री' महाराजांना कांही शंका विचारण्यासाठी, त्यांची फोनवरुन परवानगी घेऊन, महाराजांनी सांगितल्या वेळी हजर झाले. त्यांनी एक दुभाषी बरोबर आणला होता. त्यांनी विचारलेला प्रश्न दुभाषी हिंदीत 'श्री' महाराजांना सांगत असे, व महाराजांनी सांगितलेले तो त्या गृहस्थांला फ्रेंच मध्ये सांगत असे. बराच वेळ चर्चा झाली. त्या गृहस्थाचे समाधान झाले. तो भावनावश झाला व त्याने शेवटचा एक प्रश्न विचारला.

त्याचे हिंदीत भाषांतर करणे पूर्वीच त्याला महाराजांनी उत्तर दिले. ते दुभाषीनी त्यांना सांगितले. ते दोघेही आश्चर्याने दिङ्मूढ झाले. नंतर दर्शन घेऊन परत गेले.

नंतर 'श्री' महाराजांना एकाने विचारले ''आपण भाषांतर करण्यापूर्वीच उत्तर कसे दिले?'' त्यावर महाराज म्हणाले:-

''सर्व भाषा परमेश्वराने निर्माण केल्या आहेत. जो परमेश्वरालाच जाणतो त्याला एकादे वेळी हे शक्य होते.''

-श्री दत्तमहाराज स्वतःच परमेश्वर आहेत.-

--------००००००--------

वैरागला आमचे घरी 'श्री' महाराजांचा भागवत सप्ताह झाला. सर्व सोहळा व्यवस्थित पार पडला. गावातील अनेक लोक सप्ताहासाठी येत होते. सप्ताह झाल्यावर ग्रंथाची मिरवणूक काढली. वाटेत एक मशीद होती. (वैराग मधील हिंदू-मुसलमान उभय समाज सामंजस्याने राहतात) . त्या मशीदी समोर

एक मोठा ट्रक उभा होता. त्या मुळे मिरवणूक जाण्यास अडचण होते आहे हे मला जाणवले. मी लगेच पुढे गेलो व ड्रायव्हरला गाडी बाजूला घेण्यास सांगितले. तो परगावचा असल्याने त्याने दुर्लक्ष केले. त्यावर मी त्याला जोरात सांगितले, जर गाडी बाजूला घेतली नाही तर आम्ही गाडी ढकलून दूर करु. त्यावर त्याने लगेच गाडी दुसऱ्या रस्त्यावर नेली मिरवणूक व्यवस्थित (वाद्ये बंद करून) मशीदीवरून पुढे गेली.

नंतर मला महाराज म्हणाले '' अशावेळी सौम्यतेनेच समजावून सांगावे त्या मुळे गैरसमज न होता गैर प्रकार होण्याचे टाळता येते.''

अशा गोष्टी योग्य क्षणीच सांगितल्या वर कायम स्मरणात राहतात. ज्या प्रमाणे कुंभार ओल्या मातीला त्याला पाहिजे तो आकार देउ शकतो. ही समय सूचकता ''महाराजांचे कडून'' मिळाल्यावर कायमची ध्यानात राहिली. हा उपदेश करणाऱ्याचे आचरण, तपस्या, सामर्थ्यात रुपांतरित होउन त्या सामर्थ्याचा परिणाम ज्याला उपदेश केला त्याच्यावर होतो.

--------००००००--------

## तेरा तुझको अर्पण

व्यवसायात असलेले कौशल्य ही आपली महत्ता नसून 'श्रीं' चेच देणे आहे. या भावातून **उतरलेले अनुभव.**

माझ्या वैद्यक व्यवसायात अनेक रुग्ण संबधात येतात. त्यातील कांही साधारण, काही किरकोळ आजारी असतात व फार थोडे अति जर्जर गंभीर आजारी असतात. उपचार करताना ''बरे होण्यास'' थोडा विलंब लागला तरी चालेल. निदान (डायग्नोसिस) चुकल्यामुळे रुग्णास त्रास होऊ नये म्हणून त्या त्या क्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्यास सांगावे असे 'श्री' महाराजांचे सांगणे असे.

वैराग पासून जवळच इरले आहे तेथील शे.का. पक्षाचे नेते श्री. उध्दवराव पाटील खासदार होते. त्यांचा एकुलता एक मुलगा ८/९ वर्षाचा ज्वराने आजारी होता. त्याला खासदारांनी माझ्या दवाखान्यात आणला. मला तो गंभीर वाटला. तो थोडा बेसावधही होता. मी 'श्री' महाराजांचे स्मरण केले व

त्यांना सोलापूरला हॉस्पीटल मधे नेण्यास सांगितले. तथापि उस्मानाबादचे सिव्हिल सर्जन त्यांच्या मित्र परिवारातले होते. म्हणून त्यांनी तिकडे नेण्याचे ठरवले. मी त्यांना पत्र दिले की ''मला टायफॉईड वाटतो व टॉक्सीडीटी मुळे सेमी कॉन्शस वाटतो.''

तिथे सर्व तपासणी-रक्त-लघवी इ. करुन उपचार केले पण दुर्दैवाने त्याचे निधन झाले. नंतर १५ दिवसांनी खासदार भेटले. त्यांनी सांगितले ''तुम्ही वेळेवर पाठवले. तेथेही भरपूर उपचार केले. अपयश आले तरी उपचार पूर्ण केल्याचे समाधान वाटले.''

--------oooooo--------

## मला हे दत्तगुरु दिसले

श्री दत्तमहाराज अनेक वेळेस बार्शीला येत असत. विषेशकरून श्रावणात. तेथून नंतर सोलापूरला जाताना वैरागला येत असत. पुढे सोलापूर-तुळजापूर-गाणगापूर नंतर परत पुण्यास जात असत. त्यांना अनेक वेळा मी विनंती केली की मला ''पाद्यपूजा करायची आहे. त्यावर ते म्हणत ''थोडे थांबा''. मला काही कळत नसे. मनात विचार येत, माझे काही चुकते का? पण कसे विचारणार ?

वैरागच्या जवळ सुर्डी गाव आहे (१०कि.मी.) तेथील श्री बापूसाहेब विश्वरूपे (सुर्डीकर) श्री. गुळवणी महाराजांचे उपासक होते. त्यांनी श्री क्षेत्र वाराणशीला 'गायत्री' मंत्राचे पुरश्चरण तीन वेळा केले. सर्व विधी अन्नदान तेथेच झाले. त्यांना एकदा असे वाटले की आपल्या गावी सुर्डीला एक कार्यक्रम व्हावा. त्या साठी श्री. गुळवणी महाराजांची परवानगी घेऊन कार्यक्रम ठरविला. त्या साठी श्री. गुळवणी महाराज व श्री धुंडीराज महाराज व श्री दत्तमहाराज यांना निमंत्रण दिले. कार्यक्रम ठरला.

मला श्री. जगन्नाथ पुजारी यांनी कल्पना दिली व सुचविले की त्या वेळी सुर्डीला यावे व तेथील कार्यक्रम झाल्यावर वैरागला येण्यासाठी सर्वांना निमंत्रण द्यावे. त्या प्रमाणे मी सुर्डीला गेलो. श्री. बापूसाहेब सुर्डीकर यांना विनंती केली ''आपला कार्यक्रम झाल्यावर आपण या तीनही महाराज व परिवारासह वैरागला माझेकडे यावे. मला तिघांची पाद्यपूजा करणेचा योग आपल्यामुळे येईल.''

ते म्हणाले ''एक अट आहे. आज इथे प्रसाद घेऊनच जावे''. मी आनंदाने म्हणालो ''प्रसाद मी मागून घेणार होतो. पण मागण्या पूर्वीच आपण निमंत्रण दिले. परमेश्वराची कृपा.''

मी प्रसाद घेतला व श्री गुळवणी महाराजांना ''वैरागला सर्वांनी यावे'' अशी विनंती केली. त्यावर 'श्री' महाराज म्हणाले ''आम्ही ज्या यजमानाकडे आलो आहोत, त्यांनीच आपणास संमती दिली आहे. आम्हाला यावेच लागेल.''

त्यानंतर मी परत वैरागला आलो. दुसरे दिवशी श्री.विश्वरुपे तीनही महाराजांना घेऊन वैरागला आले व '' **त्रैयमूर्तीची**'' पाद्यपूजा घडली.

त्यावर सौ. आईसाहेब म्हणाल्या '' 'श्री' महाराज आपणास **थांबा!** असे का म्हणत होते ते समजले का?

त्यादिवशी आनंदाचा महापूर हे शब्द कमीच पडतील.

******

## महापंडिताचा अनहंकार पाहिला

**'श्रीं'च्या एक विद्यार्थिनी, आठवणींच्या ओघाने सांगतात :-**

संसाराच्या राम रगाड्यात वर्ष उलटत राहिली. मी गुरुजींनी (म्हणजे श्री दत्त महाराजांनी) शिकविलेल्या पुस्तकांवर फारसा अभ्यास वा चिंतन न करता टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची वेदान्त कोविद ही सातवी परीक्षा पास झाले. वेद शास्त्रोत्तेजक संस्थेच्याही वेदांताच्या दोन परीक्षा दिल्या.

'श्रीं' कडून वेदान्त शिकणारी मी एकटीच. त्यातूनही आधी तर्क न शिकताच वेदान्त शिकू इच्छिणारी. शिकविणारे एकदम भारतीय कीर्तीचे महापंडित, अन् शिवाय ते पांडित्य केवळ शब्दात सामावलेल नव्हते तर त्या मागे पूर्ण अनुभूती साकारली होती. पण माझे दुर्दैव हे की मला हे त्या वेळी स्पष्टपणे उमगले नव्हते. परंतु माझे हे सुदैव की, कळो न कळो पण ब्रह्मसूत्र, सिध्दांतबिन्दु, वेदांतसार, दहा उपनिषदांवरील शांकरभाष्य, गीता भाष्य या ग्रंथांचे पहिले वाचन गुरुजींच्यामुखातून श्रवण करण्याचे भाग्य मिळाले. **शिकविताना ते अनेकदा मौनात उतरत. एक अगाध शांती खोली भरुन टाकायची. मा. गुरुजी फार कमी बोलत. एखादी**

**शंका विचारली तरच थोडा वाणीचा विस्तार व्हायचा. त्यांच्या समोर बसल की आतूनच खूप शांती वाटायची. पण त्या मागचे कारण कळत नसे.**

ज्ञानी सत्पुरुषाचा सहवास साधत राहिला ही दयाघन परमेश्वराची व महाराजांची माझ्या सारख्या अडाण्यावरची कृपाच नव्हे काय? पुढे वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या परीक्षेसाठी **'भामती'** शिकायला जायला लागले. तेंव्हा गुरुजी (श्री महाराज) नारायण पेठेत रहात.घरीच पाठ होई. आधी तर्कशास्त्राचा अभ्यास केला नसल्यामुळे **'भामती'** डोक्यावरुन जायची.

त्या वेळी गुरुजी श्रीभागवत सप्ताहासाठी वा प्रवचनासाठी परगावी जात. त्यामुळे पाठ अधून मधून होई. **पाठ होणार नसेल तर स्वतः अनवाणी चालत आमच्या घरी येऊन सांगून जात. मला फेरी पडू नये म्हणून असं जपणारा हा महात्मा!** आणि मी ''त्यांचे पाय घराला लागले म्हणून एकीकडे आनंदाची धांदल तर त्यांना आपल्यासाठी कष्ट पडले म्हणून मनात दाटणारी खंत यात हरवून त्यांचं योग्य तसं स्वागत करू शकत नसे.''

अनहंकाराची ही महापंडितांची वागणूक ह्दयाला स्पर्शून जायची.

******

## ।। वीतराग विषयं वा चित्तम् ।।

हैदराबाद चे थोर संत प.पू. श्री. भटजी बापू महाराज यांचे चरित्र प्रकाशित झाले. त्या वरील श्री दत्तमहाराज यांचा आशीर्वादपर अभिप्राय असा आहे-

**''श्रीमान् भगवद् भक्त श्री. भटजीबापू महाराज (हैद्राबाद) यांचे चरित्र विश्वस्त मंडळाकडून प्रकाशित होत आहे, ते वाचून अत्यंत समाधान झाले. संत चरित्र वाचन, चिंतन श्रध्देने केलं तर चित्ताला शांती समाधान मिळते. व स्थैर्य लाभते, असे योगशस्त्रकारांनी ''वीतरागविषयंवाचित्तम्'' यांत स्पष्ट सांगितले आहे. ''जसे भगवद् भक्ती, नामस्मरण इत्यादि उपायांनी चित्त स्थिर होते तसे राग द्वेषादि विकार रहित पूर्ण ज्ञानी अशा माहात्म्यांच्या चरित्र चिंतनाने ही चित्त स्थिर होऊ शकते असा योग शास्त्रकारांचा सिध्दांत आहे.''**

'श्रीं'च्या वाक्य रचनेचा हा विशेष आहे की 'मी', 'मला', माझे या शब्दांना त्यात स्थानच नाही. ''अहंभावच '' नाही त्यामुळे हे शक्य झाले. आहे.

## एका भक्ताच्या स्मरणातून

### (डॉ. दिलीप देशमुख)

इ.स.१९८१ च्या जानेवारीस प.पू.श्री. दत्तमहाराज बीड जिल्ह्यातील येळंब या गावी श्री. बापूसाहेब थिगळे यांच्या शेतामधल्या मंदिरातील मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठेसाठी येणार असल्याचे कळले. घरातील सर्वांची इच्छा प.पू.'श्री' महाराजांचा पदस्पर्श आपल्या घरास व्हावा अशी मनोमन होती. माझ्या सासूबाई सौ.सिंधूताई देशमुख ह्या प.पू.श्री.गुळवणी महाराजांच्या अनुग्रहीत. त्यांचे माहेर हिंगोलीच्या आजेगावकरांचे. श्री.प.पू.शंकरकाका आजेगावकर यांच्या त्या सगळ्यात कनिष्ठ कन्या. प.पू. शंकरकाका हे प.पू.श्री.गुळवणी महाराजांचे गुरु बंधू. म्हणजे एका अर्थाने त्या प.पू.श्री.गुळवणी महाराजांच्या मानस कन्याच होत. या सर्वांचे ''श्री वासुदेव निवास'' व पर्यायाने श्री दत्तमहाराजांचे घर म्हणजे माहेरच. प.पू.सौ.लक्ष्मी आईसाहेबांना या सर्व बहिणी हक्काने ''वहिनीसाहेब म्हणत.

आम्ही उभयतांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यावर बीडला स्थायिक होण्याचे ठरविले. येथील बलभीम चौकातील श्री. पांडुरंग काशिनाथ जहागीरदारांचा जुना वाडा विकत घेतला. त्या वाड्यात अंबेजोगाई निवासिनी श्री. योगेश्वरी देवीचा वास आहे असे येथील नागरीक मानीत असत. घरमालकांचे ही तेच कुलदैवत होते. नवरात्रात इतर मंदिराप्रमाणे इथेही देवीचा गोंधळ होत असे. इथे असंख्य कवड्या त्यामुळे मिळाल्या. त्यांनी येथे नवचंडी यागादी धार्मिक कृत्ये बरेच वेळेस केल्याचे ऐकिवात होते.

हे घर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असताना व व्यावसायिक उपयोगासाठी जसे हॉटेल-खानावळ इ.साठी मागणी होत असूनही ती विचारात न घेता श्री. जहागीरदारांनी अल्प किमतीत आम्हास दिले.

इथे देवाधर्मादिकाचे वातावरण असावे, एखादे आरोग्यधाम असावे अशी त्यांची इच्छा होती. अशा रीतीने भगवतीने त्यांना तशी प्रेरणा दिली.

डॉ. दिलीप यांचे बालपण अंबेजोगाईला मावशीकडे(श्री.विष्णूपंत आडगावकर) श्री देवीच्या परिसरात गेले. त्या अवस्थेतच भगवतीच्या भक्तिप्रेमाची

ओढ मनात जागलेली होती व बहुधा याच पूर्व संस्काराचे फलस्वरूप म्हणून ह्यांना बीडला श्री योगेश्वरीने जवळ करून घेतले व या जागेत राहण्याचे सौभाग्य लाभले.

प.पू. गुरुमाऊली श्री दत्त महाराजांची प्रथम पाद्य पूजा या आमच्या घरात १२/१/१९८१ रोजी झाली. परिसातील विहिरीचे (जलदेवतेचे) विधियुक्त पूजन करविले.

पुढील आयुष्यात घडायच्या उदंड देवी उपासनेचा पाया घालून भक्तीचा मार्ग 'श्री' महाराजांनी या प्रकारे प्रशस्त करून दिला. 'श्री' चरणी कोटी कोटी प्रणाम.

--------००००००--------

साधारण १९८०-८१ या काळात प्रकृती अस्वास्थामुळे मला पदव्युत्तर शिक्षण अर्धवट सोडून द्यावे लागले होते. आत्मविश्वासही पूर्णपणे नाहीसा झाला होता. घरातील सर्व मंडळी धीर देत असत. पण प.पू.'श्री' महाराजांच्या दर्शनाने जणू माझा पुनर्जन्मच झाला. भोग भोगूनच संपतात. ईश्वराच्या प्रार्थनेने बरे वाटते असे सांगून प.पू.'श्री' महाराजांनी मला ''नित्यपाठातील'' ''नमोस्तुते महादेवी '' हे स्तोत्र रोज म्हणायला सांगितले. मनाला खूप उभारी आली.

प.पू.'श्री' महाराजांच्या कृपेने माझ्या पदव्युत्तर शिक्षणाच्या मार्गदर्शकांनी मला राहिलेले १ वर्ष पूर्ण करुन परीक्षेस बसण्याची परवानगी दिली. साधारणतः ५ वर्षांच्या खंडित झालेल्या उच्च शिक्षणासाठी, दोन मुलींना सासूबाईच्या जवळ ठेवून मी औरंगाबादला गेले. 'श्रीं' नी ह्याची पत्राने आवर्जून दखल घेतली.

''सौ. सुरेखाताईंचे पुढील शिक्षण पूर्ण होण्याची अनुकूलता ईश्वरकृपेने मिळाली हे वाचून समाधान वाटले.''

माझे शिक्षण सुरू झाल्यानंतर ते संपेपर्यंत 'श्री' अधुन मधून पत्र पाठवून चौकशी करीत.

''सौ. सुरेखाताईंच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था झाली. त्या उन्हाळ्यात ते पूर्ण करुन बीडला येऊन आपल्या हातून कार्याची जबाबदारी घेऊ शकतील

हे वाचून समाधान वाटले. श्री जगदंबेच्या कृपेने हे सर्व ठीक झाले. आता काळजी राहिली नाही.

''तेथील जागेचे उरलेले बांधकाम सध्या चालू असल्याचे आपण लिहीले ते सौ.सुरेखाताई शिक्षण आटोपून तेथे येईपर्यंत पूर्ण झाले पाहिजे म्हणजे त्यांचेही कार्य लगेच सुरू होईल.''

औरंगाबादला असताना वर्ष प्रतिपदेस मी पत्रात तेथे असलेल्या सहाध्यायींच्या बरोबर होणाऱ्या सामाजिक व राजकीय चर्चेच्या संबधी लिहिले असता प.पू.महाराजांनी रचनात्मक कार्याचा होणारा उल्लेख चांगला करुन परमार्थाकडे कशी वाटचाल करता येईल हे श्री रामनवमीच्या दिवशी पाठविलेल्या पत्रात लिहिले.

मी पदव्युत्तर परीक्षा पास झाल्यावर प.पू.महाराजांनी मंगल आशीर्वादाचे पत्र पाठविले.

''सौ. सुरेखाताईंचा अभ्यासक्रम ईशकृपेने यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याचे वाचून आनंद झाला.आता दोघांनाही व्यवसायाकडे पूर्णपणे लक्ष देता येईल. चांगले झाले.

सौ. सुरेखाताईंना धन्यवाद व मंगल आशीर्वाद.''

सर्व कांही स्वतःच करवून घेऊन ''ईशकृपे'' कडे अंगुली निर्देश करणारे. ह्या ईशाला साष्टांग दंडवत प्रणाम.

--------००००००--------

इ.स.१९८२ चा काळ.

प.पू.'श्री'महाराजांचा श्री भागवत सप्ताह बीडला आपल्याइथे व्हावा असे आम्हा उभयतांना तसेच परिवारातील सगळ्यांनाच वाटत होते. जानेवारीत माझ्या सासूबाईंनी श्रीवासुदेव निवास येथील उत्सवात प.पू.'श्री' महाराजांजवळ गोष्ट काढली. 'श्रीं' चा विदर्भाकडील दौरा आधीच निश्चित झाला होता त्यामुळे शक्यता फार कमी होती. पण आमची आर्त प्रार्थना 'श्री' महाराजांनी जाणली व वेळात वेळ काढून १४/३/८२ ला बीडला येण्याचे कबूल केले. आमच्या

घरात जणू चैतन्यच फुलले. माझ्या मावससासूबाई कै.ती.स्व.माई क्षीरसागर , कै.ती.स्व.मथुताई राहरेकर, मामेसासरे कै.ती.स्व.दिगंबरराव आजेगावकर, मावस सासरे कै.ती.स्व.भुजंगराव राहेरकर, चुलते ती.स्व.जगन्नाथ महाराज कहाळेकर आदि मंडळी व इतर आप्तेष्ट सुरवातीपासूनच जमले होते. कै.पू.वासुदेव महाराज कवीश्वर हे सकाळी संहिता वाचन करतील व प.पू.'श्री' महाराज दुपारी अर्थ सांगतील असे ठरले. आमचे घराचे आवार मोठे असल्यामुळे श्री. भागवत सप्ताह येथेच करावा असा आमचा मानस होता. पण 'श्री' महाराजांच्या पत्रात ''हा कार्यक्रम एखाद्याच्या मंदिरात करण्याचे ठरवावे म्हणजे सर्व भक्तांना त्याचा लाभ घेता येईल. एखाद्याच्या घरात असा कार्यक्रम असेल तर आमंत्रणाचा अडसर त्यात राहतो. मंदिरात सर्वांना मुक्तव्दार राहील.''

बीड येथील वे.मू.धुंडीराज शास्त्री पाटांगणकरांचे ''पटांगण'' जवळच आहे. तेथे सोय व्हावी असे त्यांना सुचविले. त्यांनी स्वीकृती देताना म्हटले ''प.पू.'श्री' महाराजांच्या श्री.भागवत सप्ताहाच्या निमित्ताने आमचे पूर्व संचित कामाला आले.''

'श्रीं' चे आगमन १५ मार्च ८२ ला झाले. त्या दिवशी शृंगेरी पीठाचे आचार्य महाराज, पटांगणावर मुक्कामास होते . त्यांचे दर्शनास 'श्री' महाराज सकाळी ९ ला गेले. आचार्य महाराजांनी त्यांना अत्यंत प्रेमाने जवळ बसवून घेऊन वार्तालाप केला. श्री.आचार्य महाराज दुपारी भोजनोत्तर प्रस्थान करणार होते. दुपारी 'श्री' महाराज भोजनोत्तर विश्रांती घेत असताना श्री आचार्य महाराजांच्याकडून निरोप आला''आपके घर में ठहरे हुए आचार्यजीको जल्दी ले आना। श्री आचार्यमहाराज उनके लिये रुके हुए है।

डॉक्टरांनी हा निरोप 'श्रीं' ना सांगताच त्वरित उठून श्री आचार्यांच्या दर्शनास पटांगणाकडे गेले. ''आओ आचार्यजी '' असे संबोधून बसवून घेतले. सत्कार करुन 'श्रीं' ना श्री शारदांबेचा फोटो प्रसाद म्हणून दिला. १६ ते २२ मार्च श्रीमद् भागवत सप्ताह उत्तम प्रकारे संपन्न झाला. श्रवणाला भरपूर भाविक येत होते. अन्नदानही मोठ्या प्रमाणात झाले. प.पू. सौ. लक्ष्मी आईसाहेब स्वतः

महाप्रसादाचे लाडू करवून घेत होत्या. रोज सकाळी ४ ते रात्री १२ या आनंदाच्या वर्षावात वेळ जात होता. प्रत्यक्ष श्री लक्ष्मीनारायणांचा वास येथे होता. शेवटच्या दिवशी महाप्रसादाला कोठून कोठून भक्तगण येत होते. स्वयंपाक पुन्हःपुन्हा वाढवून अन्नदान सुरु होते. किती स्वयंपाक झाला व कितींनी प्रसाद घेतला याचा मेळ लावण्याचे कोणाला जमले नाही. काहीही कमी पडले नाही. ''**भक्तकीर्ती विवर्धक**''श्री दत्तमहाराजांनी सर्व करवून घेतले व ''आपल्या सुकृतामुळे सर्व चांगले झाले'' असे म्हणून सर्व श्रेय मात्र आम्हाला दिले.

दुसरे दिवशी 'श्री' महाराजांच्या कृपा आशीर्वादाने आमच्या घरात पहिला नवचंडी याग संपन्न झाला. आणि दिनांक २४ मार्च १९८२ हा दिवस आमचे अनंत जन्मांच्या पुण्याईच्या व 'श्री' महाराजांच्या महाआशीर्वाद युक्त कृपेचा ठरला. या दिवशी आम्हा उभयतांना गुरुमंत्राने अनुग्रहीत केले. त्याच दिवशी श्वशुर श्री प्रभाकरपंत यांनाही मंत्र दिला व शक्तिपात दीक्षाही झाली. आम्हा सर्वांना जणू पुनर्जन्मच दिला ज्याचे अंतिम साध्य 'श्री' चरणी विलीन होणे केवळ राहिले आहे. ते ही निश्चितपणे होणारच. कारण संकल्प करणारे साक्षात दत्तप्रभू असल्यावर ''तेथे काय उणे?''

--------००००००--------

'श्री' महाराजांचे दर्शनाचा २७ मे ८२ रोजी पुन्हा योग आला. खर्ड्याहून देऊळगाव -मेहेकर कडे जाताना 'श्री' चे बीडला थांबणे व वास्तव्य झाले. 'श्रीं' ची विधिवत् पाद्य पूजा झाली व सर्वांना प्रसाद मिळाला. लिंबागणेश ह्या बीड पासून ४० कि.मि. असलेल्या जागृत स्थानी श्रीगणेशयाग नुकताच झाला होता. त्या स्थानाचे दर्शनाला 'श्रीं' ना न्यावे असे वाटत होते,पण वाहनाची सोय होत नव्हती. डॉक्टर त्यावेळी पोलीस विभागाचे वैद्यकीय अधिकारी होते. बिनतारी संदेश विभागाचे श्री. बाणाईत म्हणून फौजदार होते. ते डॉक्टरांच्या सहाय्याला धावून आले व वाहनाची सोय केली. श्री बाणाईत यांनाही 'श्रीं' च्या दर्शनाची तीव्र इच्छा होती ती त्यांची इच्छा ते पुरुन भरुन पावले. झाले असे की श्री बाणाईत जेंव्हा पदस्पर्शाला वाकले तेंव्हा 'श्रीं'च्या पदस्पर्शाबरोबर त्यांना

साधनेतील क्रिया सुरू झाल्या. 'श्रीं' नी त्यांना देवघरात बसावयास सांगितले. थोड्या वेळानंतर ते उठले. प्रसाद घेऊन परत गेले.

--------०००००० --------

माझ्या मामंजींना मधुमेहाचे दुखणे आहे. १९८२ मध्ये त्यांना अचानक पोटशूळाची व्यथा उद्‌भवली. तात्कालिक औषधोपचारात पोटात गाठ असल्याचे दिसले. पुढील तपासणीसाठी औरंगाबादला नेण्यात आले. डॉ.दिलीप मुंबईला गेलेले होते. आर्थिक विवंचनाही बऱ्याच होत्या. औरंगाबाद येथील तपासणीत मोठ्या आतड्यात कर्करोगाची गाठ असावी अशी शक्यता वर्तविली. माझ्या वैद्यकीय ज्ञानामुळे मला त्यांच्या आजाराच्या गंभीरतेची कल्पना आली. आतून खूप रडायला येत होते पण सौ.सासुबाई व इतर मंडळी घाबरुन जातील म्हणून बाहेर दाखविताही येत नव्हते. डॉ.दिलीप मुंबईहून ताबडतोब परतले व पेशंटला मुंबईला नेण्याचा निर्णय झाला.

मुंबईला जाण्यापूर्वी डॉक्टरांनी सासऱ्यांना 'श्री'महाराजांच्या दर्शनाला नेले.त्या वेळी श्रीमहाराजांनी, ''रोज सप्तशतीचा एक पाठ घरी ब्राह्मणद्वारा ''औषध'' म्हणून करीत जा, म्हणजे प्रकृतीस फरक पडून तो पोटातील गोळा जिरुन जाईल ''असे सांगितले.पुढे मुंबईला तपासणीस रोगाचे स्वरुप गंभीर नसल्याचे स्पष्ट झाले. 'श्री'. महाराजांच्या आज्ञेनुसार आमच्या उपाध्यायांच्या द्वारा अखंड पाठ रोज एक प्रमाणे सुरु केले. ते अद्यापही सुरु आहेत. श्री. प्रभाकरपंतांना त्याचा निश्चित फायदा होतो आहे. संकल्पाचा दाता भगवान असल्यामुळे प्रचीती येणारच.

--------०००००० --------

१९८३ साली मार्च मध्ये डॉ.दिलीप यांनी संपुटित पाठाची नवचंडी करण्यासाठी 'श्री'.महाराजांची अनुमती विचारली. 'श्रीं'नी अनुमती दिली पण स्वतः ह्या कार्यास येऊ शकले नाहीत. प्रकृती अस्वास्थ्यामुळे प्रवास करायचा नव्हता. तरी पत्रद्वारा आशीर्वाद पाठवलेत.''आपला संकल्पित नवचंडी याग आपणास सोईच्या वेळी आपण करुन घेण्यास हरकत नाही. आपल्या कार्याचे

वेळी देहाने नाही तरी मनाने आम्ही तेथे आहोतच. भगवतीच्या प्रेरणेने पुण्य कार्य आपणाकडून घडत आहे.''

महदाश्चर्याची गोष्ट म्हणजे प.पू. श्री वे.शा.स.सेलूकर महाराज हे एक उत्तम अग्निहोत्री, चारित्र्यसंपन्न व्यक्ती त्या वेळी बीड मधे होते. आमचे घरी संपुटितपाठाची नवचंडी होत आहे हे त्यांना समजले व ते स्वतःच आमचे घरी आले. 'श्री'. महाराजांनीच त्यांना कार्य साधण्यासाठी योजिले. त्यांनी अग्निमंथनासह अग्निहोत्र विधान पूर्वक पाकसिध्दी करुन भोजन करण्यासाठी आमचे घरी वास्तव्य करण्याची इच्छा व्यक्त केली. सर्वांना अत्यानंद झाला.सर्व कधी न पाहिलेला कार्यक्रम व अन्नदान ह्याचे अत्यंत समाधान सर्वांना झाले. 'श्री' महाराजांनीच ह्या दुसऱ्या स्वरुपात येऊन आमचे समाधान केले.

--------००००००--------

प.पू. 'श्री'. महाराज आमच्याकडे बीडला नवचंडी साठी आले होते तेव्हांची घटना. माझे मावस सासरे श्री. पू. भाऊसाहेब क्षीरसागर औरंगाबादला घाटी रुग्णालयात अत्यवस्थ स्थितीत होते. शौच्यावाटे रक्तस्त्रावाचे कारण कॅन्सर असावे असे निदान डॉक्टरांनी केले होते. मुंबईला नेण्यास सांगितले होते. श्री.भाऊसाहेब हे प.पू. श्री गुळवणी महाराजांचे शिष्य व श्री दत्तमहाराजांचेही निःसीम भक्त. ते आता अल्पकालाचे सोबती आहेत, तेव्हा त्यांना आता 'श्री'महाराजांचे दर्शन झाले तर बरे होईल असे डॉ. दिलीप यांना वाटत होते. तसा मनोदय त्यांनी 'श्रीं' च्या कानावर घातला. ''नवचंडी यागाला एका दिवसाचा अवधी आहे तेव्हा आपण औरंगाबादला जाऊया का?'' असे विचारले

'श्री ' म्हणाले ''कशाला? आम्ही २-३ महिन्यांनी औरंगाबादला जाणारच आहोत तेंव्हा श्री. भाऊसाहेबांना भेटूच.''

आम्ही स्तब्ध झालो. 'श्री' महाराजांचे शब्द खोटे होणार नाहीत ही मनात निश्चित खात्री होती. ती.स्व. भाऊसाहेबांचे आयुष्य 'श्री' महाराजांची भेट होई पर्यंत तर आहेच. पुढे 'श्री'महाराज औरंगाबादला त्यांचे घरी जाऊन, भेटून गेले. त्या नंतर श्री भाऊसाहेबांची प्रकृती बरीच सुधारली. आयुष्य संपण्याचा

काळ अटळ असून काहीतरी निमित्त लागते. अत्याधुनिक-विकसित वैद्यकीय शास्त्राचे निदान चुकले पण ‘श्रीं’चा शब्द खरा ठरला.

या प्रसंगानंतर एक वर्षानी श्री. भाउसाहेबांना काळगती प्राप्त झाली.

--------००००००--------

इ.स. १९८८ च्या आरंभाला प.पू.‘श्री’ महाराज प.पू. सौ.आईसाहेब व भक्त मंडळी कुरुगड्डीला गेली होती. माझ्या सासूबाई सौ. सिंधूताई ही त्यांच्या बरोबर होत्या. तेथील रम्य सोहळ्याचे क्षण अनुभवीत असता,‘‘ आता बीडला कधी येणार?’’ असे विचारले असता-‘‘तुम्हाला नातू झाल्यावर बारशाला निश्चित येऊ’’ असे आश्वासन प.पू.सौ.आई साहेबांनी दिले. त्यांच्या सत्यवाणीचे फलस्वरुप म्हणून माझ्या २ कन्यांच्या नंतर सहा वर्षांनी मला दिवस गेले. माझ्या प्रसुतीच्या आठवडाभर आधी ‘श्री’ महाराजांचे जालन्याहून सोलापूरला जाताना बीडला आगमन झाले. तेंव्हा त्यांची पाद्यपूजा घडली. ऑक्टोबर नंतर येण्याचे ठरवून ‘श्री’.महाराज वैरागमार्गे सोलापूरला गेले.

२२ ऑगस्टला माझी सुखरुपपणे प्रसूती होऊन मुलगा झाला. त्या बद्दल ‘श्रीं’ ना कळविले. त्यांच्या उत्तरात ‘श्री’ लिहितात-

‘‘ डॉ.सौ. सुरेखाताई प्रसूत होऊन पुत्ररत्न झाल्याची वार्ता आपल्या पत्रावरुन समजून येथे सर्वांना आनंद झाला. भगवतीची कृपा व आपणा सर्वांच्या श्रध्दाभक्तीचे हे फल आहे. आम्ही आश्विन कृष्णपक्षात इकडे येताना देऊळगावहून बीडला येऊन आपल्या नातवाला पाहून इकडे परत येऊ. सौ. सिंधूताईंची इच्छा जगदंबेने पूर्ण केली. मुलगा, मुलगी सर्वही देवीचेच स्वरुप आहे.‘‘सर्वरुपमयी देवी’’ असे देवी माहात्म्यात शेवटी आहे. डॉ.दिलीप व सौ.सुरेखाताई दोघेही देवीभक्त आहेत. त्यांच्या संसाराची सर्व चिंता जगदंबेलाच आहे. चि.बाळाचे नांव नारायण ठेवण्यास हरकत नाही. सर्वांचे पसंती प्रमाणे ठेवावे. आयुष्मान बाळ बाळंतिणीस मंगल आशीर्वाद.’’

बाळाचे नामकरण व नवचंडी समारोह प.पू.‘श्री’ महाराजांच्या अनुज्ञेने २७-१० ते १०-११-८८ ला संपन्न झाला. प.पू.सौ.आईसाहेब,

प.पू.सौ.ताईमहाराजांनी व इतर नातेवाइकांनी बाळाला मंगल आशीर्वाद दिले. बाळाला मांडीवर घेऊन प.पू.'श्री'.महाराजांनी त्याचे नांव नारायण असे ठेवले. या नावात चारही वेदांचे सार आहे असे 'श्री' महाराज म्हणत असत.

'श्रीं' नी व प,पू,सौ. आईसाहेबांनी सर्वांना अहेर केला.

--------oooooo--------

मानवी स्वभावाची प्रकृती अशी असते की, देव भरभरून देत असेल तर आपणही अधिकाधिक मिळवावे अशी इच्छा करतो.

प.पू.'श्री' महाराजांचे कृपेने ५ नवचंडीयाग व ३ शतचंडी याग झाल्यावर श्री सहस्त्रचंडी करावी असे डॉ.दिलीप यांना वाटू लागले. तसे त्यांनी प.पू.'श्री' महाराजांच्या कानी घातले. संकल्प मोठा असला तरी कार्यसिध्दी करणारी गुरुमाऊली समर्थ असताना आपणास काळजीचे कारणच नाही.

प.पू. 'श्री' महाराजांनी एका प्रवचनात उदाहरण देताना एका आवळ्याच्या बदल्यात सुवर्णाच्या आवळ्याचा पाऊस पडावा अशी भगवतीची केलेली प्रार्थना सफल होऊन संपूर्ण राज्यभर सोन्याच्या आवळ्यांचा वर्षाव झाल्याचा प्रसंग सांगितला आहे. मध्यस्थी करणारा वकील समर्थ होता म्हणून दरिद्री ब्राह्मणाचे काम झाले. ह्या वकीलाला आरंभी एक आवळा तरी मिळाला. पण निरपेक्ष दाता श्री.गुरु-महाराज नुसताच कृपेचा वर्षाव करीत व करवीत आहेत.सर्व कल्याणार्थ श्री सहस्त्रचंडी चा संकल्प 'श्री' महाराजांनी स्वतः करवून घेतला. त्यांच्या २-३ दिवसांच्या वास्तव्यात प्रवचने झाली.

त्या काळातील 'श्रीं' च्या कृपादृष्टीच्या साक्षात्काराचा हा प्रसंग अविस्मरणीय आहे-

चि. नारायण त्या वेळी जवळपास वर्षाचा झाला होता. त्याची एकंदर मानसिक वाढ व शारीरिक प्रगती घरातील पंचकन्या (त्यांच्या मोठ्या बहिणी) यांच्या, त्या त्या वयातील प्रगतीच्या मानाने मागेच वाटू लागली. 'नारायण' म्हणून हाक दिली तरी त्याच्या चेहऱ्यावर कुठलेच भाव नसत. चालणे वगैरे पण उशीराच वाटू लागले. आम्हा सर्वांना खूप काळजी वाटू लागली. एकुलत्या एक कुलदीपक-त्या मुळे रात्रंदिवस सौ.आजी खूप काळजी करू लागल्या.

त्या काळात ‘श्रीं’ ची प्रवचने घरातील मोठ्या हॉल मध्येच होत असत. एके दिवशी प्रवचन संपल्यावर त्याचे आजोबांनी-श्री.प्रभाकर पंतांनी ‘श्रीं’ ना ही सर्वांच्या काळजीची समस्या बोलून दाखवली. समस्येचे कारण ‘‘चि. नारायण’’ तेथेच दहा फुटावर होता. हॉलमधील गर्दी ओसरली होती. ‘श्रीं’ च्या मुखावर स्मित झळकले. त्यांनी चि. नारायणला मंद स्वरात हाक मारली. त्याने ताबडतोब त्यांचेकडे पाहिले, नजरेस नजर भिडवली व तो छान हसला. भराभर रांगत पुढे येऊन त्याने ‘श्रीं’ च्या तळव्यावरील खडीसाखरेचा खडा तोंडानेच उचलला. त्यावेळी ‘श्रीं’ नी त्याच्यावर जो कृपाकटाक्ष टाकला तो, आम्ही हे दृष्य पाहणारे कधीच विसरणार नाही. ‘‘नारायणाने त्याच्या कृतीनेच त्याच्या आजीची काळजी दूर केली’’ असे ‘श्री’ हसून म्हणाले. ह्या प्रसंगाची स्मृती प्रत्येक वेळी अंग रोमांचित करते.

॥ प्रसादे सर्व दुःखानाम् हानिरस्योपजायते ॥

--------oooooo--------

## टॅक्सी वाला आला

माझ्या मुलीस (सौ. पूनम) वेदना सुरू झाल्या. पहाटे १.३० ते २.०० चा सुमार होता. मुलीला हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी रस्त्यावर घेऊन आलो. एका गल्लीतून दुसऱ्या गल्लीत टॅक्सीसाठी फिरत होतो. मी, मुलगी व पत्नी उभ्या होत्या तेथे आलो. तेवढ्यात एक टॅक्सी वेगात आमच्या जवळ आली. मी त्याला दहा मिनिटाच्या अंतरावर असलेल्या हॉस्पीटल मध्ये घेऊन जाण्याची विनंती केली. तुला हवे असतील ते पैसे देतो असे म्हटले. त्याने आम्हाला टॅक्सीत घेतले. हॉस्पिटलच्या दारात आलो. मुलगी व पत्नी आत गेल्या. एवढ्या अंतराचे सर्वसाधारणपणे ८ ते १० रुपये भाडे होत असेल. तरी रु. ५० / - त्याच्या हातात ठेवले. त्यावर तो म्हणाला ‘‘ साहेब, मला पैशाऐवजी आशीर्वाद द्या!’’

‘श्रीं’ नी काय योजना केली व कसा तो टॅक्सीवाला आला त्यांनाच ठाऊक.

******

'नामा म्हणे आम्हा' या शीर्षकाखाली घ्यावे

## पंचेचाळीस हजाराचा कोर्स

एका भक्ताने त्या काळात महाग असणारा उत्तम कंप्यूटर घेतला व त्या काळी अगदी नवीनच उपलब्ध झालेले सॉफ्टवेअर घेतले. ते सॉफ्टवेअर वापरण्यासाठीचा ४५००० रु. फी चा कोर्स केला.

योगायोगाने 'श्री'महाराज यांचे घरी आले तेंव्हा हा कंप्यूटर संच नवीन सॉफ्टवेअर सह वापरायला सज्ज झाला होता. भक्ताने 'श्रीं' ना प्रार्थना करून एक बटन दाबून उद्घाटन करण्याची प्रार्थना केली. त्याप्रमाणे ते एक बटन दाबले. तेंव्हा श्री रघुनाथराव जवळ उभे होते. ते म्हणाले ''महाराज'' ही बाकीची बटनही दाबा ना!''

'श्री' म्हणाले ''अहो ती बाकीची बटन दाबायला पंचेचाळीस हजाराचा कोर्स करावा लागतो.!''

******

## पूर्व सुकृताची जोड

('श्रीं' च्या मोठ्या सूनबाई श्रीमती सविता वहिनी यांच्या आठवणीतून)

मोठ्या पूर्व सुकृतामुळे या घराण्याशी संबंध आला. आणि सर्व जीवनच जणू एका नव्या दिशेला गेले. घरात सर्वजण त्यांना ''दादा'' म्हणत असत.

घरात सातत्याने ''श्री गणेश-दत्त-रेणुका'' या तीनही देवतांची आराधना होते. त्यांचे कुलधर्म-कुलाचार वेळोवेळी केले जातात. त्या साठी पूर्व व्यवस्था चोख व्हावी हा दादांचा कटाक्ष असे. ह्या घरात आल्यावर सर्व प्रथम ह्या सर्व गोष्टी त्यांनीच करवून घेतल्या. पुष्कळदा ते परगावी असत. पत्रातून तिथी-वार लिहून कळवत व ''सर्व तयारी करून ठेवा-आम्ही अमुक दिवशी येत आहोत'' असे लिहीत असत. त्या प्रमाणे आल्यावर प्रथम चौकशी करीत. ''दळण आणले कां?'',''गव्हाचा रवा (खिरीसाठी) आणला कां?'',''मेथीची भाजी वगैरे सर्व आणले कां?'', ''कांडी कोळसा-साधा कोळसा आणला कां?''(त्यावेळी लोखंडी शेगडीवर स्वयंपाक असे. तीन शेगड्या असत. दोन

मोठ्या व एक लहान.) त्या नंतर ''कुमारिका, ब्राह्मण,सुवासिनी वगैरे सांगितले कां?'' हे सर्व पाहात असत.

सकाळी त्यांची घाई असे. ''पुरण-वरण शिजत ठेवा. म्हणजे त्याला तेवढीच मदत होईल. हे सगळ आठवण्याचं कारण अस की संसाराच्या सगळ्याच गोष्टींकडे, बारीक-बारीक गोष्टींकडे सुध्दा इतक्या डोळसपणे पहात असत. त्या मुळे त्या सर्व गोष्टी पुढे पुढे आमच्याही लक्षात रहायला लागल्या. ब्राह्मण-सुवासिनी-कुमारिकांची पंगत बसली की सर्व पदार्थ वाढण्यासाठी एवढी घाई असायची ''पक्वान्न वगैरे काय आहे ते वाढायला आणा.'' ''त्यांना सांगा काळा-भात (मसाले-भात) असेल तर तसं, आणि ''सर्वांना तूप वाढल कां?'' आणि नंतर स्वतः विडा-दक्षिणा द्यायला येत असत. वाढायची घाई झाली तर ते स्वतः 'वाढू कां?'' म्हणून येत असत.

आमच्या घरातील नवरात्र म्हणजे जवळ-जवळ दिवाळी असे. नवरात्रोत्सवात तर ते आम्हाला खर्चासाठी सुध्दा पैसे देत. त्यातूनच देवासाठी उपकरणी किंवा स्वयंपाकासाठी कांही भांडीही आणली जात. त्या वेळी अन्नदान ही होत असे. त्याचा त्यांना खूप आनंद व्हायचा.

आमची मुल लहान असतानाच दादांनी आम्हाला सांगितले होते- ''संध्याकाळी मुलांना घेऊन देवाजवळ उदबत्ती लाऊन बसावे. पंचपदीच्या पुस्तकातील 'करूणा त्रिपदी' म्हणावी व उदबत्तीचा अंगारा लावावा. त्या मुळे मुलांना सवय लागते. त्यांच्यावर चांगले संस्कार होतात असं ते नेहमी सांगत असत. संसाराचा भार तर त्यानी सर्वच उचलला होता. संसार तेच करत होते आणि 'नाममात्र' आई-वडील आम्ही होतो. मुलं लहान असतानाच त्यांनी स्वतः मुलांच्या भवितव्याचा विचार करून ते स्वतः पोस्टात वगैरे पैसे भरून येत. त्यामुळे मुलं मोठी झाल्यावर त्यांच्या शिक्षणाचा आणि लग्नाचा कांहीही भार आमच्यावर आला नाही. त्यांनी नंतर पुढे आमच्यावर घरातील खूप मोठी जबाबदारी टाकली होती. न कळत ती ''सेवा'' घडत होती. खरं तर आमचा स्वतःच असं काहीही नाही. 'अवचितपणे न जाणताच'' ही 'सेवा' घडली. आणि आमचं जीवन मात्र आनंदी करुन सोडलं. त्यांनी मोठं केल आम्हाला.

चि. रेणुका लहान असताना एक प्रसंग आठवतो- आम्ही त्यावेळी व्यवसाया निमित्त खेडेगावात(शेल-पिंपळगाव) येथे होतो. त्यावेळी दादांच एक पत्र आलं आम्हाला. त्यात त्यांनी लिहिले होत;-''चि. रेणुकाला सांभाळा. अजून ती लहान आहे. ती वेगळी मुलगी आहे.'' पुढे दोन ओळींचा एक मंत्र लिहिला होता. त्याचा सवालक्ष जप करायला सांगितले. तो जप पूर्ण झाला. त्या नंतर ही जप चालू ठेवायला सांगितले.

चि. आमोदची मुंज झाली. तो त्या वयातही अतिशय हट्टी, खोडकर,व्रात्य होता. शाळेतून आल्यावर खेळायचा. नंतर एवढा दमून यायचा आणि संध्या करणार नाही असं म्हणायचा. एकदा कंटाळून मी त्याला दादांच्याकडे खोलीत घेऊन गेले. त्यांना सांगितले ''दादा! हा अजिबात ऐकत नाही. संध्या करत नाही म्हणतोय. तुम्ही त्याला काहीतरी सांगा.'' तेंव्हा त्यांनी त्याला जवळ घेतले आणि मला म्हणाले ''अहो! तुम्ही त्याच्या आई आहात. जरा गोड बोलून जवळ घेउन बसा म्हणजे तो करेल.'' आणि त्याला सांगितले''संध्या कर बर बाळ!'' त्यांच्या सांगण्यातला तो हळुवारपणा वेगळाच होता.

आम्ही जुन्या घरात राहात होतो तेंव्हाचा एक प्रसंग आठवतो. दादा रोज दुपारी चार-साडेचारला श्रीवासुदेव निवास आश्रमात जायचे ते सायंकाळी साडेसात पर्यंत परत घरी यायचे. त्या दिवशी ते असेच आश्रमातून आले. जिना चढून तिसऱ्या मजल्यावर यायला लागायचे. वरती आल्यावर मधल्या खोलीत बसलेल्या व्यक्तीला त्यांनी ''कधी आलात'' वगैरे विचारले व अक्षरशः वाकून डोके टेकून नमस्कार केला. नंतर आपल्या (देवाच्या) खोलीत जाऊन बसले. मी त्या वेळी समोर होते. त्यांच्या पाठोपाठ मी आत जाऊन त्यांना म्हटले ''दादा! तुम्ही कशाला त्यांना नमस्कार केला. तुमच्या वतीने आम्ही करतोच नां! त्यावर ते म्हणाले ''बाळ! आपली मुलगी त्यांच्या घरी नांदते आहे. मग त्यांना नको का नमस्कार करायला? ज्याचा मान त्याला द्यायला पाहिजे. आणि थोडा कमीपणा घेतला तर कुठे बिघडलं?''- असे अनेक प्रसंग घडले आहेत.

आम्ही शेल-पिंपळगावला असताना (पुण्या पासून जवळच आहे) जो थोडा काळ तेथे होता त्या वेळी त्यांनीच मदत केली. तिकडे जायला निघालो की म्हणायचे ''जाताना घरातील थोडे-थोडे धान्य वगैरे घेऊन जा. ४-८ दिवसाचे धान्य घरात असलेले बरे असते.'' लगेच आमच्या सासूबाई (सौ. आई साहेब) पिशव्या भरून तयार करायच्या. त्यांनी तर आमचा सगळा संसार मांडून दिला होता.

दिवाळीत भाऊबीजेला ''दत्तुबाळ''(देवातील प्रासादिक श्री दत्तमूर्ती ) यांना ओवाळायला सांगायचे आणि स्वतः ओवाळणी घालायचे. दरवर्षी देत असत.

संसाराचा राम रगाडा होता. त्यांनीच सर्व भार घेतला. त्यांचा सहवास ही खूप लाभला. त्यांच्या बरोबर प्रवास ही झाले. खूप काही शिकायला मिळाले. पण खूप कांही राहून गेलय अस वाटत. कुठेतरी रुखरुख वाटते. त्यांचा मोठेपणा समजून घ्यायला किंवा त्यांची आध्यात्मिक उंची कळायला खरोखर कितीतरी जन्म घ्यावे लागतील.

पुष्कळदा आमच्या हातून चुका ही झाल्या. अनेक अपराधही घडले असतील. पण त्याबद्दल त्यांनी कधीही जाणीव दिली नाही. लौकिक अर्थाने त्यांचा संसार सुरू होता. पण ''संसारात असून नसणे,'' ही भूमिका फार अवघड आहे. ती मात्र ते सहजपणे निभावीत होते.

--------oooooo--------

बोलणे सर्वचजण शिकत असतात पण ''नबोलणे '' शिकून येत नाही. प्रवचनातून ते ज्या तितिक्षा गुणाचे वर्णन करायचे व ही अभ्यासावी असे आवर्जून सांगत असत ती ''तितिक्षा'' त्यांना पूर्णतया साध्य होती. त्यांच अंतःकरण भक्तीमय होत. त्यांनी अनेक वेळा आम्हाला सांगितले की ''रेणुका निवासातल्या देवीची भक्ती पूजाअर्चा,कुलधर्म वगैरे जे करतील, देवाची सेवा जे अगदी मनापासून करतील त्यांना देवी प्रसन्न होईल. तुम्हाला कांहीही कमी पडणार नाही. ती तुमची सर्व सोय करेल.'' आणि तसे अनुभव आजही येत आहेत.

पूर्वी  प.पू. ताई महाराज रेणुका निवासात यायच्या. त्यांना आम्ही विचारत असू की ताई राम अवतारात, कृष्ण अवतारात आम्ही कुठे असू कां? गोपीं सारख्या? तेंव्हा त्या म्हणायच्या ''म्हणूनच तुम्हाला या जन्मा मध्ये प.पू. 'श्री' महाराजांच्या घरीच त्यांचा सहवास आहे.'' या पेक्षा वेगळे भाग्य अजून कसले? त्यांनीच आपल्या जवळ केले. आपल्या सत् शिष्याला आपल्या धामात बोलावून नेले. पुढचे सर्व जन्म कृतार्थ होणार ही निश्चिती वाटते.

त्यांनी मला खूप वेळा सांगितलेले आठवते ''प्रत्येकाचे भोग असतात आणि ज्यांनी त्यांनी आपले भोगायचे असतात. ते सर्व-पूर्व कर्मानुसार- आपल्या वाट्याला येत असतात. ते सर्व इथेच संपवून जायचे.''

''त्यांच्या चरणी एवढेच मागायचे की पुन्हा जर जन्म मिळाला तर पुन्हा अशीच सेवा करायचे भाग्य आमचे आम्हाला द्या!'' ते ही त्यांच्याच हातात आहे. आम्ही अज्ञानी जीव आहोत.

प.पू.सौ. आई साहेब (आमच्या सासूबाई) म्हणजे ''आत्यंतिक जिव्हाळा, प्रेम, आपुलकी तसेच स्पष्टवक्तेपणा, टापटीप, स्वच्छता वगैरे सर्व गुणांचा एकत्र मेळच होता. त्यांचाही खूप सहवास लाभला. घरातील प्रपंचाच्या सर्व जबाबदाऱ्या त्या सांभाळत असत. व्यवहारामध्ये अगदी काटेकोरपणे कसे रहावे हे मात्र त्यांच्यामुळे शिकायला मिळालं. सर्व जबाबदारी त्या सांभाळत असत. त्यामुळे आमचे संसार सुकर झाले. संसार कसा झाला हे कळलेच नाही.

२५-३० वर्षे होऊनही आम्ही निर्धास्त होतो. सर्व नातवंडांवर त्यांचे आत्यंतिक प्रेम होत. आमोद लहान असताना खूपच मस्ती करायचा. त्याला एकदा त्या सरळ दादांच्या खोलीत हाताला धरुन घेऊन गेल्या. म्हणाल्या ''अहो! हा फारच खोडकर आहे. कोणाचेच ऐकत नाही. त्याच्या गळ्यात एखादा ताईत घाला मंत्रून. म्हणजे तो शांत होईल. '' आणि त्याप्रमाणे दादांनीही त्याच्या गळ्यात मंत्रून ताईत घातला. अद्यापिही तो त्याच्या गळ्यात आहे. त्यानंतर मात्र तो खूप शांत झाला. आम्ही मुलांकडे लक्ष देण्यात एखादेवेळी कंटाळा करू, पण त्यांचे सर्वांकडे जातीने लक्ष असायचे. नातं ''सासू-सुनेचे'' होतं पण मातेच्या मायेने सर्व गोष्टी पार पाडीत.

संसाराचे दिवस जात होते. मनात कुठेतरी जाणीव होत होती की आपण खूप मोठ्या संतांच्या घरात आहोत. प.पू.श्री ताई महाराज वारंवार पुण्याला येत असत. त्यांच्या मुळे 'श्री' महाराज व सौ. आई साहेब एवढे मोठे आहेत हे कळले व त्या मुळे भक्ती वाढली. तसेच श्री महाराजांमुळे ''प.पू.श्री ताई महाराज'' कळल्या. खर तर ही सगळीच मंडळी सारख्याच भूमिकेची आहेत.

पदोपदी 'श्री' महाराज आम्हाला सांगत की प.पू.श्री ताई महाराजांना नमस्कार करा. त्याही खूप मार्गदर्शन करतात. त्यांचा अधिकार फार मोठा आहे. त्या कोणाच्याही घरी जात नाहीत पण आपल्याकडे येतात. आपल भाग्य मोठ आहे. त्या स्वतः प्रत्यक्ष ''भगवती '' आहेत. असे अनेकदा सांगत. आश्रमात किंवा कुठे बाहेर जायला निघाले म्हणजे प.पू.ताईमहाराज पुढच्या खोलीत असतील तर 'श्री' महाराज त्यांना साष्टांग नमस्कार घालत. आणि प.पू. श्री ताई महाराज सुध्दा 'श्री' महाराजांना साष्टांग नमस्कार घालत. ते दृष्य पाहताना खरोखर आम्हाला धन्यता वाटे. असे प्रसंग आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहेत. प.पू.श्री. ताईमहाराजांच्या सहवासातील ते सोनेरी क्षण होते. अगदी आनंदोत्सव असायचा. खूप आनंद व्हायचा. आम्ही मात्र सामान्य जीव एवढीच प्रार्थना करतो की पुढचे जन्म ही सेवेत जाऊ दे.

******

## तेलंग यांच्या स्मरणिकेतून

श्री. श्रीपाद गोपाळ तेलंग यांच्या 'श्री' महाराजांसंबंधी अनेक आठवणी प्राप्त झाल्या आहेत. त्यांचा संदर्भ लक्षात येण्यासाठी सांगितलेला थोडा पूर्वेतिहास असा आहे-

''आमच्या घराण्यास श्री प.पू.वक्रतुंड महाराज कवीश्वर यांचे कृपा-आशीर्वाद लाभले. आमचे आजोबा आणि आजी यांना त्यांनी अनुग्रह दिला होता. आमचे मूळ गांव देऊळगावराजा. आमचे वडील, आई, काका, आत्या या सगळ्यांना प.पू.श्री.धुंडीराज महाराजांनी मंत्रदीक्षा दिली. या सगळ्या

अनुग्रहाचे प्रसंगी देउळगावराजा येथील श्री. बालाजी महाराजांचे मंदिरातच प्रथम देवाची पूजा करवून नंतर पुण्याहवाचनादि विधीपूर्वक मंत्र देण्याचे घडले आहे.''

आमचे पिताजी ती. गोपाळशास्त्री तेलंग यांना प.पू.श्री. धुंडीराज महाराज व सौ.सरस्वती आई साहेब हे आपला ज्येष्ठ पुत्र मानत असत. श्री दत्त महाराज व अन्य बंधूंसह आम्हाला पाच मुले आहेत असेच ते सगळ्यांना सांगत. ती. गोपाळशास्त्री अध्ययनासाठी प्रथम नाशीक त्र्यंबकेश्वरला गेले. परंतु तेथे एक साधू यांना म्हणाला ''यहाँ रहना नही. अपने गुरु के पासजाना.'' नंतर मात्र त्यांनी श्री क्षेत्र नरसोबावाडीत राहून प.पू.श्री. धुंडीराज महाराजांकडेच अध्ययन पूर्ण केले. त्या काळात त्यांचे वास्तव्यही 'श्री' महाराजांच्याच घरी होते.

देऊळगावराजाला असताना श्रीपादरावांच्या मातोश्री आपल्या घरातील कपड्यांबरोबर श्री. धुंडीराज महाराज व सौ. सरस्वती आई साहेब यांच्याकडून कपडे धुवायला नेत आणि आणून वाळत घालत. त्या मुळे जेवायला उशीर होई. पण धुणे वाळत घालून परत जाताना श्री.धुंडीराज महाराज आशीर्वाद देत.''बाई,! तुझा नवरा खडकावर बसला तरी त्याला कांही कमी पडणार नाही आणि मोठ्या आईसाहेब तिला कांहीतरी खाऊ घालून पाठवायच्या.

श्री. तेलंग यांच्या संग्रही प.पू.श्री धुंडीराज महाराज व सौ. सरस्वती आई साहेबांचा तुलसी वृंदावनाजवळ उभे असलेला जो फोटो आहे तो प.पू.श्री. धुंडीराज महाराजांनीच त्यांना श्रीदत्तमहाराजांचे हस्ते देवविला आहे.

श्री. धुंडीराज महाराजांच्या आज्ञेनुसार श्री. गोपाळराव तेलंग कुटुंबासह नागपूरला गेले. उदरनिर्वाहासाठी नागपूरच्या सीताबर्डी भागातील मोदी नं.२ गल्लीतील श्री दत्तमंदिरात सेवेला राहिले. तेथेच त्यांची ४८ वर्षे श्रीदत्तसेवा झाली.

घरात नेहमी श्री. वक्रतुंड महाराज श्री. धुंडीराज महाराज, सौ. आईसाहेब यांचे बद्दल बोलणे होत असे त्या मुळे कवीश्वर घराणे हे ''आपले गुरुघराणे '' आहे हा संस्कार बालपणीच मनावर झालेला होता.

आमचे घरी प.पू. श्री. गुळवणी महाराज, त्यांच्या मातोश्री व भगिनीसह आले होते. तसेच केडगावचे नारायण महाराज इत्यादि अनेक सत्पुरुषांचा सहवास व सेवेची संधी ती. श्री. गोपाळशास्त्रींना मिळाली. ''गुरु सेवेचे काय फळ मिळते, हे पहायचे असेल तर गोपाळबुवाकडे पहा म्हणजे कळेल'' असे श्री धुंडीराज महाराज त्यांच्या अनेक शिष्यांना सांगत. आज जी कांही आमची स्थिती आहे ती कवीश्वर घराण्याचीच कृपा आहे. संतांबरोबर सात पाउले चालले तरी स्वर्ग मिळतो असे म्हणतात. आमचे घराण्यावर तर प.पू.श्री. वक्रतुंड महाराजांच्यापासून सतत कृपेचा वर्षाव होत आहे.

श्रीपादराव २-२॥ वर्षांचे असताना श्री क्षेत्र वाडीला त्यांना नेले होते. त्यांच्या मातोश्रींना श्रीं चे पादुकांभोवती प्रदक्षिणा घालता याव्यात म्हणून प.पू.श्री. धुंडीराज महाराज या बाल श्रीपादला कडेवर घेऊन घाटावर फिरवीत असत. **नागपूर मुक्कामात एकदा श्रीपादरावांच्या मातोश्री गर्भवती असताना मंदिराच्या कांही दुरुस्तीचे बांधकाम सुरु होते. त्यासाठी त्यांना तळ मजल्यावरून माडीवर सामान न्यायचे होते. या गर्भवती मातेला त्रास होऊ नये म्हणून श्री. दत्तमहाराज स्वतः सामान माडीवर नेऊ लागले.**

कोणत्याही बाबतीत प.पू.श्री. धुंडीराज महाराज देतील तो निर्णय ती. गोपाळबुवा प्रमाण मानत असत. एकदा त्यांनी ''देऊळगावचे घर बंधूंना देऊन टाक'' असे सांगितल्यावर लगेच तसे देऊन टाकले. श्री. गोपाळबुवांनी देउळगावला श्रीमद् भागवताचे १०८ सप्ताह केले. ते चालू असताना एकदा प्लेगची साथ जोरात होती पण यांना त्याचा कांहीच उपद्रव झाला नाही. संपूर्ण भागवत त्याना पाठ होते. गोपाळ बुवांना म्हणजे माझ्या वडीलांना 'तात्या' म्हणत असत.

प.पू.श्री दत्तमहाराजांचा सहवास आम्हाला बाळपणापासूनच अनेकदा लाभला. 'श्री'महाराजांचा आमचेकडे सलग २ते३ महिने असा मुक्काम बरेचवेळा झाला. माझ्यावर त्यांचे पुत्रवत् प्रेम होते.

श्रीदत्तमहाराजांच्या बोलण्यात व वागण्यात शालीनता असे. तसेच मिश्किलपणा व विनोदही त्यांच्या बोलण्यात असे. त्यांना सकाळीवर्तमानपत्र

वाचायला आवडत असे. ती. तात्यांचे बरोबर ‘श्री’ महाराजानी कांही दर्जेदार मराठी चित्रपट पाहिले. नागपुरात ‘श्री’ डोक्याला पटका बांधायचे व धोतर उपरणे अशा पोषाखातच सिनेमालाही जात. श्री. अशोकराव महाराजांच्या लग्नापर्यंत ‘श्रीं’ ना फेटा (पटका) बांधताना बघितले आहे.

तात्यांना एकदा ‘श्री’ महाराज म्हणाले ‘‘ आमच्या मंडळींना आम्ही दोन दागिने करुन दिले.’’ तात्यांनी उत्सुकतेने विचारले ‘कोणते?’ ‘श्री’ म्हणाले ‘‘एक चष्मा आणि दुसरा म्हणजे कवळी’’. आमच्या कडे घरी असल्याप्रमाणे रहात. माझी आई तात्यांचे व ‘श्रीं’ चे पान चुली जवळ वाढत असे व चुलीवरची गरम गरम भाकरी दोघांना अर्धी अर्धी वाढत असे.

माझ्या लग्नाच्या आधी घरी गॅस आणला. तो कसा पेटवायचा हे ‘श्रीं’ नी आईला शिकवले. म्हणाले ‘‘श्रीपाद हुशार आहे. आधीच आईला गॅस आणला. उद्या कोणी म्हणायला नको, बायकोच्या सोईसाठी गॅस आणला’’. लग्नाच्या वेळी माझे वाढलेले कल्ले पाहून म्हणाले ‘‘पहा! तिकडून तसा निरोप आला असेल!’’

आमच्याकडे कोणी आजारी पडले तर ‘श्री’ मंत्र लिहून पाठवत असत. आमच्याकडे श्री रेणुकेची मुर्ती पुजेत आहे. ती मुर्ती ‘श्रीं’ नी स्वतः सोनाराजवळ बसून हवी तशी घडवून घेतली आहे. त्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठाही त्यांनीच केली आहे. प्रसंगी सत्यनारायण इ. पूजा स्वतः सांगून करवून घेतल्या आहेत.

श्री.गुरुमहाराज (गुळवणी महाराज) असताना, नागपूरची कांही मंडळी श्री दत्तमहाराजांकडे अनुग्रहाची प्रार्थना घेउनी आली तेंव्हा ‘श्री’. उत्तरले ‘‘श्री गुरुमहाराज आमच्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. त्यांच्याकडून अनुग्रह घ्या!’’

श्री. अशोक महाराज, श्री. अनिल, श्री. अजित यांनी मी (श्रीपाद) व माझ्या बंधुंबरोबर सख्ख्या नात्याने वागावे अशी सौ.आईसाहेबांची सूचना होती. सौ.सुलभाताईंचा विवाह नागपूरला संपन्न झाला. त्यावेळी ‘श्री.’ तात्यांना म्हणाले‘‘ही तुमची पांचवी मुलगी आहे’’ ‘‘ हिचे सर्व तुम्हाला करायचे आहे.’’ श्री. अशोक महाराजांचे बी ए एम एस (आयुर्वेदिक डॉक्टर) शिक्षण नागपूरला झाले. त्यांचाही सहवास लाभला.

**नागपूरला आमच्याकडे आल्यावर सकाळचे स्नानानंतर आपले धोतर उपरणे स्वतःच धूत असत. आमच्या भगिनी ती सेवा मिळवायचा खूप प्रयत्न करीत परंतु त्यांनी कोणालाही आपली वस्त्रे धुवायला दिली नाहीत. मला म्हणायचे ''श्रीपाद! आपले राष्ट्रपती श्री राजेन्द्र प्रसाद स्वतःच्या हाताने आपले धोतर धुतात. आपण तर किती लहान आहोत त्यांच्या मानाने.''** सकाळ संध्याकाळ 'श्री' दत्ताला प्रदक्षिणा घालीत असत त्यावेळी अनेक स्तोत्रे पदे इ. म्हणत असत. सायंकाळी मंदिरात प्रवचन सेवाही होत असे.

'श्री' महाराजांना मी अनुग्रहाबद्दल विनंती केली असता ''तुमच्या लग्नाच्या वेळी देऊ'' असे सांगितले. आमच्या लग्नाला म्हणून त्यांचे आगमनही झाले होते. पण प.पू.श्री गुळवणी महाराजांचे त्याच सुमारास महानिर्वाण झाल्याने 'श्रीं' ना लग्नाच्या आधीच ८-१० दिवस पुण्याला जावे लागले. पुढे देऊळगांवराजाला महाराजांचा मुक्काम होता तेव्हा पत्र पाठवून बोलावून घेतले. आम्हा उभयतांकडून पुण्याहवाचनपूर्वक श्रीदत्तुबाळाची पूजा करविली, तसेच प.पू.श्री. धुंडीराज महाराजांची पूजा करविली व त्या नंतर विधिवत् मंत्र दिला.

ती. तात्या(पिताजी) यांच्या निधनानंतर आम्ही श्री दत्तमंदिर सोडण्याचे ठरविले. त्याला संमती देताना''श्रीदत्ताचे निरंतर ध्यान ठेवा'' असे सांगितले.

इ.स.१९८३-नागपूरला आमच्याकडे 'श्रीं' चा भागवत सप्ताह झाला. नागपूरला 'श्रीं' चे रेल्वेने आगमन झाले. स्टेशनवर उतरल्याबरोबर श्रीपाद आला का असे विचारले. मी पुढे झालो. मला म्हणाले ''श्रीपाद-काल सकाळी माटुंग्याला असताना आमच्या स्वप्नात तात्या आले व म्हणाले -''महाराज, श्रीपादने भागवत सप्ताहाची तयारी केली आहे. मी तुम्हाला नेण्याकरता आलो आहे. मी म्हटले ''चला'' तर म्हणाले मी पुढे जातो.तुम्ही मागाहून याआणि अदृष्य झाले. '' 'श्रीं' नी तात्यांच्या अंगावरील वस्त्रांचे ही वर्णन केले.

**भागवत सप्ताह संपला. कांही रक्कम शिल्लक राहिली ती पुढे 'श्री वामन निवास' च्या बांधकामास पाठवायला लावली. ''गुरुपेक्षा, गुरुस्थानाचे महत्व जास्त  असते'' असे सांगितले.**

'श्रीं' चा एकदा नागपूरला मुक्काम असताना मी विचारले ''महाराज! आपल्याला, आमच्या वडीलांना, इतक्या प्रकारचे दु:ख का भोगावे लागते? त्रास कां सहन करावा लागतो''. त्यावर 'श्री' उत्तरले,''परमेश्वर आपली परीक्षा बघत असतो. आपला संयम, श्रध्दा, भक्ती किती आहे व ती प्रतिकूल परिस्थितीत ढळते कां! ते पहात असतो.''

आमच्या दत्त मंदिरांत 'श्री' बऱ्याच वेळ पर्यंत श्रीदत्ताला प्रदक्षिणा घालीत असत. **तात्यांनी त्यांना एकदा इतक्या प्रदक्षिणा घालण्याचे कारण विचारले तेंव्हा ते म्हणाले ''आपल्या हातून न कळत सतत पाप घडत असते. त्याचे क्षालन व्हावे म्हणून प्रदक्षिणा घालायच्या.'' त्यावर तात्या म्हणाले ''महाराज! आपणाला कुठल आल पाप?'''श्रीं'नी उत्तर दिले,''आपल्याला मानव जन्म आला आहे तो पुण्या प्रमाणे पाप ही असल्या मुळेच आला आहे.**

तात्यांना 'श्री' आपले मनोगत बरेचदा सांगत-''अशोक एकदा डॉक्टर झाला की आम्ही देउळगावराजाला येऊन पितांजींची सेवा करत राहणार.

'श्रीं' च्या जीवनातली प्रत्येक गोष्टी 'श्रीं'नी श्रीपादरावांना आपण होऊन सांगितली आहे.

एकदा श्रीपादरावांनी रेणुका निवास मधे एक दिवाण आणून दिला. 'श्री' महाराज परगावी असतानाची वेळ साधून त्यांनी गुपचुप 'श्रीं' साठी आणून दिला. हेतू हा की आपल्याशी बोलताना 'श्रीं' नी उच्चासनावर बसावे.

घरी परतल्यावर जेंव्हा 'श्रीं' ना समजले तेंव्हा लगेच पत्र आले. ''तुम्ही गुप्तदान करता वाटतं. तुम्हाला प्रपंच आहे. तो आधी नीट करा. उगीच भावनेच्या आहारी जाऊन असे पैसे खर्च करु नका.

एकदा श्री. धुंडामहाराज देगलूरकर यांनी कीर्तनात अभंगावरच्या निरुपणात सांगितले की, ''श्री नाथमहाराज (एकनाथ महाराज)कसे होते तर श्री दत्त महाराजां सारखे होते'' असे ४-६ वेळा बोलले. 'श्री'महाराज समारोपाचे बोलताना म्हणाले. सत्पुरुष कसे असतात तर आपल्याअंगी असलेले गूण

दुसऱ्याला लावून त्याला मोठे करण्याचा प्रयत्न करीत असतात. हेच आज श्री. धुंडामहाराजांनी केले.

एकदा 'श्री' महाराजांचा नागपूर येथे सत्कार झाला. घरी आल्यावर 'मिळालेली शाल'' त्यांनी लगेच तात्यांच्या अंगावर घातली. म्हणाले ''आमच्या पेक्षा तुम्हाला याची जास्त गरज आहे.'' नागपूरहून निघताना आम्हा बंधुनाही शाल इ. देत असत.

**कारंजा गुरु मंदिरात श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांचे दर्शनाला समोर उभा असताना त्या ठिकाणी आलटून पालटून एकदा श्री. दत्त महाराज व एकदा श्री गुरु नृसिंह सरस्वती महाराज असे दर्शन बराच वेळ होत होते.**

'श्री' महाराजांच्या बरोबर राहून त्यांची सेवा करावी असे मला फार वाटायचे. तसा मी एकदा त्यांच्याकडे विषय काढला तेंव्हा त्यांनी सांगितले- ''एकतर तुम्ही प्रपंचात पडलात. प्रपंच चांगल्यारीतीने करणे हीच देवाची सेवा आहे. आपली नोकरी इमाने-इतबारे करणे ही सुध्दा आमची सेवा आहे. तुम्ही जेंव्हा जेंव्हा स्मरण करता तेंव्हा आम्ही तुमच्या जवळ असतो. तेंव्हा आमच्या बरोबर राहण्याची गरज नाही. **गुरु स्मरण केल्यावर गुरु आपल्याबरोबर नाहीत ही जर आपली भावना होत असेल तर आपल्या गुरु भक्तीला कांही अर्थ नाही.''**

एकदा प्रमोशन संबंधी मुलाखतीला गेलो तेंव्हा त्या अधिकाऱ्याच्या मागच्या भिंतीवर 'श्री' महाराज दिसत आणि मला विचारलेल्या प्रश्नांना माझ्या तोंडून तेच उत्तर देत होते.

'श्रीं' च्या अनुग्रहीत भक्तांची गणना अशक्य आहे. देउळगावराजालाच एकावेळी ५०-५० मंडळी अनुग्रह घेण्यासाठी बसलेली पाहिलीत.

**मी सेवेत असलेल्या बँकेतून एकाने कर्ज घेतलेले परत फेड करायचे राहिले होते. तो 'श्रीं' चा अनुग्रहीत आहे असे त्यांना कळले तेंव्हा स्वतःच रु.१०००/- मला देऊन त्याचे कर्ज फेडून त्याला कर्जमुक्त केले.**

आपल्या मुलाबाळांच्या तोंडचे काढून 'श्रीं' ना खायला दिलेले त्यांना आवडत नसे. त्यांनी तसे मजजवळ बोलून दाखवले . कोणाला त्रास होऊ नये याची ते जास्तीत जास्त काळजी घेत.

एकदा प्रवचनाच्या ओघात 'श्री' म्हणाले''एकाद्याचे प्राण घेणे म्हणजेच हत्या असे नव्हे. तर दुसऱ्याचे मन दुखविणे म्हणजे देखील हत्या असते. ती आपण होऊ देऊ नये.''

आमच्याकडील भागवत सप्ताहाचे वेळी माझी धाकटी भावजय बाळंतीण होती. त्या लहान बाळाच्या रडण्याचा 'श्रीं'ना ही त्रास होत असे. पण गंमत अशी की 'श्री' महाराजच केंव्हातरी तिला म्हणत असत ''आमच्याकडे सारखी माणस भेटायला येतात. त्याचा तुम्हाला त्रास होत असेल.''

ती स्नानाला जाताना तेलाने माखलेल्या लहान बाळाला 'श्रीं' च्या मांडीवर देऊन जायची आणि 'श्री' त्याला खेळवीत असत.

आमच्या प्रपंचात एखादी प्रतिकूल घटना घडली म्हणजे असे वाटते की याही पेक्षा अधिक कांही घडणार होते पण 'श्री' महाराजांच्या कृपेने एवढ्यावरच निभावले. **एका प्रवचनाच्या ओघात म्हणाले ''गुरु,शिष्याला अनुग्रह देतात तेंव्हा काय करतात. तर अनुग्रह होण्यापूर्वी त्याची जी पापे असतील त्याचे क्षालन करतात. पण त्या नंतर जर शिष्याने दुर्वर्तन ठेवले तर त्याचे दुष्परिणाम गुरुंना भोगावे लागतात. म्हणून शिष्याने या बाबतीत सावध राहिले पाहिजे.''**

यावरुन लक्षात येते की 'श्री'महाराजांना क्लेश का भोगावे लागले. आमची पापकर्म त्यांना निस्तरावी लागली. नाही तर त्यांना कसले भोग?

प्रारब्ध भोग हे भोगूनच संपवावेत असे 'श्रीं' चे सांगणे असे.

सौ. आई साहेब गेल्या त्याच्या आधी सूरजच्या लग्नाच्या आदल्या दिवशी पुण्याला भेटायला आलो तेंव्हा 'श्री' महाराज जवळ जवळ ३ तास अखंड बोलत बसले होते. सगळ्या जुन्या आठवणी काढल्या. म्हणाले ''श्रीपाद, आता सगळ्या सोई झाल्यामुळे नागपूरला यायची फार इच्छा आहे. तुम्हा सर्वांची फार आठवण येते. पण आमचे शरीर साथ देत नाही.

त्या वेळी घरात लग्नाची गडबड, सौ.काकूंची (सौ.आई साहेबांची) प्रकृती बरोबर नाही म्हणून आम्ही महाराजांकडे न उतरता हॉटेल मधे उतरलो, आणि मोठी चूक केली. सौ.सुलभाताईंनी आम्हाला,चूक सुधारुन, लगेच सामान घेऊन घरी यायला लावले. तथापि रात्री गप्पा संपता 'श्री' म्हणाले ''यावेळी तुम्ही दुसरीकडे उतरलात असे आम्ही ऐकतोय.'' पण सामान घेउन येऊन घरीच मुक्काम केल्याचे त्यांना सांगितल्यावर त्यांचे समाधान झाले.

२५ फेब्रुवारी १९९९. सौ.चा वाढदिवस होता.

श्री अशोक महाराज सौ. च्या स्वप्नात आले व म्हणाले ''दर्शनाला या! हिमालयावरचा बर्फ वितळतो आहे! श्रीपादला घेऊन दर्शनाला ये!''

त्या नंतर फाल्गुनी पौर्णिमा- 'श्रीं' चे-महानिर्वाण-अंतिम दर्शन-'श्रीं' चे बर्फात ठेवलेले शरीर. या वरुन स्वप्नाचा उलगडा झाला. पण उशीर झाला होता.

'श्रीं' च्या गुणांचे यथार्थ वर्णन करायला पुष्पदंत विरचित श्री शिवमहिम्नातील श्लोकाचाच आधार घ्यावा लागतोः-

असित गिरिसमं स्यात् कज्जलं सिंधुपात्रे ।
सुरतरुवरशाखा लेखनी पत्रमुर्वी ।
लिखती यदि गृहीत्वा शारदा सार्वकालं ।
तदपि तव गुणाना-मीश पारं न याति।।

त्यातील भाव असा आहे की हे प्रभू!

''मोठ्या पर्वता इतके कज्जल समुद्रामध्ये कालवून लिहिण्यासाठी शाई तयार केली. देववृक्षाच्या एका लहान शाखेची लेखणी तयार केली, संपूर्ण पृथ्वी(भूमी)चीच लेखनासाठी पत्र(कागद) म्हणून योजना केली व साक्षात् भगवती शारदा ती लेखणी हातात घेऊन तुझे गुण वर्णन सर्वकाळ(अखंड) करीत राहिली तरी तुझे गुण **इतके-असे** म्हणून त्यांचा अंतपार लागू शकणार नाही.'' म्हणून मौनानेच तुला शत शत प्रणाम् !

******

## आम्ही आहोत नां !

हे आश्वासन श्री दत्तमहाराजांच्याकडून सर्व प्रसंगात मिळत असते. अशी सतत अनुभूती घेणारे साधक गुरुबंधू कळवतात-

मला आमच्या विवाहानंतरच 'श्री' महाराजांची सेवा करण्याची संधी मिळाली. तत्पूर्वी हा मार्ग, दीक्षा-साधना याची माहिती नव्हती. माझी पत्नी प.पू.श्री.गुरुमहाराज गुळवणी महारांजांची अनुग्रहीत आहे. श्वशुरांकडील पूर्ण कुटुंबच 'श्रीं' च्या छत्र छायेखाली दीर्घ कालापासून आहे. त्यामुळे 'श्रीं' चा सहवास सुलभतेने मिळत गेला. एकदा साधनेसंबंधीचे ज्ञान झाल्यावर दीक्षा मिळावी अशी ओढ लागली. प.पू.श्री.दत्त महाराजांनी १९८३ साली कृपा केली. त्या नंतर साधने बरोबरच थोरल्या महाराजांचे चरित्र वाचन, श्री गुरुचरित्र वाचन व इतर सुसंगती ह्या मुळे आपणही प्रपंचाचा सर्व भार त्यांच्या चरणावर अर्पण करून त्यांच्या स्मरणात आनंदाने राहावे अशी मनोभूमिका हळू हळू तयार झाली. त्या नंतर मात्र प्रत्येक वेळी 'आम्ही आहोत नां!' हे आश्वासन मिळत गेले व तसे प्रत्ययही येत गेले व अद्यापही ती कृपा आहेच.

पुण्याला श्रीवासुदेव निवासात 'श्रीं'ची पाद्य पूजा करण्याचे भाग्य लाभले. 'श्रीं'च्या चरण पादुका आपल्या पूजेत असाव्यात असे वाटू लागले. एक काष्ठ पादुकांचा जोड 'श्रीं' च्या समोर ठेवून प्रसादाची याचना केली. त्यानी स्वत: चरणस्पर्श न करता उचलून प्रसाद दिला व ''ह्या थोरल्या महाराजांच्या (श्री सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या पादुका) म्हणून पूजेत ठेवा.'' असे सांगितले. सोबत नेलेला हार ही थोरल्या महाराजांच्या फोटोला घालायला लावला . त्या नंतर स्वत:ची वास्तू झाली. त्याचे नामाभिधान ही 'श्री' इच्छेने ''श्रीवासुदेव निवास'' असेच झाले. तेथे 'श्रीं' चे अखंड वास्तव्य असल्याचे जाणवते व तसे अनेकदा अनुभव ही येतात.

या प्रसाद प्राप्ती नंतर एकदा पुण्याला दर्शनाचे प्रसंगी प्रार्थना केली की श्री क्षेत्र नरसोबावाडी येथे ''दक्षिण व्दार '' स्नानाचे जुळून यावे. तेंव्हा ''होईल'' म्हणाले. कांही दिवसानीच श्री गुरुपौर्णिमेच्या सुमारास आमचे वाडीला जाणे

झाले. तेथे पाहिले तो काय- कृष्णामाईला महापूर आलेला होता. देव गावात गेलेले होते. पण नवलाची गोष्ट म्हणजे वाडीला श्री रामचंद्र योगींच्या समोर जे श्री सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या पादुका स्थान आहे तेथे दक्षिण व्दार झालेले होते. जुन्या धर्मशाळेच्या मागच्या दाराने खाली उतरुन एक पुजारी तेथे स्नान करीत होते. तेथे आमचीही वर्णी 'श्री' कृपेने लागली व बेताबेताने दक्षिणद्धार खिडकी पर्यंत जाऊन आतील पादुकांचे दर्शन घेतले.

त्यावेळी जे दिव्य दर्शन झाले ते आयुष्यात कधीही विसरणार नाही. श्री थोरले महाराज स्वतःच तेथे विराजमान असलेले दिसले. कृतार्थ झालो. मनात इतक्या आनंदोर्मी उफाळून आल्या व सारखे अश्रू येऊ लागले. केवळ आनंदच आनंद!

त्या नंतर देव ''गावात'' ज्या पुजाऱ्यांचे घरी होते तेथे जाऊन महापुजेत सहभागी होण्याचे ही भाग्य लाभले. तेथे श्री पादुकांच्या बाजुच्या पडवीत थोरल्या महाराजांची भव्य तसबीर होती. ती पाहिल्यावर एकदम लक्षात आले की बरोबर तेंच स्वरुप श्री थोरल्या महाराजांनी आम्हाला प्रत्यक्ष दाखविले होते. हा अनुभव येण्या इतकी भक्ती आमची खचितच नाही. केवळ श्रीदत्त महाराजांच्या कृपा संकल्पाने हे अपूर्व भाग्य लाभले यात शंका नाही.

या प्रसंगातून 'श्री' महाराजांनी हे समजावून दिले की '' श्री दत्तप्रभू, सद्गुरु श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज व श्री दत्त महाराज एकच आहेत.''

एक-दोन लहानशा प्राप्रंचिक प्रसंगातून 'श्रीं' चे ''आम्ही आहोत नां!'' या अभिवचनाचा प्रत्यय आला ते प्रसंग असे-

स्कुटरने बाजारपेठेतून गर्दीच्या वाटेने जात असतां एका एकी पायाखालचा ब्रेक लागेनासा झाला. मोठ्या प्रयासाने गियरच्या मदतीने गाडी स्लो करुन गर्दीतून बाजूला झालो. कोठलीही अनुचित घटना घडली नाही म्हणून हायसे वाटले. इतक्यात मागून एक व्यक्ती-मोटर सायकलवर असलेली स्लो करुन एवढेच म्हणाली ''ब्रेक पेंडल खाली दगड आहे.'' इतके शब्द ऐकू येई पर्यंत ते

कोण होते, ते कुठे गेले कळले नाही. पण वाकून निरीक्षण केले तो खरोखरच पँडल खाली एक दगड आला होता व त्यामुळे ब्रेक लागत नव्हता.''

एकदा गॅस पुरवठा एजंट कडे नंबर लावला. १० दिवसांनी गॅस मिळेल असे त्याने सांगितले. त्यामुळे ऑफिसला जाताना सिलेंडरचे पैसे घरी देऊन ठेवायचे ''सवड आहे'' या विचाराने राहून गेले. २-३ दिवसानंतरच वाटेत शब्द ऐकू आले ''गॅस आला आहे. शेजाऱ्यांकडून पैसे घेऊन दिले आहेत.'' घरी परतल्यावर या शब्दांची लगेच सत्यता कळली. तेंव्हा पासून घरी कांहीतरी रक्कम ठेवून बाहेर जाण्याची सवय लावून घेतली,

'श्रीं' चे अंतर्यामित्वाचे अनुभव अनेकांना येतात. ते तसे आम्हांलाही आले आहेत.

******

## वासुदेव चिंतन

सध्या सांगली येथील रहिवासी असलेले प्रा.वासुदेव मल्हार कुलकर्णी या गुरुभक्तांच्या लेखणीतून उतरलेल्या काही स्मृती येथे दिल्या आहेत. यांच्या घराचे नांव ''श्री वासुदेव चिंतन'' असे श्री थोरल्या महाराजांच्या स्मृत्यर्थ दिलेले आहे. यांच्या वडीलांना श्री थोरल्या महाराजांची कृपा प्राप्त झाली होती. ते भक्तीचे लेणे या बंधुच्या ठिकाणीही 'श्री' कृपेने पहायला मिळते.

'' त्या वेळी पुणे येथे मी नवखा होतो. बहुधा १९६६ च्या नवरात्रात श्री वासुदेव निवासात सकाळी श्री सद्गुरु गुळवणी महाराज त्यांच्या नेहमीच्या खोलीत बसलेले होते. ''दत्तमहाराज आले कां? असे त्यांनी कुणालातरी विचारले. ''कोण हे दत्तमहाराज की ज्यांची श्रीगुरुमहाराज इतक्या आतुरतेने वाट पहात आहेत.'' असे मनात आले व इतक्यात अत्यंत साधी व्यक्ती (श्रीदत्तमहाराज कवीश्वर) देवापुढील वाचन इ. संपवून खोलीत आले. त्यांच्यामध्ये कांही सहज बोलणे होत असतानांच श्रीगुरुमहाराजांच्या पुढे गुडघे टेकून डोके ठेवून नमस्कार करीत असताना त्यांना प्रथम पाहिले. किती विनम्र भाव! वाटले श्रीगुरु

महाराजांच्या पुढे असा नमस्कार केला पाहिजे. अमाप असते थोरांची थोरवी! न बोलता खूप शिकविले जाते. त्यांनतर एकदा श्री दत्तमहाराजांना विनंती केली ''महाराज! सांगलीला येणे झाले म्हणजे आमच्या घरी यावे.''मृदु आवाजात म्हणाले ''एकदा आम्ही आलो होतो.''

माझ्या विस्मृतीत गेलेला तो प्रसंग त्यांच्या शब्दामुळे आठवला. श्री गुरुमहाराज माझ्या छोट्या भाड्याच्या घरात आले होते. त्यांच्या बरोबर चारपांच मंडळी होती. बहुधा श्री. दत्तमहाराज व श्री.जगन्नाथशास्त्री पुजारी इ. होते. त्या वेळी आनंदाच्या भरात मला कांही सुचले नाही. श्री.दत्तमहाराज खाली सतरंजीवर, अडचणीत बसले होते. कांही आदरातिथ्य केले नांही. श्री गुरुदत्त मला क्षमा करोत.

श्री दत्तमहाराज एक उत्तम ''गुण सूर्य '' होते. सहस्त्रावधी किरणांपैकी प्रत्येक किरण एक गुण असे. प.पू.योगीराज श्री गुळवणी महाराज श्री दत्तमहाराजांच्या ठिकाणची ही गुण समृध्दी पारखून होते. तसेच श्री दत्तमहाराजांच्या अंतरात श्री योगीराजांच्या बाबतीत असीम आदर होता. दोहो मध्ये एक भाव, एक वाक्यता. किंबहूना जे भावविचार श्री गुरुमहाराजांचे, ते श्री दत्तमहाराज अक्षरशः व्यक्त करीत, कार्यान्वित करीत.

श्री दत्तमहाराजांचे मोठेपण गुणवर्णन केले तर ते श्री गुरुमहाराजांना फार आवडायचे. आमच्या अनुयायांवर श्री दत्त महाराजांची कृपा साउली असावी असे श्री गुरुमहाराजांच्या मनात नक्की असे, असे वाटते.

एकदा मी आश्रमात श्री.गुरुमहाराजांना वंदन करुन पाया पडून पहाटेच (१९६८) दिल्लीला जाण्याकरता पुणे स्टेशन च्या दिशेन चालत निघालो. हिवाळ्याचे दिवस व थोडे अंधारलेलेच होते. धुक्या मधून समोर श्री दत्तमहाराज श्री.वासुदेव निवास कडे झपाझप पावले टाकीत अनवाणी येत असताना योगायोगाने दिसले. लगेच हातातील बॅग रस्त्यावर ठेवली व त्यांना नमस्कार घातला. आशीर्वाद मिळाला. रिक्षेच्या शोधातच डेक्कनचा रस्ता धरला. सर्व प्रवास उत्तम झाला.

एकदा प्रतिवार्षिक श्री गुरुद्वादशीची नरसोबावाडीची वारी आटोपून

दिवाळीच्या दिवशी, श्री दत्तमहाराज सकाळी स्नान, आन्हिक आटोपून नरसोबावाडीच्या बस स्टँडकडे निघाले होते. हातात वळकटी होती. श्री.गुरुमहाराजांचा निरोप घ्यायला''गुरुनिवास'' येथे आले होते. सकाळचे ७ वाजले असतील थंडी होती. आदल्यारात्री पाउसही पडला होता. श्री गुरुमहाराज बरोबरच्या अनेक शिष्य-भक्तांसह श्रीकृष्णा स्नानाला जायला निघाले होते. मी ही स्नानाच्या तयारीने तेथे उभा होतो. श्री गुरुमहाराज म्हणाले,''कुलकर्णी! दत्तमहाराजांची वळकटी घेऊन त्यांना बसमधे बसवून या.'' सुदैव माझे! तसाच वळकटी घेऊन स्टँडला गेलो. श्री दत्तमहाराज एरवी माझ्या कडून किंवा कोणाही कडून ही सेवा करुन घेण्यास तयार नसत. श्री गुरुमहाराजांनी सांगितल्यामुळे ही सेवा मला लाभली. हे ओझे जड नव्हतेच. पण ते घेऊन 'श्रीं' ना पोहचविण्याची आठवण झाली तरी मनाला धन्यता वाटते.

श्री. गुरुमहाराजांनी आपली ऐहिक यात्रा संपविल्यानंतर श्री. दत्तमहाराजांनी आम्हा शिष्यांच्या मनात गुरुवियोग जाणवू नये ही सदैव काळजी घेतली.

**१.४.१९८८ ते ७.४.१९८८ श्री क्षेत्र अमरापूरः-** (वाडीच्या समोर कृष्णा काठी) आता जे अमरेश्वराचे सुंदर भव्य मंदिर दिसते , ते श्री वासुदेवानंद सरस्वती पीठ व कृष्णा नदीवरील अमरेश्वरा समोरचा घाट हे प.पू.श्री. दत्तमहाराजांनी बांधून घेतले. जीर्णोध्दार होण्यापुर्वीच्या मंदिरात वरील कालात श्रीमद् भागवत सप्ताह झाला. रहाण्याची प्रसादाची इ. सर्व व्यवस्था तेथेच उत्तम ठेवलेली होती. पहाटे लवकरच तेथील छोट्या पुलाच्या उत्तरेस नदी प्रवाहामधे श्री दत्तमहाराज स्नान करीत. त्यांच्या मागे आम्ही सर्व शिष्य बुड्या मारून पावन होत असू. श्री. गुरु महाराजांची खूप आठवण यायची.

''श्री नृसिंहसरस्वती यतिर्भगवान मेऽस्ति परावरागतिः॥ हे स्तोत्र म्हणत श्री दत्तमहाराज पुलावरील रस्त्यापर्यंत येत. आम्ही स्नानानंतर वस्त्र बदलून येई पर्यंत 'श्री' चे तेथील कट्ट्यावर आन्हिक आदि सुरुही झालेले असे. त्यांच्या त्या वेळच्या आसनावर बसल्यावेळी त्यांच्या पुढे वाकून नमस्कार करीत असताना (२-३ दिवस) मला त्यांच्या मागे षड्भुज श्री दत्तात्रेय दिसायचे.

त्यानंतर कधी तरी मिरजला डॉ. प्राणी यांच्या घरी'श्री' बसले असताना नमस्कार करताना त्यांच्या मागे श्री लक्ष्मीदेवी दिसली.

श्री वासुदेव निवास आश्रमातील श्री.भागवत सप्ताहात 'श्रीं' चे आवडते शिष्य श्री. पारखीशास्त्री सकाळी खणखणीत आवाजात संहिता वाचन करीत व दुपारी 'श्री' महाराज निरुपण करीत असत. एकदा ''रुक्मिणी स्वयंवर '' हा प्रसंग होता तेंव्हा नित्य पध्दती प्रमाणे मोठा विवाह सोहळाच झाला. त्यावेळी मी कांही वस्त्रादि अर्पण करुन 'श्रीं' ना नमस्कार केला तेंव्हा त्यांच्या ठिकाणी श्री गुरुमहाराज हसत बसलेले दिसले.

एकदा नृसिंहवाडीला श्री. नारायणस्वामी महाराजांच्या पुण्यतिथीसाठी (चैत्रात) 'श्रीं' चे वास्तव्य होते. सर्व कुटुंबीय घेउन 'श्रीं' चे दर्शनाला जाणे झाले. त्यांच्या अपार वात्सल्याने मन भरून आले व डोळ्यात अश्रू आले. ते म्हणाले ''चांगले आहे. भक्ती आहे!''

केव्हा तरी 'श्रीं' नी श्रीवासुदेवनिवास'' ह्या त्रैमासिकास कांही विचार लिहून पाठवावे असे सुचविले. त्या मुळे थोडे बहुत लिहिणे झाले.

एकदा पुण्याला नोकरीला असलेल्या मुलाची भोपाळला बदली झाली असे कळले म्हणून 'श्रीं' च्या भेटीला गेलो. सर्व सांगितले. तेंव्हा म्हणाले ''जाउ दें! २-३ वर्षात जवळ येईल!'' त्यांच्या वाणी प्रमाणे तेवढ्याच काळात मुलाची बदली पुन्हा मुंबईला झाली.

विशेष म्हणजे प.पू.श्री नारायणानंद यती महाराज(उगारचेस्वामी) वाडीला कांही काळ वास्तव्यास होते तेंव्हा त्यांनाही या मुलाच्या भोपाळच्या बदली चे कळले व त्यांनी ही नेमके हेच सांगितले ''जाउ द्या! २-३ वर्षात जवळ येईल''! तत्स्वरुपातील थोर महात्म्यांच्या उक्तीतही तद्रुपता असते हे सहज दिसून येते.

या देवदुर्लभ अवतारी महात्म्याचा कृपा आशीर्वाद सर्वांवर राहू दे हीच श्रीगुरुदत्तचरणी प्रार्थना आहे.

श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु!

******

## साधक डॉक्टरांच्या स्मरणातून

१९८६ : 'श्री' डोंबिवलीच्या याज्ञवल्क्य सभागृहात श्री ज्ञानेश्वरांच्या मूर्तीची स्थापना करुन ठाण्याला परत येत होते. पुढे मुलुंडला श्री काळे यांच्याकडे मुक्कामाला जाणार होते. मनांतून सारखे वाटत होते की 'श्रीं'चे चरण आपल्या ठाण्याच्या घराला लागावेत. सौ. ची प्रकृती अस्वस्थ असल्याने ती पुण्यात होती व ठाण्यातल्या घरात मी एकटाच राहात होतो. डोंबीवलीस 'श्रीं' ना आणण्यापूर्वी घरामध्ये हार, फळे वगैरे आणून बैठकही घालून ठेवली होती. 'श्रीं' नी आपल्याकडे यावे अशी प्रार्थना करण्याकरता खूप लोक आले होते. त्यांच्याबरोबरच्या सेवकांनी सर्वांना 'श्रीं'ना दगदग सहन होणार नाही म्हणून 'श्री' कोणाकडेही जाऊ शकणार नाही हे स्पष्ट सांगितले होते. त्यामुळे मी सहाजिकच तो विषयही काढला नाही. मुलुंडला जाण्यासाठी 'श्रीं'ना घेऊन मी निघालो. गाडी कोपऱ्यावर गेल्यावर 'श्री' म्हणाले,''आपलं घर इथून जवळच आहे वाटतं तरी पांच दहा मिनिटे जाऊन येऊ.'' हे ऐकल्यावर खूप आनंद झाला. 'श्री' च स्वतः हे म्हणाल्यामुळे त्यांच्या सेवकांना कांही हरकत घेता आली नाही. आमच्या घरी आल्यावर 'श्रीं'ची यथोचित पूजा इ. केले. 'श्रीं'ना देऊ केलेल्या एका फळाचाही त्यांनी स्वीकार केला आणि आम्ही निघालो.

'श्रीं'च्या या अनपेक्षित भेटीनंतर दुसरे दिवशी सौ. च्या प्रकृतीमध्ये खूप फरक पडल्याचा तिचा फोन आला. आणि तिला खूप शांत वाटू लागले. हे ऐकल्यावर 'श्रीं'चा भेटीमागचा संकल्प काय होता तो लक्षात आला.

--------oooooo--------

प.पू. 'श्रीं'चा एकदा एक भक्त एकदा त्यांच्याकडे अडचणीमधून मार्ग काढण्यासंबंधी विचारणा करण्यासाठी गेला. अडचण अशी होती की त्या साधकाचे जवळचे मित्र शेगाव येथे श्री गजानन महाराजांचे दर्शनास जाणार होते व त्यांनी या साधकाला येण्याबद्दल खूप आग्रह केला. प्रश्न असा पडला होता की आपली दीक्षा येथे झाली व सर्व काही येथेच आहे तेव्हा शेगावला कशाला जायचे? यावर प.पू.महाराजांनी दिलेले उत्तर असे.

**आपणाला जाण्यास काहीच हरकत नाही. तेवढाच दर्शनाचा लाभ होईल व सर्वही ठिकाणी गुरुतत्व हे एकच असते तेव्हां गोंदवलेकर महाराज श्री साईबाबा, स्वामी समर्थ व आपले गुरुमहाराज हे सर्व एकच आहेत कांही फरक नाही. अगदी निःशंक मनाने जा शक्य तो गजानन विजय पोथी वाचा. दासगणू महाराजांनी फार उपकार केले आहेत. त्यात आपले थोरले महाराज पण तेथे गेल्याचा उल्लेख आहे. जरुर जा.**

--------००००००--------

असाच एकदा कंपनीच्या सहली निमित्त श्री क्षेत्र रामेश्वर, कन्याकुमारी वगैरे ठिकाणी जाण्याचा प्रसंग आला. नेहमी प्रमाणे प.पू.महाराजांची परवानगी घेण्यास गेलो. महाराज म्हणाले रामेश्वरला नुसती सहल म्हणून जाऊ नका. तेथे देवापुढे लघुरुद्र करा म्हणजे नुसते पैसे ब्राह्मणांना देऊन येऊ नका स्वतः बसून तुमच्या समोर करुन घ्या. सहल पुढे जाणार असेल तर एवढे करुन नंतर त्यांना सामील व्हा. हा फार पुण्यप्रद योग असतो तेव्हा टाळू नका. याप्रमाणे सर्व घडले हे सांगणे नकोच.

--------००००००--------

एका साधकाचा मुलगा उच्च शिक्षणासाठी अमेरिकेस जाणार होता. महाराजांची पूर्ण परवानगी होती.तेथील विद्यापीठांत प्रवेश पण मिळाला होता. तो व्हिसा काढण्यासाठी गेला तेव्हा व्हिसा नाकारण्यांत आला व अत्यंत अपमानास्पद वागणूक तेथील अधिकाऱ्याकडून मिळाली. साहाजिकच तो मुलगा खूप नाराज झाला व त्या अमेरिकन अधिकाऱ्यांचा खूप राग पण आला व त्याने तिकडे न जाण्याचे ठाम ठरविले. व्हिसा काढण्याचा दूसरा प्रयत्न सुध्दा करायचा नाही असे पण ठरविले. तो विद्यापीठात दूसरा आला होता त्यामुळे भारतातच नोकरीसाठी कँपस इंटरव्ह्यू ला सिलेक्ट झाला होता.

हे साधक महाराजांच्या दर्शनास नेहमी प्रमाणे गेले असता त्यांनी विचारले मुलाची जाण्याची तारीख ठरली का? तिकिट काढलेत का? तेव्हां महाराजांना वरील सर्व गोष्टी निवेदन केल्या व सांगितले की त्याचा आता भारतातच नोकरी

करण्याचा विचार पक्का झाला आहे व पुनः अपमान त्या लोकांकडून करुन घेण्याची तयारी नाही. हा दिवस शनिवार होता.

महाराज म्हणाले सोमवारी त्याला पाठवा. त्यावर साधकाने सांगितले की आता यापुढे बँक ड्राफ्ट काढणे, मागील अनुभवावरुन कांही कागदपत्र नव्याने करणे यास दोन दिवस तरी लागतील तेव्हा महाराज म्हणाले, गुरुवारी नक्की पाठवा. साधकाने सांगितले की मुलगा न जाण्याच्या निर्णयावर ठाम आहे व पुन्हा परदेशी माणसाकडून अपमान करुन घेण्याची पण इच्छा नाही, परंतु आपल्या आज्ञेप्रमाणे सांगतो.

त्यावर महाराज म्हणाले,''त्याला सांगा आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केल्याचा पश्चाताप त्या अधिकाऱ्यांना होऊ शकतो. तेव्हा गुरुवारी प्रार्थना करुन जरुर जा.''

तो मुलगा गुरुवारी गेला आणि त्याला कोणतेही प्रश्न न विचारता किंवा बँकेचे उत्पन्नासंबंधीचे कागदपत्र न पाहताच केवळ अक्षरशः पाच मिनिटामध्ये व्हिसा मिळाला. याच ठिकाणी पहिल्यावेळी तब्बल ४५ मिनिटे वाटेल ते प्रश्न विचारुन अपमानित केले गेले होते त्याच्या डोळ्यांत तेथेच पाणी उभे राहिले. अशी असते महाराजांची असीम कृपा त्यांच्या इच्छे विरुध्द काही होऊच शकत नाही.

--------oooooo--------

या नंतर तो मुलगा जेव्हा अमेरिकेला गेला त्यावेळी त्याला महाराजांनी तेथे कसे वागावे, अभ्यास कसा करावा, अडचणी काय येऊ शकतात, मोह कसलेही पडले तरी श्री गुरुमहाराजांचे व दत्तगुरुंचे स्मरण करावे, अडचणी दूर होतीलच असे आश्वासन दिले. त्यांनी जणू अमेरिकेतील सर्व गोष्टी पाहिल्या होत्या(हा आपला एक व्यावहारिक खुळा विचार!) त्याचवेळी महाराजांनी त्याला स्वहस्ते मोठ्या महाराजांची अत्यंत प्रासादिक पोथी''दत्तमाहात्म्य'' दिली आणि अभ्यास सांभाळून परंतु नित्य कांही ओव्या वाच म्हणून सांगितले. तो आजतागायत ते वाचन करतो आहे. त्यांच्या अडचणी निवारण झाल्या. शिकताना व ते पूर्ण झाल्यावर त्याने महाराजांना या वाचनाचे संबंधी पत्र लिहून

कळवले होते त्यावर महाराजांची प्रतिक्रिया अशी होती''तुझ्यावर महाराजांची मोठी कृपा आहे असेच वाचन चालू ठेव.'' स्वतःकडे काहीच लावून घेणे नसे!

--------oooooo--------

एकदा एक साधक, प.पू.महाराजांना कांही वैद्यकीय तपासण्यासाठी घेऊन चालले होते. वाटेमध्ये महाराजांनी विचारले की या सर्व तपासण्यासाठी काही खर्च होत असेल. साधकाने सांगितले की ती सर्व व्यवस्था झाली आहे त्यावर महाराज म्हणाले ''आता या मंडळींना सांगितले पाहिजे की या पुढे या देहासाठी असा खर्च होता कामा नये'' हीच ती विदेही अवस्था दुसरे काय ?

--------oooooo--------

एक साधक कंपनी तर्फे कांही शिक्षण घेण्यासाठी युरोपला पाच आठवडे जाणार होते. महाराजांनी परवानगी पण दिली. त्यावेळी साधकाने गुरुमहाराजांना सांगितले की पत्नीची तब्येत खूपच बरी नाही त्यामुळे कंपनीला जात नाही असे कळवावेसे वाटते आहे. त्यावर महाराज म्हणाले तुम्ही जरुर जा. नवीन शिकणे व पाहणे होईल त्याचा नोकरीत फायदाच होईल. त्यावेळी साधक ठाण्यास व सौ. च्या प्रकृतीमुळे त्या पुण्यास अशी परिस्थिती होती. परदेशी जाण्याआधी साधक पुण्याला दर्शनासाठी गेले. त्यावेळी श्री वासुदेव निवासात गेले असताना वे. मू. कोडणीकर गुरुजींनी त्यांना विचारले की तुमचे गोत्र काय? व आपण परदेशी जाणार आहात तेव्हां येण्याचे लांबले तर आम्हाला जरुर कळवा.

साधकाला आश्चर्य वाटले. त्यांनी गुरुजींना विचारले की आपण हे सर्व का विचारत आहात? त्यावर गुरुजी म्हणाले आम्हाला दत्तमहाराजांनी आपण येईपर्यंत श्री गुरुचरित्राचे पारायण करायला सांगितले आहे.प.पू. महाराजांनी यासंबंधी साधकाला काहींच कधीच सांगितले नव्हते. गुरुजींनी विचारले नसते तर आजतागायत ही गोष्ट कळलीच नसती. अर्थात पहिलीच परदेशवारी उत्तम प्रकारे पार पडली.

कुठल्या कुठल्या संकटांचे कसे निवारण केले हे केवळ त्यांनाच माहिती अशी कृपा करणे व स्वतःला पूर्ण झाकून ठेवणे हे विलक्षण होते. शब्द खुजे

पडतात. हे फक्त 'श्री' महाराजच करु शकतात. याच परदेशवारी संदर्भात महाराज म्हणाले ''आम्ही असं ऐकलं आहे की हल्ली तिकडे पण शाकाहारी राहता येते'' आणि खरोखरच २२-२३ वर्षांपूर्वी एकदा सुध्दा तशी वेळ आली नाही. अशक्य वाटेल अशा ठिकाणी आधी न कळवता सुध्दा सोय व्हायची.

--------००००००--------

कामानिमित्त बंगलोरला बरेच वेळा जाणे होत असे. सौ. च्या सांगण्यावरून एकदा उत्तम सोवळे महाराजांच्यासाठी आणले. ते देण्यासाठी गेलो. महाराजांनी ते हातात घेतले आणि प्रसन्नतेने म्हणाले, 'छान आहे.' म्हटलं महाराज आपण वापरावे अशी प्रार्थना आहे. पुन्हा एकदा हसून माऊली म्हणाली, 'हे स्वारीला खूप छान दिसेल. आम्ही उद्याच वाडीला जाणार आहोत तेव्हा ते देवाकडे देऊ.' साधकाने खूपच हट्ट केला की महाराज आपणच नेसावे. शेवटी महाराज बरं म्हणाले . आणि नंतर नेसतही असत. परंतु नंतर अस टोचत राहील की आपण उगाचच हट्ट केला व महाराजांची इच्छा वेगळीच होती. म्हणून पुढच्यावेळी पुन्हा तसच उत्तम सोवळं आणलं. महाराजांकडे गेलो व त्यांना सांगितले सोवळे आणले आहे. त्याही वेळी महाराज दुसरे दिवशीच वाडीला जाणार होते त्यांना खूप प्रसन्नता वाटली. वाडीला जाऊन आल्यावर महाराज म्हणाले, 'सोवळे स्वारीला खूप छान दिसत होते. तुम्ही फार छान काम केलेत.' आणि आम्हाला देवस्थानची सोवळे मिळाल्याची पावती दिली. याला काय म्हणावे.

--------००००००--------

प.पू.महाराजांचा फलटणला तीन दिवसांचा मुक्काम होता. त्यातील एका दिवशी संध्याकाळी श्री क्षेत्र गोंदवले संस्थानच्या विश्वस्त मंडळींनी महाराजांचे प्रवचन ठरविले होते. दुपारी फलटणहून निघताना 'श्री' महाराजांचा आवाज बसला होता. बोलताना त्रास होऊ लागला. तेव्हां बरोबरचे भक्त म्हणू लागले की महाराज आपण तेथील विश्वस्तांना सांगून प्रवचन रद्द करू. महाराज कांहीच बोलले नाहीत. गोंदवल्यात पोहोचल्यावर पुन्हा एकदा महाराजांना विचारले, ते म्हणाले देवाच्या इच्छेप्रमाणे बघू या काय होते ते.

देवस्थानांत गेल्यावर तिथे त्यांचे स्वागत झाले त्यांना देवस्थानाची सर्व माहीती दिली गेली, गोशाळा पाहिली, विश्वस्त म्हणाले आम्ही प्रवचनाची माहीती गावांत दिली आहे. बोर्ड पण लावले आहेत गर्दी खूप झाली आहे. पुन्हा आम्हाला प्रश्न चिन्ह !

महाराज उठले, देवांचे दर्शन घेऊन व्यासपीठावर बसले व त्यानंतर त्यांच्या नेहमीच्या आवाजांत ४०-४५ मिनिटे अत्यंत प्रासादिक असे प्रवचन झाले. विश्वास बसत नव्हता की काही मिनिटांपूर्वी आवाज बसला होता.

प्रवचना नंतर दुग्धपान झाले व आणखी एके ठिकाणी जाऊन आम्ही फलटणला परत येताना पुन्हा आवाज बसायला लागला.

--------००००००--------

फलटण मुक्कामातच एक गृहस्थ महाराजांना सारखी विनंती करत होते की महाराजांचे पाय त्यांच्या घराला लागावेत. शेवटी त्यांच्या घराजवळ एकाकडे महाराज गेले होते तेव्हा ते म्हणाले, ''महाराज आम्ही येथे समोरच्या टेकडीवर राहतो फार चढ नाही रस्ता जरा कच्चा आहे'' त्यांच्या बरोबरचे सेवक म्हणाले तिथे येणे शक्य नाही चढ खूप आहे. तुम्ही घरच्या सगळ्यांना येथेच बोलवा. त्यांच्या पत्नीची तब्येत येण्यासारखी नव्हती. महाराजांनी ते ज्या गाडीतून आले होते त्यांना विचारले का हो गाडी जाईल का तिथे? ते भक्त म्हणाले,''महाराज आपण गाडीत बसलात की गाडी कुठेही जायला अडचण नाही.

महाराज त्या घरांत गेले. त्या बाई अत्यंत कृश झालेल्या खूप घाबरलेल्या होत्या. त्यांना महाराजांनी विचारले, काय त्रास आहे? त्या म्हणाल्या, त्यांना गेले काही दिवस केव्हांही स्वप्नामध्ये एक काळा कोट घातलेली व्यक्ती येते आणि तिथे बस असे सांगते. खूप भीती वाटते.

महाराज म्हणाले, ''आपण भाग्यवान आहात ती व्यक्ती म्हणजे साक्षात् गुळवणी महाराज होते व आपल्याला दीक्षा झाली आहे व आता रोज साधनेला बसत जा.''

त्यांचा आजार दोन दिवसात नाहीसा झाला व प्रकृती उत्तम पूर्ववत् झाली. अशी असते प.पू. महाराजांची कृपा.

--------००००००--------

एका साधकाचे मित्र त्यांचेकडे आले(ते एक उद्योजक आहेत) व म्हणाले आता मी माझे इंडस्ट्री बंद करणार आहे. खूप वैताग येतो कामगारांचे प्रश्न, सरकारी लालफीत इतर सर्वही समस्या सोडवता नाकी नव येतात. कोणी चांगल म्हणत नाही, कितीही त्यांचं भल केलं तरी. बस झालं आता.

साधकाने त्यांना सांगितले की आपण आमच्या गुरुमहाराजांचेकडे जाऊ व काय सांगतात ते बघा आणि मग निर्णय घ्या .

आम्ही महाराजांच्याकडे गेलो त्यांना सर्व निवेदन केले. यावर महाराज त्यांना म्हणाले,''प्रभू श्रीराम वनवासांत गेले म्हणून भरताने राज्य केले तसेच तेवढाच काळ पांडवांना वनवास घडल्यामुळे दुर्योधनाने पण राज्य केले. दोघां मधील फरक लक्षांत घ्या- भरताने ते राज्य आपले नाही ते प्रभुंचेच आहे आपण केवळ विश्वस्त आहोत म्हणून उत्तम तऱ्हेने राज्य सांभाळले (सिंहासनावर न बसता). कौरवांनी म्हणजे दुर्योधनाने राज्य कसे केले ते सर्वच जाणतात.

तेव्हा आपण कारखाना बंद न करता, आपण त्यांचे विश्वस्त म्हणून काम करा मालक म्हणून नव्हे. एखादी ऑर्डर मिळाली म्हणून आनंदही नाही आणि न मिळाल्यास दुःख पण करून घेऊ नका. बघा कसं वाटते ते. अहो बंद करायला कांहीच लागत नाही. आज ३००-४०० कुटुंब उघड्यावर पडण्याचे पाप पण लागेल की नाही?

उद्योजकाने निर्णय बदलला. आज त्यांचे उत्तम चालले आहे. आता परदेशांत त्यांचे कारखाने व कचेऱ्या आहेत.'श्रीं'चे म्हणणे ऐकले त्याचा हा परिणाम यात शंकाच नाही.

--------००००००--------

वाडीला जाताना महाराजांचा कांसेगाव येथे मुक्काम ठरला होता. रात्रौ आठच्या सुमारास त्या खेडेगांवी महाराजांची हायवे पासून गावातील मुक्कामाच्या ठिकाणापर्यंत गिरवणूक निघाली होती भजनी मंडळ व खूप गावकरी होते.

तेथे जेवणानंतर महाराज विश्रांती घेत होते एवढ्यात २०-२५ माणसे महाराजांना शोधत आली (बहुतेक नगर किंवा औरंगाबादकडची असावीत.) ते म्हणाले, ''आम्ही पुणे, वाडी औरवाड असे शोधत होतो. शेवट येथे आपले दर्शन झाले.आम्हाला सर्वांना मंत्र पाहिजे.'' महाराजांनी त्यांना सांगितले आता जेवा, रात्र झाली आहे. विश्रांती घ्या उद्या सकाळी बघू. दुसरे दिवशी सर्व आन्हिक

आटोपल्यावर महाराजांनी मंत्र दीक्षा देण्यास सुरवात केली. प्रत्येकास कुलदैवत काय असे विचारुन मंत्र लिहून देत. एका माणसाने कुलदैवत काय असे विचारल्यावर ''महाराज तुम्ही'' असे उत्तर दिले. केवढी विलक्षण गोष्ट होती सहज घडून गेलेली.

--------००००००--------

कासे गावी मुक्काम करुन दुसरे दिवशी दुपारी महाराज औरवाडला जाण्यास निघाले. वाडीला दर्शन करुन औरवाडला जाताना अर्ध्या पुलावर गाडी आल्यावर गाडी थांबवली गेली. महाराज म्हणाले, 'का थांबलात?' त्यांना सांगितले की खूप लोक ढोल, ताशे, झांजा लेझीम घेऊन आले व तेथून मिरवणूकच सुरु झाली. पूल संपल्यानंतर महाराज म्हणाले, 'गाडीपुढे कोण आहे?' आम्ही म्हटलं, 'प.पू. ताईमहाराज दंडवत घालत गाडीपुढे आहेत.' महाराज म्हणाले, 'हे कशाला करीत आहेत' व थोडे थांबून म्हणाले, 'भक्तीपुढे सर्वच माफ असते.'

गाडी पुढे आल्यावर तिथे आम्हाला सांगितले की डाव्या बाजूला उतार आहे त्यावरुन गाडी घ्या. गाडी वळवली तेव्हा महाराज म्हणाले, 'इकडे कुठे गाडी चालली' तेव्हा महाराजांना सांगितले की, आपल्याला पायऱ्या चढायला लागू नयेत म्हणून गाडी अशी घ्यायला सांगितली आहे. **महाराज लगेच म्हणाले, 'गाडी मागे घ्या आणि पायऱ्यापाशी न्या.' आणि म्हणाले, 'चार पायऱ्या देवाकडे जातात चढणे अवघड आहे असे या लोकांना वाटते की काय? आम्ही पायऱ्यावरुनच जाऊ.'**

गाडी पायऱ्यापाशी थांबली महाराज उतरले. त्या नंतर गाडीचा बॉनेट प.पू.ताईमहाराजांनी पदरांनी पुसला ते पाहून आमच्या डोळ्यातून घळा घळा अश्रू वाहू लागले. गाडी चालवत होतो म्हणून नाहीतर पळून जावेसे वाटत होते आणि सर्वांनाच दंडवत घालावा असे वाटत होते. गहिवरुन येते.

--------००००००--------

ता.१२ ऑक्टोबरची रात्र व १३ ची पहाट. या काळात स्वप्न पडले. एक धोतर नेसलेली व्यक्ती म्हणाली, अठरा तारखेला जालन्यास येताय ना? वाट पहातो आहे. काम खूप आहे बसं एवढेच आणि स्वप्न संपले.

******

## मर्मबंधातली ठेव ही

उपदेश गुरु सांगे। ह्या जो शिष्य घे षड्‌लिंगे।
तोच भक्त लोटी वेगे । मागे भवा ॥

(श्री दत्तलीलामृताब्धीसार लहरी३)

२० ऑगस्ट १९८४ ते २७ ऑगस्ट १९८४ या काळात श्री मूलचंद्र भगवानदास या जालना येथील शेठजीनी जालना येथे 'श्रीं' चा भागवत सप्ताह करण्याचे आयोजन केले. महाराज कादराबाद पोलीस स्टेशनसमोर मन्नालाल यांच्या घरात रहात होते. जालन्यातील सराफी बाजारातील हॉलमध्ये सप्ताह चालू होता. रात्री आपल्या निवासस्थानी महाराज अंग टाकायचे. दिवसभर ज्ञानयज्ञ करुन थकलेल्या त्या देहाला विश्रांतीची गरज असायची असे मला वाटे. त्यांच्या पायाला तूप लावायाच्या वेळी धीर करुन महाराजांना काही प्रश्न विचारीत असे.

**प्रश्नः-** आपले सर्व देव पुण्यालाच आहेत का? की देऊळगांवराजाला काही आहेत?

'श्री':- हो. त्यांनी (पिताजींनी) आमच्याकडेच दिले. सांभाळा म्हणाले. दोन-तीनशे वर्षापासूनचे देव आहेत.

'दत्तू बाळ ' आहे. ते मंत्रदीक्षा देत त्यावेळी दत्तू बाळ जवळ असे. आम्हाला तेवढे शक्य नाही, प्रवासात नेणे. २० वर्षापूर्वी आम्ही काशीला गेलो त्यावेळी सर्व देव बरोबर नेले. म्हटले त्यानाही गंगास्नान घडेल. तर तिथे आम्हाला पिताजींनी पत्र पाठवले ' देवांना सांभाळा' आम्ही म्हटलं '' अहो देव आम्हाला सांभाळणार ना !'' देवाचे अलंकार केलेत. एवढेच काय पण भांड्यावर देखील देवांचीच नांवे आहेत. इतक त्यांचं(प्रेम) होतं देवावर. मूलबाळ काही नव्हतं सुरवातीला. किती जणांनी देव दिलेत. मौनी स्वामींनी दिलेत, औदुंबराखाली सापडलेत. ते सगळे आहेत पुण्याला. त्यांची एकदा व्यवस्था झाली म्हणजे झालं.

**प्रश्नः-** सूरज, आमोदकडून इतक्या लहान वयात पारायण झाले नाही !

'श्री':- हो आणि त्यांनी पण ते केले. बसायचे वाचायला न कंटाळता.

**प्रश्न:-** आपली परंपरा पुढे चालू केली. आपलं पण भागवताचं पारायण इतक्याच लहान वयात झालं ना? वाडीत झालं की औरवाडला!

'श्री':- औरवाडला, कुलकर्ण्यांच्या वाड्यात झालं. दीक्षितस्वामी महाराजांचा त्यावेळी तेथे चातुर्मास चालू होता. भाद्रपद महिना होता तो. नंतर पुढे पुढे आम्हाला नियमितपणे तिथे जाऊन ते करणे जमेनासे झाले म्हणून. भाद्रपदात पाणी असते त्यामुळे वाडीच्या पुजाऱ्यांना सांगितले (पुजारी माटुंग्याला संहिता वाचायला आले होते) दर माघात तिथे जाऊन ('श्रीं' च्या वाटचे) पारायण करून येतात. आम्ही त्यांना बिदागी वगैरे पाठवतो.खोल्यांच्या बांधकामाच्या बाबत इनकम टॅक्स इ. च्या बाबतीत काय करायचे याचा सल्ला श्री.मुजुमदार, श्री. नागले श्री. शृंगारपुरे वगैरेनी भगवानरावाना भेटून घेतो असे म्हटल्यावर 'श्री' म्हणाले-

''आम्ही नागल्यांना आधीच सांगितलय आधी वामन निवास मग पुढचं. पण काय करायच्यात खोल्या. आपण व्याप वाढवावेत तितके वाढत जातात.'' मी त्यांना मध्येच विचारलं ''गुळवणी महाराजांसाठी नाही त्यांच्या भक्तानी सर्व केले?

त्यावर 'श्री 'म्हणाले '' अहो पण त्यांना रहायला जागाच नव्हती. आम्हाला राहायला जागा आहे. त्या औदुंबराला मात्र पार वैगेरे बांधून झाला तर आम्हाला त्याची मुंज करता येईल. पण खोल्या बांधल्या तर त्याची मूळं खोल्यांच्या खाली शिरणार नाहीत ना?''

मी उत्तरलो,'नाही' नागले त्यावर काही तरी उपाय काढतील.

महाराजांना खोल्यांच्या बांधकामापेक्षा देवाच्या व्यवस्थेची चिंता होती. इथे आल्यामुळे देवपूजेला झाडावरील ताजी फुले मिळतात याचे समाधान. शनवारात असताना फुलपूडीतील फूले देवाला घालावी लागत असत. अस ते अगदी हसत म्हणाले. मग वाडीतील पूजांबद्दल विषय निघाला.

श्री:- आमच्या सर्व पूजा आम्ही गुरु द्वादशीला आटोपून टाकतो. वारंवार तिकडे जाता येत नाही.

मी:- सर्व म्हणजे?

श्री:- देवांच्या दोन. मोठे महाराज(श्री.प.प.टेंबेस्वामी महाराज) मौनीस्वामी महाराज. नारायणस्वामी महाराज इ. सर्वांची प्रत्येकी एक.

आपण इथले काम आवरून वाडीला जाऊन राहावे अशी ‘श्रीं’ची तीव्र इच्छा होती. आपणाबरोबर आताच नव्हे तर पुढेही आपण वाडीला गेल्यावर येऊन रहायची इच्छा आहे असे म्हटले. श्री. स.वि.मुजुमदार यांचा बेत सविस्तर सांगितला. त्यांचे ताईंशी काय बोलणे झाले तेही ‘श्रीं’ ना सांगितले.

‘श्री’:- ते मुजुमदार सांताक्रुझला रहातात ना?

उ.:- होय महाराज.

दिवसभर इतक्या व्यापात ‘श्री’ असतात की विशेष कधी कोणाबद्दल बोलाचाली होत नाही. पण श्री. मुजुमदार सांताक्रुझला रहातात हे ‘श्रीं’ च्या बरोबर लक्षात आहे.

‘श्री’:- हे सारस्वत आहेत का?

उ.:- हो.

‘श्री’ नेहमी अनवाणी चालयचे, पायाला अनेकदा लागायचे, तूप लावताना ते दिसत असे, मनाला वेदना व्हायच्या. त्या गोपींचा संवाद आठवायचा ‘‘किती मृदुकोमल चरण, रानातून जाताना आपल्या पायाला काटे टोचत असतील, आमच्या मनाला वेदना होतात कारण मन तिथेच असत ना? गोपींपेक्षा माझ्या मनात आणखी काय वेगळं होते?’’

विचारलः- किती ठिकाणी लागलय महाराज?

‘श्री’:- बर झालं ना ! त्याचा काही त्रास जाणवला नाही म्हणजे झालं. लक्षात पण रहात नाहीत. चालायचंच.

भागवत सांगण आणि भागवत जगणं यात किती फरक आहे? ‘‘देहे दुःख ते सुख मानीत जावे’’ असे श्री. संत रामदासस्वामी म्हणतात. पण या संताना तस जगताना ‘असे’ जगतो याची जाणीव तरी असते का? महाराजांनी जडभरताच्या कथेत वर्णन केले आहे. ‘कुणाला उपदेश केला त्याची जाणीव नाही कुणाचा उध्दार केला याचीही जाणीव नाही.’’ पण गोपींच मन कळतंच ना? महाराज रात्रभर शांत गाढ झोपत नाहीत. दिवसभर इतके कार्यमग्न असतात तरी रात्रीची पुरेशी विश्रांती मिळत नाही. म्हणून विचारलं,

**प्रश्नः**-आपल्याला शांत गाढ झोप अशी लागतच नाही महाराज? आपण रात्रभर जागेच असता.

'श्री':- एकदा एक डुलकी लागून गेली की मग रात्रभर झोप येत नाही. पडून रहायचं आपलं.

मसाज करण तरी कुठे मनापासून हवं असायचं. थोड्या थोड्या वेळानं ''आता पुरे''असं चालू असायचं. काहीतरी वेगळे काढून माझे काम चालूच ठेवण्याचा प्रयत्न असे.

**प्रश्न:-** म्हसवडकरांनी खास आपल्यासाठी गाईचे शुध्द तूप दिले आहे. त्यांना आपल्यासाठी काहीना काही करावेसे फार वाटत असते.

'श्री':- हो चांगली बुध्दी आहे. त्यांच्याकडे काय गायी वगैरे आहेत का? त्यांचा कसला उद्योग आहे?

'श्रीं' ना सर्व माहीती सांगितली. त्यावर ''चांगल आहे. चांगली बुध्दी आहे'' असं 'श्री ' म्हणाले.

२१ ऑगस्ट १९८४:-

महाराज भागवत सप्ताह करीत. भागवत म्हणजे त्यांचे प्राणच होते. पण भागवत सप्ताह करणाऱ्या अशाच तपस्वी लोकांबद्दल त्यांच्या मनात प्रेमादर असे. अशांच्या स्मरणानेही त्यांची कळी खुलत असे. असेच एकदा त्यांना विचारले महाराज मोठ्या महाराजांना ४० वर्षे अखंड भागवताची पारायणे केलेले एक सत्पुरुष काशीला भेटले होते ना?

त्यांच्या स्मरणाने महाराजांची कळी लगेच खुलली ते लगेच म्हणाले. ''हो. शांताश्रम स्वामी. बरीच वर्षे काशीत होते संन्यास घेऊन. शेवटी कराडला येऊन राहिले. त्यांना संस्कृत येत नव्हते पण मोठे मोठे शास्त्री, पंडित त्यांच्याकडे भागवतातला गूढ अज्ञात अर्थ समजावून घ्यायला येत. त्यांच तप इतकं होतं की, एखाद्या दिवशी उठायला उशीर झाला तर प्रत्यक्ष श्रीकृष्ण परमात्मा येऊन दारावर थाप मारून म्हणत,''स्वामी ऊठा आता आपली ध्यानाची वेळ झाली.'' इतकी त्यांच्यावर कृपा होती.''

मी म्हटले:- ''किती पारायणं झाली असतील नाही?''

'श्री':- हो पहा ना! चाळीस वर्षे जरी धरली तरी दोन एक हजार पारायणे सहज होऊन गेली असतील. 'श्रीं' नी स्वत:च हिशेब करून सांगितले. भागवताला अभ्यास फार लागतो. आम्हाला डॉक्टरांनी आता सतत वाचायला मनाई

केलीय. नाहीतर आम्हीच संहिता वाचली असती पण डोळ्यावर ताण येतो. दुपारचा काही प्रश्न नाही. ते काही सतत वाचावे लागत नाही.

मी मनात म्हणालो, 'गरजच काय आपल्याला? आपलं काय कमी तप आहे भागवताचं. आपलही मुखोद्गतच आहे.'

कोणतीही सेवा करून घ्यायची म्हणजे कठीण. पायाला तूप लावल्यावर ते गादीला किंवा बेडशीटला लागेल म्हणून ते नकार देत असत. पण ते संपूर्ण तूप मी पायाला जिरवून टाकण्याची जबाबदारी घेतो असे परोपरीने सांगितल्यावर

ते त्यांनी पटवून घेतले. आणि खरंच जरी लागले असते तूप तर काय अनर्थ ओढवणार होता? पण स्वभावच असा दुसऱ्याला यत्किंचित्ही त्रास न होऊ देण्याचा. रात्री दहा-साडेदहा वाजता पायाला काशाच्या वाटीने तूप लावले. वेगवेगळी कारणे सांगून सेवा करून घेण्याचे टाळण्याचाच प्रयत्न चालू असे. मग श्री. गुळवणी महाराजानां घैसास कसे रोज मसाज करत याची आठवण करुन दिली. मग त्यांनी ती सेवा स्वीकारली. दिवसभर 'श्रीं ' चे बोलणे, चालणे सहवास यातून मनावर संस्कार होतच असत. तरीही त्यांनी आपल्याशी काही बोलावे असे वाटे. समुद्र भरलेला होता, आणि टिटवीच्या चोचीने त्यातील ज्ञानरुपी जल साठवण्याचा माझा प्रयत्न चालू होता.

आज राजकारणावर बोलायचा मूड होता. अमेरिका, रशिया, भारत, पाकीस्तान इ. सर्व राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण काय आहे, जागतिक राजकारणाने कोणते वळण घेतले आहे. या सर्व विषयांवर ते बोलत होते. सर्व गोष्टींचे

इतके सखोल ज्ञान ऐकून मी तर उडालोच. मग हिंदू- मुसलमानांवर बोलणे झाले. हे सर्व स्वतःहूनच बोलत होते. मला त्यांना बोलते करावे लागले नाही.'' आत्मज्ञान झाल्यावर सर्वज्ञान होते म्हणतात.'' हे 'श्रीं' चे च वाक्य मी येथे अनुभवत होतो.

एकदा बोलता बोलता मन्नाशेटजींनी धुंडीराज महाराजांच्या अमृत महोत्सवाच्या वेळचा म्हणा किंवा इतर कोणत्यातरी उत्सवाच्या वेळचा म्हणा एक प्रसंग सांगितला त्या उत्सवाला साधारण ५-५० भक्त जमतील अशी कल्पना होती. त्याप्रमाणे स्वयंपाक केला होता. पण प्रत्यक्ष जेवणाच्या वेळी साधारण हजार एक भक्त जमले. महाराजांच्या देऊळगावराजाला असलेल्या

देवस्थानचे जगनशेठ हे ट्रस्टी होते. त्यांच्या घरातील पारंपारिक दागिन्यांची व्यवस्था तेच पहात असत. धुंडीराज महाराजांचे ते अनुग्रहित होते. मन्नालालनी त्यांना विचारले,''काय बाबा इतक्या स्वयंपाकात एवढी माणसे कशी जेवणार? तुम्हाला अंदाज नको का?'' 'श्रीं'च्या आईसाहेब घरात होत्या त्यांनी हे ऐकले. त्यांना परिस्थितीची जाणीव झाली. आपल्या मुलाचा अधिकारही त्या जाणून होत्या. त्यांनी 'श्रीं' ना म्हटले, ''दत्ता, देवाला नैवेद्य दाखव बरं'' 'श्रीं' नी नैवेद्य दाखवला, स्वयपाक घरात जाऊन प्रोक्षण केले. तेवढ्याच स्वयंपाकात हजार भक्त जेवून गेले. प्रचंड भंडारा झाला.

२२-८-८४

श्रीकृष्ण जे एकदा मथुरेला आले ते परत एकदाही गोकुळात जाऊन गोपींना भेटले नाहीत. दूर रहाण्याने भक्ती वाढते, असे भागवतात महाराज सांगत असत. याचा प्रत्यक्ष अनुभव मी घेतला तो असा, सकाळी ९ वाजता 'श्रीं' चे आन्हीक आटोपले. ४ पत्रे त्यांनी माझ्याकडे दिली. समोरच्याच पेटीत टाकायची होती. सौ. भाभींच्या ते लक्षात आले. पेटीतील पत्रे पोहोचायला उशीर होईल या कल्पनेने की काय सौ.भाभींनी ती आपल्याकडे घेतली आणि नोकराला सांगितले की मुख्य पोस्ट ऑफीसात नेऊन टाक म्हणजे लवकर जातील. खरं म्हणजे मला 'श्री' ची आज्ञा मोडायची नव्हती. पण सौ. भाभींच्या मनातील प्रेमादरांचाही अनादर करू शकलो नाही. महाराज काय म्हणतील? जीव अगदी टांगणीला लागला. 'श्रीं' च्या समोर येताच त्यानी विचारलेच. मग मी सौ.भाभींच्या सांगण्याप्रमाणे नोकराकरवी पत्रे मुख्य पोस्ट ऑफीसमध्ये नेऊन टाकायला कशी दिली हे सर्व सांगितले. 'श्रीं' नी एकाच वाक्यात चूक दाखवून दिली. म्हणाले, ''मागच्या खेपेस त्या पत्रपेटीत टाकलेली पत्रे लोकांना वेळेवर मिळाली होती.''‘श्रीं' च्या आज्ञेच्या पालनाच्या आड व्यवहार आणि भीड हे दोन शत्रू आलेच. दुसऱ्याचे ऐकून त्यांचा शब्द ओलांडायची काय गरज होती? पण देहातील गुरु सतत पाहिल्यावर कधी कधी असे चुकीचे वर्तन घडते.

मन्नाशेटजी वेळ मिळल्यावर धुंडीराज महाराजांच्या गोष्टी सांगत असत. गोष्टी म्हणण्यापेक्षा त्यांचे अनुभव असे म्हणजे अधिक योग्य ठरेल. धुंडीराज

महाराजांबरोबर सौ. आईसाहेबही बऱ्याचदा असायच्या. अगदी सुरुवातीच्या काळात मन्नाशेटजींची आर्थिक परिस्थिती फारच हलाखीची होती. त्याना स्वतःला कोणताच उद्योग व्यवसाय नव्हता. एकदा श्री. धुंडीराज महाराज व सौ. आईसाहेब त्यांच्याकडे गेल्या श्री. धुंडीराज महाराजानी त्यांची परिस्थिती पाहून त्याना श्री गुरुचरित्राचे पारायण करवून घ्यायला सांगितले. पारायण करवून घ्यायचे पण ब्राह्मणाला दक्षिणा कशी देणार? तेवढीही ऐपत मन्नाशेटजींची नव्हती. सौ.आईसाहेबांना याची कल्पना होती. त्यांनी सुचवले ''आमच्या दत्ताला सांगा'' पण मन्नाशेटर्जीना ते कसे पटावे? कारण दत्तांची ओळख त्यांना कुठे पटली होती? मग धुंडीराज महाराज म्हणाले दुसऱ्या कोणाकडून तरी करवून घ्या. पण तेवढीही ऐपत नाही. शेटजींनी श्री. धुंडीराज महाराजांना गळ घातली व श्री. धुंडीराज महाराजांनी शेवटी स्वतःच पारायण केले. फलश्रुती प्रमाणे फळ मिळालेच. शेटजींना पेपरची एजन्सी मिळाली. बारीकसा का होईना व्यवसाय सुरु झाला. पुढे ४० वर्षानंतर त्याच शेटजींकडे 'श्री' चे श्रीगुरुचरित्राचे पारायण घडले.

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ।
देह कष्टविती उपकारे ॥

श्री. धुंडीराज महाराज स्वतःहून सर्वांकडे जायचे. सौ. आई मागच्या दाराने यायच्या दार वाजवून म्हणायच्या ,'' मी आलेय दार उघडा'! दोघेही त्या घरात फक्त दूध घेत. महाराज विडा घेत आणि जात. सौ. आईसाहेब शेटजींच्या मंडळीना कुंकू लावत. असे नित्य चालत असे.

असेच एकदा श्री. धुंडीराज महाराज व सौ. आईसाहेब शेटजींकडे आले होते. त्यावेळी शेटजींची परिस्थिती यथातथाच होती. श्री. धुंडीराज महाराजांनी शेटजींच्या मुलाची पत्रिका पाहिली. व म्हणाले,''याचा राजयोग आहे. शेटजीना ते खरे वाटेना. सद्यस्थितीवरुन आपला मुलगा एवढा मोठा होईल हे त्याना कसे पटावे? पण संतांचा शब्द वृथा कसा होणार? आज खरोखर त्यांचा मुलगा डॉक्टर आहे. जालन्यात शिवाजी पुतळ्या समोर त्याचा दवाखाना आहे. चांगली प्रॅक्टिस आहे. त्याच्या दवाखान्याचे उद्घाटन पूजा वगैरे 'श्रीं ' च्या हस्ते झाली.

परिस्थिती बदलली म्हणून बुध्दी बदलली नाही. सद्‌गुरुंच्या कृपेचे हे फळ आहे. याची जाणीव त्या डॉक्टरना पूर्णपणे आहे. 'श्री' जालन्यात असले म्हणजे रोज रात्री ते डॉक्टर 'श्रीं ' ना नमस्कार करायला येतात. प्रत्येक वेळी दक्षिणा ठेवतात. एकदा 'श्री' त्यांना म्हणाले,''कशाला प्रत्येक वेळी दक्षिणा ठेवता?''

त्यावर त्यानी उत्तर दिले ,''आम्ही नाही मोठमोठ्याना कापत? गरीबाना मात्र कापत नाही.''

'श्री' म्हणाले ''धंदा करणाऱ्याना सर्वच सत्याला धरून करता येत नाही, व त्याना तशी परवानगी पण आहे.''

कलीयुग आहे. सर्वत्र ऱ्हास चालला आहे. अशी ओरड आपल्याला तथाकथित धर्ममार्तंडाकडून ऐकू येते. 'अनाचार चालला आहे ' हे वाक्य तर सर्वसामान्यपणे प्रत्येकाच्याच तोंडी आहे. काळाचा महिमा आणि धर्माचे तत्त्व यांची सांगड घालून असेल त्या परिस्थितीत काही तत्त्व काही आदर्श डोळ्यासमोर ठेऊन कणाकणाने का होईना आत्मोत्कर्षाच्या दिशेने वाटचाल करण्याचा याहून सोपा मार्ग आपल्याला कोठे सापडू शकतो? तो सद्‌गुरुच देऊ जाणोत.

अशा अनेक आठवणी मन्नाशेट सांगत असत. व्यवहार, परिस्थिती, आपला कर्ममार्ग या साऱ्यांची यथास्थित सांगड म्हणजे 'श्री'. अनेकदा आपल्याला वेदांच्या आज्ञा किंवा पोथीतील तत्त्व व्यवहारात कशी पाळायची? किंबहुना जग कोठे चालले आहे? आपल्याला जुन्या आदर्शांचा पुरस्कार करुन कसे जगता येईल? असंख्य प्रश्न मनात उभे रहातात. अनेक ग्रंथ वाचून जे कळणार नाही ते 'श्री ' च्या आचरणातून क्षणात कळत होते. मनाच्या कोंदणात मी ते अगदी जपून ठेवत होतो.

मन्नाशेटजींकडे 'श्रीं' ना स्वतंत्र खोली दिली होती. पाणी मी स्वतः भरून आणत असे. चहा करून देत असे. पण त्यात एक दिवस सौ.भाभींची अडचण आली. त्यांनी सकाळीच मला सांगितलं की चहाची तयारीपण तुम्हीच करून घ्या आणि चहा मलापण द्या. 'श्रीं' ची खोली तुम्हीच स्वच्छ करा. त्याप्रमाणे मी सर्व केले. मी निरीक्षण करत होतो. मला गंमत वाटली. मन्नाशेटजींकडे लहान मुले होती. त्याना घरातील सोवळे-ओवळे कसे कळणार? त्यांच्यामुळे इकडे-तिकडे सर्व लागालाग होतच होती. आम्ही त्याच घरात रहात वावरत

होतो. पण 'श्रीं' काही झालेच नाही असे वागत होते. न रहावून मी 'श्री' ना विचारलेच; 'श्री' म्हणाले, ''कलीयुगात कुटुंबात संसर्गदोष आपल्याला नाही. ज्याचं त्याच्याजवळ. आपण आपला धर्म आपल्यापुरता सांभाळायचा.'' पाणी आणि पोथी यांच्या पवित्रतेबाबत मात्र ते फार जागरुक असत. त्याला मात्र कोणाचा स्पर्श होणार नाही याबाबत ते अतिशय जागरुक असत.

एकदा रात्री साडेनऊ वाजता श्री पोटभरे झोपायला जाण्यापूर्वी नमस्कार करायला आले. 'श्री' म्हणाले, ''एकदा शताब्दी समारोह झाला की सर्वांना नमस्कार करायचा. ('श्री' नी अगदी हात जोडले.) आणि निरोप घ्यायचा. अमरापूरला जाऊन रहायचं. कधी योग येतो पहायचे. या जन्मात येतो की पुढच्या जन्मात येतो. (आश्रमाच्या व्यवहारात) आम्ही किती लक्ष घालायचे? आहेत भाविक मंडळी करणारी करतील सर्व.''

श्री गुरुमहाराजांचा (श्री. गुळवणी महाराज) जन्मशताब्दी समारोह १९८६ या वर्षी होता. 'श्री वासुदेवनिवास' ची जबाबदारी घेऊन 'श्री' ना बारा वर्षे पूर्ण होत होती. आपण आता या जबाबदारीतून मोकळे व्हावे, अमरापूरला जाऊन रहावे ही ओढ आता 'श्री' ना लागली होती.

श्री पोटभरे म्हणाले- अलीकडे बऱ्याच वेळा अमरापूरचे नाव आपल्या तोंडून ऐकायला मिळतंय. श्री गुरुमहाराजांची इच्छा काय आहे याचा विचार मनात येतो.

**'श्री' उत्तरले- महाराजांनी (श्री गुरुमहाराजांनी) तर आम्हाला २०वर्षा पूर्वीच काशीहून पत्र लिहून पाठवलं. त्यात म्हटलं होतं, इथे या, प्रस्थानत्रयी सांगा, गीता भाष्य सांगा.....आणि शेवटी असं म्हटलं होत, ''हे सर्व आपली उपास्य देवता भगवान् दत्तात्रेय नृसिंहसरस्वती महाराजांच्या आज्ञेप्रमाणे करा''. पहायचं या जन्मात की पुढच्या जन्मात. काय त्यांची इच्छा आहे कुणास ठाऊक?''**

'श्री' शय्येवर आडवे होण्याचीच मी वाट पहात होतो. आज पंधरा मिनीटेच मसाज करायला मिळाला. हळूच त्याना बोलते करीत विचारले,
मी- धुंडीराज महाराज भागवतसप्ताह करीत का?

श्री- हो करीत. पुढे पुढे लोक त्याना १५ दिवस निरुपण करायला सांगू लागले.
मी- आणि श्री गुरुचरित्र?
श्री- त्याचाही मधून मधून सप्ताह करीत.
मी- मग वाडीतल्या घरी ते किती राहिले?
श्री- मातोश्री होत्या तो पर्यंत वाडीत राहून २-४ महिने या भागात येत. त्या गेल्यावर मात्र मग जे इथे आले ते कुठे गेले नाहीत. परत वाडीकडे गेले नाहीत.

'श्री' ना फारच थकवा आला होता. त्यामुळे लवकर आटोपते घेतले.

दुसऱ्या दिवशी गुरुवार होता. एकादशीही होती. त्या दिवशी थोडा वेळ मिळाला. सौ. ताईमहाराजही जवळच रहात होत्या. त्या कधीकधी भागवत ऐकायलाही येत. दररोज येत असतच असे नाही. त्या दिवशी श्री. पोटभरे व श्री पंडितराव याना घेऊन सौ. ताईमहाराजांच्या दर्शनाला गेलो. नमस्कार करून बसलो. चौकशी झाली. मी ताईमहाराजाना म्हणालो, ''रात्रभर 'श्री' कण्हत असतात. झोपत नाहीत. त्यांच्याजवळ रहात असल्याने मला हे समजले. असे का होत असावे? जवळपास कोणी नाही, असे पाहूनच हा प्रश्न विचारला त्यावर **त्या म्हणाल्या- ''सर्व शिष्यांची दुःख ते स्वतः भोगतात. तुम्हाला ते समजावं म्हणून तर हा योग आला. आपण फक्त नामस्मरण वाढवणे व देवाच्या चरणी त्यांच्यासाठी प्रार्थना करणे हा एकच इलाज आहे आपली सेवा कमी पडते हा अर्थ आहे.''**

आपण आपल्या अडीअडचणी सत्पुरुषांना सांगत असतो. दयाबुद्धीने आणि प्रत्येक जीव सन्मार्गाला लागावा या हेतुने ते प्रत्येकाला मार्ग दाखवत असतात, आणि अडचणींतून बाहेर काढत असतात. सर्व कर्म संपून मार्ग मिळायचा तर त्या जीवाला कितीतरी काळ उपासना करायला हवी. त्याचा सन्मार्गावरील विश्वास ढळला तर? त्याचे अध:पतन होऊ नये म्हणून हे दयेचे मेघ त्याची दु:खे स्वतः भोगतात. सर्व सुखदु:खांच्या पलीकडे गेलेले सद्गुरु आपल्या शिष्यांसाठी, अज्ञानी जीवांसाठी सर्व जणांची दु:ख सोसत असतात. असेच ताईमहाराजांना सांगायचे होते. म्हणून आपण सद्गुरुनी सांगितलेली उपासना जास्तीत जास्त करणे आवश्यक असते.

सौ. ताईमहाराजांचा एक अनुभव श्री. रामभाऊ गाडेनी त्याच वेळी मला सांगितला.जालन्यात एक सर्कल इन्स्पेक्टर होते. त्यांची ताईमहाराजांवर फार भक्ती होती. ते रोज ३ वेळा ताईमहाराजांच्या दर्शनाला येत. अचानक त्यांची बदली नागपूरला झाली. ते सौ. ताईमहाराजांच्या दर्शनाला गेले. त्या म्हणाल्या जा दर पंधरा दिवसातून एकदा या म्हणजे झाले.'' आता हे कसे शक्य होते? त्या गृहस्थाना फार वाईट वाटले. नागपूरहून जालन्याला १५ दिवसानी येणे शक्यच नव्हते, पण ताईमहाराजांचे शब्द होते. ते सत्य ठरवण्याची जबाबदारी ईश्वरावर होती. दर १५ दिवसानी त्यांचे डी.वाय्.एस्.पी. त्यांना या भागात कुठेतरी इन्स्पेक्शनला पाठवत. या गुरुपौर्णिमेपूर्वी दोनच दिवस ते येथे येऊन गेले. दोन दिवसानी गुरुपौर्णिमा. आता लगेच परत येणे शक्य नव्हते. पण ' आले ताईमहाराजांच्या मना' असेच जणू झाले. गुरुपौर्णिमेच्या आदल्या दिवशी डी.वाय्.एस्.पी. विमानाने मुंबईला निघाले. एअरपोर्टवर विमानात बसण्यापूर्वी अचानक त्या गृहस्थाना म्हणाले,''का हो तुम्ही औरंगाबादचे ना?''

''हो '' ते गृहस्थ उद्गारले.

''मग जा. दोन दिवस जाऊन या.''

त्या गृहस्थाना जणू आकाश ठेंगणे वाटले. सौ.ताईमहाराजांच्या शब्दाचे सामर्थ्य अनुभवाला आले हे सांगणे नलगे.

नंतर आम्ही परत मुक्कामाला आलो. 'श्रीं' च्या समोर येताच ते म्हणाले,''काय साडेआठ झाले असतील नाही?'' घड्याळ न बघताच 'श्री' जेव्हा असे विचारतात तेव्हा प्रत्येक वेळी त्यानी विचारलेली वेळच घड्याळ दाखवित असते. त्यांची वेळ कधीच चुकत नाही. ते म्हणजे एक ''मानवी घड्याळच'' आहेत असे मला नेहमी वाटे.

राकाळी ७ वाजता 'श्री' आन्हिकाला बसले. साडेआठला ठरल्या प्रमाणे तयार झाले. साठेआठवाजता श्री. गिंदोडिया नावाचे गृहस्थ त्यांचे वडील व त्यांच्या पत्नी असे तिघेजण 'श्रीं' च्या दर्शनाला आले. त्याना 'श्रीं' कडून मंत्र हवा होता. 'श्री'नी स्वतः मंत्र म्हटले आवश्यक विधी केले. त्याना आवडत्या देवाचा म्हणजे गणपतीचा एक मंत्र लिहून दिला. आंघोळीनंतर एक माळ

जपायला सांगितले. ही या दौऱ्यातील चौथी मंत्रदीक्षा. यापूर्वी 'श्री' नी साकळगावकर यानाही अशीच मंत्रदीक्षा दिली होती.

नंतर आम्ही सर्व डॉ.बी.एन्.वडगावकर जोशींकडे गेलो. ते तर 'श्रीं' च्या आगमनाची सर्व तयारी करून वाट पहात होते. सर्व घर श्रृंगारून ठेवले होते. 'श्रीं'ची पाद्यपूजा करण्याची सर्व तयारी केली होती. ब्राह्मण बोलावून ठेवले होते आणि आमची वाट पहात होते. 'श्री' तेथे पोहोचल्यावर त्या ब्राह्मणाकरवी 'श्रीं'ची पाद्यपूजा केली. डॉक्टरांच्या आईला मंत्रदीक्षा घेण्याची इच्छा होती. महाराजानी त्यावेळी त्याना यथाविधी मंत्रदीक्षा दिली. ही या दौऱ्यातील पाचवी मंत्रदीक्षा होती. त्यानी डॉ.जोशींच्या आईना सप्तश्रृंग देवीचा मंत्र लिहून दिला. आंघोळीनंतर रोज १ माळ जप करायला सांगितले. हे डॉक्टर जालन्याला चरताईपूरा या भागात रहात असत.

जालन्याला असताना सौ.ताईमहाराजांच्या अनेक आठवणी ऐकायला मिळत असत. सौ.ताईमहाराजांची गुरुभक्ती फार मोठी. आपल्या सद्गुरुंशी आपण कसे वर्तन ठेवावे हे ताईमहाराजांच्या आचरणातून शिकून घ्यावे. देऊळगावराजाला धुंडीराज महाराज रहात असत. ताईमहाराज अधून मधून त्यांच्या घरी जाऊन रहात. गुरुगृही झाडलोटीपासून स्वयंपाक करून सर्वांना जेवायला घालण्यापर्यंत सर्व कामे करीत असत. आताही त्यांचे चाललेले कार्य त्यांच्या गुरुभक्तीचीच साक्ष देत आहे.

श्री. धुंडीराज महाराज व सौ. आईसाहेब देऊळगावराजा येथील घरात अधुनमधून रहात असत. लाड या आडनावाच्या दोन भगिनी होत्या. त्यांची धुंडीराज महाराजांवर फार भक्ती. अत्यंत प्रेमाने आणि भक्तीने हा वाडा या भगिनींनी श्री धुंडीराज महाराजाना अर्पण केलेला होता. पुढे तेथे 'श्रीं' चे बंधु श्री वासुदेवराव महाराज व त्यांची पत्नी रहात असे. तेथे असताना त्याना जर कोणी वाईट बोललं किंवा अपाय नुकसान करण्याचा प्रयत्न केला तर श्री धुंडीराज महाराज किंवा सौ. आईसाहेब लगेच दृष्टांत देऊन त्याला शिक्षा करत असत. त्या दोघांचे वासुदेवराव महाराज व त्यांची पत्नी याना पूर्ण संरक्षण होते. धुंडीराज महाराज अजूनही दृष्टांत देतात. ''देऊळगाव राजाच्या घरात मी

अजूनही आहे. मला जे काही अर्पण करायचे ते तिथे नेऊन द्या '' असे सांगतात.

अशा अनेक आठवणी ऐकायला मिळायच्या त्यांचे चिंतन करीतच झोप लागायची. 'श्री' जवळच असायचे नेहमी रात्री पावणेदोन वाजता व नंतर ५ वाजता उठायचे. आजही त्याप्रमाणे पाच वाजता उठले. आन्हिक आटोपले. पावसाचे दिवस. हवेत गारठा फार म्हणून सुंठ गुळ आणि तूप यांचे मिश्रण करून ते चाटण त्याना द्यायला गेलो. पण 'श्री' प्रकृतीला सारखे जपत रहाणे शरीराची काळजी घेत रहाणे याच्या विरुध्द होते. त्यापेक्षा त्यांचा भगवंताच्या कृपेवर अधिक भरवंसा होता. ते म्हणाले, ''कशाला सारखी औषधाची सवय लावता? औषधे कमी व्हायला पाहिजेत. सुंठीने उष्णता नाही का वाढणार? शरीराला आवश्यकता नसताना औषधे घेऊ नये.'' मी म्हटलं, '' आपण हवी तेवढीच सुंठ घ्या. उरलेली मी घेतो. मग त्यानी थोडे चाटण घेतले. व उरलेले मी घेतले.

थोड्या वेळाने सौ. मुंदडा यांच्या घरी आम्ही गेलो. त्यांचा ३-४ वर्षाचा मुलगा होता. त्यानी त्याची पत्रिका कोणा ज्योतिषाला दाखवली होती. आणि त्यानी त्या मुलाला गंडांतर असल्याचे सांगितले. त्या 'श्री' ना म्हणाल्या, ''महाराज खड्याला मुलाची पत्रिका पाहून याला गंडांतर आहे असे सांगितलेय आपण याला मांडीवर घ्या.'' 'श्रीं' च्या आश्रयाला गेल्यावर या मुलाचे गंडांतर टळेल अशी त्यांची श्रद्धा होती. त्यामुळे त्या त्या मुलाला 'श्रीं' च्या मांडीवर ठेऊ लागल्या अचानक आलेल्या या प्रसंगाने 'श्री' ना काय करावे ते कळेना त्यांची पंचाईत झाली. शेवटी त्यानी त्याचे डोके मांडीवर टेकवू दिले व डोक्यावर हात ठेवला आणि म्हणाले, ''बालाजीचा जो जप सांगितलाय तो जास्त करा. देवाची प्रार्थना करा.''

मी लक्षपूर्वक पहात होतो. कान देऊन ऐकत होतो. पण या ठराविक शब्दांपलीकडे ते काहीच बोलले नाहीत. महाराजांनी त्यांच्याकडे दूध व फळे घेतली. त्यांच्या सर्व घरात ते फिरून आले. सौ.मुंदडा म्हणाल्या, ''महाराज इतक्या वर्षानी आपल्या कृपेने मोटारसायकलची एजन्सी मिळालीये. जाताना आपण दुकानात जाऊन या ना!

'श्री' म्हणाले, ''ठीक आहे.''

जाताना त्यांच्या दुकानात गेलो. 'श्रीं'ना श्री. मुंदडा यांनी त्यांच्या ऑफिसात नेले. तेथील खुर्चीत बसवून हार घातला. 'श्रीं' ना त्या गाड्यांमध्ये काहीच रस नव्हता. पण तरीही आस्थेने चौकशी केली, ''ऑफिस कधी उघडले? फटफट्या इथेच बनतात का? की बाहेरून येतात.'' आणि लगेच निघाले.

नंतर रामभाऊ गाडे आले. ते म्हणाले, ''महाराज, तब्येत कशी काय आहे? डॉ.नाईकांना घेऊन येऊ का?''

'श्री' म्हणाले, '' आमची प्रकृती उत्तम आहे. '' नंतर ते माझ्याकडे वळले आणि म्हणाले, ''तुम्ही आमच्या प्रकृतीबद्दल काही सांगत जाऊ नका कोणाला. डॉ.तपासतील. काहीतरी निघेल त्यातून, मग पुन्हा औषध, नको ते. रघुनाथराव रागावतील नां दुसरं कोणाचं औषध घेतलं तर! डॉ.सरदेसाईंचे औषध चालू असतं ना. **शिवाय तेवढ्यासाठीच तर आम्ही पहिल्याच दिवशी ताईमहाराजांचे दर्शन घेतले. त्यांचे दर्शन हेच औषध आहे. संतांचे आशीर्वाद असले म्हणजे काही बाधा होत नाही.**

रामभाऊ म्हणाले, ''ताई महाराजांनी आपणाला जाण्यापूर्वी जेवायला बोलावले आहे.''

'श्री' म्हणाले, ''या खेपेस जमणार नाही म्हणून तर आम्ही पहिल्याच दिवशी येऊन गेलो. आम्हाला सोमवारी निघालेच पाहिजे. ह्यांना पुढे मुंबईला जायचे आहे. आणखी एक महिन्यानंतर आम्ही येणार आहोतच, त्यावेळी येऊ. सौ.ताईमहाराजांचे एक आहे. त्या अजिबात जागा सोडत नाहीत. कुठं जाणं नाही, येणं नाही. बाकीच्यांचा आग्रह असतो म्हणून त्या यात्रेला बाहेर पडतात.''

''महाराज, आपण आता रामेश्वरला जाऊ त्यावेळी त्यांना आपल्या बरोबर घेऊ'' मी म्हणालो. 'श्री' म्हणाले, '' कसला रामेश्वर आणि कसलं काय? काय करायच्या आहेत तीर्थयात्रा? आपण एका जागी स्थिर होऊन काय करायचं ते करावं. तुम्ही सगळे भाविक भक्त आहात. तुम्हाला कशाला कुठे जायची गरज आहे?''

पहिल्या श्रावण सोमवारी 'श्री' जालन्यापासून २५ कि.मी. असणाऱ्या भोजपुरी या गावात गेले होते. श्री हेलवणकर त्यांच्यां बरोबर होते. भोजपुरी ही श्री हेलवणकरांची सासुरवाडी. त्यावेळी तेथील एक ८० वर्षाच्या एका वृध्द आजींनी 'श्रीं' ची पाद्यपूजा केली. नंतर ४ एकर जमीन 'श्रीं' च्या नांवे करून द्यायची इच्छा प्रगट केली पण 'श्रीं' नी त्या जमीनीचे येणारे उत्पन्न देऊळगावराजाच्या समाधी मंदिराला द्यायला सांगितले. पुढे तुळजापुरच्या देवीच्या दर्शनाला गेले. तेथेही पुढे ठेवलेले सर्व पैसे तिथल्याच सिद्धाश्रमाला देऊन टाकले. अशी ही 'इदं न मम 'वृत्ती.

रामभाऊंजवळ निरोप दिल्यानंतर 'श्रीं' नी जेवायला यायला जमणार नसल्याचे सांगितले तेव्हा सौ.ताईमहाराज स्वतःच 'श्रीं' ना सोमवारी 'जेऊनच जा' असा आग्रह करण्यासाठी आल्या. 'श्रीं' नी ही सांगितले पण त्या आपल्या हट्ट सोडेनात. शेवटी 'श्रीं' नी विषयच पालटला. थोडावेळ बोलणे झाले. सौ ताईमहाराज नंतर आपल्या घरी गेल्या. त्या गेल्यावर 'श्री' नी मला बोलावले व सांगितले की,' तुम्ही त्यांना (सौ. ताईमहाराजाना) जाऊन सांगा की सकाळी ८ वाजता फराळ म्हणा,पोहे म्हणा, काहीतरी घेऊन आम्ही निघू. जेवायचा आग्रह करू नका.''

दुपारची जेवणे आटोपली. श्री. बाबूशेट व श्री.नागले यांच्याबरोबर मी सौ.ताईमहाराजांकडे गेलो.'श्रीं' चा निरोप सांगितला. इतरही बोलणी झाली. ताई महाराजानी मला जालन्याला वारंवार खेपा मारायला सांगितल्या. नंतर आम्ही मुक्कामावर परत आलो.

दुसऱ्या दिवशी आपापल्या मुक्कामाला जायचे होते.'श्रीं' चा सहवास काही काळ दुरावणार होता. त्यामुळे रात्री चार शब्द आशीर्वादपर सांगण्याची प्रार्थना 'श्रीं' ना केली. त्यांनी'धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिम्' वर चार शब्द सांगितले. पुढे स्तोत्र पठण केले. आपण स्तोत्र म्हणतोच. शब्द किती अर्थवाही असतात प्रत्येक शब्दांना किती पदर असतात. 'श्रीं' च्या तोंडून ऐकल्यानंतर एका वेगळ्या उंच अशा विश्वात जाऊन पोहोचायला होते. मन विशाल होत जाते. त्या अंतर्मुख अवस्थेत निद्राधीन झालो.

कधी काही काही गमती घडतात. सर्वसामान्य माणसे कोणत्याही वयात प्रपंचातील प्रत्येक गोष्टीत कितीआसक्त असतात. आलेली परिस्थिती स्वीकारण्याची मनाची तयारी नसते. संतांची मन:स्थिती याच्याबरोबर उलट असते. प्रत्येक परिस्थितीचा ते ईश्वराकडे जाण्यासाठी शिडी म्हणून उपयोग करतात. श्रीएकनाथ महाराज म्हणायचे, माझी पत्नी मला अनुकूल मिळाली म्हणून मला प्रपंच व परमार्थ दोन्ही ठिकाणी अनुकूलता आली. श्री तुकाराम महाराज म्हणाले,''बरे झाले देवा, बाईल कर्कशा म्हणून देवा मी प्रपंचात गुरफटलो नाही. तुझ्याकडे माझे सर्व लक्ष लागले.'' तर संत रामदासानी प्रपंचात पडण्यापूर्वीच 'सावध' होऊन श्रीरामांची भक्ती केली. संतांना त्यांच्या मार्गात सर्वच परिस्थिती अनुकूल वाटते. पण सामान्य माणूस आपले वाढलेले वय, शिथिल झालेले अवयव, अंगावर पसरू पहाणारे वार्धक्य अमान्य करून भूतकाळातच जगू इच्छितो. हीच गोष्ट नेमकी त्या दिवशी घडली.

एक गृहस्थ तेथे नेहमी येत असत. वयपरत्वे त्याना नीट ऐकू येईनासे झाले. त्यामुळे कोणीही कोठे बोलत असल्यास तिथे जाऊन काय बोलताहेत म्हणून चौकशा करत असत. त्या दिवशी 'श्री' आम्हा पाच सहा जणांशी बोलत होते. हे गृहस्थ तेथे आले. कोणाबद्दल बोलणे चालले आहे? काय बोलणे चालले आहे? वगैरे चौकशा करू लागले. 'श्री' कधीही कोणाबद्दल 'उणे' बोलत नसत पण आज ते पटकन म्हणाले,'काय गंमत आहे पहा, ऐकू येत नसल्याचा आनंद घ्यायचा सोडून जिज्ञासा दाखवताहेत, करायच्यात काय प्रत्येक गोष्ट ऐकून? पण नाही!'

'श्रीं' चे स्नान होण्यापूर्वी श्री पोटभरे 'श्री' ना भेटायला आले. त्यांच्या संवादातून मला पुढील गोष्टी समजल्या.

१) 'अहं ब्रह्मास्मि' हे समजले म्हणजे ज्ञान झाले असे नाही. आपल्याला त्याच्या पलीकडे जायचे आहे. हे ज्ञान झाले आहे याचाही विसर पडला पाहिजे.

२) 'वासुदेवनिवास' चा संकल्प 'श्री' नी च लिहून दिला होता.

३) शास्त्राने सांगितलेले सर्व विधी, उपचार वयोमाना प्रमाणे करवून घ्यायला गुळवणी महाराजांकडे 'श्रीं' नीच आग्रह धरला. शास्त्राधार दाखवले.

४) रसज्ञा हा फार मोठा शत्रू आहे. रसज्ञाचा अर्थ फक्त खाणे असे नसून-कीर्ती, मान सन्मान, मोठेपणाची हाव, मोह असाही आहे.

५) जरा कुठे आपल्याला काही समजले की आपल्याला वाटते, आपण पोहोचलो, पण तिथेच आपला घात होतो. तिथेच आपल्या अध:पाताला सुरुवात होते.

श्री गुळवणी महाराजांच्या उत्सव, समारंभासंबंधी बोलताना म्हणाले ''अहो आमचं हे भाग्य की आम्हाला हे समारंभ पहायला मिळाले.'' अहंकाराबद्दल 'श्री' म्हणाले,

**'आपण सिंहावलोकन करताना फार जपले पाहिजे' आपली इतकी प्रगती झाली, इतकी सुधारणा झाली असे वाटू लागले. त्यामुळे नुकसान व अध:पातच होण्याची शक्यता जास्त असते. आपण आपली उपासना, साधना वगैरे करीत रहायचे इतकेच.'**

**प्रपंचातल्या माणसांना संतुष्ट ठेऊन मग दानधर्म करावा. आपल्या उत्पन्नाचे ५ भाग करावे त्यातील एक स्वत:करता ठेवावा. एक धर्माकरता खर्च करावा. एक-परिवारातील माणसांकरता ठेवावा. एक-इतर आप्तेष्टांकरता खर्च करावा, आल्यागेल्याचे स्वागत करावे. समाजात चांगलेपणा मिळवा यासाठी खर्च करावा व एक-भाग शिल्लक ठेवावा.**

मी मध्येच म्हणाले, 'मग उत्पन्नाच्या पंचमांश आमचा खर्च होतच नाही. तो कमीच होतो.''

आम्ही जेव्हा पुण्यात होतो, तेव्हा ३०/३५ रुपयांत सर्व भागत होते. एकाने जागा दिली. मग विद्यापीठात नोकरी दिली. मग महाराजांची भेट झाली. चाललंय सारखं, कोण सांभाळतोय भार? कशाला चिंता करायची?

पण त्याचवेळी कुटुंबाकडे दुर्लक्ष करू नये. महाराजांनी श्री तुकाराम महाराजांचे उदाहरण दिले. 'रामकृष्णहरी' म्हणत एकदा तंद्री लागली की ते इतके तल्लीन होऊन जात की काही काही दिवस त्यातच असायचे. अशावेळी कुटुंबाकडे दुर्लक्ष केल्याचा दोष त्यांच्याकडे जात नाही. पण आपले थोडेच तसे आहे? त्यामुळे आपल्याकडून जर दुर्लक्ष झाले तर दोष येईल.

नंदादीपाचं मार्गी लावलं तशी आता वाडीच्या महापूजेची एकदा कायमची व्यवस्था झाली म्हणजे मग आम्ही मोकळे झालो. मग कृष्णातीरावर कुठेतरी जाऊन रहायचे. परमार्थ साधायचा आहे. कुटुंबियांच होईल व्यवस्थित. अशी सर्वांसाठी प्रार्थना करतो. 'सर्वेत्र सुखिनःसंतु' - त्यात त्यांचाही समावेश होतोच. त्यांच्यासाठी वेगळी प्रार्थना करायची आवश्यकता नाही. होईल त्यांच्या योगाप्रमाणे काय ते!

'श्री' सांगत होते. ''देवाच्या साठी किती पैसे खर्च करायचे याबाबत नको तो कटाक्ष पाळू नये'' त्यांनी घडलेली एक घटना सांगितली.देऊळगावराजाला बालाजीचे देवस्थान आहे. त्या ठिकाणी अनेक व्यापारी लोक नवस करायचे. त्यातील एक कथा सांगितली, ती सविस्तर कथा अशी-

एक व्यापाऱ्याचा मुलगा आजारी पडला. पुष्कळ डॉक्टर,वैद्य झाले पण त्याला काही गुण येईना. दिवसेंदिवस तो खंगतच चालला. त्या व्यापाऱ्याने बालाजीला नवस केला. माझा मुलगा रोगमुक्त होऊ दे. मी तुझ्यासमोर रु.५०१/-खर्च करीन. मुलगा बरा झाला. त्यानंतर तो व्यापारी मुलाला घेऊन देऊळगावराजा येथे आला. पुजेला रू.५०१/- खर्च करायचे होते पण तो बोलून चालून व्यापारी. त्याने विचार केला. नवस फेडायला येथपर्यंत यावे लागले. म्हणजे येण्याजाण्याचा तिकिटाचा खर्च केला गेला तो रु.५०१/- तून वजा करावा,त्याप्रमाणे तो खर्च वजा करून उरलेल्या पैशात पुजेचा खर्च करून बाकीचे पैसे देवासमोर ठेवले. तेथल्या तेथे मुलाला परत ताप भरला. ते पाहिल्यावर तो व्यापारी रागावला. तो म्हणाला,''देवा, तुला केलेला नवस फेडला रु.५०१/- खर्च केले. एवढ्या लांबून काम टाकून आलो. आणि याला परत ताप भरला.'' काय उपयोग तुला नवस करून?'' तो देवालाच दोष देऊ लागला. पण देवाची त्याच्यावर कृपा होती. देवाने त्याला दृष्टांत दिला. ''रु.५०१/- चा खर्च करण्याचा नवस केलास, त्यात येण्याजाण्याचा खर्च येत नाही.'' त्या व्यापाऱ्याने जेव्हा सर्व पैसे देवाजवळ ठेवले तेव्हा त्या मुलाचा ताप गेला.'' कथा सांगून महाराज म्हणाले,'' त्याच्यावर कृपा होती म्हणून देवानी त्याला दृष्टांत दिला पण हे असे प्रत्येकाच्या बाबतीत होणार नाही. आपल्या सारख्या अयोग्य माणसांच्या

हातून अशा हिशोबाच्या चुका घडल्या तर देव दृष्टांत देणार नाहीत, उपेक्षा करतील आणि म्हणतील, ''भोगा तुमच्या चुकांची फळे!''

मी म्हटले, ''महाराज, ही बुद्धी टिको हीच आपल्या चरणी प्रार्थना आहे.''

त्यावेळी ते म्हणाले, ''देवाकडे हीच प्रार्थना करायची.'' समर्थांनी एका श्लोकात सर्व सांगितले आहे.

'उपासनेला दृढ चालवावे ।
भूदेव संतासी सदा नमावे ।।
सत्कर्म योगे वय घालवावे ।
सर्वांमुखी मंगल बोलवावे ।।

आपण सर्व भार त्याच्यावर ठेवला म्हणजे तो नक्की काळजी घेत असतो. आपण त्या वाडीच्या संन्यासी महाराजांच्या दर्शनाला गेलो होतो.' ते ' सर्व सोडून देवाची सेवा करायला राहिले होते.त्यांचे होतच होते की नाही! प्रपंचात दैन्य नसलं म्हणजे झालं. दारात कोणी घेणेकरी आला नाही म्हणजे झालं.

ईश्वर प्रत्येक जीवाला भूतलावर पाठवतो तेव्हा त्याला काही कर्तव्य अपेक्षित असते. मनुष्य येथे आला की ते विसरतो. नुसते विसरतोच असे नाही तर अहंकर्तृत्वाचे भूत त्याच्या मानगुटीवर असे घट्ट बसलेले असते की ईश्वराच्या आज्ञा त्याला कोणी सांगितल्या तर आज्ञाच काय पण ईश्वराचे अस्तित्वही न मानण्यापर्यंत त्याची मजल गेलेली असते. **पण महाराज म्हणतात, ''प्रत्येक जीवाने आपले कल्याण करून घ्यावे म्हणून अनेक मार्ग ईश्वराने निर्मीलेले आहेत. कोणत्या ना कोणत्या तरी मार्गाने माणसाने आपली या चक्रातून सुटका करून घ्यावी. संतांच्या वाणीवर आपण पूर्ण विश्वास ठेवला तरी आपले जीवन तेजोमय होऊन जाते'' 'श्री' साध्या सोप्या भाषेत छोट्या छोट्या वाक्यातून अशा कितीतरी गोष्टी सहज सुचवून जात.** आग्रह नाही पण ज्याला काही अक्कल आहे तो त्यांचे बोलणे ऐकूनच मानवी मनाची अत्युच्च पातळी गाठू शकेल. असे त्या शब्दांचे सामर्थ्य होते. विचार आणि चिंतन करणाराचे जन्मोजन्मीचे कल्याण होऊन जाईल.पण त्या बोलण्याला प्रचीतीचा

भक्कम पाया असल्याने प्रत्येक शब्दाबद्दल मनात दृढ विश्वासच निर्माण होतो. आणि यातूनच घडत जाते आपले जीवन!

काही माणसे आपला मनोदय पूर्ण करण्याच्या नादात सत्पुरुषांच्या शब्दालाही महत्त्व द्यायला तयार नसतात. तसेच श्रीमान क्ष ही व्यक्ती आहे. त्यांनी मला हेसवणकरांकडे आपल्या बरोबर यायचा आग्रह केला. मी त्यांना 'श्रीं' ची आज्ञा सांगितली. पण ते कांही ऐकेनात. सकाळी ६ ते ७.३० देवासमोर बैठक, संध्या व स्तोत्रपाठ थोडक्यात आटोपून शेवटी श्रीमान क्ष यांच्याबरोबर हेसवणकरांकडे गेलो. नाईलाजानेच गेलो. पण 'श्रीं' नी स्पष्ट शब्दात इथे आल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. 'श्रीं' नी कालच सांगितले होते की त्यांचे आन्हिक आटोपल्यावर ते मंदिरात येतील.हेसवणकरांकडे कोणीही येऊ नये. पण श्रीमान क्ष यांच्या दडपणामुळे मी त्यांच्याबरोबर गुरुआज्ञाभंगाच्या अपराधात सहभागी झालो आणि मूर्ख ठरलो. सामान्य माणसांना बाहेरुन संतांचे 'संतत्व' कळत नाही हेच खरे!

**दुपारी निरुपणात 'श्रीं' नी महत्त्वाच्या २/३ गोष्टी सांगितल्या त्या अशा-**

१) **एक वेळ भाव नसला तरी चालेल पण मन 'श्री' चरणी लागले असले तरी त्याचे फळ मिळतेच.**

२) **गुरुंच्या सहवासात सुद्धा जास्त राहू नये. कारण आपल्याला गुरुंकडे पहाण्याची योग्य दृष्टी नसेल, गुणग्राहकता व गुरुंबद्दल अपरंपार प्रेम नसेल तर त्यांचे काही दोष, चारचौघांसारखे सामान्यत्व दिसते आणि मग हे कसले गुरु असे वाटू लागते. त्यापेक्षा घरी राहून स्मरणभक्ती करणे जास्त चांगले.**

३) **देव संरक्षण करतो म्हणजे आपल्याला धर्माचरण करावेसे वाटते 'धर्मे प्रीतिम्' उत्पन्न होणे इ.---**

यावेळी सौ.ताईमहाराजांच्या मंदिरात माझा मुक्काम असल्याने त्यांचा सहवास फार लाभला. **ताईमहाराज मंदिरातच रहात. तेथील सभागृहात पोत्यावर झोपत. स्वतंत्र खोली, बिऱ्हाड किंवा 'घर' म्हणून जी आपली संकल्पना असते त्यातले काहीच नव्हते. श्री भाऊजी आणि मुले पण तेथेच**

रहात. संग्रह नव्हता. मी सौ.ताईमहाराजांच्या मुलाना विचारले, तुमचे सामान कोठे आहे? तेव्हा ते म्हणाले, 'हे दिसते तेच सर्व सामान.'' आणि कपडे वगैरे कोठे आहेत? त्यावर ते उत्तरले, ''ते काय समोर वाळत घातले आहेत?'' हे विश्वची माझे घर, स्वतंत्र कशाला हवे. सेवेकरी करीत असतील त्यातील स्वयंपाक हे सर्व जेवत, असाच संसार चालला होता.'संतांचा संसार'. सौ.ताईमहाराज तर १५/१५दिवस अन्न न घेता रहात. महाराज भागवतात गोष्ट सांगताना वर्णन करतात. ''ध्रुवबाळ ८/८ दिवस सुरुवातीला नुसती फळे खाऊन, नंतर नुसती झाडाची पाने खाऊन तर शेवटी वायुभक्षण करून राहिला. ते सांगत असताना ते वर्णन करतात की या गोष्टी करणे कसे शक्य आहे. पण आपला सहज विश्वास बसत नाही. इथे सौ.ताईमहाराजांची श्रद्धा ह्या गोष्टी प्रत्यक्ष अनुभवाने सिद्धकरून दाखवते. अशा ठिकाणी फक्त 'नत' होण्यापलीकडे आपण काय करू शकतो!

सौ.ताईमहाराजांजवळ अनेक प्रकारे बोलणी होत. एकदा बोलताना त्या म्हणाल्या,''तुम्ही आम्ही व्दापार,त्रेतायुगापासून 'श्रीं' च्या जवळ आहोत.''

ताईमहाराजांकडे असल्यावर माहेरी आलेल्या मुलीसारखे कोडकौतुक चाललेले असायचे. जेवायला वेगवेगळे पदार्थ, सकाळच्या नाष्ट्याला वेगवेगळे पदार्थ, मधून सरबत किंवा आईसक्रीम किंवा तत्सम पदार्थ जप करताना तोंड सुकू नये म्हणून, खाण्याची रेलचेल, आणि काम नाहीच.

आज सकाळी ताईंशी अर्धा तास बोलायला संधी मिळाली तेव्हा सौ. ताईमहाराजांना म्हटलं,''माहेरी आलेल्या मुलीसारखे आमचे कोडकौतुक चालले आहेत. ''त्यावर त्या म्हणाल्या,''तुम्हाला जास्तीत जास्त धून करायला वेळ मिळावा म्हणून तुम्हाला काही तसदी पडू देत नाही. आता महाराज तुम्हाला काही तेवढे करू देणार नाहीत. पण पुढे तुम्हाला अशी सेवा करावीच लागणार आहे. ती कशी करायची याचे शिक्षण देण्यासाठी तुम्हाला इथं आणलं आहे. पुरुषोत्तम मासात(अधिकमास)महाराजांचे आपल्याला कृष्ण स्वरुपात दर्शन होत आहे हे आपले केवढे भाग्य आहे. महाराजांच्या (काजळकर) वेळेपासूनची जुनी जाणती माणसं इथं आहेत,पण सांगितलेले काम निमूटपणे कोणी ऐकत नाही. अमूक एक

कर सांगितले तर चटकन करायच्या ऐवजी त्याबद्दल नको ते प्रश्न विचारून घोळ घालतात. महाराजांचे कार्य पुढे तुम्हाला चालू ठेवायचे आहे.

सौ. ताईमहाराज पुढे म्हणाल्या, ''महाराजांची नंतर होणारी सेवा म्हणजे अन्नदान, यज्ञयाग इत्यादी. इथे होणारी कार्ये, आमच्यासारख्या आल्यागेल्याची इथली मंडळी जी बडदास्त ठेवतात ती सेवा महाराजांपर्यन्त जाऊन पोहोचते. आम्हीही पुढे असेच करावे.

**सौ. ताईमहाराजांना 'श्री' कृष्णस्वरुप वाटत असत. ते भागवत सांगत तेव्हा ताईमहाराज ते प्रत्यक्ष पहात असत. त्यांच्या मनात 'श्रीं' च्या बद्दल इतका आदर आहे की व्यासपीठाच्या रस्त्यावर टाकलेल्या ज्या पायघड्यावरुन 'श्री' जातात त्यावरुन न जाता त्या बाजूने जात. ताईनी सांगितले, ''इथल्या ज्या गवतावरून 'श्री' चालत जातात ते गवतरुपी वृक्षयोनीत गेलेले जीव 'श्री' च्या पदस्पर्शाने मुक्त होत असतात.''**

त्या सांगतात म्हणून 'श्रीं 'चे मोठेपण आपल्याला थोडेतरी कळते. ताईमहाराजांकडे मंदिरात प्रसाद म्हणून दुधाचा चहा असायचा. मोठा थर्मास भरुन ठेवलेला असायचा. येणाऱ्या जाणाऱ्या सर्वांनी प्रसाद म्हणून कितीही वेळा चहा प्यावा.

**एकदा मी ताईमहाराजांना म्हणालो,''किती चहा होतो आमचा इथे''. त्यावर माझाच शब्द पकडत ताईमहाराज म्हणाल्या ''त्याच कारण आपल्याला 'श्रीं'' चे 'चहाते' व्हायचे आहे.''**

ताईमहाराजानी शुक्रवार शनिवारचे कार्यक्रम ठरवून शनिवारी रात्री जायला अनुमती दिली. इथला वेळ जास्तीत जास्त धूनमध्ये घालवा असे पुन्हा पुन्हा सांगितले. 'श्री' नी सुद्धा आपल्या प्रवचनातून अशा स्थानी येण्याचे फायदे सांगितले. सौ.ताईमहाराजाना द्रौपदीची उपमा दिली. वनवासात असताना देखील द्रौपदी सूर्याकडून उपासनेने मिळालेल्या थाळीच्या सहाय्याने अन्नदान करीत असे. त्या थाळीचे वैशिष्ट्य असे होते की द्रौपदी जेवली की त्यातून अन्न येणे बंद होत असे. म्हणजे सर्वांना जेवण मिळेपर्यंत आल्यागेल्याचे जेवण होईपर्यंत द्रौपदीला जेवता येत नसे आणि तरीही आनंदाने ती सर्वांना अन्नदान करी. सौ.ताईमहाराजांचेही असेच अन्नदान चालू असे.

या वास्तव्यात सौ.ताईमहाराजांकडे अनेक लोक येत. अनेक अनुभव सांगत असत. सौ. ताईमहाराजांची प्रेमलाबाई म्हणून एक मैत्रीण आहे. त्या नांदेडला रहात असत. त्यांनी आदल्या रात्री घडलेला एक प्रसंग सांगितला. त्यांच्याबरोबर नांदेडची एक ७-८ वर्षाची मुलगी आलेली होती. तिला याग मंडपाला प्रदक्षिणा घालायच्या होत्या. पण दिवसभर त्यांना प्रदक्षिणा घालायला मिळाल्या नाहीत म्हणून ती व इतर दुसऱ्या मुली मध्यरात्री याग मंडपाला प्रदक्षिणा घालीत होत्या. इतक्यात अचानक प्रवेशव्दारातून घोड्यावर बसून सद्गुरु काजळकर महाराज याग मंडपाजवळ आले व मुलीला म्हणाले,''दान पेटीत दोन रुपये टाक.'' आणि तसेच घोड्यावर बसून कल्याणरायजींच्या समाधीजवळ गेले. आम्ही तेथेच झोपलो होतो.

ती मुलगी इतकी भांबावली की कोणाला ओळखेनाशी झाली. त्या मुलीबरोबर दुसऱ्या दोन मुली होत्या. त्या त्यावेळी जवळच होत्या. पण त्यांना काही दर्शन घडले नाही हे विशेष. प्रमिलाताईनी दुसऱ्या दिवशी तिला विचारले की तुला काय होतंय? तू अस्वस्थ का? आई इथे असताना तू तिला ओळखत का नाहीस? दिवसभर त्या तिला विचारीत होत्या. पण तिच्यात कांहीही फरक पडत नव्हता. शेवटी तिने रु.२/- पेटीत टाकले तेव्हा तिला बरे वाटले व तिने आईला पटकन ओळखले.

दुसरा एक अनुभव तेथील सेवेकरी मुलींनी सांगितला. पुष्पा, सीता अशा काही मुली तेथे सेवेला राहिल्या होत्या. चार महिन्यापूर्वीच त्यांना दृष्टांत झाला होता की इथे मोठा यज्ञ चाललेला आहे. वेद घोष चालला आहे. अशी दृश्ये आधीच दिसली होती. पुढे याच ठिकाणी विष्णुयाग महाराजांच्या हस्ते झाला.

**सौ. ताईमहाराजांचे जिथे वास्तव्य असे तेथे नेहमी सर्प प्रगट होतो. ते सद्गुरुंचे स्वरुप मानले जाते.**

रात्रौ भाऊजी, अनंता(महाराजांचे पुतणे), श्री शृंगारपुरे, श्री. तांबोळी यांच्याबरोबर या स्थानात घडणाऱ्या सत्कर्माबद्दल बोलणे चालले होते. ते ऐकताना रात्री एक कधी वाजला, समजलेच नाही. पुन्हा एकदा शृंगारपुरे यांना 'श्रीं'च्या निरवानिरवीच्या पत्राचे गांभीर्य जाणवून दिले. त्यांच्या बोलण्यात वारंवार औरवाडला जाण्याचे येत असे.

आमच्या मनातील अस्वस्थता शेवटी मी सौ ताईमहाराजांच्या कानावर घातली. त्या म्हणाल्या,''शताब्दी महोत्सवानंतर लगेच 'श्री' वाडीला जाणार नाहीत. पहिली ३/४ वर्षे, आठ पंधरा दिवस किंवा एखादा महिना जाऊन परत पुण्याला येऊन रहातील. त्यांची तिथे व्यवस्था आपोआप होईल. तुमच्यावरही जबाबदारी आहे. तुमच्यापैकी जे संसारातून मोकळे झालेत त्यानी आळीपाळीने जाऊन रहावे.'श्रीं' साठी घाट बांधावा. ज्या वास्तूत 'श्री' रहातील ती नीट रहाण्यायोग्य करून घ्यावी लागेल. मी इथे रहायला आले तेव्हा काय होते पण महाराजांच्या कृपेने सर्व झाले. तसे व्यवस्थित होईल'' अशा तऱ्हेने सौ ताईमहाराजांनी आम्हाला 'श्रीं'ची सेवा करण्याचा मार्ग दाखवला. 'श्रीं' च्या सहवासात जास्तीत जास्त रहा असे ताईमहाराज नेहमी म्हणायच्या. पण 'श्रीं' च्या सहवासात जरी राहिलो तरी त्यांच्या कामाचा व्याप इतका असे की 'श्री' शी बोलणे,बसणे होतच नसे. मनातील सर्व शंका सौ.ताईमहाराजांशी मी मोकळेपणाने बोलत असे त्यामुळे आपल्या स्थूलबुद्धीला जे आकलन होत नसे तो सर्व उलगडा त्या सहज करीत असत.

**याही वेळी मी माझ्या मनातील शंका मी स्पष्टपणे ताईमहाराजांना विचारली,''तुम्ही म्हणता 'श्री' च्या सहवासात जास्तीत जास्त रहा आता आम्ही इथल्यासारखे जेथे त्यांचे वास्तव्य असेल तिथे शक्यतो रहाण्याचा प्रयत्न करतो पण 'श्रीं' शी प्रत्यक्ष बोलणे, बसणे होत नाही. मग नेमका फायदा काय होतो?**

**त्यावर त्या म्हणाल्या,''त्यांची जरी तुमच्यावर कृपादृष्टी पडली तरी तुमची शुद्धी होत असते, वातावरण पवित्र असते. या सगळ्यामुळे तुमची अदृष्टे(तुम्हाला दिसली नाहीत तरी) नाश पावत असतात. याचा फायदा तुम्हाला पुढे समजेल.**

सौ.ताईमहाराजांकडे अन्नदान सतत चाललेले असायचे. लोकांची बुद्धी शुद्ध अन्नाने शुद्ध व्हावी. भुकेल्याची भूक भागावी, तहानलेल्यांची तहान भागावी हा उदात्त हेतू त्यामध्ये असतो. जेवा, खा पण नामस्मरण करुन आत्मोत्कर्ष करुन घ्या. ही त्या जगन्मातेची करुणा त्यामागे असते. ऐसी कळवळ्याची

जाती। करी लाभावीण प्रीती ।। हे संतच करू जाणोत. पण सामान्य व्यवहारी माणसाना त्याचे काय? फुकट मिळते. खा! मजा करा! या पातळीवरही असणारी माणसे तेथे असायची हे ताईमहाराजांना कळत नव्हते का? आपल्यासारख्या सामान्य माणसाना समाजात वावरताना जी माणसे भेटतात ते सर्वच नमुने संतानाही भेटतातच. त्यांच्या संतत्वाचा यांच्यावर काय परिणाम होणार? कारण समोर झगझगीत सूर्य उभा असला तरी यांच्या डोळ्यावर स्वार्थाची झापडे अगदी घट्ट बाधलेली. कधी-कधी ताईमहाराजांना अशा लोकांचा अगदी उबग यायचा. त्या एकदा असेच बोलणे निघाले असता म्हणाल्या, ''इथे फुकटे आणि काढवा काढणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. लुटतात अक्षरशः. ऐकत नाहीत सांगितलेले, त्यामुळे इतका वीट येतो की लांब कुठेतरी निघून जावेसे वाटते पण मी बाईमाणूस एकटी जाणार कुठे? त्यावर मी म्हटले 'श्रीं' कडून आपल्याला होणारा त्रास कळल्यावर आम्ही आपल्याला पत्र पाठवून मुंबईला बदल म्हणून काही दिवसांसाठी नेणार होतो पण हीच समाजमर्यादा आड आली. तुम्ही पुरुष असता तर घेऊनच गेलो असतो.

त्या पुढे म्हणाल्या, ''अशा वेळी मी मौन धरते पण त्याचाही तापच होतो. कारण क्षुल्लक गोष्टी मला विचारायला येतात; वास्तविक प्रत्येकाने आपापली जबाबदारी ओळखून वागले तर किती सोयीस्कर होईल? मी आठ दिवस बाहेर पडले तर इथे सगळा गोंधळ उडतो. मला काजळकर महाराजांनी दृष्टांत देऊन हा यज्ञ कर असे सांगितले. तसेच सतत अन्नदान कर म्हणून मागे लागतात.''

सद्गुरुंची आज्ञा पालन करायची, त्यासाठी पडेल तो सर्व त्रास सहन करायचा, आणि अज्ञ जीवांवर करुणा करायची. त्यांच्या चुका समजत असून पोटात घालायच्या आणि सदैव त्यांच्यावर कृपेचा वर्षाव करीत रहायचे.असे असते संतांचे जीवन. मी एकेका प्रसंगातून हे सर्व शिकत होतो. चिंतन करत होतो. ''योगी पावन मनाचा। साही अपराध जनाचा।'' आठ वर्षाची योगीनी मुक्ताबाईच जणू सांगत होती.

'श्रीं' च्या बरोबर बऱ्याच वेळा यात्रेलाही जाण्याचा योग आला. त्याबद्दल सौ.ताईमहाराजांशी विषय निघाल्यावर त्या म्हणाल्या,'' 'श्रीं' च्या बरोबर यात्रा घडतात. त्यामुळे निरनिराळे शिक्षण मिळते, दोष दूर होतात.'' यात्रेला

गेल्याबद्दल त्यानी वारंवार समाधान व्यक्त केले. त्यावेळी मी सूचक शब्दात ताईमहाराजांजवळ 'श्री' ना होणाऱ्या त्रासाची साधारण कल्पना दिली. अशा आनंदाच्या वेळीही काही लोकांचा 'श्री' ना त्रास होतो, ते पहाण्यापेक्षा परत यात्रेला जाऊ नये, असे वाटते. असे मी म्हणालो. त्यावर त्यानी सांगितले,''बाकी कोणी बाहेर कसेही वागले तरी लक्ष देऊ नका. तुम्ही जाणे चालू ठेवा.

३१ तारखेला विष्णुयाग झाला. कार्यक्रम नेहमीप्रमाणेच अतिशय चांगला झाला. खूप अन्नसंतर्पण घडले. 'श्री' प्रसन्न झालेले होते.

दुसऱ्या दिवशी 'श्री' ताईमहाराजाना म्हणाले,''कार्यक्रम सगळा उत्तम पार पडला. केवढे अन्नसंतर्पण घडले. एवढ्या प्रचंड जनसमुदायाला उद्देशून लाउड स्पीकरवरून कोणीही प्रसाद घेतल्या शिवाय जाऊ नये. असे शब्द तरी इतरत्र कुठे आज ऐकायला मिळतात का? छान आनंद आहे.''

''महाराज सगळी आपली कृपा आहे.'' ताईमहाराज म्हणाल्या.

'श्री' नी सांगितले,''उद्या आता त्या तुलेवर देवतांची आपल्याला स्थापना करून पूजा करावी लागेल.''

''मी कशाला महाराज, माधवराव वगैरे कोणीतरी पूजेला बसेल.'' ताईमहाराज म्हणाल्या.

'श्री' म्हणाले,''अहो पण त्यात संकोचायचे काही कारणच नाही. गुळवणी महाराजांच्या वेळेसही (आम्ही) त्यांना याला शास्त्राधार दाखवून दिला होता. आपण जर शर्करा तुला करून घेणार असलात तर आमची मुद्रिका तुला होईल.''

महाराजांची आज्ञा ताईमहाराजाना शिरसावंद्य होती. दुसऱ्या दिवशी सौ. ताईमहाराजांची शर्करा तुला झाली आणि महाराजांची मुद्रिका तुला. मुद्रिका तुला म्हणजे एक रुपयाच्या नाण्यांनी महाराजांची तुला केली. एक एक रुपयांची खूप नाणी आम्ही सर्व भक्त मंडळींनी गोळा केली. किती नाणी लागतील याचा अंदाज केला. थोड्याच दिवसापूर्वी मुंबईला एका ठिकाणी महाराजांची शर्करा तुला झाली होती. तेव्हा त्यांचे वजन ६५ किलो भरले होते. आता तेच वजन गृहीत धरून तेवढ्या वजनाची नाणी गोळा करायचे ठरविले. एका नाण्याचे वजन १०ग्रॅम म्हणजे ६५००० हजार ग्रॅम वजनासाठी ६५०० नाणी हवीत.

खूप खटपट करून ७००० नाणी जमविली. काही भक्त मंडळीनी जालन्यात फिरून १ नाण्याला २ ते ५ रु. सुद्धा दिले. ६५ किलो पेक्षा जास्त नाणी असावी. ७० किलो पुरेशी होतील. हा आमचा अंदाज. तुला करण्यास सुरुवात झाली. तराजूचे पूजन करुन एका पारड्यात 'श्री' बसले तर दुसऱ्या पारड्यात नाणी ठेवण्यात आली. सुमारे ६५ किलो इतकी नाणी टाकून झाली. तरी 'श्रीं' चे पारडे जडच होते. पुढे ६६.६७.---७० किलो झाले तरी 'श्रीं' चे पारडे हलेना. पुन्हा भक्तानी सर्वत्र फोनाफोनी करून नाणी जमविली. दुसऱ्या पारड्यात नाणी आणून टाकली जात होती. नाण्यांचे वजन वाढत चालले ७५-८०-१००-११२! पण 'श्रीं' चे पारडे जडच. शेवटी सर्व थकले, सौ. ताईमहाराजांना शरण गेले. त्या म्हणाल्या, ''देवासमोरील पेटीतील पैसे घ्या'' पैसे व तुलसीपत्र ताईमहाराजांच्या हस्तेच पारड्यात टाकण्यात आले--- आणि दोन्ही पारडी सारखी झाली. तुला झाली.

-अशीच तुला द्वापार युगात झाली होती.

श्रीकृष्णांची ! सोन्याने !

त्या दिवशी महाराजांचे('श्रीं' चे) वजन १२० किलो झाले होते.

सौ. ताईमहाराजांना श्री. काजळकर महाराजानी त्या दिवशी सर्व दागिने अंगावर घालण्याची आज्ञा केली होती. संध्याकाळी मिरवणूक निघाली. जुन्या जालन्यातून ही मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक संपल्यावर पाऊस पडला. अवभृतस्नान सर्वानाच घडले. अवभृतस्नान याचा अर्थ पवित्र स्नान. कोणत्याही चांगल्या कार्याची सांगता जलाने होते. एखादे पवित्र कार्य किंवा यज्ञ याग झाल्यावर यजमानाने आपल्या बरोबरच्या सर्व मुख्य माणसांना घेऊन नदीवर स्नान करायचे असते. याला अवभृतस्नान म्हणतात. ते पाणी वहात असते. त्यात इतरांनी स्नान केले तर त्या पवित्र कार्याचे, यागाचे पुण्य सर्वांना मिळते असा संकेत आहे.

पण इथे अवभृतस्नान ईश्वरानेच घातले होते. याग संपल्यावर तो ईश्वरापर्यंत पोहोचल्याची खूणही या पावसाने दिली.

दुसऱ्या दिवशी दुपारी आम्ही ताईमहाराजांशी बोलत असताना एक अधु दृष्टीचा म्हातारा ताईमहाराजांकडे आला. ताईमहाराजांसमोर चार/आठ आणे

ठेवले. आणि म्हणाला,''मी रामाच्या मूर्तीची स्थापना केली आहे. तुम्हाला इथे मूर्ती आणून देतो. १३ लाख रामनामाचा जप झाला आहे.'' इ.इ. सांगू लागला.

ताईमहाराज म्हणाल्या, ''ही माझी जागा नाही. इथे मूर्ती स्थापना केल्यावर कोण पाळणार? ही २ रु.(ची नोट) घ्या. आणि दर्शन प्रसाद घेऊन जा.''

तो गेल्यावर त्या उपहासाने म्हणाल्या,''ज्याचा १३ लाख जप झालाय त्याची अशी स्थिती कशी होईल? इथे एक लाख जप होत नाही. पण बघितलं. इथं पैसे मिळतील या आशेने असे अनेक उपटसुंभ येत असतात.''

महाराजांचा दिवसभरचा कार्यक्रम झाला की रात्री वेळ मिळाल्यावर आलेल्या पत्रांची उत्तरे लिहीणे चालू असे. आज रात्री ११ वाजेपर्यंत त्यांचे पत्रलेखन चालू होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० ला 'श्री' उठले ७ च्या सुमारास मंदिरात कोपऱ्यात एकटे बसले होते. मी तेथे गेलो. नमस्कार केला.

'श्री' म्हणाले,''काय प्रकृती बरी आहे नां? काय झालं होतं? औषध काय घेतलं? आम्ही आता उद्या आपला देऊळगावराजाचा कार्यक्रम आटोपल्यावर बार्शीला जाऊ. तिथून आम्हाला परत इथे यावे लागेल. मग आम्ही पुण्यात येऊ. तुम्ही काय शनिवारी रात्री निघता?''

सकाळी ११.३० च्या सुमारास 'श्री' खोलीत एकटे बसलेले आहेत हे पाहून गेलो. यवत हे आमचे गाव. तेथे आमची वडिलार्जीत इस्टेट आहे. बरीच आहे. व्यावहारिक दृष्टीने पाहिले तर बरीच रक्कम हाती येण्याचा योग होता. कारण तेथून पत्र आले होते की या इस्टेटीचा वारसदार मी एकटाच होतो. मी स्वीकारली नाही तर ती इतर भाईबंदाकडे जाणार होती. काय करावे? 'श्री' ना सर्व सांगितले. 'श्री' म्हणाले, ऽऽतुम्हाला जर इस्टेटीचा मोह नसेल तर तुम्ही तिकडे लक्ष देऊ नका.'' त्यांची आज्ञा मी पाळली. सतत त्यांच्या सहवासात राहिल्याने त्यांचे अत्यंत उच्च दर्जाचे रहाणे, विचार यांच्या सततच्या चिंतनाने म्हणा आणि मुख्य म्हणजे त्यांच्या कृपेने त्या इस्टेटीचा मोह मला कधीच वाटला नाही.

'श्री' म्हणाले, '' परमार्थात राहून संपत्तीचा मोह सुटणे फार कठीण कर्म आहे.होत नाही. ईश्वरी कृपा असली तरच तो मोह होत नाही. आता ताईंचेच पहा ना! एवढे सर्व आहे पण त्यांना कशाचाच मोह नाही. सर्व मुलांवर व इतरांवर सोपवून एकांतात रहायचे म्हणताहेत.

पुन्हा १५ मिनीटे एकांत मिळाल्यावर 'श्रीं' ना 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' या श्री स्वामी महाराजांच्या आरतीचा अर्थ पुन्हा एकदा समजावून सांगण्याची प्रार्थना केली. त्यावर 'श्री' म्हणाले,''तुम्ही एकदा या. जे काही राहीले असेल ते आम्ही पुन्हा तुम्हांला समजावून सांगू. ते तुम्ही लिहून काढा. सर्वानाच उपयोग होईल.''दिगंबरा---- '' अर्थ सर्वांना समजावा म्हणूनच तर मोठ्या महाराजांनी मुद्दाम ती केली. फार महत्वाची आहे. घेऊन या. बसू आपण.

खरं म्हणजे आरतीचा अर्थ यापूर्वीच 'श्री' नी सांगितला होता. तो टेप करून घेतला होता. परंतु काही भाग टेपवरून नीट ऐकू न आल्याने पुन्हा प्रार्थना केली. 'श्री'नी ती लगेचच मान्य केली. ३-८-८५- दोन तारखेला रात्री ताईमहाराजानी मला 'श्रीं'च्या खोलीत झोपायला सांगितले. त्याप्रमाणे मी त्या खोलीत झोपायला गेलो. पण तिथे रंजू, तारा, वगैरे सेवेकरी मुली झोपल्या होत्या. ते पाहून मी मागे फिरलो. दुसऱ्या दिवशी ९.३० ते १०.४५ या काळात सौ.ताईमहाराजांजवळ बोलत बसलो होतो. ताईमहाराजांनी मला झोपायला जायला सांगण्याचे कारण सांगितले. 'श्री' च्या खोलीत झोपल्यावर मला 'श्रीं' चा दृष्टांत व्हावा. अनुभूती व्हावी. असा ताईमहाराजांचा संकल्प होता. मी ताईमहाराजाना सांगितले की, ''मी तेथे झोपायला गेलो देखील होतो. पण त्या खोलीत सेवेकरी मुली झोपल्या होत्या. त्यावर ताईमहाराज म्हणाल्या ते मला दिसलेले दृश्य भ्रामक होते. त्या मुली तेथे असल्या तरी मी तेथेच झोपायला हवे होते. प्रारब्धाचा भोग दुसरे काय?

ताईमहाराजांच्या मंदिरात येणारे जाणारे लोक देवासमोर पैसे ठेवत असत. काही देणगीरुपातही पैसे देत असत पण या पैशाचा आपल्या मुलानी वापर करू नये असे त्याना वाटे. मुलानी शिकून स्वतःच्या पायावर उभे रहावे. इथे येणारी

पैसा/संपत्ती काही विशिष्ट कार्यासाठी येते. ह्या संपत्ती बरोबर देणाऱ्याच्या वासनाही आलेल्या असतात. त्या आपल्याला बाधक ठरतात. त्यामुळे त्याचा हव्यास आपण धरु नये. असे त्यांचे विचार होते. मुलानीही त्यांच्या आज्ञेचे पालन केले होते. त्या म्हणाल्या, ''द्रव्य देणारी मंडळी व्यवहारी असतात. त्याना जोपर्यंत ताईंची मदत होते आहे तोपर्यंत ते पैसा ओततील. चमत्कार / अनुभव थांबले तर हा पैशाचा ओघही थांबेल.''

'श्री' रोज एकदा कधी तरी येऊन देवासमोरच्या पेटीत काही पैसे टाकत असत.

अच्युतराव पोटभरे 'श्री' ना येऊन भेटले, व लिखाणाची माहिती दिली. काही गोष्टींसाठी 'श्रीं'ची संमती घेतली. ताईमहाराजांकडे इतक्या मोठ्या प्रमाणावर अन्नदान, यज्ञयाग अतिथीसत्कार वगैरे पाहून पोटभऱ्यांचे डोळे दिपले. ते 'श्री'ना म्हणाले, ''महाराज हे सगळे काय चालले आहे?

त्यावर 'श्री' म्हणाले, ''अच्युतराव जिथे उद्याची भ्रांत नाही तिथे कमी पडेलच कशाला?''

शनिवारी रात्री मी मुंबईला जायला निघालो. निरोप घेण्यापूर्वी पुन्हा ताईंशी थोडावेळ बोलणे झाले.

ताईमहाराज- परत कधी येणार?

मी - तुम्ही आठवण केलीत की.

ताईमहाराज- दोनतीन महिन्यानी पुन्हा येणे होईल. त्यावेळी २१ तासांची धून करा.

त्यावेळी ताईमहाराजांनी सांगितले की, ''वयाच्या सहाव्या वर्षापासून त्यांच्यामनात कृष्णभक्ती,प्रेम उत्पन्न झाले .'श्रीं'च्या मुखातून भागवत महाभारत ऐकताना त्याना ते प्रसंग जसेच्या तसे दिसतात.''

ताईमहाराजांचा निरोप घेतला. देहाने मुंबईला निघालो. मन मात्र 'श्रीं' जवळ. ताईमहाराजांजवळ. ते काही माझ्याबरोबर यायला तयार नव्हते.

******

## ‘श्रीं’ चे नीटनेटके काम

९ मे १९७८, स्थळ-श्री वर्तकवाडा-वेळ-सकाळी ११ वा.- ‘श्रीं’च्या खोलीत प्रवेश केला तेव्हां ‘श्री’ पोस्टाचा एक लिफाफा बंद करीत होते. लिफाफ्याला गोंद लावलेल्या जागेवरून त्यांनी एकदाच रबरी चोच असलेली गोंदाची बाटली फिरवली, लिफाफा बंद केला व जर गोंद बाजूने पडलाच असेल तर तो टिपून घेण्याकरता त्यावरून एक व्यवस्थित घडी केलेला छोटा रुमाल फिरवला आणि तो लिफाफा बाजूला ठेवला.

त्यांच्या नेहमीच्या वापरातील पिशवी इतकी व्यवस्थित लावलेली असे की काळोखात जरी तिच्यात हात घातला तरी जागची वस्तू तत्काल सांपडावी, उचका उचक करायची वेळ येऊ नये.

त्यांचे धोतर सोडून सोवळे नेसणे बघण्यासारखे असे. सोडलेल्या धोतराच्या निऱ्या जराही न विस्कटता ते व्यवस्थित गुंडाळून ठेवीत. पुन्हा नेसताना परत निऱ्या करायची वेळ यायची नाही.

त्यांचा पत्र व्यवहार प्रचंड होता. रोज अनेक पत्रे त्यांना येत व अनेक पत्रांना सवडीनुसार ते तत्परतेने उत्तर देत. पत्रांचे तीन गठ्ठे ते करीत त्यावर लेबलप्रमाणे नोंद करीत. आलेली, उत्तर पाठवायची व उत्तर पाठवलेली.

एकदा त्यांनी एका भक्ताला मंत्र लिहून देण्याकरता कागद मागितला. मागतानाच त्यांनी लहान कागद मागितला. विचार केला महाराजांना कागद द्यायचाय मग तुकडा कशाला द्या. म्हणून मोठा ताव पेपर दिला. त्यांनी त्यावर दोन ओळींचा मंत्र लिहून तेवढाच कागद फाडून उरलेला कागद परत केला. तो फाडतानासुध्दा त्यांचा व्यवस्थितपणा कौतुकास्पद होता. त्यांनी त्याची एकदाच घडी केली व अशा रीतीने फाडला की कुठेही कमी जास्ती फाडला गेला नाही. जणु कांही अगदी व्यवस्थित कात्रीनेच फाडला होता. खडीसाखरेची किंवा पेढ्याची पुडी देतानासुध्दा ती एकदाच व व्यवस्थित करीत. आणखी एकदा त्यांच्या अशा छोट्या गोष्टीतल्या व्यवस्थितपणाचा प्रत्यय आला. काशीत श्राध्द विधी चालला होता. त्यात भात दुधात भिजवून त्याचे निरनिराळ्या आकाराचे गोल गोळे करायचे असतात ते जिकीरीचे काम असते. सर्व साधारण माणसाला ते जमत

नाही. गोळे लहान मोठे किंवा कमी जास्त गोलाकाराचे होतात. पण 'श्रीं' नी इतक्या झटकन हव्या त्या आकाराचे गोळे करुन अंगठ्यावरून त्या दर्भावर ठेवले की आम्ही पहातच बसलो. जणु कांही त्यांना तसे करायची संवयच असावी.

जालन्यात श्रीमत भागवत सप्ताहाच्या निमित्ताने एका मारवाडी भक्ताकडे त्यांचा मुक्काम होता. 'श्रीं' ना उतरण्याकरता एका स्वतंत्र खोलीची व्यवस्था केली होती. त्याला जोडूनच प्रसाधन होते. 'श्रीं'ना पाय धुण्याकरता रात्रीतून दोन वेळा उठावे लागे. नवीन जागा. काळोखात खोलीतून प्रसाधनाकडे जायची वाट दिसावी म्हणून प्रसाधनाचा दरवाजा आंत दिवा लावून उघडा ठेवला. 'श्रीं' नी तिकडे जाण्याकरता उठल्यावर ते पाहून म्हटलं, कशाला उगीच रात्रभर दिवा ठेवायचा. कोणत्याही नवीन जागेत गेल्यावर आम्ही दिव्याचे बटन कुठे आहे ते बघून ठेवतो. त्यामुळे जायच्या वेळी काळोखातही अंदाजाने बटनाकडे जाऊन दिवा लावतो. उगीच रात्रभर दिवा ठेवायची गरज नाही.

त्याच मुक्कामात पहिल्या दिवशी 'श्रीं' चे कपडे धुण्याकरता बादलीभर पाण्यात चांगला दोन चमचे सर्फ टाकला. भावना काय तर 'श्रीं'चे कपडे स्वच्छ निघाले पाहिजेत. पण 'श्रीं'नी ते पाणी नुसते पाहूनच म्हटलं, आमच्या दोनच कपड्यांना एवढा साबण टाकायची काय गरज? दोन कपड्यांना किती साबण लागणार ? आवश्यक तेवढा टाकला असता तरी चालले असते. (प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या चरित्रातला कोठीच्या बाहेर एक मिरची पडली होती तेव्हां स्वामी महाराज काय म्हणाले होते तो प्रसंग या निमित्ताने आठवतो).

--------oooooo--------

## परनिंदा नको

आपण कोणाची निंदा कशी टाळावी, कोणाचा काय अधिकार आहे हे जाणून न घेता कोणतेही मत प्रदर्शन कसे करु नये हे त्यांनी एका प्रसंगाने फार हळूवारपणे शिकवले.

पॉल ब्रंटन नांवाच्या लेखकाचे मराठीत भाषांतरीत ''भारतीय अध्यात्मिक रहस्याच्या शोधात'' म्हणून एक पुस्तक आहे. त्या पुस्तकाबद्दल 'श्रीं'शी

बोलताना त्यातल्या एका प्रसंगाचा उल्लेख आला तो  असा. पॉल ब्रंटन योग्य गुरुच्या शोधात भारतात फिरत असताना पुण्याला आले व श्रीमेहेरबाबांची कीर्ती ऐकून त्यांच्याकडे मार्गदर्शनाकरता गेले. त्यांच्या सहवासात कांही दिवस राहिले पण त्यांना कांही अपेक्षित मार्गदर्शन लाभले नाही. त्यामुळे त्यांना वाटले श्रीमेहरबाबा तेवढ्या योग्यतेचे नाहीत. त्यांच्यात कांही अर्थ नव्हता, वगैरे. हा मजकू र वाचून वाचकाचेही मत तसेच होण्याचा संभव आहे.

'श्रीं'नी मला विचारले, ''तुम्ही गोंदवलेकरमहाराजांचे चरित्र वाचले आहे ना?'' म्हटल, हो. मग ते पुढे म्हणाले, ''गोंदवलेकर महाराज लहानपणीच गुरुंच्या शोधात बाहेर पडले प्रथम ते श्री अक्कलकोट स्वामींच्याकडे गेले. पण स्वामींनी त्यांना सांगितले मी तुझा गुरु नाही. मग ते श्रीमाणिकप्रभुंकडे गेले, श्रीसाईबाबांकडे गेले पण त्यांनीही श्री गोंदवलेकरांना तेच सांगितले. शेवटी श्री गोंदवलेकरांची व तुकाईंची येहेळगांवला भेट झाली. तुकाईंनी  परिक्षा पाहून ह्यांना दीक्षा दिली. हे पुढे गोंदवलेकरमहाराज म्हणून प्रसिद्धिस पावले. आता आपण असे म्हणायचे का की श्रीस्वामीसमर्थ, श्रीमाणिकप्रभु, श्रीसाईबाबांच्यात काही अर्थ नव्हता? नाही आपण असे म्हणू शकत नाही असे म्हणणे चुकीचे व अयोग्य आहे ह्याचा सरळ अर्थ इतकाच की गोंदवलेकरांना मार्गदर्शन तुकाईंकडून व्हायचे होते. ह्या तीन विभूतींकडून नाही. त्याप्रमाणे पॉल ब्रँटनला श्री रमण महर्षींकडून दीक्षा मिळायची होती म्हणून इतर कोणाकडून मिळाली नाही. कोणी कोणाला उपदेश करायचा, दीक्षा द्यायची हे सर्व कार्य ईश्वरी योजनेनुसार चालू असते. आपली बुद्धी अल्प असल्याने ईश्वरी शक्तीच्या कार्याचे स्वरुप समजून येत नाही.''

--------oooooo--------

## सांघिक कार्य व मतभेद

कोणतेही सांघिक कार्य म्हटले की मतभेद असणारच. ते मिटवण्याकरता ते सतत प्रयत्नशील असत. एका ट्रस्टच्या ट्रस्टींमध्ये असेच मतभेद व गटबाजी होती. ते लोक एकत्र येऊन मिटींगच घेत नसत. मन:पूर्वक काम करणाऱ्याला एकटा पाडीत. त्यांच्याशी बोलताना 'श्री' इतक्या सहजतेने म्हणाले, मिटींग

घ्यायला तुम्हाला कामातून सवड मिळत असेल नसेल. पण तुम्ही नियमाप्रमाणे रेकॉर्ड ठेवण्याकरता त्या रजिस्टरमध्ये लिहा मिटींग झाली. चर्चेला महत्वाचा कांही मुद्दा नव्हता वगैरे. हे सांगताना त्यांनी कुठेही त्यांनीच नियुक्त केलेले ते ट्रस्टी एकत्र येत नाहीत, भेटत नाहीत, नियमाप्रमाणे सभा घेत नाहीत, मिनिटस् रेकॉर्ड करीत नाहीत वगैरे ची तक्रार केली नाही, बाऊ केला नाही. पण हळूवारपणे त्या ट्रस्टींना त्यांच्या कर्तव्याची जाणीव मात्र करुन दिली.

--------००००००--------

## भक्तांचा वेळही महत्त्वाचा

आपल्याला भेटायला येणाऱ्या माणसांचा वेळही महत्वाचा असतो याचे त्यांनी त्या माणसांच्या योग्यायोग्यतेचा विचार न करता कायम भान ठेवले. त्यांची एकदा किरकोळ सर्जरी झाली म्हणून आम्ही कांही जण त्यांना पहायला पुण्याला गेलो. आम्ही 'श्रीं' च्या घरी पोहोचण्याच्या पूर्वी बराच वेळ 'श्री' जागे होते व आलेल्या लोकांशी बोलत होते पण नेमके आम्ही पोहोचण्याच्या किंचित आधी 'श्री' झोपले. सौ. आईसाहेबांनी, श्री अशोकमहाराजांनी आम्ही मुंबईहून आलो व परत मुंबईला जायचे होते म्हणून 'श्रीं' ना उठवण्याची तयारी दाखवली पण आम्हीच त्यांना मनाई केली. आम्ही असे कोणी मोठे नाही की आमच्याकरता सद्गुरुंची झोपमोड करावी.

आम्हाला रात्री उशीर होण्यापूर्वी परतायचे असल्याने आम्ही थोडा वेळ थांबून निघालो. नेमके आम्ही गेल्यावर 'श्रीं'ची विश्रांती झाली. आम्ही येऊन गेल्याचे समजताच त्यांनी घरच्या मंडळीना त्यांना का उठवले नाही म्हणून रागावले. ते म्हणाले,''आम्ही परत झोपू शकतो. ती मंडळी एवढ्या लांबून आम्हाला भेटण्याकरता आली होती. आता परत असा प्रसंग आला तर कोणतीही वेळ असली तरी आम्हाला उठवा. आम्ही काय परत झोपू शकतो.''

त्याचप्रमाणे कोणी वेळ ठरवून भेटायला येणार असेल तर त्या वेळेच्या आधी कमीत कमी १५ मि. तरी 'श्री' तयार होऊन बसत. म्हणजे त्या येणाऱ्या व्यक्तीचा वेळ जाणार नाही.

--------००००००--------

## संन्याशांचा सन्मान

श्रीक्षेत्रहरिहरेश्वर येथे १९८२ साली श्री नागले यांच्या घरी 'श्रीं'चा श्रीगुरुचरित्र सप्ताह झाला. त्यावेळी श्री नागल्यांनी मागच्या अंगणात पोथीवाचनाला बसण्याकरता मोठा मंडप घातला होता. 'श्रीं'करता योग्य असे आसन तयार केले होते त्यावेळी 'श्रीं' बरोबर एक संन्याशी आले होते. त्यांच्याकरता अंगणातल्या औदुंबराच्या पारावर बसण्याची व्यवस्था केली होती. पहिल्या दिवशी आम्ही सर्वजण 'श्रीं'ची उत्सुकतेने वाट पहात होतो. ते येऊन स्थानापन्न झाले म्हणजे वाचनाला सुरवात करायची होती. त्याप्रमाणे ते आले पण त्यांच्याकरता तयार केलेल्या आसनावर न बसता स्वतःच्या हाताने पाट घेऊन आसनाच्या बाजूला भिंतीला टेकून बसले कोणाला कांही समजेना त्यानी असे का करावे? नंतर एका जाणकार साधकाच्या लक्षात आले की त्यांच्या आसनाची उंची संन्याशांच्या आसनापेक्षा कांही २/३ इंचांनी जास्त होती. संन्यासी, मग त्याची योग्यायोग्यतेचा विचार न करता आपल्या परंपरेप्रमाणे सर्वोच्च मानाचा अधिकारी असतो

'श्रीं' च्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्याला कर्नाटकातल्या एका उपपीठाचे एक अतिशय तरुण (वय अंदाजे १६ वर्ष) संन्यासी श्रीवासुदेव निवासात आले होते वास्तविक पाहता ते 'श्रीं'कडून कांही धार्मिक शंका समाधान करुन घेण्याकरता आले होते. पण 'श्रीं'नी त्यांना दर्शन झाल्यावर साष्टांग नमस्कार घातला. वास्तविक पाहता ईश्वरस्वरुप झालेल्या 'श्रीं'ना एवढी प्रथा पाळायचे कांही कारण नव्हते. पण लोक शिक्षणाकरता त्यांनी तसे केले.

--------००००००--------

## सर्वांना 'श्री' आमचेच वाटायचे

'श्रीं'च्याकडे भक्तवर्गाचा त्रिवेणी संगम झाला होता प.पू. श्री. धुंडीराजमहाराज, प.पू.श्री. गुळवणीमहाराज व त्यांचे स्वतःचे भक्त. त्यांच्याकडे या सर्वांना आपल्या सद्गुरुंचे दर्शन, भेट झाल्याचे समाधान देण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्याकडे होते त्यामुळे श्री धुंडिराजमहाराजांच्या भक्तांना ते साक्षात धुंडिराजमहाराज तर श्री गुळवणीमहाराजांच्या भक्तांना ते गुरुमहाराजच वाटत.

कारण ते महात्मे जसे वागले तसे 'श्री' ह्या लोकांशी वागत. जालना, देऊळगांवराजासारख्या मराठवाड्यातल्या भक्तांना ते साक्षात धुंडिराजमहाराज होते. तर पुणे मुंबईकडच्या भक्तांना ते गुरुमहाराज होते.

--------oooooo--------

## विविध विषयांवरील 'श्रीं'चे दृष्टीकोन-तथा प्रासंगिक स्मृत

'श्रीं'च्या बरोबर एकदा औरंगाबादच्या माई क्षीरसागरांकडे जायचा प्रसंग आला तेव्हां याची परत प्रचिती आली. माईंचा व 'श्रीं'चा ऋणानुबंध प.पू. श्री गुरुमहाराजांपासून होता. एकदा जालन्याला जाता येता 'श्री' आवर्जून आपण होऊन सवडी प्रमाणे त्यांच्याकडे गेले आणि कोणी आगत स्वागत करत बसायची वाट न पहाता हात पाय धुवून आपण होऊन पाट घेऊन नेहमीच्या ठिकाणी बसले. त्या वेळी माई व भाऊसाहेब जवळच्या श्री गणपती मंदिरात दर्शनाला गेले होते. त्यांच्या चिरंजीवांनी त्या दोघांना 'श्री' आल्याचा निरोप पाठवला. ते दोघे अत्यानंदाने धावतच आले.

'श्रीं'ची भेट झाल्यावर प्रेमालाप झाला. माईंनी 'श्रीं'ना फराळ करुन जाण्याचा आग्रह केला. 'श्रीं'नी त्यांना प्रेमाने तसे कां करता येत नाही हे समजावताना सांगितले ''आम्ही आता जालन्याला जायला निघालोय. तिथे मंडळी वाट पहात असतील. आपल्या घरावरुन जाताना आपल्याला न भेटता जाणे मनाला प्रशस्त वाटले नाही म्हणून आलो. आम्ही परत स्वतंत्र तुमच्याकडे येऊ. लोक देव दर्शनाला बाहेर पडले की एका खेपेतच त्यांना पाहिजे असलेल्या देवळात जाऊन दर्शन घेऊन येतात. पण असं म्हणतात तसे करु नये. घरातून बाहेर पडल्यावर गणपती मंदिरात जाऊन घरी यावे, परत रामाच्या मंदिरात जाऊन दर्शन घेऊन घरी यावे, परत बाहेर पडून दत्ताच्या मंदिरात जावे वगैरे. तसे आम्ही स्वतंत्र परत निश्चित येऊ.'' इतकी आत्मीयता पाहिल्यावर कोण आग्रह करील?'' 'श्रीं'नी ज्याला एकदा विचारपूर्वक आपला म्हटला त्याला शेवटपर्यंत आपला समजले. त्या माणसाच्या भावनेत जरी बदल झाला तरी 'श्रीं'च्या भावनेत बदल झाला नाही.

भारतीय संस्कृतीमध्ये निराशावाद नाही असे ते कायम म्हणत. कोणी कितीही अपराधी असला, दु:खी कष्टी असला व त्याने आपली दुर्दैवी कहाणी 'श्रीं'ना कथन केली की ती ते शांतपणे ऐकून घेत. समोरची व्यक्ती जरी दोषी असली, तिने चुका केल्या असल्या तरी त्याचा उल्लेख न करता, जे झाले त्याबद्दल त्या व्यक्तीला दोष देत न बसता, उगाळत न बसता जे झाले ते झाले या पुढे काय करता येईल याचा ते नेहमी विचार करीत व उपाय सांगत कोणाचे कधी त्यांनी खच्चीकरण केले नाही. उलट आलेल्या व्यक्तींच्यातली कोणतीही चांगली गोष्ट हेरुन त्यावर भर देऊन त्याला उत्तेजन देत.

पुण्याला त्यांना भेटायला येण्याबद्दलही त्यांचा दृष्टीकोन असा असे की कशाला इतका त्रास करून भाडे खर्च करुन यायचे, त्यापेक्षा पत्राने काय असेल ते विचारले तरी हरकत नाही.

विद्यार्थ्यांनी नुसता देवावर भरवसा न ठेवता भरपूर अभ्यास करुन त्याच्या जोडीला देवाची प्रार्थना करावी असे त्यांचे नेहमी सांगणे असे. त्याचप्रमाणे तरुणांनीसुद्धा अतिशय प्रयत्नशील, उद्यमशील राहावे, सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा असे ते सांगत. एका मोठ्या अधिकारी व्यक्तीच्या मुलांना शिक्षणाचे महत्व पटवून देताना त्यांनी पत्रात लिहिले होते, सध्याचे जग स्पर्धात्मक आहे. त्यात टिकून राहाण्याकरता आपण आपली योग्यता जास्तीत जास्त वाढवली पाहिजे. त्याच्या जोडीला उपासना असावी.

सर्वच बाबतीत त्यांचा सकारात्मक दृष्टीकोन होता. एकदा एका गृहस्थांच्या घरी ते बसले असता त्यांच्या परिचयातला एक तरुण तिथे आला होता. त्याने पूर्वी कुठेतरी नोकरीसाठी अर्ज केला होता व त्याला नोकरी मिळाली नव्हती त्यामुळे 'श्रीं'नी जेव्हा त्याला नोकरीचे काय झाले विचारल्यावर तो वैतागून म्हणाला, काय व्हायचय? केला होता अर्ज पण नाही मिळाली नोकरी. 'श्री' त्यावर त्याला शांतपणे म्हणाले तुम्ही परत अर्ज केलात का? त्याने परत वैतागून, करुन काही उपयोग नाही म्हणून केला नाही असे सांगितले. त्यावर 'श्रीं' नी त्याला समजावले, आपण परत प्रयत्न करायला काय हरकत आहे? तुम्ही पूर्वी अर्ज केलात तेव्हां त्याचा विचार केला गेला नाही हे जरी मान्य केले तरी आता परिस्थितीत बदल झाला असेल, कोणी निवृत्त झाले असतील,

कोणाची बदली झाली असेल, कोणाला प्रमोशन मिळाले असेल त्यामुळे पद रिक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे परत अर्ज करुन पहायला काय हरकत आहे?

उत्तरेहून महाराष्ट्र एक्स्प्रेस मुंबईला येते. त्या गाडीला पुण्याचा एक डबा जोडतात. 'श्री' जेव्हां १९८३ साली काशीला गेले होते त्या काळात रेल्वेच्या अनागोंदी कारभारामुळे कधी कधी हा डबा जोडण्यात कुचराई होत असे.'श्री' पुण्याला परत निघण्याच्या वेळी हे जेव्हां त्यांच्या कानावर गेले तेव्हां ते एवढेच म्हणाले, असे होतही असेल पण ते आपल्या जायच्या वेळी होईल असा आपण कशाला विचार करायचा?

'विद्याभ्यसनम् व्यसनम् अथवा हरिपाद सेवनम् व्यसनम्' हे त्यांच्या जीवनाचे बोध वाक्य होते.

गरजेनुसार सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यावर त्यांचा फार भर होता. एकदा एक अनुष्ठान करण्याकरता त्यासाठी त्यांचे आशीर्वाद घेण्याकरता पुण्याला गेलो पण नेमके 'श्री' बाहेरगांवी गेले होते. (ही जुनी -- १९८० -- ची गोष्ट आहे जेव्हां त्यांच्याकडे फोनची सोय नव्हती) म्हणून परत पुढच्या रविवारी त्यांच्या दर्शनाला गेलो. त्यावेळी मला निष्कारण चक्कर पडली म्हणून त्यांनी दिलगीरी व्यक्त तर केलीच पण एक मोठा आशीर्वाद दिला. ते म्हणाले, या पुढे तुम्ही कायम लक्षात ठेवा. तुम्ही कोणतेही पुण्यकर्म करा. सद्गुरुंचे आशीर्वाद सदैव तुमच्या बरोबर आहेत. प्रत्येक वेळी विचारायला यायचे कारण नाही. या आशीर्वादांचा जीवनात शेवटपर्यंत उपयोग होऊ शकतो.

जालन्याचे श्रीदत्ताश्रमाचे बांधकाम सुरु असताना (१९९२-९३) बांधकामाबाबत कोणताही निर्णय घ्यायचा असला की भगवती पुण्याला 'श्रीं'च्या दर्शनाला पाठवत. असे वारंवार होऊ लागल्यावर एक दिवस ते म्हणाले, ''तुम्ही असे किती वेळा येणार? त्यापेक्षा आज आम्ही तुम्हाला सांगून ठेवतो. यापुढे बांधकामाबाबत कोणताही निर्णय घ्यायची वेळ आली तर तुम्ही जो योग्य वाटेल तो निर्णय घ्या. उद्या कांही कमी जास्त झाले तर आम्ही त्याची जबाबदारी घेऊन सांगू की तो आमचा निर्णय आहे.'' एवढे आश्वासन मिळाल्यावर कमी जास्ती होईलच कशाला? तेच प्रेरणा देऊन ते कार्य करवून घेत होते.

जेव्हां मंदिराची भव्य नवीन वास्तू बांधण्याचे ठरले तेव्हां त्याला मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणे आवश्यक होते. त्याकरता नियोजित बांधकामाची माहिती करुन देणारे एक आवाहन पत्रक भगवतींना 'श्रीं'कडून लिहून पाहिजे होते. भगवतींची इच्छा त्यांना सांगितल्यावर ते इतक्या सहजपणे म्हणाले, ''आम्ही वेगळे काय लिहीणार? तुम्ही लिहायचे आम्ही सही करणार'' (समोरच्या व्यक्तीवर इतका विश्वास दाखवला की तिची निष्ठा वाढते त्या शिवाय त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट न केलेला त्याचा खरा अर्थ असा होता की त्यांच्याच प्रेरणेने ते लेखन होणार होते. त्यामुळे चुकायचा प्रश्नच येत नव्हता. आपले कांही चुकेल ही भीतीच अज्ञानाने होती.)

त्यांच्या हळूवार शिकवण्याचा आणखी एक अनुभव. १९९४ च्या यागाच्या निमित्ताने यागाच्या तयारीकरता जालन्यात आधी सुमारे महिनाभर मुक्काम झाला होता. याग संपल्यावर असे वाटले, आता काय आपले काम झाले आता निघायला हरकत नाही. बहुतेक सर्व शेवटच्या दिवशी परतू लागले. वाटले आपल्यालाही निघायला हरकत नाही. 'श्री'ही दुसऱ्या दिवशी हिंगोलीला रवाना होणार होते मग आपण राहून तरी काय करणार? या विचाराने त्यांना सर्वांबरोबर निरोपाचा नमस्कार करायला गेलो तेव्हां त्यांनी विचारले, 'काय मुक्काम आहे ना?' वास्तविक मुक्काम हलवायची परवानगी घेण्याकरता गेलो होतो व हा 'श्रीं'चा प्रश्न अनपेक्षित होता. त्याचे सहज उत्तर, 'नाही उद्या निघणार', असे होते. पण 'श्रीं'नीच काय बुद्धी दिली, पटकन म्हटलं, 'हो, महाराज.' हे ऐकल्यावर मात्र ते प्रसन्नपणे हंसून म्हणाले, ''हं खरी कामे नंतरच असतात.'' मांडववाल्याचे बिल द्यायचे असते, धान्य उरले असल्यास परत करून बिलाचा हिशोब करायचा असतो, भाड्याने आणलेली भांडी, गाद्या वगैरे सामान परत करुन बिले द्यायची असतात. तेव्हां ही कामे होणे महत्वाचे असते. एका छोट्या प्रसंगातून 'श्री' सेवाकार्य करताना काय विचार करायचा याचे कायमचे मार्गदर्शन करुन गेले.

'श्रीं'च्या बोलण्यात नेहमी कलीयुगात संघशक्तीला महत्व आहे असे यायचे व ते आपल्या भक्तांमध्ये सेवाकार्य करण्याच्या दृष्टीने सांघिक भावना निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्नशील असायचे. त्या दृष्टीने त्यांना ज्यांना एकत्र

आणायचे असेल त्या लोकांना ते कोणत्या ना कोणत्या कारणाने सतत संपर्कात आणायचे. आमच्याबाबतीत त्यांनी एक असाच प्रयत्न केला होता. आम्हा तिघा चौघांच्या पत्रात आम्ही किंवा आमच्या मुलांनी स्वतंत्रपणे पाठवलेल्या पत्राचा उल्लेख असे उदा. माझ्या पत्रात श्री तावडेंचे पत्र आल्याचा उल्लेख करीत. तावडेंच्या पत्रात आमच्या वैशालीचे पत्र आल्याचे लिहिलेले असायचे.

सांघिक सेवा कार्य करताना मतभेद अटळ आहेत पण ते सामोपचाराने मिटवण्याच्या प्रयत्नात ते सतत असत. एक बांधकामाकरता त्यांनी त्यांच्या विश्वासातल्या सिव्हिल इंजिनियरची नियुक्ती केली. हे गृहस्थ त्यांच्या निस्पृह निःस्वार्थी,निगर्वी सेवेकरता 'श्रीं'ना चिरपरिचित होते. पण अशा गुणांची पारख सगळ्यांना कशी होणार? एका प्रकल्पाची त्यांच्यावर जबाबदारी सोपवून 'श्री' निश्चिंत झाले होते. पण त्यात इतरही एक प्रतिष्ठित व्यक्ती सामील होती. पुढे ह्या इंजिनियरांचे व त्या व्यक्तीचे बांधकामाच्या दर्जावरुन अत्यंत तीव्र मतभेद झाले. जे खरे पहायला गेलं तर होण्याची गरजच नव्हती पण झाले.

इंजिनियरसाहेबांना वाटायचे देवाचे बांधकाम आहे, दीर्घकाल टिकणारे व्हावे उत्तम प्रतीचे व्हावे, पण दुसऱ्या व्यक्तीचा दृष्टीकोन स्वस्तात बांधकाम करण्याकडे होता. वास्तविक पहाता जर संतांच्या संकल्पाने एखादी गोष्टी घडत असेल तर त्यांच्या भक्तांनी निश्चिंत मनाने खर्चाचा विचार न करता करायला हरकत नाही. पण अज्ञान आड येते. 'श्रीं'ना जेव्हां हे समजले तेव्हां त्यांनी आधी वस्तुस्थिती काय आहे, मतभेदांचे नेमके स्वरुप काय आहे हे समजून घेतले व त्या दोघांच्यात दिलजमाई कशी करायची याचे कुशल मार्गदर्शन केले. थोडक्यात असे की विश्वस्तांनी दरात कांही वाढ करुन द्यावी व इंजिनिअरसाहेबांनी दरात थोडी घट करावी. अशी तडजोड केली की काम खोळंबून राहाणार नाही. त्यांचे जमत नसेल तर सोडून द्या, म्हणाले नाहीत. अशा प्रसंगी सामंजस्याकरता ते कायम पुढाकार घेत असत. वैयक्तिक मतभेदांमुळे सेवा कार्य नासू नये या करता ते सदैव प्रयत्नशील असत.

'श्रीं'नी सांघिक कार्याकरता कांही निवडक लोकांशी संपर्क आणला. त्यातले एक गृहस्थ सांघिक सेवेत 'श्रीं'नी सहभागी करुन घेतले होते. पुढे त्या

गृहस्थांवर कांही दुर्दैवाने आघात झाल्यावर त्यांनी तसे कांहीच कारण नसताना वड्याचं तेल वांग्यावर या न्यायाने सर्वांशीच संबंध जवळ जवळ तोडले. पण 'श्रीं'ची इच्छा होती की एकलकोंडे न राहाता ते जर इतर गुरुबंधूंच्या सहवासात राहिले तर त्यांना आपल्या दुःखाचा विसर पडेल व सेवाही पुढे चालू राहील. मी दर्शनाला गेलो की श्री म्हणायचे, क्ष येऊन गेले, परवाच आले होते, वगैरे 'श्रीं'चा अभिप्राय समजून मी जरी त्या गृहस्थांना राग येत असला तरी गुर्वाज्ञा म्हणून त्यांच्याकडे जाऊन दोन शब्द बोलत असे. त्यांना हा सद्भाव समजत नव्हता असे म्हणणे धाडसाचे ठरेल पण ते 'श्रीं'ना अपेक्षित प्रतिसाद देत नसत. उलट उडवून लावत. असे कांही महिने चालू होते. एकदा एका दसऱ्याच्या दिवशी ते 'श्रीं'च्या खोलीतून बाहेर पडले व मी आंत गेलो. 'श्री' लगेच म्हणाले, क्ष आत्ताच बाहेर पडले ते वाडीला येणार आहेत. गंमत म्हणजे त्यांना मुंबईहून तिकीट काढूनसुद्धा आमच्याच डब्यात (पुणे-मिरज) रिझर्व्हेशन मिळाले आहे वगैरे.

'श्रीं'चा अभिप्राय समजून दर्शन घेऊन बाहेर आलो तो क्ष बाहेरच्या हॉलमध्ये होते. त्यांच्या प्रतिक्रियेस मनांत न आणता 'श्रीं'च्या अपेक्षे प्रमाणे त्यांच्याकडे जाऊन म्हटल, बरं झालं 'श्रीं'च्याबरोबर प्रवासाचा योग येतो आहे. महाराज म्हणाले तुम्हाला त्यांच्या डब्यातच रिझर्व्हेशन मिळाले आहे इ. यावर त्या सज्जनांनी नेहमीप्रमाणे झटकून टाकले. ते म्हणतात, कोण जातोय महाराजांबरोबर? मी जाणार नाहीये वगैरे. मी समजलो. शब्दाने शब्द न वाढवता इतकेच म्हटल, माफ करा महाराजांनी मला बरोबर सांगितले असेल. माझ्या ऐकण्यात कांही तरी चूक झाली असेल. त्यानंतर देह ठेवेपर्यंत 'श्रीं'नी पुन्हा कधीही त्या सज्जनांचा माझ्याजवळ उल्लेख केला नाही. कदाचित माझी तितिक्षा वाढवायलाही 'श्रीं'नी ही संधी दिली असेल.

आपल्याशी चांगले, प्रेमाने वागणाऱ्यांकडे कोणीही तत्परतेने जाईल पण जो आपल्याला पाहिल्यावर अलर्काप्रमाणे आपल्या अंगावर धावून येतो त्याच्याकडे आपण सरळ मनाने जाऊ शकतो की नाही हेही तपासायला 'श्रीं'नी संधी दिली असेल. **ईश्वरी कृपा होऊनही त्या गंगेत अवगाहन**

**करण्याची बुद्धी एखाद्याला न होणे यात कृपा कमी पडली असे नसून स्व-बुद्धीने निर्णय घेण्याचे जे स्वातंत्र्य मनुष्याला आहे त्याचा दुरुपयोग घडतो हे आहे.** हेच दैन्य आहे. असे 'श्री' सांगत असत.घोरात् कष्टात् पदात हेच दैन्य आमचे घालवावे ही प्रार्थना आहे.

एखाद्या कुटुंबात किंवा धार्मिक स्थानात कोणतीही पूर्वापार चालत आलेली परंपरा ते बदलण्याच्या विरोधात असत. उदा. जर एखाद्या धार्मिक संस्थेत पूर्वापार चालत आलेल्या प्रार्थना बदलून त्यात कांही नवीन प्रार्थनांची भर घालण्याबद्दल त्यांना विचारले तर ते विनम्रपणे सांगत की यापूर्वी ज्या महात्म्यांनी ह्या प्रथा चालू केल्या त्यामागे त्यांचा कांही संकल्प असतो. आपण त्यात त्यांच्या इच्छेशिवाय बदल करु नये वगैरे. ज्यांच्या कुटुबात श्रीगणपती बसवायची पूर्वापार चालत आलेली प्रथा नसेल तर ते नव्याने सुरु करायला उत्तेजन सहसा देत नसत. हां, ज्या जीवाच्या कल्याणाच्या दृष्टीने ते आवश्यक असेल तर गोष्ट वेगळी.

कुळधर्म कुलाचार पाळण्यावर मात्र त्यांचा कटाक्ष असे. ते मात्र कधी टाळू नयेत असे त्यांचे सतत सांगणे असे. कधी प्रसंगानुरुप प्रतिकूलता आली तर आपद् धर्माचे पालन करावे असे ते म्हणत.

शास्त्राच्या विरुद्ध व्यवहारिक सोय म्हणून कोणी आचारात बदल करण्यास परवानगी मागू लागला तर मात्र ते कदापिही देत नसत. ते एवढेच म्हणत आम्ही वेगळे काय सांगणार, जे शास्त्र सांगते त्याप्रमाणे करायचे.

समोरच्याला न दुखावता कुशलपणे नकार कसा द्यावा हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे होते. त्यांच्याकरता आपण जर फर्स्ट क्लासचे किंवा एसीचे तिकीट काढायचे ठरवले तर ते म्हणायचे, अहो, तुम्ही सगळे एकत्र प्रवासाचा आनंद घेणार आणि आम्ही एकटे तिकडे बसून काय करणार?

आपल्याकरता भक्तांनी खर्च करण्यापेक्षा तो कोणत्या तरी धार्मिक कार्याकरता खर्च करावा अशी त्यांची इच्छा असे. त्यामुळे त्यांच्याकरता वरच्या वर्गाची तिकीटे काढण्यावर पैसे खर्च करण्यापेक्षा आवश्यक तिथे देवाला पूजा, अभिषेक करावा यावर त्यांचा भर होता.

१९७८ साली त्यांच्याकडे नियमितपणे जायला लागलो. 'श्री'सुद्धा मुंबईला येत असतात असे समजले. एकदा असेच ते येऊन गेल्याचे नंतर

समजल्यावर मनाला चुटपुट लागून राहिली. आधी समजले असते तर दर्शन तरी घेतले असते. तसे 'श्रीं'ना सहज बोलून दाखवले. त्यानंतर 'श्रीं'नी नियमितपणे मुंबईला कोणाकडे येणार, किती मुक्काम आहे, त्या यजमानांचा पत्ता कळवायला सुरवात केली. तसेच त्यांचे नियोजित कार्यक्रम काय ठरले आहेत हेही ते भेटल्यावर सांगत असत. त्यामुळे रजेची ॲडजेस्टमेंट करुन त्यांच्या सहवासाचा लाभ घेता येत असे.

प.पू. श्रीगुरुमहाराजांच्या एका अनुगृहिताच्या मनांत काय विकल्प आला कोणास ठाऊक ! 'श्री' कधीही श्रीवासुदेव निवासात श्रीगुरुमहाराजांच्या आसनावर किंवा त्या खोलीत बसले नाहीत. या गृहस्थांनी 'श्रीं'च्या या कृतीचा अर्थ असा लावला की 'श्रीं'च्यात एक प्रकारचा न्यूनगंड आहे व आपण गुरुमहाराजांपेक्षा कमी योग्यतेचे आहोत अशी जाणीव झाल्याने ते गुरुमहाराजांच्या आसनावर बसत नाहीत. त्याच्याही पुढे त्यांची मजल जाऊन त्यांनी या शंकेची शहानिशा करण्यास सांगितले. 'श्रीं'ना जेव्हां मोकळेपणाने हे सांगितले तेव्हां ते मंद स्मित करुन म्हणाले, **''अहो, गुरुमहाराजांच्या समोर आम्ही कधी बसलोसुद्धा नाही. गुरुमहाराज नाहीत असे आम्ही मानत नाही. मग त्यांच्या आसनावर आम्ही कसे बसायचे?'' 'श्री'ची केवढी उत्तुंग गुरुनिष्ठा या प्रसंगाने प्रगट झाली.**

त्यांच्या अमानित्वाचा एक प्रसंग आठवतो. प्रथमच 'श्रीं'बरोबर श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथे जायचा योग आला. ते देवाजवळ उभे होते. आम्ही आपले आनंदाने त्यांना नमस्कार करायला धावलो. ते मागे होत म्हणाले,'' अहो, काय करताहात? ते (श्रीदत्तप्रभु-मनोहर पादुका) बसले आहेत ना! त्यांच्या समोर आम्हाला काय नमस्कार करता?'' एकदा त्यांची प्रामाणिक भावना समजल्यानंतर त्यांना कधीही वाडीत नमस्कार करावासा वाटला नाही.

प.पू. श्रीगुरुमहाराज इतर भक्तांबरोबर वाडीत कृष्णामाईत स्नानाला उतरत इतरांवर स्नान करताना तीर्थ प्रोक्षण करीत आम्ही 'श्रीं'ना त्यांच्याबरोबर स्नान करायची परवानगी मागितली. त्यांनी नकार न देता प.प.श्रीनारायणस्वामींच्या चरित्रातील कुष्ठरोग्याचे कुष्ठ दूर होण्याचा प्रसंग सांगितला.

एरव्ही धीर गंभीर प्रकृतीचे वाटणारे 'श्री' प्रसंगाने हलका फुलका विनोद करुन वातावरण आनंदी करण्याची संधी सोडत नसत. एकदा सौ.आईसाहेबांना श्री म्हसवडकर 'श्रीं'ना नमस्कार करण्याचा आग्रह करू लागले. आईसाहेब कांही कमी नव्हत्या बरीच प्रेमळ बाचाबाची झाल्यावर त्या म्हणाल्या,'' अहो, आता त्यांच्याशी लग्न करुन सर्वस्वच अर्पण केलं तेव्हां पुन्हा नमस्काराची काय गरज? श्री म्हसवडकरही आपला हट्ट सोडीनात.त्यांनी बाहेर जाऊन हार व पेढे आणले व 'श्रीं'ची सायंसंध्या झाल्यावर त्यांना तो हार घातला व पेढे बाजूला ठेवून घरच्या सर्वांना नमस्काराला बोलावले. 'श्री' ना नमस्कार केला की 'श्रीं'नी पेढा द्यायचा सर्वात शेवटी आईसाहेबांना 'श्रीं'समोर आणले. त्यावेळी 'श्रीं'नी काय गंमत केली माहीत नाही. फक्त घरचीच मंडळी असताना कटोऱ्यातले पेढे कसे संपले हे आम्हालाही समजले नाही. आईसाहेब समोर आल्यावर 'श्री' एवढेच म्हणाले,''पेढे तर संपलेत( म्हणजे नमस्कार करायचा की नाही पहा कारण नमस्कार केल्यावर पेढा मिळत होता) सर्वांना हा प्रसंग फार भावला.

श्री अजित कवीश्वरांनी जेव्हां श्रीदत्तवाक्सुधा ही व्हिडिओ फिल्म घरी सर्वांना दाखवली तेव्हां सर्वांच्या समाधानाकरता ते येऊन बसले. वाडीच्या मनोहर पादुकांचे दर्शन फिल्ममध्ये झाल्यावर अगदी भक्तीभावाने नमस्कार केला. दहा मिनिटे झाल्यावर हंसत म्हणाले, तुमचे चालू द्या. आम्हाला कांही तुमच्यासारखी रविवारची सुट्टी नाही. उद्या ८ वाजता आश्रमात जायचे आहे.

तसेच, काशीहून आल्यावर पुढच्या यात्रेचे आयोजन करताना सौ. आईसाहेबांना बरोबर यायची इच्छा होती. आपली इच्छा त्यांनी एका गृहस्थांच्या मार्फत 'श्रीं'च्या कानावर घातली. 'श्री' गंमतीने म्हणाले, तिथे कांही वेणीदान नाही(म्हणजे सौ. आईसाहेबांना येण्याची गरज नाही).

सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा झाल्यावर 'श्रीं'ना शारीरिक त्रास होऊ लागला. आश्रमाचे विश्वस्त 'श्रीं'चे आप्तेष्ट वगैरेंनी एकमताने 'श्रीं'ना आता दौऱ्यावर बाहेरगांवी जाण्यास मनाई करायचे ठरवले. 'श्रीं'बरोबर जसे एक गृहस्थ जात तसे आईसाहेबांबरोबर पुजारीकाकू जात. ज्या दिवशी हा ठराव झाला त्यादिवशी पुजारी काकू नेहमीप्रमाणे दर्शन, नमस्कार करायला आल्या. 'श्री' मिस्किलपणे

हंसत म्हणाले, ''आमचा तर प्रवास आता बंद होणार आहे, तुमचं बघा---''अप्रत्यक्षपणे आईसाहेबांना हा संदेश होता पण तो असा विनोदी प्रसंगाने दिला.

१९८५ साली पश्चिमेच्या यात्रेचे आयोजन श्री शुक्लाजींनी केले ते दिवस नेमके परिक्षांचे होते. बरं ती यात्रा मर्यादित संख्येने करणे आवश्यक होते. त्यामुळे जे 'श्रीं' चे अनुग्रहित यात्रेला गेले होते त्यांच्या पत्नींना जाता आले नाही. त्या सर्वांनी 'श्रीं'ची यात्रेला जाऊन आल्यावर भेट झाली तेव्हां, त्यांना यायला न मिळाल्याची खंत व्यक्त केली. त्यावर 'श्री' त्यांना म्हणाले, **''अहो, खरी यात्रा तुम्हालाच घडली. तुम्हाला घरी राहून सतत आम्ही गेलेल्या तीर्थक्षेत्रांचे स्मरण घडले. ते प्रत्यक्ष यात्रेला जाऊन येण्या इतकेच पुण्यप्रद आहे. तेव्हां तुम्हाला खंत करायचे कारण नाही.''**

'श्री' जेव्हां १९७८ साली प्रथम घरी आले तेव्हां सहाजिकच किती आनंद झाला असेल याची प्रत्येकाला कल्पना आहेच. ते दुपारी १२ च्या सुमारास आले . वाटलं आता संध्याकाळी परत जाईपयंत फक्त आपल्याकरताच त्यांनी वेळ ठेवला आहे. 'श्री' सर्वांचेच आहेत हे या प्रसंगातून 'श्रीं'नी शिकवले. आल्यावर थोडावेळ ते बोलत बसले . नंतर म्हणाले,तुम्ही जेवून घ्या, आम्ही विश्रांती घेतो. म्हटलं, चला 'श्रीं'ची विश्रांती झाली की बोलत बसता येईल. 'श्रीं'च्या आज्ञेप्रमाणे आम्ही जेवून घेतले व 'श्रीं'ची झोपमोड होऊ नये म्हणून दार बंद करुन गॅलरीत बसलो.

चार वाजण्याच्या सुमारास दोघे जण आमचा पत्ता शोधत आले. त्यांच्या येण्याचे कारण समजल्यावर मी उडालोच. ते 'श्रीं'ना घरी नेण्याकरता आले होते. त्यांना कसे समजले, 'श्री' आमच्याकडे आलेत? असे विचारल्यावर त्यांनी सांगितले 'श्रीं'नीच त्यांना पत्राने आजचा कार्यक्रम कळवला होता. 'श्रीं'ची विश्रांती झाल्यावर त्यांना फार वेळ बसवून घेण्यात अर्थ नव्हता. कारण त्यांना या दोघांच्या घरी जाऊन रात्री उशीर होण्यापूर्वी मुक्कामाच्या घरी परत यायचे होते. आलेल्यांपैकी एक होते दादरचे श्री काकडे व दुसरे होते मुलुंडचे श्री हातकमकर आमच्याकडून श्री काकडेंच्या घरी गेले व तिथून मुलुंडला श्री हातकमकरांच्याकडे गेले.

श्री नागले यांच्या गोरेगांवच्या घरी १९८० साली प्रथम आले तेव्हां येऊन स्नान संध्या वगैरे सर्व आटोपल्यावर त्यांनी श्री नागल्यांना विचारले, ''नीलाताईंची कन्या सौ आशाइथेच कुठे राहाते ना? तिला व नीलाताईंना आम्ही इथे आलो आहोत हे कळवा.'' त्या प्रमाणे नागलेंनी सौ.आशाचा फोन नंबर, पत्ता शोधून काढला व तिच्याशी संपर्क साधला. थोडक्यात, आपण सर्व एकाच गुरुंचे अनुग्रहित आहोत. आपण एकमेकांच्या संपर्कात कसे राहावे हे ते निरनिराळ्या प्रसंगातून शिकवत असत. श्रीं प्रत्येकाशी अत्यंत आत्मीयतेने वागत. त्या त्या भक्ताला प्रसंगाने लक्षात ठेवून बोलवित असत.

श्री श्रीपादवल्लभांचे लीला क्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या कुरवपूर येथे १९८७ च्या अखेरीस 'श्रीं'चा श्रीमत भागवत् सप्ताह झाला. कुरवपूर हे अतिशय दुर्गम स्थान आहे. तिथे एक मंदिर व त्यात राहाणाऱ्या पुजाऱ्याचे कुटुंब सोडले तर कांहीच नाही. काड्या पेटी जरी आणायची म्हटली तरी रायचूर किंवा यापलदिन्नी वगैरे ठिकाणी जावे लागते. स्थानिक मनुष्यबळ तर मुळीच नाही. अशात जवळ जवळ २०० मंडळी त्या सप्ताहाला गेली होती.

अशा स्थानात गेल्यावर आलेल्या इतक्या लोकांना सकाळच्या चहापाण्यापासून ते रात्रीच्या जेवण्यापर्यंतची व्यवस्था कोण करणार? प्रत्येकजण हा सहाजिकच आपापली उपासना कशी करता येईल याचा विचार करीत होता व ते सहाजिकच आहे. वरील कामे करण्यास कोणालाच वेळ नव्हता. दुपारी निरुपण असायचे. मग चहा पाण्याचे कोण पहाणार, स्वैंपाक कोण करणार, पंगती कोण वाढणार वगैरे प्रश्न निर्माण झाले. तिघा चौघांनी ठरवले आपण कोणत्याही उपासना करण्याच्या फंदात न पडता अत्यंत आवश्यक अशी जी कामे आहेत ती करायची व समस्या सोडवायची. जर हे केले नाही एकमेकांवर ढकलत बसलो, संबधितांना दोष देत स्वस्थ बसलो तर 'श्रीं' चे नांव खराब होईल. श्रीदत्तमहाराज आले होते तेव्हां व्यवस्थेचा सगळा सावळा गोंधळ होता. हे मात्र चिरकाल सर्वत्र पसरुन राहील. उलट 'श्रीं'नी आपल्याला इतक्या लोकांची सेवा करायची संधी दिली. जी एरव्ही मिळत नाही. असा विचार करुन सर्व कामे केली. तुझ्या भजकांची सेवा करो कर। हाची वर --- असे मोठे महाराज एका पदात म्हणतातच आहेत.

रोज रात्री झोपण्यापूर्वी 'श्रीं'ना नमस्कार करायला गेल्यावर 'श्री' इतर सर्वांना पोथी वाचन झाले का, प्रदक्षिणा झाल्या का, वगैरे विचारत. आम्हाला मात्र म्हणत,काय नुसती सेवाच करताहात की स्वतःच्या खाण्यापिण्याकडे लक्ष देताय. चहा, नाश्ता वगैरे करत जावा. थोडक्यात आम्हाला त्यांनीच प्रेरणा देऊन ही वेळ निभावून नेली व प्रसंगानुरुप वैय्यक्तिक उपासनेला अग्रक्रम न देता सेवा कार्याला कसा द्यायचा हे शिकवले. हे माझे काम नाही, मला कुठे कोणी सांगितलय? त्यांना व्यवस्था करायला काय होते, वगैरे विकल्प मनांत आणायचे नाहीत. काम करुन मोकळे व्हायचे.

कुरवपूरला जायचे ठरले. तिथे कोणतीच सामान्य वस्तू मिळण्याची सोय नाही. यात्रासुद्धा अवघड आहे वगैरे ऐकले होते. म्हणून ती यात्रा निर्विघ्नपणे पार पडण्याकरता 'श्रीं'ना प्रार्थना केली. 'श्रीं'नी सांगितले, आपण निर्धाराने निघाल्यावर देव सर्व व्यवस्था करतातच. अशा स्थानांत गेल्यावर जेवण व झोपेचा वेळ वगळता तन मन धनाने होईल तेवढी देवाची सेवा करावी. या साध्या प्रसंगातून 'श्रीं'नी कायम स्वरुपी मार्गदर्शन केले आहे. जे कोणालाही कोणत्याही तीर्थक्षेत्रात गेल्यावर उपयोगी पडेल.

समोरच्या माणसाला भेटल्यापासून तो मूळचा कोणत्याही प्रवृत्तीचा असला तरी त्याला ते सज्जन म्हणूनच वागवत. त्याच्यावर कोणत्या तरी प्रसंगाने सेवा कार्यात सहभागी करुन स्थूलमानाने कां होईना विश्वास टाकत. त्यामुळे त्या माणसाला लाजेकाजेस्तव कां असेना सुरवातीला सज्जनपणे वागावे लागे. पुढे जर त्याला 'श्रीं'चा सहवास मिळत राहिला तर 'श्री' त्याच्यात आंतरिक बदल घडवून आणत आणि तो खरोखरच सज्जन होत असे.

अध्यात्म, परमार्थ,भक्ती व व्यवहार याची त्यांनी कधी गल्लत होऊ दिली नाही. आपल्या प्रिय दैवताप्रमाणे (भगवान श्रीकृष्णांप्रमाणे) त्यांची नीती असे. एकदा एक वृद्ध दांपत्य श्रीवासुदेव निवासमध्ये आले व 'श्रीं'ना त्या गृहस्थांनी विचारले, मी श्रीगुरुचरित्राचे पारायण करु का? 'श्रीं'नी त्याचे कारण विचारल्यावर ते गृहस्थ म्हणाले, आमचा मुलगा आम्हाला मारहाण करतो वगैरे. 'श्री' तत्काल म्हणाले, मग त्याला पोलीसात द्या. चौकीत गेल्यावर त्याने एकदा

पोलीसांच्या हातचा मार खाल्ला की सरळ होईल. तुमच्या भावनेचा तो गैरफायदा घेतोय.

एकदा 'श्री' वाडीत असताना घडलेला प्रसंग. मिरजच्या एक परिचिताचा मुलगा संध्याकाळी 'श्रीं'कडे येऊन म्हणाला त्याची आई अत्यवस्थ झाली असून डॉ.नी तिला तत्काल आय सी यू मध्ये हालवायला सांगितले आहे. 'श्रीं'ची कृपा असावी. एवढे सांगून त्याने बैठकीला बसायची इच्छा व्यक्त केली. 'श्रीं'नी त्याला स्पष्ट सांगितले. ती वेळ साधनेला बसायची नसून आईला तत्काल आवश्यक ती वैद्यकीय मदत देण्याची आहे. तेव्हा त्याने ताबडतोब मिरजेला परत जावे व आईला बरे वाटल्याचे येऊन सांगावे(श्रीगुरुचरित्र अध्याय १४ वा).

एका दसऱ्याच्या दिवशी श्रीवासुदेव निवासात आम्ही दर्शनाला रांगेत उभे होतो. आमच्या पुढे स्टेट बँकेत काम करणारे एक गृहस्थ होते. त्यांनी 'श्रीं' ना सांगितले, मी बँकेत काम करतो. दिवाळी दसऱ्यासारख्या सणासुदीला आम्हाला-स्टाफला-कांही ना कांही तरी वस्तु किंवा रोख पैसे पाकिटात घालून देतात. माझ्याबरोबर काम करणारे लोक हे घ्यायला उत्सुक असतात. माझी पंचाईत होते. अशा वेळी मी काय करावे? 'श्री' त्यांना म्हणाले, तुम्हाला जर त्याचा मोह नसेल तर दिलेल्या वस्तूला स्पर्शसुद्धा करु नका. तुमच्या बरोबर काम करणाऱ्या ज्या लोकांना त्यांचा मोह आहे त्यांना ते वाटून किंवा स्वतः काय हवे ते घेऊ द्या.

पण त्याच 'श्रीं'नी शासकीय कार्यालयात लांच मागत असेल व आपण दिली नाही तर अडवणुक करणार असेल तर त्याची इच्छा पूर्ण करायला सांगत. कारण त्यामुळे आपले काम अडत असे.

१९८६ साली श्रीवामननिवासचे उद्घाटन व प.पू.श्रीगुरुमहाराजांची जन्मशताब्दी मोठ्या प्रमाणावर साजरी होणार होती. एक वर्षभर आधी 'श्री' मुंबईकरांना या कार्यक्रमात सहभागी होण्याकरता ८-१० दिवसांची रजा शिल्लक ठेवण्याची सूचना देत होते. एका गृहस्थाच्या मनांत मात्र काय विकल्प आला कोणास ठाऊक. 'श्रीं'ची इच्छा असूनही ह्या गृहस्थांना त्या कार्यक्रमांना पुण्यात जाऊन राहाण्याची इच्छा नव्हती. आपल्याला 'श्रीं'नी लगेच परत जायची

परवानगी दिली तर बरे असे त्यांना वाटत होते. 'श्रीं'नी त्यांची इच्छा लगेच पूर्ण केली. पहिल्याच दिवशी गेल्यावर नमस्कार करतानाच 'श्री' म्हणाले, तुम्हाला प्रसाद घेऊन निघायला हरकत नाही.

'श्रीं'ची आचारधर्मावर जोर द्यायची पद्धत व्यक्ती व्यक्तीवर अवलंबून असे. जो आचारनिष्ठ असेल त्यालाच ते तशा सूचना करीत. श्रीवासुदेव निवासात प्रथमच मुक्कामाला गेलो. 'श्री' कांही आश्रमात राहात नसत. संध्याकाळी सहा नंतर ते घरी जात. तसे ते जायला निघाले जाताना एवढेच म्हणाले, संध्यावंदन करुन घ्या. वास्तविक मी रोज न चुकता संध्या करतो. तरीही त्यांनी ही सूचना देऊन शिक्का मोर्तब केले असावे.

तसेच एकदा पुण्याला त्यांचे दर्शन घेऊन दुसऱ्या दिवशी सकाळच्या बसने कोकणात जायचे होते. 'श्रीं'नी घरी जाताना सूचना केली, ''उद्या सकाळी इथे पोहे वगैरे कांही खाऊन जा.'' संध्याकाळी घरी पोहोचेपर्यंत वाटेत कांही खायला मिळणार नाही. वास्तविक दर दीड दोन तासांनी एस टी बस थांबते, चहापाण्याला वेळ मिळतो. चालक वाहकांना जेवण्यासाठी जास्त वेळ थांबते. तेव्हा वाटेत खायला मिळणार नाही असे होऊच शकत नाही. पण वाटेत बाहेरचे कांही खाऊ नये ही सूचना त्यांनी अशी खुबीदारपणे केली.

१९८७ च्या डिसेंबर अखेर 'श्रीं'चा कुरवपूरमध्ये श्रीभागवत सप्ताह ठरला. तिथे कडाक्याची थंडी असते. मुंबई पुण्याकडच्या लोकांना ती सहन होण्यासारखी नव्हती. 'श्रीं'च्या एका भक्त भगिनींनी 'श्रीं'ना स्वेटर बरोबर द्यायची इच्छा व्यक्त केली . 'श्रीं'नी त्यांना स्वतःला स्वेटर न शिवता श्रीगोपालकृष्णांना (मूर्ती) स्वेटर शिवण्यास सांगितले. त्या प्रमाणे त्या भगिनींनी केल्यावर तो सप्ताह होण्यापूर्वी पडलेली कडाक्याची थंडी एकदम गायब व संपूर्ण सप्ताह कोणालाही थंडीचा त्रास न होता पार पडला. सर्वांनी हा चमत्कार अनुभवला पण तो नेमका कसा घडला हे मात्र शेवटपर्यंत कोणालाच समजले नाही.

कुरवपूरचा एक प्रसंग. कुरवपूर हे बेट असल्याने तिथे कांही प्रवास पाण्यातून चालत तर कांही थोडा नावेतून करावा लागायचा. परत येताना 'श्री' किनाऱ्यावर नावेकरता येऊन थांबले. पण नेमके पाणी ओसरल्याने नाव किनाऱ्याजवळ येऊ

शकत नव्हती आणि नावेपर्यंत जाण शक्य नव्हते कारण खूप चिखल होता. त्यामुळे 'श्रीं'ना उचलून जरी न्यायचे म्हटले तरी शक्य नव्हते. तेव्हां काय करावे अशा विचारात संयोजक होते. कदाचित श्रीकृष्णामाईला 'श्रीं'च्या चरणाला स्पर्श करुन पावन व्हायचे असेल. त्यामुळे बाकीची मंडळी विचारात पडली असता पहाता पहाता पाणी किनाऱ्यापर्यंत कधी आले समजलेच नाही. लांब उभे राहून हे सर्व सहज पहाणाऱ्या मुंबईच्या एका भक्ताच्या ते लक्षात आले व त्याने ते संयोजकाच्या निदर्शनास आणून दिले व नंतर 'श्रीं'ना नावेत बसवण्यात आले. 'श्रीं'च्या नावेबरोबर कृष्णामाईनेही प्रयाण केले व प्रवाह पूर्ववत् झाला.

'श्री' कोणाकडेही मुक्कामाला गेल्यावर यजमानांची सोय प्रथम पाहात असत. १९८१ मध्ये प.पू.धुंडिराजांच्या व श्री दत्तात्रेयांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा देऊळगांवराजातल्या समाधि मंदिरात होणार होती. तो सर्व सोहळा सुरवातीपासून पहायला मिळावा म्हणून आम्ही तिकडे चार दिवस आधीच गेलो.पण 'श्रीं'चा हा दृष्टीकोन आम्हाला प्रथमच या प्रसंगाने समजला. आमच्यामुळे तिथे कोणाची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांनी गेल्या गेल्या आम्हाला औंढ्या नागनाथ,परळी वैजनाथ व श्रीघृष्णेश्वराचे दर्शन घेऊन प्रत्यक्ष प्राणप्रतिष्ठेच्या दिवशी देऊळगांवराजाला येण्यास सांगितले. दोन्ही गोष्टी साध्य झाल्या.एक तर आम्हाला 'श्रीं'च्या आज्ञेने या ज्योतिर्लिंगांचे दर्शन झाल्याचे समाधान व दुसरे म्हणजे तिथल्या यंत्रणेवर तेवढाच ताण कमी.

'श्रीं'ना कोणीही कितीही भारी वस्त्र दिले की त्यांना प्रथम देवांची आठवण होई. मग त्या वाडीच्या मनोहर पादुका असो किंवा अन्य कोणती मूर्ती असो. मिळालेले वस्त्र ते अशा देवतांना देत.

मुंबईच्या एका गृहस्थांना ॲरिअर्स मिळाले. त्यांनी कांही रक्कम 'श्रीं'ना मनी ऑर्डरने पाठवली. त्यांचा हेतु, 'श्रीं'नी स्वतःकरता त्या रकमेचा विनियोग करावा. म्हणून इतर कांहीच लिहिले नाही. 'श्रीं'नी पैसे मिळताच या गृहस्थांना पत्र पाठवून विचारणा केली, मनी ऑर्डर मिळाली पण त्याचा विनियोग (आश्रमाला देणगी द्यायची आहे की आश्रमातल्या पादुकांवर अभिषेक करायचाय इ.)काय करायचा हे लिहिलेले नाही. तेव्हां ते कृपया कळवावे.

भगवतीस्वरुप ताईमहाराजांना 'श्रीं'च्या वास्तुचा विस्तार करुन (आणखी कांही खोल्या वाढवून) सर्व कुटुंबियांची एकत्र रहाण्याची सोय करायची इच्छा होती पण 'श्री' त्यांना मान्यता देत नव्हते. ते म्हणायचे सुरवातीला वर्तक वाड्यात राहाताना त्यांची एकच खोली होती. पुढे दुसरी मिळाली. मग तिसरीही मिळाली. झाली सोय झाली. पुढे श्रीगुरुमहाराजांनी स्वत: बरोबर येऊन या वास्तुचे एका दसऱ्याच्या दिवशी भूमीपूजन केले. आणखी किती पाहिजे? जागा काय कितीही मिळाली तरी ती अपुरीच वाटते. समाधान महत्वाचे आहे.

आमच्या अगदीच दोन लहान खोल्या पण एका गृहस्थांकडच्या कार्याला उपस्थित राहाण्याच्या निमित्ताने ते आमच्याकडे मुक्कामाला आले. त्यांना जेव्हां लहान जागेमुळे त्यांची नीट सोय झाली नाही म्हणून दिलगिरी व्यक्त केली तेव्हां ते सहज म्हणाले,जागा लहान असली तरी हरकत नाही. मन मोठे असले म्हणजे झाले.

एकदा श्री अशोकमहाराज लहानपणी शाळेत असताना किरकोळ गोष्टीवरुन आईसाहेबांवर रागावले. पण 'श्रीं'नी त्यांना फार वेगळ्या पातळीवर कायमचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले,''आपण कुठून आलो हे आपल्याला माहीत नाही. कुठे जाणार हे माहीत नाही. हा मधला एक प्रवास आहे. या प्रवासापुरते एकत्र आलेले आपण प्रवासी आहोत. प्रवास संपला की उतरुन जायचे. मग हे असे रागावून तो प्रवास दु:खी कां करुन घ्यायचा?''

एका पाद्य पूजेच्या निमित्ताने प्रसादाला आश्रमात यायचे एक आश्रमप्रेमी श्री मोघ्यांना आमंत्रण द्यायला 'श्रीं'नी ज्यांना सांगितले होते त्यांना कामाच्या रगाड्यात ते लक्षात राहिले नाही. इतरही कोणाच्या लक्षात आले नाही. पाद्यपूजा होऊन लोक प्रसादाला बसले. 'श्री' जेव्हां त्यांच्या पानावर येऊन बसले तेव्हां ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. आता लोक तर पंगतीत येऊन बसले होते व भोजनास सुरवात होणार होती. अशा प्रसंगी करणार काय? 'श्रीं'कडे प्रत्येक समस्येला तोडगा होता.

त्यांनी पाहिले सगळे जेवायला बसायला उद्युक्त आहेत व 'श्री' आपोशन घ्यायची वाट पहात आहेत. 'श्रीं'नी चित्रावती घालून आपोशन घेण्याकरता

आचमन घेण्याकरता पाणी घेताच सगळ्या पंगतीने त्यांचे अनुकरण केले व 'श्री' आचमन करताहेत की नाही हे न पहाता(किंवा 'श्रीं'नी त्यांच्यावर मायेचे आवरण सोडले असेल म्हणून म्हणा) पटकन आचमन करुन जेवायला सुरवात केली. 'श्रीं'नी हातात घेतलेले पाणी पटकन खाली टाकले व उठून ते ऑफिसात आले व आश्रमाच्या सेवेकऱ्यांपैकी कोणाला तर पटकन रिक्षाने जाऊन मोघ्यांना आणायला पाठवले व मोघे आल्यावर त्यांच्याबरोबर जेवायला बसले.

'श्रीं' प्रत्येक गोष्ट वेळच्या वेळी करीत असत व त्यांना प्रत्येक गोष्ट करायला वेळ मिळत असे. एकदा जालन्याच्या मुक्कामात सकाळी त्यांनी त्यांचे स्नानाचे पाणी तापवायला सांगितले. त्याप्रमाणे गॅसवर पाणी ठेवले. तेवढ्यात पुण्यातील तत्कालीन एक प्रतिष्ठीत व्यक्ती 'श्रीं'शी कांही विचार विनिमय करायला येऊन बसली. पाणी दहा मिनिटात तापले. आता 'श्रीं'ना त्या व्यक्तीकडे व त्यांच्या चर्चेचा विषय पाहून स्नानाला उठा म्हणायचे की नाही असा संभ्रम पडला. थोड्या वेळाने त्यांनीच विचारले, पाणी तापले का? म्हटलं, केव्हांच तापले पण आपल्या चर्चेत व्यत्यय कसा आणायचा असा प्रश्न पडला. त्यावर ते म्हणाले, हे चालतच राहाणार. आपण आपली कामे वेळच्या वेळी करायची. त्या गृहस्थांनी इतक्या लवकर येऊन 'श्रीं'चा वेळ घ्यायला नको होता. 'श्रीं'चे आन्हिक वगैरे झाल्यावर यायला हरकत नव्हती.

'श्रीं'नी देहबुद्धि नष्ट केल्याची उदाहरणे अधून मधून पहायला मिळायची. वाराणशीतल्या मुक्कामात एकदा ते एका खिडकीखाली बसले होते. त्या खिडकीची दारे आंतल्या बाजूने उघडणारी होती. बाहेरुन 'श्रीं'चे दर्शन घेणाऱ्या कोणी तरी ते दार उघडले होते व नंतर उठताना 'श्रीं'ना ते माहीत नसल्याने अत्यंत जोरात लागले. पण 'श्रीं'च्या चेहऱ्यावरची रेष हालली नाही. कल्याणला असेच एका गृहस्थांकडे बाथरुमचा नळ उठताना जोरात लागला. जेव्हां तिथे खोक पडून रक्त येऊ लागले, तेव्हां यजमानांच्या लक्षात आले काय झालय ते.

एकदा एक मुलगा 'श्रीं'बरोबर श्रीनारायणस्वामींच्या उत्सवाला 'श्रीं'बरोबर वाडीला आला. परत निघताना त्याने 'श्रीं'ना तो एक स्पर्धा परिक्षेला बसणार असून 'श्रीं'चे आशीर्वाद मागितले. 'श्री' तेव्हा म्हणाले, तुम्हाला जर परिक्षेला

बसायचे होते तर इथे यायचेच नाही. आलात ते आलात येताना अभ्यासाची पुस्तके कां आणली नाहीत? इथल्या मुक्कामात ती वाचता आली असती. तुम्ही कांही २४ तास देवाची सेवा करत नव्हतात. पारायण वगैरे झाल्यावर परिक्षेचा अभ्यास करता आला असता.

१९९५ मध्ये जालन्यातील श्रीदत्ताश्रमात श्रीदत्तयाग झाला. त्यानिमित्ताने 'श्री' सहकुटुंब सहपरिवार जालन्याला आले. निघण्यापूर्वी 'श्रीं'नी सौ आईसाहेबांना आपणहोऊन सांगितले, ''सौ.सविताविहिनींचे माहेर(कळंब) जालन्याहून जवळ आहे. श्रीदत्तयागाचा कार्यक्रम झाल्यावर सौ. आईसाहेबांनी सौ.सविताविहिनींना माहेरी जाऊन मग पुण्याला परतण्यास सांगावे.'' सौ.सविताविहिनींनी विचारण्याची 'श्रीं'नी वाट पाहिली नाही. अशा तऱ्हेने श्रीं नेहमीच दुसऱ्याचा विचार करीत असत.

मुंबईचे एक गृहस्थ वारंवार 'श्रीं'ना विचारायचे, ''महाराज,मला नोकरी सोडायची परवानगी द्या. माझी आपली सेवा करायची इच्छा आहे.'' 'श्री' त्यांना प्रत्येक वेळी सांगायचे, तुमची मुले अजून मोठी व्हायची आहेत. तुमच्या सांसारिक जबाबदाऱ्या अजून संपल्या नाहीत. त्या पूर्ण व्हायला पाहिजेत इ. तरी त्या गृहस्थांचे विचारणे चालूच असे. एकदा ते गृहस्थ 'श्रीं'चा पिच्छा पुरवून गेले. ते गेल्यावर 'श्री' सहज बोलून गेले, ज्याला खरोखरच सेवा करायची आहे तो नोकरी सोडून येऊन विचारील, ''काय सेवा करु सांगा.'' असे विचारत बसणार नाही.असे विचारणे म्हणजे आम्हाला ओलीस ठेवण्यासारखे आहे.

आम्ही पाच सहा गुरुबंधू कुरवपूरला गेलो होतो. मुख्य मंदिरापासून सुमारे दीड दोन किलो मीटर अंतरावर एका खडकावर श्रीपादवल्लभांच्या शरीराचे व त्रिशूळाचे ठरो उगटले आहेत. श्रीपाद श्रीवल्लभ सूर्य नमस्कार घालीत तेंव्हा ते उमटले आहेत असे सांगितले जाते. आम्हा तीन गुरुबंधूंना त्या खडकावर जाऊन तिथे घोरात् कष्टात्---स्तोत्राचे पाठ करण्याची इच्छा झाली. कुरवपूर हे बेट आहे. त्याच्या बाजूंनी कृष्णामाई अनेक धारांनी वाहाते. त्या प्रवाहात मोठ मोठ्या शिळा व खडक आहेत. त्यामुळे तिथे नांव चालत नाही. कुठेही जायचे म्हटले तर पाण्यातून चालतच जावे लागते. पाण्याची खोली ठिकठिकाणी बदलते.

आम्ही दुपारी ३ च्या सुमारास त्या स्थानावर पोहोचलो. घोरात् कष्टात--चे पाठ झाले. ५॥ च्या सुमारास काळोख पडायला सुरवात झाली. तेव्हां आम्ही भानावर आलो व तो पर्यंत आमची संकल्पित पाठ संख्याही पूर्ण झाली होती. आजूबाजूला पहातो तो काय पाणीच पाणी भरलेले. खडक कुठेच दिसेनात. आम्हाला कांही समजेच ना हा काय प्रकार आह तो. हे पाणी कुठून आले व हे खडक कसे त्यात बुडाले? दूर मुख्य मंदिराच्या शिखरावरचा दिवा लागलेला दिसू लागला. पण करणार काय? मदत करु शकेल-रस्ता दाखवू शकेल असे तिथे कोणीही नव्हते. चीट पाखरु नव्हते तर माणसाचा प्रश्नच येत नव्हता.नीरव शांतता. भयावह नव्हते पण मनांत अधीरता होती, ''आता पुढे काय?'' या विचारात असताना काळोख गडद होत चालला होता. कांही तरी प्रयत्न करायचा म्हणून आम्ही दूर दिसणाऱ्या मंदिराच्या दिशेने जाण्यास सुरवात केली. पण पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने कुठे खोल पाण्यात जाऊ लागलो तर कुठे बुडालेला खडक न दिसून त्याच्यावर आपटून गुडघे फुटायची वेळ आली. थांबलो. काय करायचे सुचत नव्हते. एवढ्यात मंदिराच्या जवळच्या किनाऱ्यावरुन पुजारी श्रीपादभटजी आवाज देत आहेत असे दिसले. पाण्याच्या खळखळाटाशिवाय व मंद वाऱ्याच्या झुळूकी शिवाय कसलाच आवाज नव्हता. हळू हळू श्रीपादभटजी आम्हाला कोणत्या बाजूने पाण्यातून यायचे हे सांगताहेत असे लक्षात आल व त्याप्रमाणे आम्ही मंदिराच्या दिशेने पुढे जाऊ लागलो. जसे जसे पुढे गेलो तस तसा श्रीपादभटजींचा आवाज स्पष्ट येऊ लागला व आम्ही उत्साहाने पहाता पहाता किनाऱ्याला लागलो.

श्रीपादभटजींनी आम्हाला मंदिराच्या दारात आणून सोडले व ते सहाजिकच त्यांच्या कामाला निघून गेले. आम्हालाही त्यात वावगे कांही वाटले नाही. पण आमच्याबरोबर न आलेल्या गुरुबंधूंच्या दृष्टीने ती विलक्षण गोष्ट होती. आम्हाला पहाताच त्यांचा जीव भांड्यात पडला. त्यानी आम्हाला खोदून खोदून आम्ही कसे आलो हे विचारले. त्यांनाआम्ही श्रीपादभटजींनी रस्ता दाखवल्याप्रमाणे आलो हे सांगितल्यावर त्यांचा विश्वासच बसेना. कारण, जस जसा काळोख होऊ लागला व आम्ही परत आलो नाही, हे जाणवल्यावर त्यांनी श्रीपादभटजींना आम्हाला परत आणण्याची काही तरी व्यवस्था करण्याकरता तगादा लावला

होता. पण श्रीपादभटजी जे मंदिरातल्या त्यांच्या खोलीत बसले होते ते उठायलासुद्धा तयार नव्हते. आमचे गुरुबंधू तर त्यांच्या अंगावर धावून गेले होते पण ते जागचे इंचभर हलले नव्हते. ते सारखे एकच म्हणत होते, ''कशाला काळजी करता, श्रीपाद त्यांना आणतील हो'' इ. आता सगळ्यांच्या लक्षात आले की त्यांचे शब्द खरे झाले आहेत. आम्हाला वाट दाखवणारे साक्षात श्रीपादवल्लभच होते. फक्त श्रीपादभटजीच्या रुपाने येऊन त्यांनी आम्हाला वाचवले होते. नंतर समजले की कृष्णामाईवर वरच्या बाजूला धरण बांधले आहे त्याचे असे पाणी अचानक कधी तरी सोडतात.

'श्रीं'चा भीडस्त स्वभाव लक्षात घेऊन जो त्यांच्या इच्छेला मान देईल तो भाग्यवान नाही. तर स्वतःची इच्छा जर कोणी लादू लागला तर ते एका मर्यादेपर्यंत त्याला तसे न करण्याबद्दल परोपरीने समजावून सांगत. पण तरीही त्याने जर त्याचा हेका कायम ठेवला तर मग मात्र त्याच्या तंत्राप्रमाणे घेत. वाडीला गेल्यावर समोरच्या अमरेश्वरला पायी जाऊन यायचा त्यांचा वर्षानु वर्षाचा प्रघात होता. पायी जाणे हा गुरुसेवेचा तो एक भाग समजत. नाही तर काय ते रिक्षाने जाऊ शकले असते. असो. ही त्यांची भावना माहीत नसलेल्या एका भक्ताने त्यांना एकदा, त्या भक्ताने आणलेल्या कारने जायचा हट्ट धरला. 'श्रीं'नी त्याला परोपरिने समजावून सांगितले तरी तो ऐकायला तयार नाही. शेवटी 'श्री' नी त्यांच्या पद्धतीने रुकार दिला व अमरेश्वरला जाऊन आले. पण कधी नव्हे ते एवढेच म्हणाले, ''आज गुरुदर्शनाचे पुण्य तुमच्या कारला मिळाले.''

Dr दिलीप देशमुख 'श्रीं'चे एक भक्त डॉ. व स्वतःचे हॉस्पिटल असणारे. 'श्री' त्यांच्या घरी गेल्यावर ते डॉ. दवाखाना सोडून 'श्रीं' कडे येत. पुढे 'श्रीं'नी त्यांना प्रेमाने बजावले की 'श्री' तिथेच मुक्कामाला असल्यामुळे 'श्रीं'जवळ येऊन बसण्याची घाई करण्याचे कारण नाही. रात्री निवांतपणे बोलता येईल. त्यांनी त्यांच्या कर्तव्याला प्राधान्य द्यावे. रुग्ण त्यांच्या प्रतिक्षेत असतात, वगैरे.

अशीच कर्तव्याची जाणीव त्यांनी नुकत्याच नोकरीला लागलेल्या एका तरूण भक्ताला करुन दिली होती. गुरुसेवेने भारावून जाऊन हा तरुण इतर कोणाचे अनुकरण करण्याच्या दृष्टीने ऑफिसला दांड्या मारू लागला. 'श्रीं'नी

त्याला समजावले की तो ज्याचे अनुकरण करतोय त्या गृहस्थाचे वरिष्ट त्याने कितीही रजा(सेवाकार्याकरता) घेतली तरी नाराज होत नाहीत. त्याचे तसे नाही. ह्याची मात्र नवीन नोकरी आहे. ती जबाबदारी ओळखून करावी.

त्यांचे वाडीवरचे प्रेम कोणत्या ना कोणत्या तरी प्रसंगाने नेहमी व्यक्त होत असे. एका गुरुद्वादशीच्या उत्सवाच्या निमित्ताने 'श्रीं'चा मुक्काम नेहमीच्या उपाध्यांच्या घरी होता. त्या घराच्या मागे फार प्रचंड विस्तार असलेला अनेक वर्षांचा जुना पिंपळाचा वृक्ष आहे. त्याकडे बोट दाखवून बोलण्याच्या ओघात सहज म्हणाले, पिताजी म्हणत असत या झाडावरचे पक्षी जसे पहाट झाली की चारापाण्याच्या शोधात कुठे कुठे जातात पण संध्याकाळी मात्र परत याच वृक्षावर येऊन बसतात तसे आपले आहे. उद्योग धंद्याच्या निमित्ताने आपण अन्य कोणत्याही गांवी गेलो तरी(निवृत्ती नंतर म्हणा) शेवटी आपल्याला इथेच येऊन राहायचे आहे.

१९९४ साली 'श्री' नेहमीप्रमाणे वाडीला गेले. तिथे त्यांना एक दिवस श्वसनाचा थोडा त्रास झाला. त्यांच्या बरोबरच्या व्यक्तीला सहाजिकच तिच्यावरच्या जबाबदारीची गंभीरपणे जाणीव झाली व त्या व्यक्तीने मुंबई पुण्याला फोन करुन डॉ. व सिलिंडर मागवायचे ठरवले. 'श्रीं'नी त्या व्यक्तीला सांगितले आपण परवा प्रसाद घेऊन निघू. उगीच सगळ्यांना कळवायची गडबड करु नका. म्हणजे एक प्रकारे 'श्रीं'नी ते लवकरच बरे होणार असल्याची ग्वाही दिली होती पण त्या गृहस्थांनी फोनाफोनी करुन सर्वांना कळवले व वैद्यकीय मदत मागवली. ती तर मिळालीच पण त्याचबरोबर 'श्रीं'च्याबद्दल आत्मीयता असणारे 'श्रीं'ना भेटण्याकरता वाडीला गर्दी करु लागले. 'श्रीं'ना फार संकोचल्यासारखे झाले व आपल्याला पहायला लोकांची गर्दी नको, देवाच्या दर्शनाच्या ऐवजी आपले महत्व वाढत चाललेले पाहून त्यांनी त्वरित पुण्याला जायचा निर्णय घेतला. पुढच्या वर्षी वाडीला जाताना त्याच गृहस्थांनी परत 'श्रीं'ना कांही त्रास झाला तर धांवपळ नको म्हणून निघतानाच सिलींडर बरोबर घेतला. 'श्री' कारमध्ये येऊन बसले होते. डिकीत सिलींडर ठेवल्याचा आवाज ऐकून ते डॉ. जोशींना म्हणाले, आम्ही जे वाडीला निघालोय ते सिलींडरच्या भरवशावर नव्हे.

प्रसंगाने हळुवारपणे न दुखवता एखाद्याला ते त्याची चूक दाखवून देत. संतांच्या सेवेत असणाऱ्या मंडळीना संतांची अत्यंत काळजी असल्याने त्यांना संतांच्या भक्तांचा संतांना उपद्रव होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. तसे 'श्रीं'बरोबर असणाऱ्या व्यक्तींना वाटले तर नवल नाही. कांही भक्त या काळजीमुळे दुखावले जाणे स्वाभाविक होते. अशा दुखावलेल्यांपैकी एक जण श्रीरामराव 'श्रीं'बरोबर रांजणगांवच्या श्रीगणपतीच्या दर्शनाला गेले. तिथे भला मोठा उंदीर पाहिल्यावर ते 'श्रीं'ना म्हणाले, महाराज तो गणपतीच्या पुढचा उंदीर बघा कसा धष्टपुष्ट झालाय(सरळ शब्दांत सांगायचे तर माजलाय). 'श्री' तेव्हां कांही बोलले नाहीत. पण नंतर पुढच्या प्रवासात 'श्रीं'नी रामरावांना विचारले, तुम्ही कधी सज्जनगडावर गेला होता का? रामरावांनी होकार दिला. मग 'श्री' म्हणाले, तो मोठा हंडा पाहिलात का? कल्याणस्वामी तो रोज खालच्या गांवातल्या नदीतून पाण्याने भरुन वर आणत असत.

त्यांच्यासारखे प्रेम किंवा आत्मीयता सहजा सहजी कोणाला व्यक्त करता येणार नाही. प्रसंगी एखाद्याकडचा मुक्काम आटोपून परत आल्यावर त्याला लिहिलेल्या पत्रात लिहीत, तुम्हा मंडळींनी आम्हाला इतक्या प्रेमाने वागवले की आम्हाला घरची आठवणसुद्धा होऊ दिली नाहीत.

एकदा जालन्याहून कारने पुण्याला येताना टायर पंक्चर होऊन तो बदलायला लागला. 'श्रीं'ना कांही मिनिटापुरते बाहेर यावे लागले. ते शांतपणे बाहेर येऊन हायवेच्या बाजूला एक चांगला दगड पाहून त्यावर बसले. एका शब्दाने त्यांनी नाराजी व्यक्त केली नाही की कधी होणार काम, किती वेळ थांबावे लागणार म्हणून पृच्छा केली नाही. दुरुस्ती पूर्ण झाल्यावर चालकाने सांगितल्यावर शांतपणे आंत येऊन बसले. पुढचा प्रवास चालू झाला.

त्यांच्या लेखी प्रत्येक जीव हा ईश्वराचा अंशच होता. एका व्यक्तीने एकदा फार भावनाविवश होऊन 'श्रीं'ना म्हटलं आम्ही आपल्यात साक्षात परमेश्वर पहातो. 'हो', 'श्री'ही तितक्याच ऋजुतेने म्हणाले, आम्हीही तुम्हा सर्वांच्यात परमेश्वरच पहात असतो.

डॉ दिलीप देशमुख बाहेरगांवचे एक भक्त 'श्रीं'ना पुण्याला परत जायला त्यांची कार देत असत. नंतर पाठवलेल्या पत्रात 'श्री' आवर्जून त्याच्या कारच्या चालकाचा

कांही ना कांही तरी उल्लेख करीत. उदा. तुमच्या चालकाने इतकी सुंदर गाडी चालवली की आम्हाला जरासुद्धा त्रास झाला नाही. श्रींना सर्वांच्या गुणांचं कौतुक होतं ते अंतःकरणपूर्वक करीत असत. हॉस्पीटलमधील आया, मेट्रन, वॉर्डबॉय या सर्वांचीही चौकशी अतिशय आपुलकीने करीत.

देहभाव पूर्णपणे गेल्यामुळे लहान मोठा हा भेदच त्यांच्या ठिकाणी राहिला नव्हता. चांगदेवांनी पाठवलेल्या कोऱ्या पत्राला उत्तर पाठवायची आज्ञा होताच ज्ञानेश्वरांना पत्र लिहायला वेळ लागला नाही. त्याप्रमाणे एका पहिलीत शिकणाऱ्या बालभक्ताने पत्र पाठवल्यावर त्यालाही 'श्रीं'नी तत्परतेने व अतिशय समर्पक उत्तर पाठवून त्या बालभक्ताचे समाधान केले. पहिलीतल्या मुलीला आपण काय लिहीणार हा प्रश्न त्यांना पडला नाही. ते पत्र नुसते बालिकेलाच नव्हे तर कोणालाही जीवनात मार्गदर्शक ठरणारे आहे.

'श्रीं'नी बडोद्याच्या एका शास्त्रींच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने अत्यंत विद्वत्ताप्रचूर प्रवचने केली होती(कारण श्रोतृवर्ग असेल त्याप्रमाणे ते विषय मांडत व तशी भाषा वापरत). त्या प्रवचनांत 'श्रीं'नी भारतीय तत्वज्ञानातले महत्वाचे सिद्धांत समजावले होते, निरनिराळ्या ग्रंथांतले संदर्भ दिले होते. ते कांही कांही ठिकाणी आकलन होत नव्हते कारण ते सामान्यपणे ऐकायची वेळच येत नाही. बरं ते पुस्तकात छापायचे म्हणजे बिनचूक असणे आवश्यक होते.

'श्रीं'नाच ते विचारुन घ्यावे म्हणून त्यांना प्रार्थना केली. म्हटलं, आपल्याला जेव्हां सवड असेल तेव्हां मला कांही भाग विचारुन घ्यायचाय.आपण सांगाल तेव्हां मी तयार आहे. 'श्रीं'नी मलाच विचारले मला त्याची घाई आहे का? म्हटलं, नाही मग त्यांनी ते लिखाण स्वतःकडे ठेवून नंतर तपासून दिले तर चालेल का, असे मलाच विचारले. काय बोलणार? बरं ते मनापासून माझ्या लिखाणाला सहकार्य देऊ इच्छित होते. कसे नाही म्हणणार? शेवटी त्यांना दिले व म्हटले, जिथे समजलेले नाही तिथे चुकीची फुली मारुन खूण केली आहे. म्हणजे 'श्रीं'नी फक्त तेवढेच तपासावे. संपूर्ण वाचण्यात वेळ घालवायला नको. पण ते हाडाचे शिक्षक होते. त्यांनी पुढच्या आठवड्यात ते लिखाण जेव्हां मला परत केले तेव्हां त्यातला शब्द न शब्द तपासून दिला होता. दयाळु किती तरी

मी सांगू । वाणी होत असे पंगू ।। ही दया दाखवताना त्यांनी समोरच्या जीवाची योग्यता अयोग्यता पाहिली नाही.

१९८२ मध्ये देऊळगांवराजात श्रीदत्तात्रेयांच्या व प.पू.श्री धुंडिराजमहाराजांच्या मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठेच्या दिवशीची गोष्ट. आमची ती देऊळगांवराजाला पहिलीच भेट होती. तिथला भंडाऱ्याचा खाक्या आम्हाला माहीत नव्हता. पण सौ आईसाहेबांच्या तो पक्का लक्षात होता. त्यांनी तेवढ्या गडबडीतही आम्हाला त्यांच्या देऊळगांवराजातल्या घरी सकाळी ११ च्या सुमारास बोलावले व जेवायला दिले. म्हणाल्या, तुम्ही मुंबईची माणसं तुम्हाला इथल्या जेवायच्या वेळा माहीतही नाहीत व मानवणाऱ्याही नाहीत. इथे पहिली पंगत संध्याकाळी ६ वाजता बसते. तुम्हाला तोपर्यंत दम निघणार नाही. तुम्ही आपले चार घास खाऊन घ्या. आम्हाला श्रीपादवल्लभांच्या आईची-सुमतीची आठवण आली. तिने असेच श्राद्धाचे ब्राम्हण जेवण्यापूर्वी अतिथीला भिक्षा घातली होती.

मुलुंडच्या सौ मोहरीरबाई व त्यांच्या गुरुभगिनींनी एक दिवस 'श्रीं'च्या घरी जाऊन दिवसभर सर्व(कामे) सेवा करायचे ठरवून त्याप्रमाणे केले. संध्याकाळी 'श्रीं'ची इच्छा होती आईसाहेबांनी ह्या सुवासिनींचा योग्य तो सत्कार करायची तयारी करावी. म्हणून त्यांनी आईसाहेबांना हांक मारली. त्यांनी सांगण्यापूर्वीच आईसाहेबांनी काय तयारी केली आहे ते सांगितल्यावर 'श्रीं'नी प्रसन्नता व्यक्त केली. ते नेहमी म्हणत, आम्ही सतत दौऱ्यावर असतो. कुलधर्म कुलाचाराच्या आदल्या दिवशी बहुधा येतो. पण मंडळींनी सर्व जय्यत तयारी ठेवलेली असायची. त्यामुळे कधी गडबड गोंधळ उडाला नाही.

'श्रीं'नी ज्या गरजू माणसाला तात्पुरते त्यांच्या घरात राहायला दिले तो कृतघ्न नराधम पुढे ती जागाच बळकावून बसला. 'श्रीं'ना गरज लागल्यावर परत करायला तयार नव्हता. विनवण्या करुनही कांही उपयोग झाला नाही. कांही भक्तांनी वेगळ्या पद्धतीने त्याच्याकडून जागा परत मिळवायचे मार्ग 'श्रीं'ना सुचवले. पण त्यांचा अवलंब करणे 'श्रीं'च्या तत्वात बसारे नव्हते. शेवटी त्यांनी आईसाहेबांना सांगितले, त्यांना (जागा बळकावणाऱ्याला) आपला चौथा मुलगा कां मानत नाही म्हणजे विषय संपेल.

प.पू. श्रीगुरुमहाराजांनी त्यांच्या गुरुंच्या विषयीच्या कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून श्रीवासुदेवनिवास बांधला. 'श्रीं'नी श्रीगुरुमहाराजांच्या अक्षय पुण्यस्मृतीकरता श्रीवामननिवास उभा केला. त्याच्याकरता निधी उभा करण्यासाठी त्यांनी स्वत:च्या वयाची पर्वा न करता महाराष्ट्रभर झंझावती दौरे केले. एका पाठोपाठ एक श्रीमत् भागवत सप्ताह केले. वेळ पडली तर स्वत:चे निवास स्थान किंवा आईसाहेबांचे दागिनेही विकायची त्यांनी तयारी ठेवली होती. त्याप्रसंगाने त्यांनी आईसाहेबांना सांगितले होते हस्तस्य भूषणम् दानम्.

त्यांना एकदा दिल्ली की कुठेतरी जायचे होते. पुण्याहून तिकडे जाणाऱ्या गाड्या दोन प्रकारच्या होत्या. फास्ट व स्लो. 'श्रीं'नी जास्त वेळ घेणारी अशी स्लो गाडी निवडली जी सकाळी व संध्याकाळी प्रवासातल्या कोणत्या तरी स्टेशनवर सुमारे अर्धातास थांबेल. म्हणजे 'श्रीं'ना प्लॅटफॉर्मवर एका बाजूला स्नान संध्या करता येईल.

१९८३ मध्ये काशीहून परत येताना जबलपूरजवळ रेल्वे कोचमध्ये कांही तरी बिघाड झाला व त्यामुळे गाडी सुमारे १२ तास लेट झाली. सकाळी ६ वाजता भुसावळला यायच्या ऐवजी संध्याकाळी ६ वाजता आली. स्नान न झाल्यामुळे 'श्रीं'नी प्रवासात कांहीही खाल्ले नाही. इथे ऑपरेशनल हॉल्ट म्हणून गाडी अर्धातास थांबते. 'श्रीं'नी प्लॅटफॉर्मवरच्या नळाखाली स्नान केले. संध्या केली. मग कांही थोडेसे सेवन केले. पण त्या प्रसंगाने ते म्हणाले, आज आमचे कोणत्या जन्माचे प्रारब्ध आड आले. आमच्या देवाची पूजा राहिली.

प्रत्येक जीवाला आपली सोय महत्वाची वाटत असते, मग ती कोणत्याही बाबतीत असू दे. उदा. प्रत्येकाला वाटतं आपलं ऑफिस जवळ असावं. जेवायला दुपारी घरी येता यावं वगैरे. जर एखाद्याला ही अनुकूलता मिळाली तर त्याला काय वाईट वाटेल? कांही काळ माझे ऑफिस घरापासून १५ मिनिटावर होते. मुंबईत याच्यासारखी भाग्याची गोष्ट नाही. पण कोणत्याही खात्यात कायमचे राहाता येत नाही. कधी ना कधी बदली होतच असते. हा व्यावहारिक जगातला नियम आहे. कालानुरुप माझी बदली घरापासून तासभर अंतरावर असलेल्या खात्यात झाली. माझ्या गुरुबंधूंनी माझ्यावरच्या प्रेमाने 'श्रीं'ना

सांगितले की मला आता लवकर घर सोडावे लागते, संध्याकाळी यायला उशीर होतो, वगैरे. म्हणजे थोडक्यात उपासनेचा वेळ कमी झाला. 'श्रीं'नी सर्व शांतपणे ऐकून घेतले व मला म्हणाले,''तुम्ही राजाभाऊंना ओळखता? ते सकाळी ७ वा. कॉलेजात जाण्याकरता निघतात. पण तो पर्यंत त्यांचा १२०० गायत्री जप व संहितेचे एक पारायण झालेले असते. पहाटे ३॥ वाजता ते उठतात. आता मी कोणत्या तोंडाने म्हणू मला वेळ अपुरा आहे?

कोणत्या ना कोणत्या प्रकारे खुबीदारपणे ते आपली चूक दाखवून देत. आपले ध्येय आधी विचारपूर्वक व निर्धारपूर्वक नक्की करावे व मग त्याप्रमाणे आपली पुढची वाटचाल करावी असे त्यांचे सांगणे असे. मला एका चुकीच्या विचारापासून त्यांनी असेच परावृत्त केले. दीक्षा घेतल्यानंतर जास्तीत जास्त साधना करावी हे माहीत असतानासुद्धा पूर्वसंचिताने मनांत विपरीत विचार आला व आपण अमूक एक कोर्स करावा असे वाटू लागले. 'श्रीं'ना पत्र लिहून परवानगी विचारली. 'श्रीं'नी एवढेच लिहिले, ''जीवनोपयोगी कोणतीही विद्या शिकायला हरकत नाही पण तसे करताना आपण जे स्वेच्छेने स्वीकारले आहे त्याच्याशी प्रतारणा तर होणार नाही ना एवढा विचार करावा.'' तो विचार मी सोडून दिला हे सांगणे नलगे.

श्री पुरोहितांचा अभिजित इंजिनिअरिंगला शिकत असताना त्याला अभ्यासात योग्य ते मार्गदर्शन मिळत नव्हते. याची खंत एक दिवस शीगेला पोहोचून सौ.पुरोहित रात्रभर 'श्रीं'समोर (फोटोसमोर) ठाणच मांडून बसल्या. अभिजितचे वर्ष वाया जायची वेळ आली आणि 'श्री' काय करतायत? दुसऱ्या दिवशी रविवार होता. ते चौघे व आम्ही कांही गुरुबंधू शिरस्त्याप्रमाणे सकाळची इंद्रायणी पकडून पुण्याला जायला निघालो.

सौ. वहिनींच्या इच्छेप्रमाणे मी अभिजितशी कांही अभ्यासाबद्दल बोलणार एवढ्यात आमच्या बाजूला बसलेले एक गृहस्थ आपण होऊन म्हणाले,'मी अभिजितशी बोलू का?'' आम्हाला आनंदच झाला. त्यांच्या व्यक्तीमत्वावरुन व पेहरावावरुन ते कोणी तरी प्रतिष्ठित असावेत हे स्पष्ट होत होते. मग ते दोघे बोलत बसले व आम्ही आमच्या सत्संगात रमलो. पुणे कधी आले समजलेच

नाही. शिवाजीनगर स्टेशनवर उतरल्यावर अभिजितचा चेहरा आनंदी होता. त्याने सांगितले त्या ''सरांनी'' अभिजितचा सहा महिन्याचा अभ्यास सूत्र रुपाने घेतला होता. गोष्ट तिथे संपत नाही. संध्याकाळी परत तेच ''सर'' इंद्रायणीमध्ये आमच्याच डब्यात. आम्हाला पहाताच त्यांनी अभिजितला एका बाजूला घेऊन दादर येईपर्यंत दुसऱ्या सहामाहीचा अभ्यास करुन घेतला. सौ.पुरोहितांच्या डोळ्यात पाणी आले. अभिजितच्या मनावरचे ओझे उतरले.

पण ते ''सर'' होते कोण? बोलण्याच्या ओघात एवढेच समजले की ते सर म्हणजे डॉ.साठे पुण्याचे असून मुंबईच्या एके काळच्या सन्माननीय ' इन्स्टीट्युट ऑफ सायन्स'' मध्ये एका विभागाचे प्रमुख आहेत. गंमत म्हणजे आम्ही अनेक वर्ष इंद्रायणीने पुण्याचा प्रवास केला पण त्या प्रसंगापूर्वी व त्या प्रसंगानंतर डॉ. साठे कधीच आम्हाला दिसलेसुद्धा नाहीत. जर ते खरोखरच पुण्यात राहून मुंबईत नियमित येत होते तर कधी तरी दिसायला हरकत नव्हती. पण कधीच दिसले नाहीत. मग डॉ. साठे कोण होते ?

******

## एका सेवकाच्या डायरीतील टिपणाच्या आधारे

पुणे येथील रहिवासी कु. सरोज गांधी यांना प.पू. श्री गुळवणी महाराजांची कृपा प्राप्त झाली. यांना मोठ्या कठीण आजारातून श्री गुळवणी महाराजांनी बरे केले व नवीन जीवन दिलेले आहे.

यांना एकदा प्रवासात असताना बस अपघात घडून आला व कांही दुखापत झाली. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला आल्या असताना 'श्री' म्हणाले''परमेश्वर पाठीराखा आहे. तो सांभाळतो. गुरुदेवांची कृपा आहे तुमच्यावर.''

--------oooooo--------

एकदा एक भगिनी प.पू.श्री.गुळवणी महाराजांचे कडे आली. त्यांना 'श्री'महाराजांचा अनुग्रह व्हावा अशी त्याची इच्छा होती. 'श्री' महाराज त्यांना म्हणाले''आपण पतीदेवांना घेऊन या.''

त्या प्रमाणे उभयता पती-पत्नी आले. ‘श्री’महाराजांनी त्यांना ‘‘काय इच्छा आहे?’’ असे विचारले. ते गृहस्थ म्हणाले मला मुलगा व्हावा अशी इच्छा आहे.

श्री गुळवणी महाराजांनी त्यांना सांगितले ‘‘आपण आपल्या घरी सत्यनारायणाची पूजा करा व पू.श्री.दत्तमहाराजांना घरी जेवायला बोलावा. त्यांच्या हातून ओटीत नारळ प्रसाद घ्या. म्हणजे तुमची इच्छा पूर्ण होईल.’’

त्या प्रमाणे श्री दत्तमहाराजांकडून प्रसाद प्राप्त झाल्यानंतर एक वर्षातच त्या दंपतीला पुत्रप्राप्ती झाली.

--------oooooo--------

मुलाला इंजिनिअरिंगची पदवी मिळाली(आपल्या इच्छेप्रमाणे) तो आता कमावू लागावा अस वडिलांना वाटणे साहजिक होते. पण कांही कारणाने तो मुलगा कोणत्याही व्यवसायात प्रवेश करण्यास, नोकरी करण्यास उत्सुक नव्हता. काम करायची इच्छाच नव्हती.

एकदा या मुलाचे वडील ‘श्रीं’च्या दर्शनाला आले असताना त्यांनी ही समस्या ‘श्रीं’समोर मांडली. दुपारी ४॥ ची वेळ होती. ‘श्रीं’नी कांहीही सांगितले नाही म्हणून ते गृहस्थ थांबून राहिले. सायंकाळी ६ च्या सुमारास ‘श्री’जायला निघाले. वासुदेव निवासच्या देवघरासमोर आले. तुळजाभवानीला वंदन करुन आता बाहेर जाणार तितक्यात ह्या गृहस्थांकडे वळून ‘श्रीं’नी विचारले‘‘तुमच्या घरी **गणेश स्तोत्र** आहे नां? त्यांनी म्हटले ‘‘हो.आहे.’’

‘श्रीं’नी सांगितले‘‘ते स्तोत्र नित्य वाचत जा, म्हणजे सगळे ठिक होईल.’’

या नंतर दोन महिन्यांनी ते लोक पुन्हा दर्शनाला आले. ‘श्रीं’ना ते सांगत होते ‘‘आमचा मुलगा आता बराच सुधारत आहे. विमान खात्यात इंजिनिअर ची नोकरी करु लागला आहे.’’

--------oooooo--------

सद्गुरु श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या चरित्रात एका प्रसंगी घडलेले वर्णन असे आहे-

''एक स्त्री दर्शनाला श्री स्वामींच्या पुढे आली. तिने नारळ व दक्षिणा अर्पण केली. दक्षिणा ठेवताना तिने चुकून सोन्याचे नाणे ठेवले. ठेवावे असे तिचे मनात नसताना लहान नाण्या ऐवजी ''गिनी'' ठेवली. आता परत उचलून कशी घ्यायची? म्हणून कांहीच न बोलता श्रींस्वामी महाराजांनी दिलेला नारळाचा प्रसाद ओटीत घेउन घरी आली. नंतर प्रसादाचा नारळ फोडून पाहता ती ''गिनी''(सोन्याचे नाणे) नारळातून बाहेर पडली.''

दत्तस्वरुपी महात्म्यांच्या बरोबर सेवेत असताना सेवकाची जर एकादी मौल्यवान चीजवस्तू हरवली तर त्याच्या मनात येते, ''अरे! आपण 'श्रीं'च्या सोबत असताना असे नुकसान कां व्हावे?''

एका भक्ताच्या पत्नीच्या हातात सोन्याच्या पाटल्या होत्या. घराबाहेरील बाजूला थोड्या अंधाराच्या ठिकाणी कापड झटकत असताना त्यांच्या एका हातातील पाटली गळून खाली पडली. शोधाशोध करायचे धाडस झाले नाही कारण अंधाराची भीती वाटत असे.

हा भक्त 'श्रीं'चे सोबत बाहेर गावी गेलेला दुसऱ्या दिवशी परत आला. त्या नंतर पत्नीने झाला प्रकार सांगितला. उरलेली एक पाटली कपाटात ठेवल्याचे सांगितले. या भक्ताला वर म्हटल्याप्रमाणे ''असे कसे झाले?'' असा प्रश्न पडला. त्या विचारातच त्याने ते कपाट उघडले. वरच्या कप्प्यात एक पाटली होती. जी त्यांच्या सौ.ने तेथे ठेवली होती. आणि खालच्या कप्प्यात दुसरीही पाटली होती. हे 'श्रीं'च्या कृपेचे सामर्थ्य आहे हे त्यांना जाणवले. ''श्री दत्तप्रभू'' त्यांच्यावर असा **ठपका ठेवलेला कसा** मान्य करतील?

--------०००००० --------

८२ साली एकदा श्रीमद्भागवताच्या सप्ताहासाठी कळमनूरी येथे जायचे ठरले. जाताना प्रथम देऊळगाव राजाला गेले. तेथून छोटी मिरी येथे गेले. या गावात एका भक्ताकडे मुक्काम झाला. त्यांना दीक्षा दिली. पुढे साखरखेर्डा येथे

जाणे झाले. श्री प्रल्हादमहाराज काळे(श्री गोंदवलेकर महाराजांच्या संप्रदायातील मोठे सत्पुरुष होऊन गेले) यांची पुण्यतिथी साखरखेर्डा येथे केली. व तेथून कळमनूरी मुक्कामी गेले.

श्रीमद् भागवत सप्ताह उत्तम प्रकारे सुरु झाला. तेथील भक्त हौसेखातर 'श्रीं'ना ''सर्वांच्या सह '' तीर्थ स्नानाला चलण्याची गळ घालीत. 'श्रीं'नी त्यांची इच्छा पूर्ण केली. (पण 'श्रीं'ना ताप येत होता. हे लक्षात आल्यावर शक्यतोवर हे स्नान घरीच होऊ लागले).

तेथील वृद्ध मंडळी आठवण सांगत होते की कळमनूरीला प.प.सद्गुरु श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचा ही मुक्काम झालेला होता. एक मंदिराचे प्रवेशद्वार रस्त्याकडच्या बाजूला बदलून घ्यावे म्हणजे येता जाता दर्शन सुलभ होईल अशी सूचना श्री स्वामी महाराजांनी तात्कालिक भक्तांना दिली होती. इत्यादि.

ह्या घटनेचे स्मरण होऊन त्या मंडळींना श्रीदत्तमहाराज म्हणजे सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजच आपल्या गावी पुन्हा आले आहेत असे वाटे.

सप्ताहात अन्नदान मोठ्या प्रमाणावर होत होते.समाप्तीच्या दिवशी एक हजार भक्त प्रसाद घेऊन गेले. स्वयंपाक करणारे आचारी इतके सेवाभावी होते की त्यांनी संपूर्ण सप्ताह काळात केलेल्या कामाचा मोबदला न घेता फक्त 'श्रीं'च्या हस्ते नारळ प्रसाद स्वीकारला. यांची सेवा 'श्रीं'नी मान्य करुन घेतली व इतर अनेक मंडळींना ही गोष्ट कौतुक म्हणून सांगितली. पत्रांमधूनही उल्लेख आलेले कांही भक्तांनी सांगितले.

--------oooooo--------

श्रीदत्त महाराजांच्या बाळपणच्या नांवांपैकी त्यांचे ''वक्रतुंड'' हे ही एक नाव आहे. ते नाव सार्थच आहे. कारण 'श्री'म्हणजे ''गणेशदत्तगुरु'' चे अवतारच आहेत. असे असूनही लोक शिक्षणासाठी त्यांची गणपती दैवताची सगुण भक्ती पाहण्यासारखी होती. प्रवासात असताना मार्गात लागणारे गणपतीचे

स्थानात मुद्दाम गाडी थांबवून गणेश दर्शन करीत. तसेच पूजा-नैवेद्य या साठी द्रव्यसेवाही अर्पण करीत असत. असाच एकदा जालन्याला मुक्काम असताना तेथून जवळ असलेल्या 'राजूर' देवस्थानाला 'श्रीं'नी भेट दिली. तेथे मंदिराला पुष्कळ पायऱ्या चढून जावे लागते. चढताना 'श्रीं'ना दम लागत होता, तरी थांबत-थांबत शेवटपर्यंत गेले. दर्शनाला बरीच गर्दी होती. तथापि तेथील पुजारी मंडळींनी आदराने मंदिरात नेवून दर्शन करविले. त्या क्षणी 'श्रीं' च्या भावावस्थेतील **त्यांचे** दर्शन ही अत्यंत मनोहारी होते. विलक्षण तेज त्यांच्या ठिकाणी जाणवत होते. जणू मूर्तीतील गणेशच बाहेर येऊन उभे असावेत.

जेंव्हा जेंव्हा शक्य होईल तेंव्हा 'श्री' महाराज राजूरला दर्शनाला जात असत.

--------००००००--------

## ''न भजती त्यांही कृपा करिसी''

श्रीवासुदेव निवास आश्रमात येणाऱ्या एका साधक भक्ताच्या नात्यातील एका उपवर कन्येचा हा वृत्तांत आहे. हिचे माता-पिता हिच्या लहान वयातच दिवंगत झाले. नातेवाईकांनी सांभाळ केला. पण ते जीवन तसे कष्टप्रदच आहे. स्थळ पाहण्याचा प्रयत्न नातेवाईक करीत होते. त्यातच एका ज्योतिर्विदाने मुलीची पत्रिका पाहिल्यावर ''या मुलीच्या भावी आयुष्यातही मोठी संकटे येण्याची शक्यता आहे'' असे सांगितले. अशा परिस्थितीत हिचा विवाह करावा की न करावा अशी द्विधा अवस्था नातेवाईकांची झाली होती. त्याच ज्योतिषांने मार्गदर्शन केले ते असे--''या मुलीला श्रीवासुदेवनिवास आश्रमात जाउन रोज दर्शन घेण्यास सांगितले.''व '' 'श्री'महाराजच तिच्यावरील आपदांचे निवारण करतील असे सांगितले.'' ती मुलगी नोकरीच्या वेळा सांभाळून रोज श्रद्धेने आश्रमात दर्शनाला येऊ लागली.

कांही दिवसांनी तिला स्वप्न पडले. स्वप्नात पू.श्री. दत्तमहराजांनी दर्शन देऊन एक जपाची माळ तिच्या हाती दिली व जप करण्यास सांगितले. स्वप्नातच तिने 'श्रीं'चे समोरच जप करायला सुरवात केली. एकेक मणी ओढत असताना

तिच्या लक्षात आले की माळ मधेच तुटलेली असून तेथे गाठ मारली आहे. ती 'श्रीं'ना म्हणाली 'महाराज! ही माळ इथे तुटलेली आहे. त्यावर 'श्री' म्हणाले''असू देत! त्या माळेवरच जप कर. तुझे चांगले होईल.''

'श्रीं'नी त्या कन्येच्या आयुष्यातील संकटांना 'गाठ' घालून सीमित केले. दुर्दैवाची तीव्रता मर्यादित करुन टाकली.

--------oooooo--------

श्री दत्तमहाराजांनी १९९९ मध्ये आपले सगुणरुप विलीन केले. त्याच्या थोडे दिवस आधी कांही भक्तांना 'श्रीं'नी दीक्षा अनुग्रहाचे पत्र दिलेले होते. 'श्रीं'च्या संकल्पाची नित्यता व सत्यता येथे दिसली. दिलेल्या तारखा नंतरच्या होत्या. तरीही दिलेल्या दिवशी त्या त्या भक्तांना 'दीक्षा अनुग्रह' मिळाला व साधना सुरु झाली.

--------oooooo--------

श्रीवासुदेव निवासात 'श्रीं'च्या काळात अनेक गरजू विद्यार्थी-मग त्यांचे शिक्षणाचा कोणताही प्रकार असो-वेदाभ्यास, शास्त्राभ्यास, शाळा, कॉलेज, तसेच इतर पाठशाळांमध्ये शिकणारे ही विद्यार्थी असोत-अशा गरजू विद्यार्थ्यांना उदार अंत:करणाने उत्तेजन देऊन व आश्रमात भोजन व राहण्याची व्यवस्था करुन त्यांच्या विद्याभ्यासाला चालना व प्रोत्साहन श्री दत्तमहाराज देत असत. त्या विद्यार्थ्यांना वरचेवर भेटून चौकशी करुन प्रकृतीस्वास्थ्य वा इतर अडचणी विचारुन त्या दूर करीत असत. प्रसंगोपात्त ही मुले आश्रमातील ''उष्टे काढणे'' इ. सारखी कामे करताना 'श्रीं'च्या तीक्ष्णनिरीक्षणातून सुटत नसे. लगेच सूचना देऊन ''यांना अभ्यास असतो. ही कामे सौ.राधाबाईना सांगावीत''इत्यादि प्रकारे सांभाळीत असत.

'श्री' महाराज रेणुका निवास येथून श्रीवासुदेवनिवास आश्रमात येत असत. परगावाहून ही प्रथम आश्रमात येऊन मग घरी जाणे होई. बाहेर गावी जाण्यासाठीही प्रथम आश्रमात येऊनच पुढे प्रस्थान होत असे.

आश्रमात आल्या बरोबर 'श्री' मनोहर पादुकांचे व भगवती तुळजा भवानीचे दर्शन करुन तीर्थ घेत असत. त्या नंतर थोडा वेळ ऑफिसच्या कामांना देत असत. अतिथी अभ्यागत, राहणारे विद्यार्थी, कार्यालयीन कामकाज, इ.महत्वाच्या गोष्टींवर चर्चा करुन योग्य त्या सूचना देउन मगच बाहेर गादीवर येऊन बसत असत. याच वेळी पत्र वाचन, दर्शनार्थी भक्तांबरोबर आवश्यक ते बोलणे, या सर्व गोष्टी एकाच वेळी सुरु असत. तसेच घरी परत जाताना मुद्दाम देवापुढे येऊन देवदर्शन करुन जणू कांही देवांची परवानगी व आशीर्वाद घेऊनच बाहेत पडत असत. परगावी जातानाही असेच निवेदन करुन जाणे होत असे. एकादे वेळी जर दुसरे दिवशी फार पहाटे गावाला जायला निघणार असतील तर आदल्या दिवशीच निवेदन करुन अनुज्ञा घेऊन ठेवीत असत.

संन्यासी महात्मे, प्रवचनकार, कीर्तनकार अशा अनेकांच्या अडचणी दूर करून, सर्वतोपरी सहाय्य 'श्री'महाराज फार तत्परतेने करीत असत.

प्रवासासाठी विमानाचे किंवा रेल्वेच्या उच्चश्रेणीच्या डब्याचे तिकीट काढायला कदापि परवानगी देत नसत. ''आमच्यासाठी इतका खर्च करु नका''-देव कार्यासाठी ते द्रव्य वापरा'' असे संवंधितांना नेहमी सागणे होई.

--------oooooo--------

श्री गुरुचरित्रात श्रीगुरुभक्त सायंदेव ब्राम्हणाची कथा आहे. यांना श्रीगुरुंनी ''पुत्र पौत्रादि २१ पिढ्या माझी सेवा करतील व भक्तीरत असे जीवन घालवून उद्धार करुन घेतील'' असा आशिर्वाद दिलेला आहे. या सायंदेवांचा नागनाथ नांवाचा पुत्र श्रीगुरुंचा विशेष आवडता व कृपापात्र होता असेही पुढील कथानकात वर्णिलेले आहे. या नागनाथाचे नंतर स्वामी नागनाथ असे नामाभिधान झाले. ते नागनाथ स्वामी शेवटी कर्नाटक प्रांतातील हत्तरवाट नांवाच्या क्षेत्रात स्वेच्छेने समाधिस्थ झाले. त्यांच्या समाधीचे ठिकाणी उत्तम अनुभव येतात व भक्तांवर विविध प्रकारे कृपा होते असे हे स्थान आहे.''तस्मिन् तज्जने भेदाभावात् '' असा सिद्धांत श्री दत्तमहाराजांनीच एके ठिकाणी उद्धृत केला आहे. त्या नुसार श्री.नागनाथ स्वामी व श्री गुरु नृसिंहसरस्वती दत्तप्रभू यांच्यात(तज्जने

भेदाभावात्) कांहीही भेद नाही. या कथनाची प्रत्यक्षता श्री दत्तमहाराजांच्या सह या हत्तरवाट स्थित समाधीमंदिरात गेलेल्या या सेवकाने नोंदली आहे.

श्री नागनाथ स्वामी महाराज स्वेच्छेने समाधिस्थ होऊन शेकडोवर्षे लोटली. एक कुलकर्णी कुटुंब पिढ्यान्‌पिढ्या त्या स्वामींच्या समाधीस्थानात सेवारत आहे. ह्यांच्या अलीकडच्या वंशजांनी श्रीदत्त महाराजांना त्या हत्तरवाट क्षेत्रात येण्याची विनंती केली. त्या प्रमाणे 'श्रीं' चे तेथे जाणे झाले. वेळ भर दुपारची. उन्हाळा तीव्र होता. तशाही वातावरणात श्री दत्त महाराज त्या समाधी समोर भर उन्हात शांत व उन्मनी स्थितीत उभे होते. श्री नागनाथ स्वामींच्या भेटीला प्रत्यक्ष श्रीदत्तप्रभूच समोर येऊन उभे असावे असे भासत होते.

वरुन ऊन, वातावरणातील माशा इ.चा उपद्रव ह्या कशा कशाचाही परिणाम 'श्रीं'च्या देहावर त्या अवस्थेत दिसत नव्हता.

--------००००००--------

प.पू.श्री गुळवणी महाराज यांच्या ''२०नारायणपेठ'' या निवास स्थानी घडलेला प्रसंग आहे.

प.पू.श्री.गुळवणी महाराज अधिकमासात वायन दान व ब्राह्मण भोजन आदि प्रत्येक वेळी करीत असत. एकदा श्री गुळवणी महाराजांनी या कार्यक्रमाची सूचना(भगिनी)आत्याबाईंनाही दिली व त्यांना सांगितले की तुमचे उपाध्याय कोडणीकर आहेत. तेंव्हा त्यांना बोलावून घ्या.

नंतर यथाशास्त्र कार्यक्रम झाला. प.पू.श्री.गुळवणी महाराजांनी प.पू.श्री दत्तमहाराजांना ''वायन'' दान दिले.तसेच आत्याबाईंनी कोडणीकरांना दिले.

भोजनानंतर समोरच्या खोलीत प.पू.गुळवणी महाराज व प.पू.श्री दत्तमहाराज कांही बोलत बसले होते. तेंव्हा अचानक श्री गुळवणी महाराजांनी प.पू.दत्तमहाराजांना त्यांची नजर चुकवून पटकन नमस्कार केला. आत्मीयता व आदर व्यक्त करणारे हे दुर्मिळ दर्शन होते.

--------००००००--------

श्री दिवाकरपंत जोशी हे प.पू. श्री दत्तमहाराजांचे विद्यार्थी आहेत. यांचे बरेच अध्ययन 'श्री' च्या कडे झाले. तसेच 'श्रीं'नी यांना मंत्र अनुग्रह ही दिला. मूळ राहणारे कर्नाटकातील श्री जोशी पुण्याकडे शेवटी स्थायिक झाले. संसार पाशांपासून स्वत:ला बाजूला करुन एकांत साधना एका निवांत स्थळी राहून करु लागले. पण एकदा यांना छातीत दुखायला लागले. त्यामुळे साधन-उपासना यात अडथळा येऊ लागला. साधनेत प्रगती थांबली असे वाटू लागले. याच अवस्थेत त्यांनी मनोमन कळवळून 'श्री' महाराजांची प्रार्थना केली.

थोड्याच काळाने त्यांना स्वप्नात श्री दत्तमहाराजांचे दर्शन झाले. 'श्री' महाराजांनी श्री. जोशी यांना कडकडून मिठी मारली. छातीला छातीचा स्पर्श झाला असे दिसले.

आणि त्या दिवसापासून त्यांचे छातीचे दुखणे पूर्ण बंद झाले. व पूर्ण समाधानात साधनारत असा त्यांचा दिनक्रम पूर्ववत सुरु आहे.

--------०००००० --------

श्री क्षेत्र काशी येथे १९८३ च्या उन्हाळ्यात मे महिन्यात 'श्रीं'चे जाणे झाले. त्या वेळी काशीच्या सांगवेद विद्यालयात मंत्रजागर आयोजित केला गेला. विद्वान् ब्रह्मवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता. मंत्र जागरानिमित्त 'श्रीं'नी सर्व ब्राह्मणांचे पूजन करुन वस्त्र व दक्षिणा आदि अर्पण केली.

त्यानंतर तेथेच एका विद्वत् सभेचे आयोजन झाले. चर्चेसाठी ''काशीक्षेत्रात मृत्यू आला तर मोक्ष मिळतो.'' असा अभिप्राय असलेला श्लोक घेतला होता. तो श्लोक बहुधा असा होता--''काश्यांतु मरणानि मुक्तिः।'' 'श्री' महाराजांनीच प्रथम चर्चेच्या विषयाचे प्रतिपादन केले. नंतर विविध विद्वज्जनांनी मते मांडली. त्या सर्वांना निरुत्तर करीत 'श्री' महाराजांनी जो समारोप केला त्याचा अभिप्राय असा होता--

'काशी' चा अर्थ आत्मा. आत्मा म्हणजे प्रकाश. या प्रकाशाकडे लक्ष केंद्रित करुन विकार व विषय रहित अनन्य चित्ताने काशीमध्ये अनुष्ठान केले तर मोक्ष प्राप्ती होते. इ.

******

# एका भगिनीच्या स्मृतीतून

दीक्षा घेतल्यानंतर जेव्हा पुण्याला जात असू तेव्हां 'श्री'प.पू.महाराज 'वासुदेव निवासा'' मधे पहिल्या मजल्यावर असत. त्यांना नमस्कार केला की 'आलात,या' असे म्हणून त्याची स्निग्ध प्रेमळ नजर पाहिली की प्रवासाचा शीण कुठल्या कुठे पळून जाई. हा प्रेमाचा, आपुलकीचा अनुभव दरवेळेस येत असे हे महत्त्वाचे. मग कुटुंबातील सर्वांची चौकशी तर कधी प्रकृतीची चौकशी, रजा किती, केव्हा जाणार असे मोजके प्रश्नच पण त्यात जिव्हाळा ओतप्रोत भरलेला! सूचक बोलणे, त्यातून मार्गदर्शन! उदा. दुपारची ४ ची गाडी ठाण्याला थांबते वाटते असे उद्गार त्यानी काढले की आपले रिझर्व्हेशन झालेच समजा. ती गाडी आपल्याला घेतल्या शिवाय जाणारच नाही. हा अनुभव दरवेळेला यायचा.

माझ्या हाताला साबणाची अॅलर्जी झाली होती. वैद्याचे औषध सुरु होते पण त्यांनी अॅलर्जीचे कारण सांगितले नव्हते त्यामुळे गुण येत नव्हता. असेच दुपारी वासुदेव निवासात गेले, 'श्री' प.पू.महाराजांचे दर्शन झाले. झाल्यावर तब्येतीची विचारणा केली व लगेच म्हणाले,''हल्ली बरेच लोक होमिओपाथीची औषधे घेतात. गुण येतो म्हणतात;व थांबले . घरी परतत असताना 'श्रीं'च्या आठवणीत रमणे चालले असताना त्यांच्या शब्दांची आठवण झाली व एकदम मी सावध झाले ही सूचना आपल्याला आहे. अर्थातच नंतर होमिओपाथीची औषधे घेऊन माझे दोन्हीही तळहात बरे झाले हे सांगणे नलगे!

पण ह्या सगळ्याचा विचार करताना दोन गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या की एक म्हणजे आज्ञा करायची नाही, सहज बोलल्याप्रमाणे जाता जाता सूचना द्यायची व दुसरी गोष्ट त्यांना सर्वाबद्दल वाटणारी अपरंपार आत्मीयता! एवढा मोठा शिष्यपरिवार-पण सगळ्यांची खडान्खडा माहिती-चौकशी बरोबर करणार.

माझी शाळा पश्चिमेला होती,लांब जावे लागायचे, मुले लहान. धावपळ होत असे. नवरात्रात दर्शनाला घरी गेले तेव्हां 'श्री' ना नमस्कार केल्याबरोबर म्हणाले,''काय, शाळा घराजवळ आली, बरे झाले.'' आमचा शिक्षकी पेशा आड आला. 'नाही महाराज, या वर्षी फक्त प्रायमरी शाळा जाणार आहे. सेकंडरी शाळा शिफ्ट व्हायला अजून वर्ष ,दीड वर्ष लागेल असे काही

दिवसापूर्वीच कळले! 'श्री' काही पुढे बोलले नाहीत. दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर शिक्षकरुम मधे पाऊल टाकताच सर्वांनी माझ्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. ह्या जूनपासूनच आमचीही शाळा तिकडे जाणार होती. माझ्या घरापासून अवघ्या सात मिनिटावर शाळा आली!

ह्या शाळेच्या आधी मी घाटकोपरहून चेंबूरच्या शाळेत जायची. 'श्री' माझ्या दीराजवळ चौकशी करत व म्हणत फार शाळा लांब आहे,दूर जावे लागते. त्या नंतर ठाण्याच्या शाळेत लागले, शाळा पलीकडे होती पण ह्या प्रेमळ माऊलीने माझी शाळा घराजवळ आणून दिली. शाळेची बेल, प्रार्थना घरात ऐकायला येऊ लागली पण त्यामुळे प्रत्येक वेळी 'श्रीं' च्या आठवणींने डोळे भरून यायचे. मी खुलासा केल्यावर त्यावर काही न बोलता ते शांत बसले. व मी? त्यांच्या शक्तीची कल्पना आपल्याला कशी व कधी येणार? कारण सर्व गुण दैवी शक्ती लपवून ठेवलेली कुठेही उच्चार नाही, प्रदर्शन नाही संयमाची पूर्ण प्रतिमा म्हणजे आमचे महाराज! (पू.ती. सौ. ताईमहाराज मागे एकदा म्हणाल्या होत्या की बघा 'श्री' महाराजांनी आपल्याला सर्वांना सोन्याच्या तारेत गुंफले आहे! अक्षरश: खरे आहे. आश्रमात रक्ताच्या नात्यापेक्षा सुद्धा नाती दृढमूल झाली. सर्वांच्या मनात कौटुंबिक भावना निर्माण झाली. पू.ती.सौ.ताई महाराज व 'श्रीं' नी आमच्यावर प्रेमाची पाखर घातली आहे त्याला तोडच नाही. आमच्या सर्वांसमोर आदर्श ठेवले.)

'श्रीं' च्या फोटोसमोर आपण बोललो की ते त्यांच्या पर्यंत पोचते असे मी घरात मुलांना नेहमी म्हणत असते. मुलगा पुण्याला कॉलेजमधे शिकत असतानाची गोष्ट- तो दोन दिवस सुटीचा घरी आला होता व दुसऱ्या दिवशी निघणार होता. मी 'श्री' च्या करता आळीवाचे लाडू, चिवडा व आल्याच्या वड्या तयार करून मुलाजवळ दिल्या. त्यांच्या फोटोसमोर बसून ''महाराज ह्याचा स्वीकार करा बरं'' असे म्हणत पिशव्या भरल्या व मुलाजवळ दिल्या. दुसऱ्या दिवशी मुलगा 'रेणुका निवासात' घरी गेला. 'श्रीं' चे दर्शन झाल्यावर लाडू व चिवड्याची पुडी काढली. आल्याच्या वड्या राहिल्या. 'श्रीं' नी पटकन विचारले की' पिशवीत काही आहे कां?' असे विचारताच त्याला वडीची आठवण आली. पण 'श्री'

नी कृष्णाने जसे सुदाम्याचे पोहे खाल्ले तसेच ते स्वीकारून मी सर्वत्र आहे ही खात्री मुलांना पटवून दिली. परमेश्वराला काय कमी आहे? पण तो भावाचा भुकेला आहे. आपल्या इच्छेकरता ते स्वीकारतात हेच खरें!

ती.सौ. प.पू.आई साहेब निर्गुणात गेल्या तेव्हांची गोष्ट. त्यांना फाटकापर्यंत पोचवून 'श्री' आपल्या खोलीत जाऊन शांत बसले होते. कामासाठी मी तेथे राहण्याचे ठरवले. खोलीत गेल्यावर प्रथम त्यांनी मला सांगितले की ''आपण दूध वगैरे काही घेतले कां? काही घ्या''. केवढी स्थितप्रज्ञता! कुठेही विचलितपणा दिसला नाही. तोच संयम तीच शांत मुद्रा! त्या परिस्थितीतही पूर्ण व्यवहाराचे भान!

सर्व सूत्रधार तेच, पण पुढे होऊन काही सांगणे बोलणे नाही मोठेपणा नाही सर्व कार्य गुपचूपपणे चाललेले! ह्याचे उदाहरण-

माझा मुलगा दुसऱ्या नोकरीला रुजू होण्यापूर्वी रजेवर होता. तो व त्याचे दोन तीन मित्र तिरूपतीला गेले. तेथे त्याला पाण्यामुळे त्रास झाला. घरी आल्यावर ताप आला एकटाच राहात होता. आम्हाला कळवले नाही. तापाने घसा सुजून आला त्याला अन्न जाईना. नचिकेत पुण्याला हॉस्पीटलमध्ये ॲडमिट झाल्यावर फोन आला. त्याला तेथे पाहिजे तशी विश्रांती मिळाली नाही. बी.पी. खाली आले म्हणून त्याला जोशी हॉस्पिटलला ॲडमिट केले. पण आमच्या मनातले पाणी जरा सुद्धा ढळले नाही. महाराज आहेत. काही काळजी नाही ही माझी दृढ भावना होती. घरी दर्शनाला गेलो की प्रकृतीची चौकशी व्हायची. डॉक्टरच आजारी पडले व दुसरे डॉक्टर आले. एकवीस दिवस ताप होता. आय सी यू मधे होता.

डॉ.तळवळकर एक दिवस त्याच्या रुममधे येऊन त्याचा चार्ट बघून गेले. तेव्हाच मी मनात खूण गाठ बांधली की हा बरा होणार. व उद्या परत डॉ. त्याला बघायला येतील. तसेच झाले. डॉ.तळवळकर त्याच्या जवळ येऊन चौकशी करून गेले. व दुपारनंतर त्याचा ताप गेला. दुसऱ्या दिवशी तो जनरल वार्डमधे आला. त्या डॉक्टराना जाताना मी नमस्कार केला,ते संकोचले. त्यांना मी म्हटले हा नमस्कार महाराजांना आहे. तुमच्या मार्फत त्यांनी त्याला कृपा दृष्टीने

बरे केले हा माझा विश्वास आहे. हे डॉक्टर रोज 'श्रीं'ना तपासण्यास जात तेव्हांही 'श्री' त्यांच्या जवळ मुलाच्या तब्येतीची काळजी व्यक्त करीत. पण एवढ्या मोठ्या दुखण्यातून 'श्री' नी अलगद् बाहेर काढले. आपण नामानिराळे राहून! कोणाकडून जप करुन घेतला तर कुणाला दवाखान्यात पाठवले. त्याला स्वप्नान दृष्टांत देऊन उलगडा केला तो वेगळाच! ह्या मायेला, ह्या त्यांच्या लीलेला काय म्हणायचं?

गुरुसारखा असता पाठीराखा। इतराचा लेखा कोण करी । किंवा गुरु ही कामधेनू आहे. माऊली आहे. हे म्हटलेले वृथा जाईलच कसे? गर्दीत मुलाने आईचा हात धरला तर तो सुटला जातो पण जर आईने मुलाचा हात धरला तर तो सुटत नाही. तसेच सद्गुरुने आपला हात धरला की ऐलतीरावरून पैलतीरावर आपली जीवन नौका ते योग्य स्थळी नेणारच. ह्यात काय संशय?

तुम्ही चुकीच्या मार्गाने थोडेतरी जाऊ लागलात की ते तुम्हाला कसेही,पण सावध करतात. असे अनुभव खूप वेळा आले.

******